
सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
४० वा वर्धापन दिन
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर
सोमवार, ५ ऑगस्ट २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ३८ वे अंक २७६ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### जानकीबाई वाचनालयाच्या वतीने महिला चालक, वाहकांचा सन्मान

**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**
बाळगी (ता.द.सोलापूर) येथील जानकीबाई वाचनालयाच्या वतीने व ग्रामस्थांच्या वतीने एसटी महामंडळाच्या वाहक, चालकांच्या सन्मानाचे आयोजन करण्यात आले होते. आषाढी वारीमुळे राज्य परिवहन महामंडळाच्या वाहक चालकांना वेगवेगळ्या मार्गांवरून काम करावे लागते. एक आगस्ट रोजी सोलापूर विभागाची एसटी बस भंडार कवठे मार्गे बाळगी येथे आली होती. चालक संजीवनी गुरव, वाहक मुमताज बेगम मोमीन यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन हणमंत बिज्जरगी यांनी केले.



### बालरंगभूमी परिषद लोककला कार्यशाळेला बालकांचा प्रतिसाद

**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**
बालरंगभूमी सोलापूर जिल्हा शाखेच्यावतीने लोककला कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती या कार्यशाळेत सोलापूर शहरातील विविध शाळेतील ६ ते १५ वर्षे वयोगटातील मुले-मुली यांचा सहभाग होता. या कार्यशाळेत २०० बालकलाकारांनी उपस्थिती नोंदविली होती. कार्यशाळेचे उद्घाटन सोलापुरातील प्रसिद्ध नृत्य दिग्दर्शक राजेश पंचे, यांच्या हस्ते करण्यात आले. ज्येष्ठ नाट्य कलावंत विद्या काळे, लेखक व दिग्दर्शिका डॉ.मीरा शेंडगे, हे होते तर अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रकाश यलगुलवार होते. प्रारंभी बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा सीमा यलगुलवार प्रास्ताविक करून या कार्यशाळेच्या उपक्रमाची माहिती दिली. यानंतर दीपपूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यशाळेत महाराष्ट्रातील लोककलांचा इतिहास व सध्याची स्थिती या विषयावर प्रशांत देशपांडे यांनी मुलांना प्रोजेक्टरद्वारे गीत व संगीत दाखवून मार्गदर्शन केले तर अनिल लोंढे यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनावरील वीररसाचे गीत गायले. तर राजेश पंचे यांनी लोकनृत्याची ओळख करून दिली. सूत्रसंचालन उपाध्यक्ष अर्चना आयाचित यांनी केले तर आभार कार्यकारणी सदस्य सुभाष माने यांनी मानले. यावेळी अमृता भानप, मुख्याध्यापक प्रा.नरसिंह आसादे, सल्लागार पद्माकर कुलकर्णी, प्रा.जोतिबा काटे, सुमित फुलमामडी, कोषाध्यक्ष सुनंदा शेंडगे, सदस्य किरण फडके, श्रद्धा हुलेनवरु, दिपक कलढोणे उपस्थित होते.



### भगवती गौरीमाता प्रशालेत पालक-शिक्षक सभा

**सोलापूर, दि.४ ऑगस्ट-**
दक्षिण सोलापूर तालुक्यातील धोत्री येथील श्री भगवती गौरीमाता प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात पालक शिक्षक सभा झाली.सभेच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक गिरमल बुगडे होते. यावेळी पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्षपदी श्रीदेवी सावंत्रे यांची तर सहसचिवपदी गेनसिद्ध उमरदंड यांची एकमताने निवड करण्यात आले. यावेळी अर्चना बिराजदार, सिद्धाराम बिराजदार, बाबुशा हाटकर, चंद्रकांत कारभारी, महादेवी लक्ष्मण कलशेट्टी, सलीम पटेल, मल्लिनाथ कोरे, बसवराज बिराजदार, कन्याकुमारी रवींद्र माळी,पार्वती मल्लिनाथ तोळणूर, बसवराज नंदनगे, रंजना गौरीशंकर बनसोडे आदी नूतन कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. प्रशालेचे माजी पर्यवेक्षक राजकुमार पाटील, गेनसिद्ध प्रशालेचे माजी मुख्याध्यापक बाबुशा चौगुले, पालक शिक्षक संघाचे माजी उपाध्यक्ष लक्ष्मण बिराजदार, पर्यवेक्षक सचिन देगावकर आदी मान्यवरांच्या हस्ते नूतन उपाध्यक्ष सावंत्रे व सहसचिव उमरदंड यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन मल्लिकार्जुन गुरव यांनी केले तर ज्येष्ठ शिक्षक मल्लेशा व्हनमाने यांनी आभार मानले.



### नरसिंह विद्यालयाचे कुस्ती स्पर्धेत यश

**सोलापूर, दि.४ ऑगस्ट-**
रयत शिक्षण संस्थेच्या नरसिंह विद्यालय कदेहळळी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी कुस्ती क्रीडा स्पर्धेत यश संपादन केले. श्रीकृष्ण कुस्ती केंद्र आयोजित केलेल्या पावसाळी क्रीडा स्पर्धेत कुस्ती प्रकारामध्ये ५२ किलो वजनी गटाखालील गटात छत्रवीर कृष्णा पवार याने प्रथम क्रमांक संपादन केले तर द्वितीय क्रमांक प्रसाद महादेव सपकाळ याने मिळविला तसेच १७ वर्षीय वयोगटांमध्ये ८१ किलो वजना खालील गटात पांडुरंग खंडू कांबळे याने द्वितीय क्रमांक संपादन केला आहे या यशाबद्दल संस्थेचे मध्य विभागाचे चेअरमन संजीव पाटील, मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य प्राचार्य डॉ.सुरेश रामचंद्र, ढेरे स्कूल कमिटीचे चेअरमन नाना सावंत, मुख्याध्यापक बिराजदार, शिक्षक शिक्षकेतर सेवक, सरपंच, ग्रामपंचायतचे सदस्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# डीपी रस्त्याबाबत पालकमंत्री पाटील यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**
सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांना जुना प्रभाग क्रमांक २६ ब मधील मंजूर तक्त्याप्रमाणे नमूद डांबरी डी.पी. रस्त्याची शासनाच्या योजनेतून मंजूर करून त्यांना शासन प्रशासन स्तरावर निधी उपलब्ध करून देण्याबाबत निवेदन दिले होते. ते अद्याप पर्यंत मंजूर झाले नाही. दरम्यान याचबाबत पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांना भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा माजी नगरसेविका राजश्री चव्हाण यांच्याकडून निवेदन देण्यात आले आहे.

प्रभाग २६ ब मधील स्मरणपत्रात नमूद करण्यात आलेल्या बाबी. रेणुका नगर येथील भीमाशंकर अपार्टमेंट ते उद्धव नगर



भाग एक प्लॉट नंबर १८ गदगी घरापर्यंत डी.पी. रस्ता मंजूर असून सदर ठिकाणी डांबरी रस्ता होण्याबाबत. आर्यन वर्ल्ड स्कूल ते रेणुका नगर जवळील भीमाशंकर अपार्टमेंट येथील डांबरी रस्ता करणे. रेणुका नगर भीमाशंकर अपार्टमेंट,श्रीकृष्ण बाग, साक्षीनगर,उद्धवनगर, रेणुका नगर, बंडे नगर ,दततारा पार्क, प्रल्हाद नगर,प्रियंका नगर,रजनीश रेसिडेन्सी पार्क,आदित्य रेसिडेन्सी,विश्व नगर, शिवभारत पार्क,चंडक मळा ते विजापूर रोड हायवे टच डी.पी. रस्ता मंजूर असून सदर ठिकाणी डांबरी रस्ते करणे. कोरे वस्ती, शाहूनगर, राऊत वस्ती, वास्तु विहार नगर, ए जी पाटील नगर,परमेश्वर नगर, कल्याण नगर भाग एक ते तीन, समर्थ नगर, मीना नगर, बंडापानगर, सुभाष शहा नगर असे जवळपास ३० नगरांमधील समस्या उदा. ड्रेनेज, पाण्याची पाईपलाईन,अंतर्गत रस्ते,दिवाबत्ती करणे. आदिवासी पारधी समाजातील आय. टी.आय. कोर्स पूर्ण करून महावितरण कडून कोर्स पूर्ण करून सुद्धा उद्यापर्यंत त्यांना नोकरीची संधी देण्यात आलेली नाही त्यामुळे आदिवासी पारधी समाजातील सुशिक्षित बेरोजगार यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली असून त्यांना लवकरात लवकर महावितरण विभागात नोकरीची संधी मिळवून द्यावी. सर्व प्रलंबित मागण्याचे स्मरणपत्र सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांना निवेदन दिलेले आहेत.

## रोजगार मेळाव्यात १७१ उमेदवारांची निवड

**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**
जिल्हा कौशल्य विकास रोजगार उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर तसेच रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर व गुरुप्रसाद स्किल डेव्हलपमेंट सेंटर पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर येथे पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये १५ उद्योजकांमार्फत प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे १७१ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली असल्याची माहिती कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकताचे प्र.सहाय्यक आयुक्त हणमंत नलावडे यांनी दिली. या मेळाव्यास रयत शिक्षण संस्थेचे सदस्य अमरजीत पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जे खिल्लारे तसेच गुरुप्रसाद स्किल डेव्हलपमेंट सेंटरचे संचालक सर्जेराव पवार, प्रा. बी.बी नाईकनवरे, प्रा.एम. ए चंदनशिवे आदी मान्यवर उपस्थित होते.

# 'रोटरी' म्हणजे सत्पात्री दानाचे उत्तम उदाहरण

**पंचांगकर्ते दाते यांचे प्रतिपादन**

**रोटरी अन्नपूर्णा योजनेद्वारे १०० वृद्धांना दिला आधार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**
रोटरीची अन्नपूर्णा योजना म्हणजे सत्पात्री दानाचे उत्तम उदाहरण असल्याचे पंचांगकर्ते अनंत (मोहन) दाते यांनी सांगितले. हिंदू धर्मशास्त्रानुसार दानाचे महत्व खूप मोठे आहे . देहदान, अन्नदान, नेत्रदान,रक्तदान अशा विविध प्रकारची दाने आपण करीत असतो, तेव्हा त्याचा आपल्याला लाभ होतो, असे पंचांगकर्ते दाते यांनी सांगितले.



रोटरी क्लब ऑफ सोलापूरच्या अन्नपूर्णा योजनेला १७ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. रोटरी अन्नपूर्णा योजनाद्वारे रोटरी क्लब ऑफ सोलापूरने १०० वृध्दांना आधार दिला आहे. तत्पूर्वी रोटरी अध्यक्ष सी.ए.सुनील माहेश्वरी यांनी प्रास्ताविक केले. तर सुहास लाहोटी यांनी रोटरी अन्नपूर्णा योजनेचा आढावा घेतला. ही योजना गेली १६ वर्षे चालवणार्या उद्योगवर्धिनी बचत गटाच्या संचालिका चंद्रिका चौहान तसेच रिक्षाचालक शरणय्या हिरेमठ, राम चौगुले यांच्या दैनंदिन उत्स्फूर्त सहभागामुळेच गेली १७ वर्षे एकही दिवसाचा खंड न पडता चालू असल्याचा त्यांनी उल्लेख केला.

अन्नपूर्णा योजनेने सोलापूरात नव्हे तर भारतात आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळवला आहे. ८,१०० देणगी दिल्यास एका व्यक्तिचे वर्षभरासाठी एक डब्याचे पालकत्व सध्या देण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. रोटरी क्लबचे सहसचिव निलेश फोफलिया यांनी आभार प्रदर्शन केले. तर माजी अध्यक्ष सी.ए. राज मिणियार यांनी सूत्रसंचालन केले. सोहळ्यात प्रत्येक लाभार्थ्यांना ब्रिजकुमार गोयदानी यांच्यातर्फे नॅपकिन भेट देण्यात आले. आजच्या १७ व्या वर्षपूर्ती सोहळ्याचा संपूर्ण खर्च रोटे आणि राज मिणियार यांच्यातर्फे करण्यात आला. कार्यक्रमास जयेश पटेल, बी. एस. मुंदडा, धनश्री केळकर, खुशाल देढीया, विशाल वर्मा, सुरेश बिटला, पारुल पटेल, ज्योती चिडगुपकर, केतन व्होरा,विद्या मणुरे , कालिदास जाजू, पराग कुलकर्णी, भूपती गुंडेली, सुरज तापडिया, संदीप जव्हेरी सह इतर रोटरी सदस्य आणि समाजातील मान्यवर उपस्थित होते.




## कर्करोगापासून दूर राहण्यासाठी आरोग्यदायी जीवन जगा : डॉ. कुमठेकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**
कॅन्सरपासून दूर राहण्यासाठी चांगले आरोग्यदायी जीवन जगणे महत्त्वाचे आहे. कॅन्सर हा दुर्धर आजार असून वेळेवर अचूक निदान न झाल्यास रुग्णाचा मृत्यू ओढवतो. वाढत्या व्यसनाधीनतेमुळे कॅन्सरचे प्रमाण समाजात वाढत असून व्यसनांमुळे मन व शरीर खराब होते,असे प्रतिपादन प्रसिद्ध कर्करोगतज्ञ व सोलापूर कॅन्सर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. शिरीष कुमठेकर यांनी केले. ए.आर.बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय व सोलापूर कॅन्सर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने 'व्यसनांचा विळखा, कॅन्सरचा धोका' या विषयावर विशेष प्रबोधनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.टी. एन. शिंदे हे उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.डॉ. शंकर राजे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.डॉ.रंजना बनसुडे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



## टीबीमुक्त अभियानामध्ये जिल्ह्यातील ५३ ग्रामपंचायती पात्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**
जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम अंतर्गत टीबी मुक्त ग्रामपंचायत अभियानामध्ये जिल्ह्यातील ५३ ग्रामपंचायत पात्र ठरल्या. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते महात्मा गांधी यांचा पुतळा व प्रशस्तीपत्र देऊन या ग्रामपंचायतींचा गौरव करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. मीनाक्षी बनसोडे जिल्हा क्षयरोग अधिकारी यांनी केले. यावेळी इशाधीन शेळकंदे, डॉ. संतोष नवले, डॉ. सुवर्णा रामटेके, डॉ. विनोद अभिवंत तसेच सर्व तालुका गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, सरपंच व जिल्हास्तरीय कर्मचारी वर्ग आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यामध्ये टीबी हा रोग संसर्गजन्य असून, यावर रुग्णांनी व नातेवाईकांनी न घाबरता वेळेवेळी उपचार घेऊन आपला क्षयरोग समूळ नष्ट करावा व समाजामध्ये क्षयरोग पसरणार नाही याची सर्व स्तरातून दक्षता घेणे आवश्यक आहे. तसेच आपले गाव, आपला तालुका, आपला जिल्हा क्षयरोगमुक्त होईल या बाबत मार्गदर्शन केले.

## १,४४० रिक्षांचे प्रमाणपत्र नूतनीकरण

**सर्व प्रकारच्या वाहनधारकांनी योग्यता प्रमाणपत्र नूतणीकरण करून घेण्याचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट -**
पंधरा वर्षांच्या आतील सर्व परिवहन वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणास विलंब झाल्यानंतर प्रतिदिवस ५० रुपये विलंब शुल्क आकारण्याच्या कार्यवाहीस राज्य शासनाने १२ जुलै रोजी स्थगिती दिली आहे. या दिवसापासून ३१ जुलैपर्यंत सोलापुर प्रादेशिक परिवहन कार्यालयात १४४० रिक्षाचालक व मालकांनी योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण घेतले आहे. राज्या शासनाने दिलेल्या सवलतीचा योग्यता प्रमाणपत्र न घेतलेल्या वाहनचालकांनी लाभ घेत त्यांच्या वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण करून घेण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार यांनी केले आहे.

विलंब शुल्क माफ करणे / विलंब शुल्काच्या आकारणीमधून सूट देण्याबाबत ऑटोरिक्षा-टॅक्सी चालक संघटना तसेच विविध परिवहन संवर्गातील वाहन धारकांच्या संघटना यांच्याकडून शासनाकडे निवेदने देण्यात आली होती. या निवेदनांचा व मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी १५ वर्षांच्या आतील सर्व परिवहन वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणास विलंब झाल्यानंतर प्रतिदिन रुपये ५० एवढे विलंब शुल्क आकारण्याच्या कार्यवाहीस पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देण्याची घोषणा केली. वास्तविक राज्य शासनाच्या या घोषणेमुळे सोलापूरमध्ये १४० कोटींच्या महसुलाला फटका बसला असून राज्यभरामध्ये हजारों कोटीच्या महसुलाला शासनाला मुकावे लागले आहे. १२ जुलै रोजी शासनाने योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणास विलंब झाल्यानंतर प्रतिदिन ५० रुपये विलंब शुल्क आकारणीस स्थगिती दिल्यानंतर सोलापूर प्रादेशिक परिवहन कार्यालयांत १४४० रिक्षाचालक व मालकांनी त्यांच्या वाहनाचे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण करून घेतलेले आहे. दररोज किमान ७० ते ८० वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण करून देण्यात येत असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. सोलापूर प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या हद्दीत १ जानेवारी २०१७ ते ३० जून २०२४ योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण करून न घेतलेली १२ हजार ७२९ वाहने आहेत.

## पद्मशाली सखी संघमच्या अध्यक्षपदी मेघा इट्टम

**सचिवपदी पूजा चिप्पा**

**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**
पद्मशाली सखी संघमच्या सन २०२४-२५ या वर्षांकरता नूतन अध्यक्षपदी मेघा इट्टम यांची तर, सचिवपदी पूजा चिप्पा यांची निवड संस्थापक गौरीशंकर कोंडा यांनी केले आहे. दाजी पेठ येथील श्रीराम मंदिरात पद्मशाली सखी संघमच्या नवीन पदाधिकारी व सदस्यांची




निवड करण्यासाठी झालेल्या या बैठकीत अन्य पदाधिकारी निवड करण्यात आले. उपाध्यक्ष मंजुळा आडम, कल्याणी पेनगोंडा, सहसचिव लक्ष्मी कोडम, खजिनदार आरती बुधाराम, सहखजिनदार विद्या सिंगम, कार्याध्यक्षा अन्नपूर्णा सोमा, सहकार्याध्यक्षा आरती आडम, समन्वयिका गीता भूदत्त, कला चन्नापट्टण, मार्गदर्शिका प्रा. सपना मिठ्ठापल्ली, सल्लागार- ममता मुदगुंडी, सीमा यलगुलवार. कार्यकारिणी सदस्या वनिता सुरम, अॅड. मेघना मलपेद्दी, भाग्यश्री मड्डूर, हेमा मैलारी, पद्मा मेडपल्ली, पल्लवी संगा, सुनिता दारा, सविता अंबाल, मीना कंदीकटला, अनिता कोंका, सुजाता इंदापूरे, विद्या श्रीगादी, सोनाली तुम्मा, सुनिता निलम (क्यामा) यांची निवड करण्यात आली.

## तू भेटशी नव्याने मालिकेला प्रेक्षकांची पसंती

**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**
वैविध्यपूर्ण आशय-विषय यामुळे काही मालिका प्रेक्षकांच्या पसंतीस अल्पावधीतच उतरतात. सध्या अशाच एका मालिकेची जोरदार चर्चा आहे, ही मालिका म्हणजे सोनी मराठी वाहिनीवरील तू भेटशी नव्याने.मालिका विश्वात एक वेगळं पाऊल टाकत तू भेटशी नव्याने मालिकेच्या माध्यमातून पहिली एआय मालिका प्रेक्षकांसाठी आणली आणि अल्पावधीतच या मालिकेनं प्रेक्षकांची मनं जिंकली.अभिनेता सुबोध भावे आणि अभिनेत्री शिवानी सोनार यांची फ्रेश जोडी आणि प्रेमाचा विषय आगळ्यावेगळ्या पद्धतीनं मांडल्यामुळे ही मालिका प्रेक्षक पसंतीस उतरली आहे.अगदी सुरुवातीपासूनच या मालिकेला अतिशय उत्तम प्रतिसाद मिळालाय,याबद्दल सोनी मराठी वाहिनीचे बिझनेस हेड अजय भाळवणकर यांनी सांगितलं,मालिकेला मिळणारं प्रेक्षकांचं प्रेम पाहून चांगलं काम करायला अजून उत्साह मिळतो.

# अवयवदान जनजागरण रॅलीमध्ये तीन हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट -**
डॉ.वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित अवयवदान महाअभियानाच्या शुभारंभ पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.प्रकाश महानवर यांच्या हस्ते करण्यात आले. या अवयवदान जनजागरण रॅलीमध्ये तीन हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रांगणातून या रॅलीचा शुभारंभ प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते हवेत फुगे सोडून करण्यात आला.



या कार्यक्रमाच्या सुरुवातीला चि. पृथ्वी वरवटे (रा. उमरगा) मेंदूमृत रुग्ण यांनी अवयवदान करुन सहा लोकांना जीवदान दिले, त्यानिमित्ताने श्रध्दांजली वाहण्यात आली. या कार्यक्रमाला डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रभारी अधिष्ठाता डॉ.विद्या तिरणकर, उपअधिष्ठाता डॉ. नरेश झंजाड, अश्विनी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुहास कुलकर्णी, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशनचे डॉ. श्रीकांत येळेगांवकर, डॉ. एन. बी. तेली, डॉ. संतोष हराळकर, अश्विनी सहकारी रुग्णालयाचे संचालक अशोक लांबतुरे, व सोलापूर विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख डॉ. राजेंद्र वडजे, डॉ. अभिजीत जगताप, डॉ. तोडकर उपस्थित होते.

रॅलीचे सूत्रसंचालन अशोक लांबतुरे यांनी केले. यावेळी अवयवदान समितीचे अध्यक्ष डॉ. व्ही.एन. धडके यांनी अवयवदानाची उपस्थितांना शपथ दिली.

जागतिक अवयवदान दिनाचे औचित्य साधून पोस्टर स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा आयोजित केले होते. या स्पर्धामधील प्रथम, द्वितीय व तृतीय विजेत्यांना पारितोषिक वितरण कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर आणि मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

सदर जनजागरण दिंडी (रॅली) डॉ.वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथून प्रारंभ पोटफाडी चौक सिध्दार्थ हौसिंग सोसायटी कुंभार गल्ली जगदंबा चौक -लष्कर -सात रस्ता- संगमेश्वर कॉलेजमार्गे गरुड बंगला रोटरी बगीचा मार्ग- भगतसिंग मार्केट- समारोप अश्विनी सहकारी रुग्णालयाच्या मैदानामध्ये समारोप करण्यात आला. डॉ.वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अश्विनी ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय व संशोधन केंद्र कुंभारी व अश्विनी सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र नियमित, सोलापूर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ (राष्ट्रीय सेवा योजना विभाग) व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने ही रॅली काढण्यात आली. याप्रसंगी डॉ. हराळकर, डॉ. कसबे, डॉ. दंतकाळे, डॉ. शुभांगी धडके, डॉ. बंदीछोडे, डॉ.सोनवणे, डॉ.काबरा, डॉ.प्रशांत औरंगाबादकर, सचिन बिज्जरगी, प्रा. फरझाना पटेल, डॉ. एस.एस. पन्हाळकर, बाबुराव चंद्रकवठे, डॉ. श्रीनिवास जगताप, प्रा.विजय माने, तात्या पवार, नंदकिशोर सगरे, डॉ.ए.एस. शिंदे, प्रा.डॉ. रंजना बनसुडे, प्रा.डॉ.विकास शिंगे, हणमंतु सलगर, ज्ञानेश्वर जोशी, डॉ. एस.एस. पाटील, डॉ.धनंजय मोगले, ममता बाळासाहेब कुलकर्णी, दुमालदार, प्रा. आयेशा रंगरेज, व्ही.सी. परदेशी, सतिश राठोड आदी उपस्थित होते. या रॅलीच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम मार्केटींग ऑफिसर स्वप्नील लांबतुरे, उमेश शिवशरण, अवधूत कुलकर्णी, मनोज परदेशी, सुर्यकांत कवलगी, नागराज दंतकाळे, नीळकंठ चौगुले, दत्तात्रय यलपले यांनी घेतले. या रॅलीचे समारोपप्रसंगी आभार सुगरत्न गायकवाड यांनी मानले.

सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
४० वा वर्धापन दिन
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | सोमवार, ५ ऑगस्ट २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३८ वे अंक २७६ |
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## ▶▶ महत्त्वाचे...

### पंतप्रधान मोदी जगातील सर्वांत लोकप्रिय नेते

**नवी दिल्ली :** भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा एकदा जगातील सर्वांत लोकप्रिय नेते बनले आहेत. मॉर्निंग कन्सल्ट नावाच्या ग्लोबल डिसिजन इंटेलिजेंस फर्मने जगातील २५ देशांच्या प्रमुखांची मान्यता रेटिंग जारी केली. यादीत पंतप्रधान मोदी ६९ टक्के रेटिंगसह पहिल्या स्थानावर आहेत. या यादीत मेक्सिकोचे राष्ट्राध्यक्ष आंद्रेस मॅन्युएल लोपेझ ओब्राडोर यांना दुसरे स्थान मिळाले. त्यांची मान्यता रेटिंग ६० टक्के होती. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांचा टॉप-१० नेत्यांमध्येही समावेश नाही. ३९ टक्के मान्यता रेटिंगसह ते १२ व्या क्रमांकावर आहेत. त्याच वेळी २५ वे म्हणजेच शेवटचे स्थान जपानचे पंतप्रधान फुमियो किशिदा यांना मिळाले. त्यांचे रेटिंग १६ टक्के होते.



**सर्वेक्षणातून रेटिंग**

ग्लोबल लीडर अप्रूव्हल रेटिंग ट्रॅकर वेबसाईट मॉर्निंग कन्सल्टनुसार, ही यादी ८ ते १४ जुलै दरम्यान गोळा केलेल्या डेटावर आधारित आहे. प्रत्येक देशात १८ वर्षांपेक्षा जास्त लोकांचे सर्वेक्षण केल्यानंतर सरासरी सात दिवसांनी मान्यता रेटिंग निश्चित केली जाते.

# श्रीक्षेत्र अरण तीर्थक्षेत्र विकासासाठी १०० कोटींचा निधी मंजूर

## तीर्थक्षेत्राचा 'अ' वर्ग दर्जाही

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ४ ऑगस्ट-**

संत शिरोमणी सावता महाराज यांची जन्मभूमी व कर्मभूमी असलेले श्री क्षेत्र अरणचा तीर्थक्षेत्र म्हणून पाहिजे तेवढा विकास झालेला नाही. परंतु या तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासाचा सविस्तर आराखडा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने तयार केला जात आहे. यासाठी आवश्यक असलेला सर्व निधी राज्य शासन उपलब्ध करून देणार आहे. परंतु या तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासाच्या आराखड्यातील १०० कोटीचा पहिला हप्ता आपण आज मंजूर करत असून, या तीर्थक्षेत्राला अ वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देणार असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

श्रीक्षेत्र अरण तालुका माढा येथील श्री संत शिरोमणी सावता महाराज भक्त परिवार मेळावा व भक्तनिवास वास्तुशिल्प भूमिपूजन कार्यक्रम प्रसंगी उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी आमदार राम शिंदे, जयकुमार गोरे, राम सातपुते, योगेश टिळेकर, सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार राम कांडगे, बळीराम शिरस्कर, संत शिरोमणी सावता महाराज चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष रविकांत महाराज वसेकर, प्रभू महाराज माळी, महामंडलेश्वर मनीषानंद महाराज यांच्यासह सावता महाराज यांचे भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. फडवणीस पुढे म्हणाले की, संत सावता महाराजांनी संपूर्ण महाराष्ट्राला भक्ती मार्गावर चालण्याचा एक वेगळा विचार दिला तसेच समाजाला एकसंघ ठेवण्याचे कार्य केले. आपल्या कर्मात मग्न असलेल्या सावता महाराजांना भेटण्यासाठी पंढरपूर येथून विठूरायाची पालखी अरण येथे येते ही ही घटना खूप महत्त्वाची आहे व १२९५ मध्ये अरण येथे संत शिरोमणी सावता महाराज यांनी संजीवन समाधी घेतली. शेकडो वर्षापूर्वी सावता महाराजांनी मांडलेले विचार आजही समाजाला दिशादर्शक ठरत आहेत. आजच्या समाजाला ही संतांच्या विचारांची नितांत गरज आहे. आपल्या राज्यातील समाज जाती-जातीमध्ये विखंडित होत आहे. मताच्या राजकारणामुळे समाजामध्ये दरी निर्माण होत आहे. सर्वांना सोबत घेऊन एकसंघ समाज निर्माण करण्याचे जी संतपरंपरेची विचारसरणी होती ती विचारसरणी अंगीकरणाची गरज आहे त्यातूनच एक सुदृढ समाज निर्माण होऊ शकेल, असे मत उपमुख्यमंत्री फडवणीस यांनी व्यक्त केले. मराठी भाषेला अभिजीत भाषेचा दर्जा देण्यासाठी संत शिरोमणी सावता महाराजांचे मराठीत लिहिलेले अभंग महत्वपूर्ण पुरावा आहे.



### संत सावता महाराज भक्तनिवास, वास्तुशिल्प कामाचे भूमिपूजन

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अन्न नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे व मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून संत सावता महाराज भक्त परिवार मेळावा कार्यक्रमाचा शुभारंभ व विविध विकास कामाचे भूमिपूजन करण्यात आले. तसेच संत सावता महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संत शिरोमणी सावता महाराज यांच्यावर आधारित असलेले संत सावता माळी अभंग व विचार या पुस्तकाचे प्रकाशन यावेळी झाले. या पुस्तिकेच्या लेखिका प्रो. सुवर्णा चव्हाण गुंड या आहेत.

पुणे येथील भिडे वाडा केस राज्य शासनाने जिंकलेली असून या वाड्याच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा तयार करण्यात आला असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते येथील कामाचे भूमिपूजन लवकरच करण्यात येईल असे माहिती श्री फडणवीस यांनी दिली. राज्य शासनाने विविध शासकीय योजना महिला व मुलीसाठी सुरू केलेल्या आहेत. उच्च शिक्षणात क्रांतिकारी निर्णय घेतला असून मुलींना मोफत उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही एक महत्वपूर्ण योजना आहे. तसेच इतर मागासवर्ग विभागाला भरघोस निधी उपलब्ध करून देऊन या अंतर्गत येणाऱ्या समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासन प्रयत्नशील आहे.

परमार्थ करण्यासाठी संसार त्यागण्याची आवश्यकता नाही हा महत्त्वपूर्ण विचार संत शिरोमणी सावता महाराज यांनी मांडला. आपलं कर्तव्य व कर्म करत रहावे ही शिकवण सावता महाराजांनी दिली, अशी माहिती अन्न नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी सांगून संत शिरोमणी सावता महाराज वास्तुशिल्प आराखड्यासाठी शासनाकडून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. अरण तीर्थक्षेत्राचा सर्वांगीण विकास आराखडा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने तयार करण्यात येत आहे. लवकरच या भागाचा विकास होऊन भक्तांना येथे चांगल्या सुविधा उपलब्ध होतील अशी माहिती त्यांनी दिली. सर्वोच्च न्यायालयात भिडे वाड्याचा निकाल राज्य शासनाच्या बाजूने लागला असून, १५ ऑगस्ट २०२४ नंतर २०० कोटीच्या विकास आराखड्याचे भूमिपूजन प्रधान मंत्री महोदय यांच्या हस्ते करण्याचा मानस श्री भुजबळ यांनी व्यक्त केला. राज्य शासनाने सर्व मुलींना मोफत शिक्षणाचा हक्क उपलब्ध करून दिलेला आहे शासनाचा हा निर्णय म्हणजेच सावित्रीबाई फुले यांचेच काम शासन नेटाने पुढे नेत आहे. राज्य शासन लाडकी बहीण योजना, युवा प्रशिक्षण कार्यक्रम, शेतीला मोफत वीज, मागेल त्याला सौर पंप, तीन सिलेंडर मोफत योजना, मुख्यमंत्री तीर्थटन या योजनांच्या माध्यमातून सर्वसामान्यांना न्याय मिळवून देणार आहे.



सोलापूर : दैनिक तरुण भारतच्या ४० व्या वर्धापन दिनानिमित्त राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या शुभेच्छा स्वीकारताना तरुण भारतचे मुख्य समूह संपादक दिलीप पेठे आणि निवासी संपादक प्रशांत माने. छायाचित्र : नागेश दंतकाळे




दै. 'तरुण भारत'च्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा...!




दै. 'तरुण भारत'च्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा...!



सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# जागतिक अन्नसुरक्षेसाठी भारत कटिबद्ध

भारत आता अतिरिक्त अन्नधान्याचा देश बनला आहे. जगातील अन्नसुरक्षा तसेच पोषकत्त्व पुरविण्यावर आता आमचा देश काम करीत आहे, हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आंतरराष्ट्रीय कृषी तज्ज्ञांच्या परिषदेतील वक्तव्य विश्वकल्याणासाठी तसेच शाश्वत विकासासाठी भारत कटिबद्ध असल्याची ग्वाही देणारे आहे. जगभरातील शेती आणि त्याच्याशी संबंधित समस्यांवर उपाय शोधण्यासाठी आंतरराष्ट्रीय कृषी तज्ज्ञांची ही परिषद दर तीन वर्षांनी आयोजित केली जाते. भारतात १९५८ नंतर म्हणजेच तब्बल ६५ वर्षांनंतर याचे आयोजन करण्यात आले आहे. ६५ वर्षांपूर्वी भारत हा अन्नधान्याच्या बाबतीत मुळीच स्वयंपूर्ण नव्हता. भारताला मोठ्या प्रमाणात अन्नधान्याची आयात करावी लागत होती. पण, गेल्या ७५ वर्षांमध्ये भारतातील कृषी तज्ज्ञांनी, शेतकऱ्यांनी, सर्वपक्षीय सरकारांनी केलेल्या अखंड प्रयत्नांमुळे आज भारत जगातील सर्वाधिक अन्नधान्य उत्पादन करणारा देश बनला आहे. २०१४ मध्ये केंद्रात प्रथम जेव्हा मोदी सरकार आले तेव्हा नव्याने कृषी धोरणाची आखणी करण्यात आली. धान्य उत्पादन, वाहतूक, वितरण तसेच पुरवठा साखळी व अन्य सर्व क्षेत्रांचा नव्याने विचार करण्यासाठी उच्चस्तरीय टास्क फोर्सची स्थापना करण्यात आली. पंतप्रधान मोदी यांनी कृषी, अधिकाधिक धान्योत्पादन आणि शेतकरी हा विषय गांभीर्याने घेतला. परिणामी गेल्या १० वर्षांत भारताचे कृषी उत्पन्न प्रचंड प्रमाणात वाढले. आज भारत दूध, डाळी आणि मसाल्यांचा सर्वात मोठा उत्पादक आहे, तर अन्नधान्य, फळभाज्या, कापूस, साखर, चहा उत्पादनात दुसऱ्या क्रमांकाचा देश बनला आहे. आज भारत हा बाजरीचा सर्वात मोठा उत्पादक आहे. बाजरीला आज जगात 'सुपर फूड' नावाने ओळखले जाते. भारताचे हे पीक 'श्री अन्न' म्हणून ओळखले जाते. भारतातील विविध 'सुपर फूड्स' जागतिक अन्न पोषणात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. देशात यंदा मागील वर्षापेक्षा सुमारे १५ लाख टन अधिक अन्नधान्य उत्पादन झाले. यंदा तांदळाचे १३५.५ दशलक्ष उत्पादन झाले आहे, जे मागील वर्षापेक्षा ६७ लाख टनांनी जास्त आहे. गव्हाच्या उत्पादनात ५० लाख टनांची वाढ होऊन ते ११२.७ दशलक्ष टन झाले आहे. वाढीचा असाच कल तेलबिया, तृणधान्ये आणि डाळींबाबत दिसून येतो. केवळ मोसमी पावसावर अवलंबून शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्याही देशात मोठी आहे. या शेतकऱ्यांना बारमाही पुरेसे पाणी उपलब्ध नाही. अशाही अवस्थेत त्यांनी विक्रमी उत्पादन करणे ही बाब महत्त्वाची मानायला हवी. १४० कोटी लोकसंख्येला पुरून उरेल आणि जगाचीही भूक भागविता येईल, एवढे धान्योत्पादन करण्याची क्षमता आता भारताने प्राप्त केली असली, तरी देशात कोणत्या धान्याची नेमकी गरज किती असते, हे सरकारच्या कृषी खात्याने जाहीर केले पाहिजे. मात्र, तसे होत नाही. त्यामुळे प्रत्येक शेतकरी आपापल्या हिशोबाने हव्या त्या शेतमालाला प्राधान्य देतो. त्यामुळे काही बाबतीत देश गरजेपेक्षा अधिक धान्य उत्पादन करतो आणि काही शेतमालाची मोठ्या प्रमाणात आयात करणे भाग पडते. त्यामुळे कृषी धोरण आखताना शेतकऱ्यांना विश्वासात घेणे आवश्यक आहे आणि तशी ग्वाही केंद्रातील मोदी सरकारने दिली, ही आनंदाची आणि समाधानाची बाब आहे. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने वर्ष २०२३-२४ साठी प्रमुख कृषी उत्पादनांचा अंदाज जाहीर केला आहे. देशात यावर्षी एकूण ३२८८.५२ लाख टन अन्नधान्य उत्पादन होईल, असा अंदाज आहे. गेल्या ५ वर्षांतील सरासरी अन्नधान्य उत्पादनापेक्षा यावर्षी २११.०० लाख टन अधिक उत्पादन होणार असल्याचा अंदाज आहे. शेतकऱ्यांच्या कठोर मेहनतीचे हे फळ आहे, या कष्टाचा अभिमान देशवासीयांनी बाळगलाच पाहिजे. मात्र, कागदोपत्री पुरेसे धान्य उत्पादन होत असल्याचे दिसत असले, तरी या देशातील प्रत्येक नागरिकाच्या पोटात पुरेसे अन्नधान्य जाईल, याचीही धोरणकर्त्यांनी काळजी घेतली पाहिजे. शेतमालाच्या निर्यातीला केंद्र सरकारने अधिकाधिक प्रोत्साहन दिले पाहिजे तसेच विक्री व्यवस्थेतील येणाऱ्या अडचणी सोडविण्यास सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. शेती आणि शेतकऱ्यांच्या विकासासाठी केंद्र तसेच सर्वच राज्य सरकारांकडून विविध कार्यक्रम, योजना, प्रकल्प राबविले जातात. मात्र, बदलत्या हवामानामुळे ऋतुचक्रावर परिणाम होऊन त्याचा सर्वाधिक प्रभाव शेतीवर होत असल्याची वस्तुस्थितीही लक्षात घेतली पाहिजे. अलिकडच्या काळात सेंद्रिय शेतीकडे शेतकऱ्यांचा मोठा कल वाढू लागला आहे. असे असताना दुसरीकडे निसर्गचक्र सतत बदलत असल्याने शेतकऱ्यांना पिकांचे व्यवस्थापन करण्यास अडचणी येत आहेत. कधी अवकाळी पाऊस तर कधी गारपीट तर कधी ढगाळ वातावरण यामुळे पीक उत्पादकतेवर परिणाम होत आहे. त्यामुळे या हवामान बदलाचा परिणाम राज्यांच्या कृषी क्षेत्रावर व तेथील पीक पद्धतीवर वेगवेगळा होत असल्यामुळे त्याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. सुदैवाने केंद्रातील मोदी सरकार त्या दृष्टीने सजग व सावध असल्याने सरकारने या संदर्भात पावले उचलली आहेत. मोसमी पाऊस कमी-जास्त झाल्याचा परिणाम तांदूळ लागवड आणि उत्पादनावर दिसून येतो. मोसमी पाऊस सरासरी इतका झाल्यास तांदूळ उत्पादनात वाढ होते. देशातील आंध्रप्रदेश, तेलंगणा आणि पंजाब या तांदूळ उत्पादक राज्यांत सिंचनाची सोय लागवड क्षेत्राच्या जवळपास ९७ ते ९९ टक्के इतकी आहे तर उत्तरप्रदेशात ८६.३ टक्के, पश्चिम बंगालमध्ये ५१.१ टक्के आणि ओडिशात ३१.५ इतक्या क्षेत्रावर सिंचनाची सोय आहे. त्यामुळे पावसाने ओढ दिल्यास त्याचा फटका आंध्रप्रदेश, तेलंगणा आणि पंजाब या सिंचनाची सोय असलेली राज्ये वगळून अन्य सर्व राज्यांना बसण्याची शक्यता आहे. पाऊस सरासरीइतका पडत असला, तरीही तो कमी वेळेत धो-धो पडून मोकळा होतो. त्याचा शेतीला फायदा होण्यापेक्षा तोटाच होतो. अवकाळी, गारपीट, अतिवृष्टीसारख्या नैसर्गिक आपत्तींचा सामना शेती करीत आहे. त्याचा परिणाम अन्नधान्य उत्पादनांवर होतो. त्यामुळे कृषी उत्पादनात वाढ हवी असेल, तर प्रयत्नही अतिशय जोरकसपणे झाले पाहिजेत. शेतकऱ्यांनी पिकविलेले अन्नधान्य सुरक्षित ठेवण्यासाठी पुरेशा संख्येने गोदामे व कोल्ड स्टोअरेजची उभारणी यावर आता केंद्रातील मोदी सरकारने भर दिला पाहिजे. कारण, शेतमाल शेवटपर्यंत सुरक्षितपणे पोहोचणे ही अन्नधान्य प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाची साखळी आहे आणि ती अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. तरच कृषी उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्याला आर्थिक फायदा होईल. गेल्या ७५ वर्षांत सर्वच सरकारांच्या प्रयत्नांमुळे सिंचन, संकरित बियाणे आणि रासायनिक खतांच्या जोरावर देशाने अन्नधान्यांसह इतर कृषी उत्पादनात दरवर्षी नवनवे विक्रम केले. कमी पाऊस किंवा दुष्काळासारख्या स्थितीचे अपवाद सोडल्यास देशात अन्नधान्यांसह शेतीमालाच्या उत्पादनाचा वाढीचा कल कायम राहिला, हे खरे असले तरी वाढत्या लोकसंख्येसाठी शेतीमालाचे अधिक उत्पादन घेण्यासाठी सिंचनाच्या पुरेशा व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. लागवडीखालील जमिनीत सतत होणारी घट हे कृषी उत्पादनात वाढ करण्यातले आजचे सर्वात मोठे आव्हान आहे. एकरी उत्पादन वाढ करणे एवढाच त्यावर पर्याय असू शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी पिकविलेल्या अन्नधान्याची नासाडी कमी होणे अधिक गरजेचे आहे. 'असोचॅम' या उद्योग संघटनांच्या संघाने वर्तविलेल्या अंदाजानुसार, एका वर्षात सुमारे ९२६ अब्ज किमतीचे अन्नधान्य काढणीनंतर वाया जाते. वितरण प्रक्रियेतील अनागोंदी, धान्य वेळेत तयार न होणे, अन्नधान्य वेळेत न पोहोचणे आणि तयार केलेले अन्न खाण्यास नकार देणे, अशा किरकोळ कारणांतून ही नासाडी आहे. मात्र, केंद्रातील मोदी सरकार कृषी संबंधित सर्वच आव्हानांचा सक्षमपणे सामना करेल, अशी देशवासीयांना खात्री आहे.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# 'योगी गया, उत्तरप्रदेश गया!'

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला उत्तरप्रदेशात अपेक्षित यश मिळाले नाही. अर्थात ही बाब काही उत्तरप्रदेशापुरती मर्यादित नव्हती. आणखीही काही राज्यांत भाजपाला अपेक्षित यश मिळाले नाही. पण, अन्य राज्यांत नेतृत्वाबाबत काही चर्चा ऐकिवात नाही, जी उत्तरप्रदेशाबाबत सुरू आहे. ही चर्चा निराधार असावी, असे मानण्यात आले पाहिजे. उत्तरप्रदेशचे दोन उपमुख्यमंत्री केशवप्रसाद मौर्य व ब्रिजेश पाठक यांच्या भूमिकांवरही चर्चा सुरू आहे. 'संघटना सरकारपेक्षा मोठी असते,' असे एक विधान मौर्य यांनी केले आणि त्यातून योगी आदित्यनाथ यांच्याबाबत उलटसुलट चर्चा सुरू झाली. योगी आदित्यनाथ यांनी या साऱ्या वादावर 'योगीं'सारखी भूमिका घेत कोणतेही भाष्य केलेले नाही.

**प्रथम बहुमत** : १९९१ पर्यंत उत्तरप्रदेशात भाजपा कधीही स्वबळावर सत्तेवर आला नव्हता. श्रीराम जन्मभूमी आंदोलनानंतर झालेल्या निवडणुकीत भाजपाला ४२५ पैकी २१३ म्हणजे बरोबर नेमके बहुमत मिळाले होते. मुख्यमंत्रिपदासाठी दोन प्रमुख नावांची चर्चा होती. डॉ. मुरली मनोहर जोशी व कल्याणसिंग हे ते दोन नेते होते. पक्षाने कल्याणसिंग या ओबीसी नेत्यास मुख्यमंत्री केले. त्यांनी आपली निवड सार्थ ठरविली. राज्यातील कायदा-सुव्यवस्था स्थिती सुधारली, भ्रष्टाचार कमी झाला. १९९२ च्या डिसेंबर महिन्यात वादग्रस्त ढाचा कोसळला आणि कल्याणसिंग सरकार बरखास्त करण्यात आले. काही महिन्यांनी झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर पुन्हा एकदा कल्याणसिंग मुख्यमंत्री झाले; पण संमिश्र सरकारात. त्यांच्याविरोधात पक्षांतर्गत कारवाया सुरू झाल्या. एक उगवता नेता मागे पडला. याचा परिणाम म्हणजे नंतरच्या काही विधानसभा निवडणुकीत भाजपा ५०-५५ आमदारांचा पक्ष झाला.

**२०१४ चे यश** : २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला अभूतपूर्व यश मिळाले. नरेंद्र मोदी यांची प्रतिमा हे याचे कारण होते. २०१७ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला पुन्हा मोठे यश मिळाले. यावेळी भाजपाने मुख्यमंत्रिपदासाठी कोणताही चेहरा समोर केला नव्हता. भाजपामध्ये दोन नावांवर चर्चा झाली. जम्मू-काश्मीरचे विद्यमान नायब राज्यपाल मनोज सिन्हा व योगी आदित्यनाथ. भाजपाने योग्य निर्णय घेतला आणि योगी आदित्यनाथ यांना राज्याचे मुख्यमंत्री केले. २०१९ ची लोकसभा व २०२२ ची विधानसभा या दोन्ही निवडणुकीत भाजपाला चांगले यश मिळाले. याचे मोठे श्रेय योगींना जाते. २०२४ मध्ये भाजपाला अपेक्षित यश मिळाले नाही. यासाठी लगेच योगींना जबाबदार धरले जात आहे, तसे चित्र तयार केले जात आहे.



**योगींना पर्याय नाही** : उत्तरप्रदेशात आज भाजपाजवळ योगींशिवाय दुसरा कोणताही चेहरा नाही. निवडणुकीत पराभव हा होत असतो, पण एक-दोन पराभव झाल्याने लगेच नेता बदल केला जात नसतो. पराभवाची वेगवेगळी कारणे असतात. केवळ मुख्यमंत्र्याला जबाबदार धरणे हे कधीच योग्य नसते.

**चेहरा आवश्यक** : केवळ राजकीय वातावरण, राजकीय हवा या आधारे निवडणूक जिंकता येत नाही, हे एक कटू वास्तव असते. वातावरण वा हवेच्या आधारे फक्त एक निवडणूक जिंकता येते. नंतर चेहरा हा आवश्यक असतो. १९९३ च्या दिल्ली विधानसभेच्या पहिला निवडणुकीत भाजपाजवळ मदनलाल खुराणा नावाचा चेहरा होता. त्याआधारे भाजपाने विधानसभा जिंकली होती. नंतर मागील ३१ वर्षांत भाजपाला दिल्लीतील लोकसभेच्या सर्व सातही जागा जिंकता आल्या, पण एकही विधानसभा निवडणूक जिंकता आली नाही. कारण हवा तर भाजपाच्या बाजूने होती, पण पक्षाजवळ चेहरा नव्हता. लोकसभा निवडणुकीत बंगालमध्ये भाजपाला २५ ते ३० जागा मिळतील, असा एक अंदाज वर्तविला जात होता. प्रत्यक्षात भाजपाला २०१९ पेक्षाही कमी जागा मिळाल्या. कारण, राज्यात ममता बॅनर्जींशी टक्कर देऊ शकणारा नेता भाजपाजवळ नाही. अगदी हीच स्थिती उत्तरप्रदेशात आहे. भाजपाजवळ योगी आदित्यनाथ यांचा पर्याय नाही.

**सर्वात मोठी उपलब्धी** : योगी आदित्यनाथ यांची राज्यातील सर्वात मोठी उपलब्धी म्हणजे त्यांनी राज्यातील माफिया राजवट संपविली. राज्याच्या अनेक भागांत माफियांचे समांतर सरकार चालत होते. ते योगी यांनी मोडून काढले. जनतेत सुरक्षेचे वातावरण तयार केले. महिला-मुली सुरक्षित वातावरणात वावरू लागल्या. प्रशासनात सुधारणा केल्या. मोठे पायाभूत प्रकल्प सुरू केले.

**गो-संवर्धन** : योगी आदित्यनाथ यांची एक महत्त्वाची कामगिरी म्हणजे त्यांनी गोवंशाच्या संरक्षण व संवर्धनासाठी बजावलेली कामगिरी. कोणत्याही मुख्यमंत्र्याने केले नसेल एवढे काम त्यांनी केले आहे. त्यांनी ठिकठिकाणी गोशाळा बांधल्या. मागील वर्षी राजधानी दिल्लीत आलेल्या महापुराचा फटका नोएडा भागातील एका गोशाळेस बसला. यात अनेक गायी मरण पावल्या. नोएडा विकास प्राधिकरणाच्या एक प्रभावशाली मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यावर ही सारी जबाबदारी होती. या घटनेनंतर मुख्यमंत्र्यांनी या महिला अधिकाऱ्यास काही दिवसात असे काही हटविले की, अंगावरील झुरळ झटकावे. नंतर संबंधित गोशाळा नव्याने बांधण्यात आली.

**२०२४ चे निकाल** : उत्तरप्रदेशचे राजकारण जातींचे आहे. सपा नेते अखिलेश यादव यांनी यावेळी जातीय समीकरण व्यवस्थित बसविले. त्याचा फायदा सपाला मिळाला तर फटका भाजपाला बसला. लगेच काही विधाने सुरू झाली. त्यातील एक विधान होते केशवप्रसाद मौर्य यांचे. संघटना महत्त्वाची असतेच. जेव्हा कोणताही राजकीय पक्ष विरोधी बाकावर असतो, संघटनाच महत्त्वाची असते. पण, तो पक्ष सत्तेत आल्यावर सरकार प्रमुख होते आणि संघटना पूरक भूमिकेत जाते. हा संसदीय लोकशाहीचा अलिखित नियम आहे. कम्युनिस्ट पक्षात संघटना महत्त्वाची असते. देशाचा राष्ट्रपती, पंतप्रधान यांच्यापेक्षा पक्षप्रमुख हा महत्त्वाचा मानला जातो. लोकशाहीत ते होत नसते आणि केशवप्रसाद मौर्य तर स्वतः विधानसभा निवडणूक हरलेले आहेत. त्यांनी संघटना बळकट करण्यासाठी काम करावयास हवे होते. पण ते सरकारमध्ये उपमुख्यमंत्री झाले. हीच स्थिती दुसरे उपमुख्यमंत्री ब्रिजेश पाठक यांची. ते बसपातून भाजपात आलेले आहेत. उद्या दुसऱ्या पक्षाचे सरकार आले तर पाठक त्या पक्षात जातील. त्यांची भाजपाशी काय बांधिलकी?

**योगी गया...!** : भाजपासाठी योगी आदित्यनाथ महत्त्वाचे व मोलाचे आहेत. त्यांना डावलण्याचे वा डिवचण्याचे प्रयत्न होणार नाहीत, असे मानले पाहिजे. कारण, कल्याणसिंग यांना कमजोर केल्यानंतर राज्यात भाजपाही कमजोर झाला. योगींना कमजोर करण्याचे प्रयत्न झाल्यास पुन्हा त्याची पुनरावृत्ती होणार, यात शंका नाही. याचा अर्थ उत्तरप्रदेशात कोणतीही सुधारणा आवश्यक नाही, असा नाही. सरकार व संघटना दोन्ही आघाड्यांवर काही सुधारणा- बदल आवश्यक आहेत. मात्र, हे सारे योगी आदित्यनाथ यांना केंद्रस्थानी ठेवून झाले पाहिजे. योगींना हटवून नव्हे. कारण 'योगी गया, उत्तरप्रदेश गया' हे राज्याचे राजकीय वास्तव आहे आणि राजकीय वास्तव ओळखणारे, समजणारे नेतृत्व समंजस, परिपक्व मानले जाते. भाजपाकडून परिपक्व, समंजस नेतृत्वाची अपेक्षा तर केलीच पाहिजे.

## वेध

अनिरुद्ध पांडे

# श्रावण तो आला...

*'हासरा नाचरा जरासा*
*सुंदर साजिरा श्रावण आला...'*

अशा शब्दांमध्ये कविश्रेष्ठ कुसुमाग्रज श्रावण महिन्याचे स्वागत करतात. आपले सण-उत्सव यांचा विचार करता श्रावण महिन्याचे महत्त्व आपल्या संस्कृतीत वेगळेच आहे. भरपावसाळ्यात येणारा हा श्रावण महिना म्हणजे साऱ्या पृथ्वीवर हिरवाईचा काळ असतो. हिरवा हा जीवनाचा रंग 'कलर ऑफ लाईफ' मानला जातो. या हिरव्या रंगाचे सर्वदूर राज्य म्हणजे आनंद, उत्साहच असतो. सारा निसर्ग हिरवागार, शेते हिरवीगार तसेच माणसाचे मनही हिरवेगार. उन्हाळ्याच्या पृष्ठभूमीवर अतिशय सुखद असा हा काळ. त्यातही अवचित पाऊस आणि लगेच आल्हाददायक ऊन असा हा श्रावण. म्हणून तर बालकवींच्या या ओळी आपल्या काही पिढ्यांच्या ओठांवर आहेत...

*श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे*
*क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरूनी ऊन पडे...*

साऱ्याच कवी, चित्रकार, लेखकांना मोहवून टाकणारा हा श्रावण महिना पूर्वी 'नभस्' म्हणून ओळखला जायचा. या महिन्यात रोज रात्री प्रारंभी पूर्व क्षितिजावर 'श्रवण' नक्षत्र रात्रभर आकाशात येऊन पहाटे पश्चिमेला मावळते. या महिन्यात पौर्णिमेला चंद्र श्रवण नक्षत्रात असतो म्हणून या महिन्याला 'श्रावण' असे नाव आहे. श्रावण महिना अतिशय पवित्र मानला जातो. ईश्वरोपासना करण्यासाठी अत्यंत योग्य मानला जातो. तो चातुर्मासातील श्रेष्ठ महिना मानला जातो. पावसामुळे या महिन्यात शारीरिक हालचाली कमी होऊन पचनशक्ती कमी होते. म्हणूनच आपल्या पूर्वजांनी या महिन्यात उपवासांचे दिवस अधिक ठेवले असावेत. पण आजकाल 'एकादशी दुप्पट खाशी' यानुसार हे उपवास तसे नावाचेच ठरत असतात.

*श्रावणात घननिळा बरसला, रिमझिम रेशीमधारा*
*उलगडला झाडांतून अवचित हिरवा मोर पिसारा....*

असा मंगेश पाडगावकरांच्या शब्दांत श्रावण आहे. नागपंचमी, मंगळागौरी, रक्षाबंधन, मातृदिन, संस्कृत दिन, गोकुळाष्टमी, पोळा असे सण-उत्सव श्रावणात येतात. नागपंचमी या सणाच्या दिवशी सापांचे रक्षण केले जाते. पूर्वी सापांची उपयुक्तता माहीत नसल्यामुळे सर्पहत्या खूप व्हायची. पण आपल्या पूर्वजांना 'नागदेवता' माहीत असल्यामुळे त्यांनी कथेची गुंफण करून हत्या टाळण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच या दिवशी चिरणे, कापणे, शस्त्र वापरणे, शेतात नांगर अशा गोष्टी समाज निषिद्ध मानतो. पुढे सापाची उपयोगिता कळल्यानंतर ठिकठिकाणी 'सर्पमित्र' तयार झाले. त्यांनी सापाची हत्या थांबवली. मुलीच्या विवाहानंतर मंगळागौरीची पूजा महाराष्ट्रात करतात. सध्या हे व्रत राहिले नसून तो एक उत्सवच असतो. या संस्कृतीचे एक वैशिष्ट्य आहे. आपल्या जीवनात जे-जे काही उपयोगी पडते त्यांचे ऋण मानून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते. त्यातून अशा सण-उत्सवांची संकल्पना आपले पूर्वज करतात. भावा-बहिणीच्या नात्यातील पावित्र्य जोपासणाऱ्या रक्षाबंधनाची परंपरा आपण जोपासली आहे. 'राखी' हा एक दोरा नसून ते प्रेम, जिव्हाळा वाढवणारे, कर्तव्याची जाणीव करून देणारे, दुभंगलेली मने जोडणारे एक साधन आहे.

*मातीच्या गंधात झिंगून सांगतो उनाड अल्लड वारा*
*सोनिया उन्हात न्हाऊन माखून आल्या गं श्रावणधारा..*

अशा ओळी गुरू ठाकूरांना श्रावणामुळेच सुचतात. 'पूर्ण पुरुषोत्तम' श्रीकृष्णाचा जन्मोत्सव गोकुळाष्टमी याच महिन्यात येतो. सध्या महाराष्ट्रभर उत्साहात खेळल्या जात असलेल्या 'दहीहंडी'मुळे श्रीकृष्ण जन्मोत्सवाला एका क्रीडा महोत्सवाचे स्वरूप आले आहे. शेतकऱ्यांसाठी अतिशय संवेदनशील व जिव्हाळ्याचा सण म्हणजे पोळा याच महिन्यात असतो. पण या बदलत्या काळात फक्त बैलपूजेपुरताच हा सण मर्यादित असू नये. या निमित्ताने शेतकऱ्यांना शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान समजावून सांगणारे उपक्रमही व्हायला हवे आहेत. याच दिवशी 'मातृदिन'ही साजरा होतो. श्रावण पौर्णिमा हा 'संस्कृत दिन' साजरा करून माणसाला सुसंस्कृत करण्याचा प्रयत्न आपण करत असतो. यंदाचा, म्हणजे शके १९४६ आणि कलियुग वर्ष ५१२६ म्हणजेच २०२४ चा श्रावणमास अधिकच खास आहे. भगवान शंकराचे सर्वात महत्त्वाचे आणि आवडते श्रावण सोमवार यावर्षी २०२४ मध्ये पाच आहेत. यंदा श्रावण महिन्याची सुरवात ५ ऑगस्ट या सोमवारी आणि समाप्ती २ सप्टेंबर या सोमवारीच होणार आहे. आपले खगोलशास्त्र किती काटेकोर शास्त्रशुद्ध आहे पहा. पाच सोमवार आणि सोमवारीच सुरुवात व शेवट हा योग यापूर्वी ७१ वर्षांपूर्वी आला होता. १९५३ साली श्रावणाची १० ऑगस्टला सुरुवात आणि ८ सप्टेंबरला शेवट सोमवारीच झाला होता, असे हे शास्त्र क्षणात सांगते. पाच श्रावण सोमवार यापूर्वी २००६ मध्ये आले होते. गेल्या वर्षी २०२३ मध्ये तर अधिक मासामुळे श्रावण चक्क दोन महिने, आठ सोमवारी आपण पाळला होता. आहे ना, श्रावण हा आगळावेगळा...!

९८८१७१७८२९

## कानोसा

अमोल पुसदकर

# खेळ संस्कृती निर्माण करणे आवश्यक

ऑलिम्पिकमध्ये मनू भाकरने आपल्याला दोन कांस्यपदक मिळवून दिलेले आहेत. दरम्यान, तिसऱ्या पदकाने तिला हुलकावणी दिली. अतिशय उत्कंठा वाढविणारा सामना होता. अगदी एक नेम अचूक लागला असता तर तिला तिसरेही कांस्यपदक मिळाले असते. परंतु, दुर्दैवाने तसे झाले नाही. मनू भाकरला चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. ती जरी चौथ्या क्रमांकावर होती तरी तिच्यामध्ये व पहिल्या दुसऱ्या व तिसऱ्यामध्ये फार फार तर दोन गुणांचे अंतर होते. म्हणजे एक चुकीची खेळी व क्षणार्धात ती पदकाच्या शर्यतीतून बाहेर पडली. हीच गोष्ट विद्यार्थ्यांसाठी लागू आहे. वर्षभराची मेहनत त्यांच्या छोट्याशा चुकीमुळे पाण्यात जाऊ शकते. त्यामुळे शेवटच्या क्षणापर्यंत आपले संपूर्ण समर्पण यशासाठी देणे आवश्यक ठरते.

आपण म्हणतो की, अभ्यासामध्ये खूप स्पर्धा आहे. ज्यांना अभ्यास जमत नसेल त्यांनी खेळामध्ये जावे. परंतु अभ्यास असो की खेळ; जर तुम्हाला यशस्वी व्हायचे असेल तर मेहनत व संपूर्ण समर्पण हे कोणत्याही क्षेत्रांमध्ये आवश्यकच आहे. ऑलिम्पिकमध्ये काही खेळाडूंना विजय मिळेल तर काहींना पराभव पत्करावा लागेल. तरीसुद्धा त्यांची मेहनत वाखाणण्याजोगी आहे. दीपिका कुमारी तर आपल्या छोट्याशा मुलाला घरी ठेवून ऑलिम्पिकच्या प्रशिक्षणासाठी गेली होती. तिच्यासाठी हा कठीण निर्णय होता. परंतु ज्या वेळेला संपूर्ण देश तुमच्या कामगिरीकडे डोळे लावून बसलेला असतो त्या वेळेला तुम्हाला व्यक्तिगत पातळीवर असे काही कठोर निर्णय घ्यावे लागतात, हे तिने दाखवून दिलेले आहे. बॉक्सिंग स्पर्धेच्या वेळी आपले वजन जास्त भरू नये यासाठी स्पर्धेच्या दोन दिवस आधी अतिशय कमी आहार घेऊन निखत झरीन राहिली. या सर्वच खेळाडूंचा संघर्ष हा प्रेरणादायी आहे. काही वर्षांपूर्वी भारताला ऑलिम्पिकमध्ये एकही पदक मिळत नव्हते. अर्जुनाच्या देशामध्ये नेमबाजीमध्ये पदक नव्हते. भीमाच्या देशामध्ये कुस्तीमध्ये पदक नव्हते. नकुल-सहदेवांच्या देशामध्ये तलवारबाजीमध्ये पदक नव्हते. जांबुवंताच्या देशामध्ये जुडोमध्ये पदक नव्हते. त्यावेळेला लोक म्हणायचे की, काय हे आमच्या एवढ्या मोठ्या देशाला एकही पदक मिळत नाही. ऑलिम्पिक आले की इतर देशांना मिळणारे पदक पाहिल्यावर आपल्याला काही नाही, ही भावना स्वाभाविकतः लोकांमध्ये निर्माण होते व त्यातून लोक ही प्रतिक्रिया देतात. परंतु असे अनेक वर्षांपासून सुरू होते. मागील काही वर्षांमध्ये ऑलिम्पिकमधील पदकांचा हा दुष्काळ संपला आहे. आपले खेळाडू चांगली कामगिरी करीत आहेत. लोकांनी आम्हाला पदक का मिळत नाही, असे रडगाणे गाण्यापेक्षा आम्हाला पदक कसे मिळेल याचा विचार आणि चिंतन करण्याची आवश्यकता आहे. तहान लागल्यावर विहीर खोदण्यापेक्षा आधीपासूनच त्याची पूर्वतयारी करणे गरजेचे आहे.

ऑलिम्पिक काही दरवर्षी येत नाही; ते चार वर्षांनी येते. त्यामुळे चार वर्षांत तुम्हाला खूप मोठी तयारी करता येते. क्रिकेटमध्ये भारत अनेक वेळा विश्वविजेता ठरतो; परंतु क्रिकेट किती देश खेळतात? फार कमी देश खेळतात. त्यांचे आम्ही विश्वविजेते असतो. परंतु ऑलिम्पिकमध्ये जवळपास सर्व जग खेळत असते. त्यामुळे तेथे विश्वविजेता बनण्याला वेगळाच सन्मान आहे. एकेकाळी क्रिकेटमध्येही भारताची परिस्थिती खराब होती. परंतु क्रिकेटची लोकप्रियता, पालकांनी आपल्या मुलांना क्रिकेट खेळायला पाठविणे, त्यांचे प्रशिक्षण करणे, बीसीसीआयने विदेशी प्रशिक्षकांना आणून गोलंदाजी, फलंदाजी, क्षेत्ररक्षण यातील उणिवा भरून काढत भारताला समोर नेले. जे क्रिकेटमध्ये होऊ शकले ते अन्य खेळांमध्ये का होऊ शकणार नाही. आता तर स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी हे खेळाडूंचा आत्मविश्वास वाढविताना दिसतात. भारतीय क्रीडा प्राधिकरणासारख्या बऱ्याच सरकारी संस्था आहेत की ज्या खेळाडूंना उत्तम दर्जाचे प्रशिक्षण व आर्थिक मदत करू शकतात. परंतु जे काही सुरू आहे ते पर्याप्त नाही, हे मात्र निश्चित.

ऑलिम्पिकसाठी चांगल्या नियोजनाची आवश्यकता आहे. हे नियोजन सरकारी स्तरावर होणे गरजेचे आहे. ऑलिम्पिकमध्ये खेळले जाणारे खेळ हे देशातही सर्वत्र खेळले गेले पाहिजे. त्या खेळांसाठी आवश्यक त्या सुविधा जिल्हास्तरावर, प्रांत स्तरावर निर्माण झाल्या पाहिजे. शालेय जीवनात प्रत्येक विद्यार्थ्याला अभ्यासासोबतच कुठल्या तरी खेळामध्ये त्याने सहभाग घेणे आवश्यक केले पाहिजे.

ऑलिम्पिकमध्ये एकूण ३२ खेळ आहेत. त्यापैकी १६ खेळांमध्ये आम्ही सहभागी होतो. उरलेल्या खेळांमध्ये पुढील ऑलिम्पिकमध्ये आमचा सहभाग झाला पाहिजे यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.

ग्रामीण भागामध्ये पूर आलेली नदी केवळ लाकडं पकडण्याकरिता पोहणारी मुले मी पाहिलेली आहेत. मासेमारी करणारा जो समाज आहे त्या समाजाच्या मुलांना लहानपणापासूनच नदी असेल, तलाव असेल किंवा समुद्र असेल यामध्ये पोहण्याची सवय असते. या समाजातील मुलांना जलतरणाचे प्रशिक्षण देऊन त्यांना समोर आणता येईल का, याचा विचार केला पाहिजे. धनुष्यबाणाने शिकार करणारे आदिवासी, पारधी समाजातील मुलांनासुद्धा धनुर्विद्येत समोर आणता येईल का, याचाही विचार झाला पाहिजे.

धावण्याच्या स्पर्धेमध्ये एका लहानशा देशातल्या एका तरुणाला ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक मिळाले. त्याला विचारले की, तुमच्या देशात तर सोयी-सुविधा नाही तरी तुला सुवर्णपदक कसे मिळाले? तर, तो म्हणाला, माझ्या गावात शाळा नव्हती. शाळा १० किलोमीटर दूर होती. नदी-नाले पार करून मला शाळेत धावतच पोहोचावे लागत होते. यातून मला इतके अंतर धावत जाण्याची सवय लागली. या सवयीतूनच आजचे माझे ऑलिम्पिकचे सुवर्णपदक आकाराला आलेले आहे. म्हणजे कधी कधी अभाव हा संधी देऊ शकतो. अभावाचे संधीमध्ये रूपांतर करता येऊ शकते. आपल्या पहाडांमध्ये, जंगलांमध्ये राहणाऱ्या समाजाच्या मुलांना अशा प्रकारच्या शारीरिक कष्टाच्या सवयी आहेत. फक्त त्यांना आधुनिक प्रशिक्षणाची जोड देणे आवश्यक आहे. सरकारी प्रयत्न, सामाजिक संस्था, पालक, शाळा, विद्यार्थी या सर्वांनी सुसूत्रपणे एकत्रित प्रयास करण्याची आवश्यकता आहे. असे झाले तर 'खेलेगा भारत, जितेगा भारत, दहाडेगा भारत...' हे साकार होईल.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### भारताने सतर्क राहणे गरजेचे

चीनमध्ये कम्युनिस्ट पक्षाची २४ सदस्यीय बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत चीनचे सर्वेसर्वा राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी यापुढे सीमांच्या रक्षणासाठी स्मार्ट सिस्टिमचा वापर करावा, असा आदेश दिला आहे. हाँगकाँगमधील 'साऊथ चायना मॉर्निंग' या वृत्तपत्राने ही माहिती प्रसिद्ध केली आहे. चीनचे अनेक देशांशी सीमा तंटे आहेत. त्यामुळे भारताने या बाबतीत सतर्क राहणे गरजेचे आहे. यापुढे संशोधनावर अधिक भर देणे, लष्कर तैनातीच्या नवीन पद्धती विकसित करणे, प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करणे आदी गोष्टी चीन करेल. २०२७ पर्यंत तेथील लष्कर आधुनिक करण्यात येणार आहे. २०५० पर्यंत तर चीनचे लष्कर जगातील एक जागतिक दर्जाचे लष्कर करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या सर्व गोष्टीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून मानवरहित शस्त्रांचा वापर करण्यात येणार आहे. आतापर्यंत चीनने गलवान खोरे, पेंगाँग तलाव, हॉट स्प्रिंग्स, गोगारा या ठिकाणांवरून मतभेद दाखवत भारताच्या कुरापती काढल्या आहेत. सीमावर्ती भागात अनेक ठिकाणी चीनने रस्ते बांधले आहेत. भारतीय लष्कर या सर्व प्रकाराला तोंड देण्यास समर्थ आहे. तथापि, चीनच्या नवीन धोरणाची चाल ओळखून आपण आपली संरक्षण सिद्धता आधुनिक पद्धतीने स्मार्ट बनविली पाहिजे.

**शांताराम वाघ**/९६२३४५२५५३

●● ●●

### विधिलेख

इंदिरा संताची 'कुब्जा' ही कविता वाचली आणि बा. भ. बोरकरांच्या कवितेच्या ओळींची आठवण झाली...

*झुरूमुरू झुरूमुरू, या धारा लागती झरू*
*हरपले होते ते ते, पाहे हळूच अंकुरू*

आपण बरेचदा हताश होतो की, इतरांसाठी आपण खूप काही केले, पण पदरी नैराश्य आले. अशा वेळी नियती अचूक दान पदरात टाकते. आपण केलेल्या गोड कर्माची फळे आपल्याला चाखायला मिळते. इंदिरा संतांच्या कुब्जेच्या बाबतीतही नियतीनं झुकतं माप ठेवलं. स्वतः त्रिवक्रा असताना दुसऱ्याला सुगंधी उटीचं लेपन लावायची याची नोंद नियतीने ठेवली. दुसऱ्याला अनुलेपन लावायचं म्हटलं तर स्वतः शुचिर्भूत असणं आवश्यक आहे. त्यासाठी ती भल्या पहाटे नदीवर स्नानाला जाते आणि अचानक मंत्रमुग्ध करणारे सूर तिच्या कर्णपटलावर रुंजी घालतात. तीसुद्धा त्या दैवी सुरांची साक्षीदार होते. स्वर्गीय सुरांचा मनमुराद आनंद घेते. जेव्हा जागृत होते तेव्हा ती अवतीभोवती न्याहाळते. तिला त्या ब्रह्म मुहूर्तावर कोणाचीही पावले उमटलेली जाणवत नाही. मग ही अंतर्मनात ब्रह्मानंदी टाळी कशी वाजली, ज्या सुरांची आपण केवळ चर्चा ऐकली होती, ते सूर आज आपल्याखेरीज कोणीच ऐकले नाही; त्या अनुपम सुखाचे आपणच एकटे साक्षीदार आहोत. ही कल्पनाच मुळी वैरागिरीच्या रत्नसारखी पारदर्शक आहे. जे सूर आजतागत गोकुळवासीयांनी आणि राधेनीच ऐकले होते ते दिव्य सूर माझ्यासारखी क्षुद्र स्त्री किंबहुना माझ्यासाठीच वाजविण्यात येते. अशावेळी आपले तनमन या पाण्यात समर्पित करावे आणि ब्रह्मानंदी डोलावे. आज या नदीच्या पात्रामध्ये मला अवघे विश्व संचारल्याचा भास होतो. त्या मुरलीमधून पाझरणारा तो मधुर रस मीच एकटी ग्रहण करीत आहे. खरेच हे केवळ आणि केवळ माझ्याचसाठी...

इंदिरा संतांची 'कुब्जा' ही कविता अशा स्त्रीचं प्रतिनिधित्व करीत आहे की, जी अतिशय क्षुद्र आहे. पण तिच्याही भाळावरती परमेश्वराने अद्‌भुत पूर्व विधिलेख कोरला आहे. जो सर्वस्वी केवळ तिचाच आहे.

**जयश्री कविमंडन**/७७९८७८९८८८

●● ●●

### राक्षसी राजकारणाचे अपयश

सध्या वायनाड येथील निसर्गाचा कोप बघितल्यानंतर असे का घडावे किंवा घडू नये अशाप्रकारच्या शंका उभ्या राहतात. परंतु, निसर्गाचा नियमच आहे की जेव्हा राक्षसी वृत्तीला प्रोत्साहन देऊन त्याचे संरक्षण होते तेव्हा अशा वृत्तीचा सामूहिकपणे नाश करण्याची ताकद निसर्गात आहे, याबद्दल शंका नाही. रस्त्यांवर गोमातेची हत्या करणारे आणि गर्भवती हत्तिणीच्या अन्नामध्ये बॉम्ब ठेवणाऱ्यांना निसर्गाने सामूहिक शिक्षाच दिली आहे. असुर वृत्तीवाल्यांना, स्वधर्माशी गद्दारी करणाऱ्यांना निसर्ग समाप्त केल्याशिवाय राहात नाही, हा नियम आहे. एकवेळ या प्रसंगांची दया माणसांना येईलही; पण निसर्गाला ते कधीच मान्य नसते. हे हिंदू धर्माशी खेळ खेळणाऱ्यांनीही लक्षात घेणे गरजेचे आहे. सज्जनांचे रक्षण करणारा निसर्ग दुर्जनांना शिक्षा देतो; तेच सध्या पदोपदी बघायला मिळते आहे. आघाड्या करून मिळविलेली राज्ये राक्षसी वृत्तीकडे वळली की त्यांचा विनाश ठरलेलाच असतो. याला ज्योतिष बघण्याची गरज नाही. सध्या दिल्लीत पावसाने जनजीवन बेहाल केलेले आहे. जीवन जगणे मुश्किल झाले आहे. न्याय देण्याची मागणी होत आहे. परंतु दारू घोटाळ्याची नशा उतरेल तेव्हाच या जनतेला न्याय मिळेल. कारण राक्षसी राजकारणाचे ते अपयश आहे जे निसर्गाला आवडलेले नाही. अशी अनेक उदाहरणे राज्याराज्यांमधून आहेत; पण बेफान झालेल्यांना ते समजायला वेळ आहे.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे**.● निवासी संपादक : **प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Resident Editor Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### 'ते' सुपारी घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांना भेटले असतील : संजय राऊत यांचा राज यांना टोला

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ४ ऑगस्ट-**

एका फार मोठ्या महाराष्ट्राच्या हितासाठी, सामाजिक कार्यासाठी कोणी भेटले असा काही त्यांचा इतिहास नाही. लोकसभा निवडणुकीपूर्वी ते अमित शाह यांना भेटले आणि विधानसभा निवडणुकीपूर्वी ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटले. मी कोणाचेही नाव घेत नाही. पण दोन्हीही वेळेला दोन वेगवेगळ्या पक्षांची सुपारी किंवा सहकार हे होताना दिसत आहे, असा टोला उद्धव ठाकरे गटाचे नेते खा संजय राऊत यांनी राज ठाकरे यांचे नाव न घेता त्यांना लगावला. राज ठाकरे यांनी शनिवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची वर्षा निवासस्थानी भेट



घेऊन विविध प्रश्नावर चर्चा केली होती. त्याबाबत पत्रकारांनी आज राऊत यांच्याकडे विचारण्यात केले असता ते म्हणाले की, तुम्ही ज्यांच्याबद्दल बोलताय ते महाशय २८८ जागा स्वतंत्रपणे लढणार आहेत. त्यामुळे ही देवाणघेवाण चालूच राहते. ते स्वतंत्र लढणार असतील, तर त्या बदल्यात मुख्यमंत्र्यांनी काहीतरी द्यायला पाहिजे. त्या देवाणघेवाणाबद्दल चर्चा करण्यासाठी ते बंद दाराआड चर्चा करत असतील, असा टोला लगावत राऊत म्हणाले ,'महाराष्ट्राला मराठी माणसाच्या ताकदीचं खच्चीकरण करायचं, यासाठी जर हे लोक मराठी-मराठी करणारे महाराष्ट्रातल्या शत्रूंशी हात मिळवणी करणार असतील तर इतिहास महाराष्ट्राचा त्याला माफ करणार नाही.'

### अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाला सतर्क राहण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या सूचना

**मुंबई, दि. ४ ऑगस्ट-**

भारतीय हवामान खात्याने पुणे आणि जिल्हा परिसरात अतिवृष्टीचा इशारा दिला असून आज जोराचा पाऊस होत आहे. या पार्श्वभूमीवर संपूर्ण प्रशासनाने सज्ज राहावे. नदी आणि धरण परिसरातील संभाव्य धोकादायक क्षेत्रातील नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्यात यावे. आवश्यकता वाटल्यास एनडीआरएफ, एसडीआरएफ आणि सेनादलाची मदत घेण्यात यावी. लोकांचे स्थलांतर केल्यास त्यांच्यासाठी निवारा, कपडे, जेवण, औषधे, आरोग्य सुविधा इत्यादी सर्व व्यवस्था करण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुणे महापालिका आयुक्त आणि पुणे जिल्हाधिकारी यांना दूरध्वनीद्वारे दिल्या आहेत. पुणे परिसरातील खडकवासला, मुळशी, पवना इत्यादी धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. त्या पार्श्वभूमीवर या धरण आणि नदी परिसरातील पूररेषेच्या आतील आणि संभाव्य धोका क्षेत्रातील नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्यात यावे. या विसर्गामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील बाधित होऊ शकणाऱ्या एकतानगर, दत्तवाडी, पाटील इस्टेट, येरवडा परिसर, शिवाजी नगर कोर्ट परिसर, कामगार पुतळा, हॅरीस ब्रीज, दापोडी, जुनी सांगवी, कासारवाडी, पिंपरी कॅम्प, रावेत, बालेवाडी गावठाण, ज्युपीटर हॉस्पिटल परिसर, कपिल मल्हार परिसर, बाणेर, बावधन, संगमवाडी इत्यादी सखल भागातील लोकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात, अशा सूचनाही मुख्यमंत्री शिंदे यांनी दिल्या आहेत.

### माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समुहाचा आज ४२ वा स्थापना दिवस

**पुणे, दि. ४ ऑगस्ट-**

देशातील शिक्षण क्षेत्रात माइल स्टोन ठरलेली माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाचा ४२ वा स्थापना दिवस सोमवार, ५ ऑगस्ट रोजी सकाळी १०.४५ वाजता कोथरूड येथील एमआयटी डब्ल्यूपीयू मधील संत ज्ञानेश्वर सभागृहात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्राचे उद्योग मंत्री उदयजी सामंत हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच अध्यक्षस्थानी



माईर्स एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील. माईर्स एमआयटीचे संस्थापक विश्वस्त प्रा.प्रकाश जोशी व एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. मंगेश तु. कराड यांची उपस्थिती असेल. स्थापना दिनाचे औचित्य साधून ११ कर्मचार्यांचा व संस्थेत १४ वर्षे अविरत सेवा देणारे ३ कर्मचार्यांना विशेष पुरस्काराने सन्मानीत करण्यात येणार आहे. या संस्थेने संत ज्ञानेश्वर माऊली व जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराज यांच्या नावाने अध्यात्मशास्त्राची वैज्ञानिक प्रयोगशाळा या नावाखाली जगातील सर्वात मोठ्या विश्वशांती घुमटाची उभारणी केली आहे. तसेच शैक्षणिक क्षेत्राच्या इतिहासात अभिनव अशी मानवी देह आणि बुद्धी व आत्मा आणि मन यांचा समन्वय साधणारी मूल्याधिष्ठित वैश्विक शिक्षण पद्धतीची संपूर्ण जगाला विश्वशांती व मानवीकल्याणाचा मार्ग दाखविणारी एक अद्भूत व नाविन्यपूर्ण अशी देणगी या संस्थेने दिली आहे.

# राजीव गांधी जयंतीदिनी मुंबई काँग्रेसतर्फे कार्यक्रम

## २० ऑगस्टला खर्गेसह, राहुल गांधी, शरद पवार व उद्धव ठाकरे यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि. ४ ऑगस्ट**

दिवंगत पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्य २० ऑगस्ट मुंबईत काँग्रेसतर्फे भव्य कार्यक्रम केला जाणार असून विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ फोडला जाणार आहे. राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ नेत्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हेही उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी रविवारी दिली.

पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांची बैठक पार पडल्यानंतर चेन्नीथला यांनी ही माहिती दिली. ते पुढे म्हणाले की, जागा वाटपाबद्दल ७ तारखेच्या बैठकीत चर्चा होईल. कोणी किती जागा लढवणार यावर अद्याप चर्चा झालेली नाही. महाविकास आघाडी सक्षम आहे आणि सर्वजण मिळून राज्यात मविआचे सरकार आणण्यासाठी एकजुट होऊन निवडणुकीला सामोरे जाणार आहोत. लोकसभा निवडणुकीत मविआला जनतेने चांगला प्रतिसाद दिला आहे. विधानसभेलाही असाच प्रतिसाद मिळेल.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यावेळी म्हणाले की, महाराष्ट्राचा स्वाभिमान टिकवण्याचा मविआचा प्रयत्न आहे. महाभ्रष्टयुती सरकारने राज्याचा स्वाभिमान विकला आहे, हे सरकार गुजरात धार्जिणे आहे. महाराष्ट्र लूटन सुरतेला देण्याचे काम सुरु आहे. महाराष्ट्रातील जमिनी, संपत्ती विकत आहेत अशा परिस्थितीत महाराष्ट्र वाचवणे हाच मविआचा संकल्प आहे. या मुद्दांवर बैठकीत चर्चा झाली. तसेच राज्यातील विविध मुद्दे घेऊन महाभ्रष्टयुती सरकार विरोधात चार्जसिट बनवून ते प्रसिद्ध केले जाणार आहे, त्यासंदर्भातही चर्चा झाली आहे. राजीव गांधी यांच्या जयंती कार्यक्रमाच्या दिवशी विधानसभेच्या प्रचाराचा नारळ फोडला जाणार आहे.

लाडकी बहिण योजनेला काँग्रेसचा विरोध नाही. भाजपा व सत्ताधारी पक्षातील जे लोक काँग्रेसविरोधात असा अपप्रचार करत आहेत ते पराभवाने घाबरले आहेत. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेशी काँग्रेसचा काहीही संबंध नाही. तेलंगणा, कर्नाटकमध्ये काँग्रेस सरकारने महिलांसाठी महालक्ष्मी योजना सुरु केलेली आहे, संजय गांधी निराधर योजना अनेक वर्षांपासून सुरु आहे. महायुती सरकारनेच काँग्रेसच्या योजनांची नक्कल केली आहे. महायुती सरकार महिलांना फक्त १५०० रुपये देणार आहे परंतु काँग्रेस सत्तेत आल्यास महिलांना लखपती केले जाईल.

कैदेतील सचिन वाझे संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, गृहमंत्री फडणवीस म्हणतात त्याच्याकडे व्हिडिओ, ऑडिओ आहेत, वाझे म्हणतो फडणवीसला माहिती दिली तर फडणवीस म्हणतात माझ्याकडे कसलाही कागद दिला नाही, ही सर्व नौटकी चालली आहे. कैदेतील व्यक्ती मीडियाशी कसा काय बोलू शकतो ?पण काँग्रेसला या विषयावर फार चर्चा करण्याची गरज वाटत नाही.

आजच्या बैठकीला विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, विधान परिषदेतील गटनेते सतेज बंटी पाटील, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड, आमदार भाई जगताप, माजी मंत्री अस्लम शेख, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे आदी उपस्थित होते.

# दीड लाख प्रवाशांना एक्स्प्रेसमधून उतरवले खाली

### कन्फर्म तिकिटाशिवाय प्रवास करणाऱ्यांविरोधात धडक मोहीम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट -**

कन्फर्म तिकिटाशिवाय मेल-एक्स्प्रेसच्या आरक्षित डब्यातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर कारवाई करण्याची धडक मोहीम मध्य रेल्वेने हाती घेतली आहे. त्यानुसार आरक्षित तिकीटशिवाय मेल-एक्स्प्रेसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांविरोधात गेल्या दिड महिन्यात १ लाख ६० हजार प्रवाशांना मेल, एक्सप्रेसमधून खाली उतरविण्यात आले आहे. रेल्वे बोर्डाच्या आदेशानुसार, मध्य रेल्वेने मेल एक्स्प्रेसचे आरक्षण नसताना आरक्षित डब्यांमधून प्रवास करणाऱ्यांविरोधात कारवाई सुरू केली आहे. त्यानुसार मध्य रेल्वेने आरक्षित डब्यातून प्रवाशांना खाली उतरविण्याची मोहीम १४ जून पासून सुरू केली आहे. या कारवाईनुसार गेल्या दिड महिन्यात १ लाख ६० हजार प्रवाशांना मेल / एक्सप्रेसमधून खाली उतरविण्यात आले आहे. सुरुवातीला एका दिवसांत १ हजार ७०० प्रवाशांना रेल्वे गाड्यांतून खाली उतरविण्यात आले होते.

**वेटिंग तिकिटावर आरक्षित डब्यातून प्रवास**

तिकीट खिडकीवर काढलेले तिकीट वेटिंग आले, तरी बहुतांश प्रवासी आरक्षित डब्यातून प्रवास करतात. अशा प्रवाशांना टी.सी.कडून आरक्षित डब्यातून प्रवास करण्यास परवानगी देण्यात येत होती; मात्र अनारक्षित तिकिटावर आरक्षित डब्यातून प्रवास करता येणार नसल्याची उद्घोषणा रेल्वे स्थानकांवर करण्यात येत आहे.

**लोकल तिकिटावर मेल, एक्स्प्रेसमधून प्रवास**

बहुतांशी प्रवासी लोकल तिकिटावर कर्जत, कसारा, कल्याणपर्यंत मेल/एक्स्प्रेसमधून प्रवास करीत असल्याच्या प्रवाशांच्या तक्रारी होत्याा. मध्य रेल्वेने २९ मे २०२४ ला एक्स्प्रेसमध्ये ही कारवाई करत सुमारे १७०० प्रवाशांना खाली उतरविण्यात आले.



# भावसार प्रतिष्ठानच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट -**

भावसार प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेमार्फत नुकताच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ शिवस्मारक येथे पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आ. विजयकुमार देशमुख हे होते व जिल्हा सरकारी वकील तसेच महाराष्ट्र सीबीआय वकील प्रदीपसिंह राजपूत यांच्या हस्ते भावसार समाजातील शंभर विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी कृषी अधिकारी सुधीर जोशी, भावसार प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष दिलीप पतंगे होते. कार्यक्रमास गिरीश माळवदकर, सचिव अरुण आकुडे, विजय काळे यांची प्रमुख उपस्थिती व्यासपीठावर होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपाध्यक्ष नवीन तापसे, खजिनदार सतीश हिबारे यांची मदत लाभली. याप्रसंगी भावसार समाजातील १०० विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन गुणवंत विद्यार्थी म्हणून सत्कार करण्यात आला. सीबीएससी परीक्षेत प्रथम आलेली विद्यार्थी कुमारी प्रणाली महेश महिंद्रकर हिला ५४८ गुण मिळाल्याबद्दल गौरविण्यात आले. सूत्रसंचालन विद्यानिकेतन हायस्कूलचे मुख्याध्यापक गोपी नवले यांनी केले. १० वी बोर्ड परीक्षेत भावसार समाजात प्रथम आलेले विद्यार्थी अनुष्का रपुरे, गौरव कटारे, पियुष महिंद्रकर, बारावी बोर्ड परीक्षेत प्रथम आलेले विद्यार्थी साक्षी दंतकाळे, अर्पिता बासुतकर, तसेच मुकेश महिंद्रकर, निनाद नवले, संस्कार डोईजोडे, सागर महिंद्रकर, खुशी जाधव, आसावरी क्षीरसागर, संस्कृती हंचाटे, श्लोक खमितकर, प्रियरत्न हिबारे यांना पदवीधर ही पदवी मिळाल्याबद्दल गौरविण्यात आले. कार्यक्रमास भावसार भावसार व्हीजनच्या अध्यक्ष प्रणिता महिंद्रकर, हिंगलाज माता पतसंस्थेच्या सदस्या शोभा आकुडे उपस्थित होते. बापू ढगे, शशिकांत रंगदळ, श्रीकांत अंबुरे, सुधीर क्षीरसागर हे समाज बांधव उपस्थित होते.

# बिपीओ, आयटीमध्ये सोलापूर नावारूपास येईल : माऊली झांबरे

### ग्रे नाईट सर्व्हिसेसच्या दुसऱ्या शाखेचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

सोलापूर शहर वेगाने बदलत असून लवकरच सोलापूरच्या होटगी रोड विमानतळावरून नागरी विमानसेवा सुरू होईल. यामुळे सोलापूरमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणुकीच्या संधी निर्माण होतील. यामुळे शहराच्या विकासाचा मार्ग खुला होणार सोलापूर हे भविष्यात बिपीओ आणि आयटीमध्ये नावारूपास येईल, असा विश्वास व्हिजनरीचे चेअरमन माऊली झांबरे यांनी व्यक्त केला.

आयटी बीपीओ आणि बॅक ऑफिस सेवा प्रदानकर्ता म्हणून सोलापूरात ज्यांनी अल्पावधीत लोकप्रियता मिळवली अश्या ग्रे नाईट सर्विसेसने जुळे सोलापूर परिसरात आपल्या दुसऱ्या शाखेचे उद्घाटन केले. यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले, सीईओ अश्विनी झांबरे म्हणाले, नवीन शाखेची १३५ युनिट्सची क्षमता असून, यामुळे सोलापूरच्या तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. या आधी ग्रे नाईट सर्विसेसची पहिली शाखा दमाणी नगरमध्ये ९० युनिट्सच्या क्षमतेने कार्यरत आहे असुन नव्या शाखेच्या



विस्तारामुळे सोलापूरच्या विकासाच्या दिशेने एक नवा विश्वास निर्माण झाला आहे. यावेळी लक्ष्मी हायड्रोलिकचे शरद ठाकरे, सोलापूर विकास मंचचे केतन शहा, विजय जाधव, क्रेडाईचे सुनील फुरडे, प्रदीप पिंपरकर, शिरीष गोडबोले, संतोष सुरवसे, माजी आमदार दिलीप माने, तुकाराम गायकवाड यांनी शुभेच्छा दिल्या.

# राज्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यात अंधश्रध्दा निर्मूलनचा स्वतंत्र कक्ष स्थापन होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट -**

महाराष्ट्रातील प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये अंधश्रद्धा निर्मूलनाचा स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. तशा असल्याचे पत्रक राज्याच्या पोलीस महासंचालक कार्यालयाने जारी केलं आहे. पोलीस प्रशासनाच्या या भूमिकेचे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने स्वागत केले आहे.

भारतात प्रथमच झालेल्या जादूटोणा विरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणीबाबत पोलीसांनी उचललेले पाऊल पथदर्शी आहे. महाराष्ट्रातून जादूटोणा, बुवाबाजीला हद्दपार करण्यासाठी ते उपयुक्त पाऊल ठरेल अशी माहिती महाराष्ट्र अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे, राज्य प्रधान सचिव डॉ. ठकसेन गोराणे यांनी दिली.

'महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा, जादुटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३' या कायद्याची प्रभावी अंमलबजावण्यासाठी पोलीस प्रशासनाने घेतलेली भूमिका पुरोगामी महाराष्ट्राला साजेशी आहे. सदरचा कायदा व्हावा यासाठी महाराष्ट्र अंनिसने सलग अठरा वर्षे सातत्याने विविध आंदोलने, लढे उभे केले होते. संघटनेचे संस्थापक कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या बलिदानानंतर तत्कालीन महाराष्ट्र शासनाने हा कायदा संमत केला होता. संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या प्रयत्नामुळे या कायद्यांतर्गत राज्यभरात आजवर ५०० हून अधिक गुन्हे दाखल झालेले आहेत.

कर्नाटकमध्ये जादुटोणा विरोधी प्रभावी असा कायदा अस्तित्वात आला आहे. केंद्र सरकारने जादूटोणा विरोधी कायदा करावा यासाठी संघटना पाठपुरावा करत आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीला येत्या ९ ऑगस्टला ३५ वर्षे पूर्ण होत आहेत. या पुढील काळातही शोषणमुक्त आणि अंधश्रद्धा मुक्त समाज निर्मितीसाठी संघटना प्रयत्नशील असेल असे महाराष्ट्र अंनिसचे राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे प्रा. डॉ. सुदेश घोडेराव महेंद्र दातरंगे, राज्य सदस्य प्रल्हाद मिस्त्री, राजेंद्र फेगडे, जिल्हा कार्याध्यक्ष डॉ. शामसुंदर झळके, जिल्हा प्रधान सचिव नितीन बागुल, महेंद्र दातरंगे, ॲड समीर शिंदे, प्रा. आशा लांडगे, कोमल वर्दे, अरूण घोडेराव यांनी कळविले आहे.

# 'ऑर्किड'मधील विज्ञान प्रदर्शनाला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

### नव्या तंत्रज्ञानाचा वापर; पर्यावरण संवर्धनासाठी पोषक प्रकल्प

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

शहरातील नागेश करजगी ऑर्किड स्कुल मध्ये भरविण्यात आलेल्या विज्ञान प्रदर्शनास विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. नव्या तंत्रज्ञानावर व पर्यावरण संवर्धनासाठी विविध प्रकल्प सादर करण्यात आले. यामध्ये सोलर प्रकल्पावर भार देण्यात आला असल्याचे दिसून आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन युवा शास्त्रज्ञा अंकिता नगरकर-देगील यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार करजगी, सचिवा वर्षा विभुते, व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी,संस्थेचे संचालक योगिनाथ करजगी, सोम नाथ करजगी, नंदिनी करजगी, यशराज करजगी, प्राचार्या रुपाली हजारे,प्री.प्रायमरी इन्चार्ज अनिता अनगोंडा आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक व आभारप्रदर्शन काजल कुलकर्णी यांनी केले.

नगरकर म्हणाल्या, भारताचे अनमोल रत्न डॉ.अब्दुल कलाम यांनी एक स्वप्न पाहिले होते की भारत हा शास्त्रज्ञाचा देश बनला पाहिजे. त्यांचे हे स्वप्न साकार करण्यासाठी आजच्या विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रदर्शनात सहभागी होऊन आपल्यातील सुप्त गुणांना वाव दिला पाहिजे.

**नाविन्यपूर्ण प्रकल्पाचे केले सादरीकरण**

या विज्ञान प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण असे जल शुद्धीकरण, सोलापूर स्मार्ट सिटीसाठी विजेचे पाच उपाय, चंद्रयान, ग्रीन बिल्डिंग, इलेक्ट्रिक स्केट बोर्ड, थ्रीडी प्रोजेक्टर, रिचार्जेबल टेबल फॅन, पवन चक्की, ऊर्जेची निर्मिती, सोलार प्रकल्प, पाण्याचे नियोजन, मोहोंजोदडो संस्कृती, भारतीय लोकशाही असे विविध प्रयोग सादर केले.

# दिलीपराव लोखंडे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव,दि. ४ ऑगस्ट-**

इंदापुर तालुक्यातील बावडा येथील दिलीपराव जगन्नाथ लोखंडे (वय ७०) यांचे अल्प आजाराने उपचारा दरम्यान निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. पिलीव ग्रामपंचायतीच्या माजी सदस्या



अनिता जेऊरकर यांचे ते वडील व श्रीराम पतसंस्थेचे माजी चेअरमन अविनाश जेऊरकर यांचे ते सासरे होते.

## चुकीची दुरुस्ती

दै. 'तरुण भारत' दि. ०३/०८/२०२४ रोजीच्या अंकात ॲड. बी.आर. पवार यांचे सावधानतेची जाहीर नोटीसमध्ये **स्पे.मु.नं. ३०५/२०१७** असे प्रसिध्द करण्यात आले तरी त्याऐवजी **स्पे.मु.नं. ३०७/२०१७** असे वाचावे

केनरा बैंक Canara Bank
भारत सरकार का उपक्रम A Govt. of India Undertaking
सिंडिकेट Syndicate

**एआरएम शाखा,** सर्कल ऑफिस बिल्डिंग, बालमट्टा रोड, मंगळुरू - ५७५००१.

**विक्री सूचना**

**आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ अंतर्गत जंगम आणि स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना नियम ८ (६) च्या तरतुदीसह वाचली आहे आणि सुरक्षा व्याज (२) च्या नियम ६ (२) सह वाचा अंमलबजावणी) नियम, २००२.**

याद्वारे सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेल्या जंगम आणि जंगम मालमत्ता सुरक्षित कर्जदाराकडे गहाण/शुल्क आकारल्या आहेत, ज्याचा **भौतिक ताबा** अधिकृत व्यक्तीने घेतला आहे. कॅनरा बँकेचे अधिकारी रु.च्या वसुलीसाठी **०६.०९.२०२४** रोजी जसे आहे तसे, जसे आहे तसे, आणि जे आहे ते विकले जातील. **३२,७०,६३,३८१.१६ (रु. बत्तीस कोटी सत्तर लाख त्रेसष्ठ हजार तीनशे एक्याऐंशी आणि सोळा पैसे) ३०.०६.२०२४** रोजीचे दायित्व तसेच ०१.०७.२०२४ पासून पुढील व्याज, घटनात्मक तारखेपर्यंतच्या व्याजाच्या दराने करारानुसार पेमेंट कॅनरा बँकेच्या A.R.M शाखा, सर्कल ऑफिस बुलिडिंग, मंगळुरू-५७५००१ चे खर्च, इतर शुल्क आणि खर्च **M.S. शिवप्रियदर्शिनी कास्टिंग्ज प्रायव्हेट लि.,** त्याचे व्यवस्थापकीय संचालक **श्री. अण्णासाहेब सदाशिव चौगुले** यांनी प्रतिनिधित्व केले. ज्ञात असलेल्या जंगम आणि स्थावर मालमत्तेचे तपशील आणि संपूर्ण वर्णन बोजा, जर असेल तर.

| लॉट क्र. | मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत | बयाणा पैसे ठेव |
|---|---|---|---|
| **मालमत्ता १: मालमत्ताधारकाचे नावः M/s. शिवप्रियदर्शिनी एंटरप्रायझेस** | | | |
| **लॉट १** | Sy मध्ये स्थित होनागा औद्योगिक क्षेत्राचा भूखंड क्रमांक ४८- म्हणून ओळखला जाणारा तो सर्व जमिनीचा तुकडा. होनागा गाव, काकती होबळी, बेळगाव तालुका, बेळगाव जिल्ह्यातील क्रमांक ५३६, विक्री विपत्र ९६४२/१३-१४ नुसार दिनांक ०८.११.२०१३ नुसार २१२१.८९ चौ.मी. कर्नाटक इंडस्ट्रियल एरिया डेव्हलपमेंट बोर्ड, बंगलोरचे ताबा प्रमाणपत्र दि. ०३.११.१९९७.) सीमाः **पूर्वः** भूखंड क्रमांक ४८/बी; **पश्चिमः** ६० रुंद रस्ता; **उत्तरः** प्लॉट क्रमांक ४७/A२; **दक्षिणः** भूखंड क्रमांक ४९/अ. | **रु. ३,४२,२५,०००/-** | **रु. ३४,२२,५००/-** |
| **लॉट २** | सर्व काल्पनिक जंगम मालमत्ता ज्यामध्ये प्लॉट नं.४८, KIDB, बेळगाव मध्ये ठड मध्ये वसलेल्या औद्योगिक इमारतीमध्ये स्थापित उपकरणे, प्लांट आणि यंत्रसामग्री आहेत. No.५३६ होनागा औद्योगिक क्षेत्र होनागा, काकती तालुका आणि जिल्हा बेळगावी येथे स्थित आहे. | **रु. ६०,३२,०००/-** | **रु. ६,०३,२००/-** |
| **लॉट नं.१ फक्त लॉट २ च्या आयटमसाठी वेगळी वैध बोली प्राप्त झाल्यास आणि यशस्वी झाल्यासच विकला जाईल. तथापि, पक्ष लॉट-१ आणि लॉट-२ दोन्हीसाठी बोली लावू शकतात आणि दोन्ही वस्तू घेऊ शकतात.** | | | |
| **मालमत्ता २: मालमत्ताधारकाचे नावः M/s. शुभम इंडस्ट्रीज (भागीदारी फर्म)** | | | |
| २. | मालमत्ता (पुढील भाग कार्यालय आणि मागील बाजूस औद्योगिक शेड/गोदाम आणि इतर सुविधांचा समावेश आहे) भूखंड क्रमांक ४९/ (भाग) R.S.No.५३६ आकारमान ९०० चौ.मीटर, KIDB होनागा औद्योगिक क्षेत्र होनागा, बेलागावी येथे आहे. सीमाः **पूर्वः** भूखंड क्रमांक ४९/बी; **पश्चिमः** ६० रुंद रस्ता; **उत्तरः** प्लॉट क्र. ४९ चा भाग; **दक्षिणः** प्लॉट क्र. ५०. | **रु. १,१७,२९,०००/-** | **रु. ११,७२,९००/-** |
| **मालमत्ता ३: मालमत्ता मालकाचे नावः M/s. शिवप्रियदर्शनी कास्टिंग प्रा. लि.** | | | |
| ३. | मालमत्तेचा तो सर्व भाग आणि पार्सल ज्यामध्ये भूखंड क्रमांक ४९-ए (उत्तर भाग), आर.एस. क्र. ५३६, ८६९.७५ चौ. Mtrs., KIDB औद्योगिक क्षेत्र, होनागा, बेळगाव. सीमाः **पूर्वः** भूखंड क्रमांक ४९/बी; **पश्चिमः** रस्ता क्रमांक ४ म्हणजेच ६० फूट रुंद रस्ता; **उत्तरः** भूखंड क्रमांक ४८/अ; **दक्षिणः** भूखंड क्रमांक ४९ (भाग) म्हणजेच ४९/अ (भाग) | **रु. ८७,२१,०००/-** | **रु. ८,७२,१००/-** |

बयाणा रक्कम जमा ०५.०९.२०२४ रोजी किंवा त्यापूर्वी संध्याकाळी ५.०० वाजता जमा केली जाईल. वरील मालमत्तेवर आमच्या माहितीनुसार लिलाव खरेदीदाराच्या शीर्षकाला प्रभावित करणारे कोणतेही भार नाहीत.

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी कृपया कॅनरा बँकेच्या वेबसाइटवर **(www.canarabank.com)** प्रदान केलेली ई-लिलाव लिंक पहा. मुख्य व्यवस्थापक, एआरएम शाखा कॅनरा बँक, सर्कल ऑफिस बिल्डिंग, बालमट्टा रोड मंगळुरू - ५७५००१, पीएच. ०८२४ २४४०४६९, ०८२४ २८६३३६७, ९३६१९९६७५५ कोणत्याही कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत.

**दिनांकः ०२.०८.२०२४**
**ठिकाणः मंगळुरु**

**सही/-**
**अधिकृत अधिकारी**
**कॅनरा बँक**



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/
सोलापूर : सोमवार, ५ ऑगस्ट २०२४

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्त्वाचे

### पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज भारताचे सामने

**नेमबाजी** : स्कीट मिश्र संघ (पात्रता) : माहेश्वरी चौहान आणि अनंतजित सिंग नारुका, दुपारी १२.३० वा.

**टेबल टेनिस** : महिला संघ (उपांत्यपूर्व ) : भारत विरुद्ध रोमानिया, दुपारी १.३० वा.

**रोइंग** : महिला (पहिली फेरी) : नववी शर्यत - दुपारी ३.४५ वा.

**महिला** (पहिली फेरी) : दहावी शर्यत - दुपारी ४.५३ वा.

**पुरुष** (पहिली फेरी) : नववी शर्यत - संध्याकाळी ६.१० वा.

**पुरुष** (पहिली फेरी) : दहावी शर्यत - संध्याकाळी ७.१५ वा.

**ॲथ्लेटिक्स** : महिला ४०० मीटर (पहिली फेरी): किरण पहल - दुपारी ३.५७

**पुरुष -** ३,००० मीटर स्टीपलचेस (पहिली फेरी) : अविनाश साबळे - रात्री १०.५० वा.

**बॅडमिंटन** : पुरुष एकेरी (कांस्य पदक प्लेऑफ) : लक्ष्य सेन विरुद्ध ली जी जिया (मलेशिया) - संध्याकाळी ६ वा.

### बेल्जियम पदकाच्या शर्यतीतून बाहेर

**पॅरिस** : सध्याचा विजेता बेल्जियम पॅरिस ऑलिम्पिकच्या पुरुष हॉकी स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत स्पेनकडून २-३ ने पराभूत झाला आणि पदकाच्या शर्यतीतून बाहेर पडला. ब गटात भारताला हरवणारा बेल्जियम हा एकमेव संघ आहे. याशिवाय भारतीय संघ अद्याप एकही सामना हरलेला नाही. स्पेनसाठी जोस मारिया बुस्तेराने ४० व्या मिनिटाला, मार्क रेनीने ५५ व्या मिनिटाला आणि मार्क मिरालेसने ५७ व्या मिनिटाला गोल केले. बेल्जियमसाठी आर्थर डी स्ल्युव्हरने ४१व्या मिनिटाला आणि अलेक्झांडर हेंड्रिक्सने ५८व्या मिनिटाला गोल केले.

### भारतीय नेमबाज अंतिम फेरीत प्रवेशापासून वंचित

**पॅरिस** : भारतीय नेमबाज विजयवीर सिद्धू आणि अनिश भानवाल रविवारी येथे पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेच्या पुरुषांच्या २५ मीटर रॅपिड फायर पिस्तूल प्रकाराच्या अंतिम मालिकेत प्रभावी कामगिरी करूनही अंतिम फेरीत प्रवेश करू शकले नाहीत. विजयवीर आणि अनिश हे दोन टप्प्यांच्या पात्रतेच्या दुसऱ्या रॅपिड फायर फेरीच्या शेवटच्या १० शॉट्सपर्यंत अंतिम फेरीत प्रवेश करण्याच्या शर्यतीत होते परंतु अनुक्रमे ९२ आणि ९३ गुणांसह नवव्या आणि १३व्या स्थानावर होते. तत्पूर्वी, माहेश्वरी चौहान आणि रजा धिल्लन यांना महिलांच्या स्कीट स्पर्धेत अनुक्रमे १४व्या आणि २३व्या स्थानावर राहून अंतिम फेरीत प्रवेश मिळू शकला नाही. पाच फेऱ्यांच्या पात्रतेच्या शेवटच्या दोन मालिका रविवारी खेळल्या गेल्या. त्यानंतर माहेश्वरीची एकूण गुणसंख्या ११८ झाली. तिने पाच फेऱ्यांमध्ये २३, २४, २४, २५ आणि २२ गुण केले. रजाची एकूण गुणसंख्या ११३ होती. त्याने पाच फेऱ्यांमध्ये २१, २२, २३, २३ आणि २४ गुण केले. या स्पर्धेत २९ नेमबाजांनी भाग घेतला, त्यापैकी अव्वल सहा जणांनी अंतिम फेरी गाठली. आता माहेश्वरी मिश्र सांघिक स्कीटसाठी अनंतजित सिंग नारुका सोबत रेंजमध्ये जाईल. ऑलिम्पिकमध्ये ही स्पर्धा प्रथमच होणार आहे.

### पंचांच्या भूमिकेवर भारतीय हॉकी महासंघाची चिंता

**पॅरिस** : ऑलिम्पिक २०२४ च्या हॉकी स्पर्धेतील पंचांच्या कामगिरीबद्दल भारतीय हॉकी महासंघाने रविवारी अधिकृतपणे चिंता व्यक्त केली. ही तक्रार भारत आणि ब्रिटन यांच्यातील उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्याशी संबंधित आहे. ज्यात पंचांच्या अनेक निर्णयांमुळे सामन्याच्या निकालावर परिणाम झाला. या सामन्यात अनुभवी बचावपटू अमित रोहिदासला १८व्या मिनिटाला रेड कार्ड मिळाल्यानंतर भारताला जवळपास ४५ मिनिटे दहा खेळाडूंसह खेळावे लागले.

### पदक जिंकेपर्यंत खेळतच राहणार : दीपिका कुमारी

**पॅरिस** : पदक जिंकेपर्यंत मी निवृत्त होणार नाही, अशी घोषणा सलग चार ऑलिम्पिकमध्ये अपयशी ठरलेली, अनेक विश्वचषक पदक विजेती तिरंदाज दीपिका कुमारी केली आहे. लॉस एंजेलिसमध्ये चार वर्षांनंतर आपण जिंकू असा विश्वास तिने व्यक्त केला. मला भविष्यात आणखी खेळायचे आहे आणि माझा खेळ सुरूच ठेवणार आहे. दीपिका खेळाच्या सर्वात मोठ्या स्पर्धेत दबावाच्या परिस्थितीत अपयशी ठरली आहे. ती पॅरिसमध्ये सलग चौथ्या ऑलिम्पिकमध्ये खेळण्यासाठी आली होती.


# भारताची ब्रिटनवर ४-२ गोलने मात

**पेनल्टी शूटआऊटमध्ये लागला निकाल**

**सलग दुसऱ्यांदा उपांत्य फेरीत**

**गोलरक्षक श्रीजेशची कमाल**

**दहा खेळाडूंसह खेळला संघ**



ब्रिटनची संरक्षण फळी भेदून चेंडू आपल्या ताब्यात घेताना भारताचा मनप्रीत सिंह.

◆ **पॅरिस, ४ ऑगस्ट**

भारतीय हॉकी संघाने पेनल्टी शूटआऊटमध्ये ब्रिटनचा पराभव करून इतिहास घडविला आणि सलग दुसऱ्यांदा ऑलिम्पिकची उपांत्य फेरी गाठली. चार क्वार्टर संपल्यानंतर दोन्ही संघांची गोलसंख्या १-१ अशी बरोबरीत होती. निर्धारित वेळेपर्यंत दोन्ही संघांनी आघाडी घेण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांना यश आले नाही. यानंतर पेनल्टी शूटआऊटचा अवलंब करण्यात आला ज्यामध्ये भारताने ब्रिटनचा ४-२ असा पराभव केला.

या सामन्यात भारत १० खेळाडूंसह खेळत होता कारण अमित रोहिदासला दुसऱ्या क्वार्टरमध्ये रेड कार्ड मिळाल्यामुळे तो संपूर्ण सामन्यातून बाहेर पडला होता. मात्र, भारतीय संघाने हार न मानता अखेरपर्यंत ब्रिटनला कडवी झुंज दिली. अशा प्रकारे भारतीय संघाने पदकाच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकले आहे. भारत उपांत्य फेरीत विजय मिळवण्यात यशस्वी ठरला, तर किमान रौप्यपदक निश्चित होईल. भारताचा उपांत्य फेरीचा सामना मंगळवार, ६ ऑगस्ट रोजी होणार आहे.


भारत आणि ब्रिटन यांच्यातील उपांत्यपूर्व सामन्याच्या तिसऱ्या उपांत्यपूर्व फेरीपर्यंत १-१ अशी बरोबरी होती. दोन्ही संघांनी एकमेकांवर आक्रमण केले, मात्र त्यांना गोल करता आला नाही. तत्पूर्वी, हाफ टाईमपर्यंत दोन्ही संघांची गोलसंख्या १-१ अशी बरोबरीत होती.

दुसऱ्या क्वार्टरमध्ये भारताच्या अमित रोहिदासला रेड कार्ड मिळाल्यामुळे त्याला मैदान सोडावे लागले. मात्र, हरमनप्रीत सिंगने केलेल्या शानदार गोलच्या जोरावर भारताने ती मागे टाकली आणि आघाडी घेतली, मात्र ली मॉर्टनने लवकरच ब्रिटनसाठी बरोबरी साधणारा गोल केला. ब्रिटनसाठी ली मॉर्टनने काऊंटर अटॅकवर गोल केला, तर हरमनप्रीत सिंगने पेनल्टी कॉर्नरवर गोल करत २२ व्या मिनिटाला १० खेळाडूंसह खेळत भारतीय संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. पॅरिस ऑलिम्पिकमधील हरमनप्रीतचा हा सातवा गोल होता. मॅच रेफ्रींनी रोहिदासला ब्रिटिश खेळाडूच्या डोक्यात जाणीवपूर्वक हॉकी स्टिकने मारल्याबद्दल दोषी आढळले आणि त्याला लाल कार्ड देऊन बाहेर पाठवले. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये खेळाडूला रेड कार्ड देण्याची ही पहिलीच वेळ आहे.

पहिल्या क्वार्टरमध्ये दोन्ही संघांना पेनल्टी कॉर्नर मिळाले, मात्र त्यांचे गोलमध्ये रूपांतर कोणीही करू शकले नाही. यादरम्यान भारताचा गोलरक्षक पीआर श्रीजेशने दमदार कामगिरी करत ब्रिटनचे प्रत्येक आक्रमण रोखण्यात यश मिळवले. टोकियो ऑलिम्पिकच्या रौप्यपदक विजेत्या ऑस्ट्रेलियावर त्यांच्या अंतिम पूल सामन्यात ऐतिहासिक विजय मिळविल्यानंतर आत्मविश्वासाने उंचावलेला भारतीय पुरुष हॉकी संघ पॅरिस ऑलिम्पिकच्या उपांत्यपूर्व फेरीत ब्रिटनविरुद्धची ही विजयी मालिका कायम ठेवण्यात यशस्वी ठरला. ◀(वृत्तसंस्था)

### विजयानंतर श्रीजेश झाला भावुक

हॉकीमध्ये उपांत्यपूर्व फेरीत विजय मिळवल्यानंतर भारतीय संघाचा गोलरक्षक श्रीजेश म्हणाला, मी स्वतःला सांगितले की हा माझा शेवटचा सामना असू शकतो किंवा जर मी गोल वाचवले तर मला आणखी २ सामने खेळायला मिळतील. हा सामना जिंकून मला खूप आनंद झाला आहे. श्रीजेशचे हे शेवटचे ऑलिम्पिक आहे. त्याने यापूर्वीच निवृत्ती जाहीर केली आहे.



डेन्मार्कच्या व्हिक्टर ॲक्सेलसेनचा शॉट परतवताना भारताचा लक्ष्य सेन

# लक्ष्य सेनचा ॲक्सेल'सेन'कडून पराभव

**कांस्यपदकासाठी आज होणार लढत**

◆ **पॅरिस, ४ ऑगस्ट**

भारतीय पुरुष एकेरी बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनला डेन्मार्कच्या व्हिक्टर ॲक्सेलसेनविरुद्धच्या उपांत्य सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला. ॲक्सेलसेनने त्याचा २२-२०, २१-१४ अशा फरकाने पराभव केला. हा पराभव झाला असला तरी लक्ष्य आता सोमवारी कांस्यपदकासाठी सज्ज राहणार आहे.

सामना हरल्यानंतर लक्ष्य म्हणाला, हा मोठा सामना होता, पण मला थोडे सावधपणे खेळावे लागले. दुसऱ्या गेममध्ये मी चांगली सुरुवात केली आणि आघाडी घेतली, पण ती राखता आली नाही. सुरुवातीपासून ज्या पद्धतीने खेळ सुरू होता, त्यात ॲक्सलसन आक्रमक खेळत होता आणि मी बचावात्मक खेळ करत होतो. मला वाटते की मी आक्रमण करायला हवे होते. आता मी कांस्यपदकासाठी सर्वोत्तम प्रयत्न करेन. प्रेक्षकांनी मला खूप प्रोत्साहन दिले आणि माझे आई-वडीलही इथे आहेत, त्यामुळे माझा आत्मविश्वास बळावला आहे. मला आशा आहे की आज मला प्रेक्षकांचा जसा पाठिंबा मिळाला तोच उद्याच्या सामन्यात कायम राहील.

भारतीय बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनचा पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत डेन्मार्कच्या व्हिक्टर ॲक्सेलसेनविरुद्ध पराभव झाला. लक्ष्यने सामन्याची शानदार सुरुवात केली होती, परंतु ॲक्सेलसेनने दोन्ही गेममध्ये भारतीय खेळाडूवर मात केली आणि त्याने लक्ष्यचा २२-२०, २१-१४ असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. ऑलिम्पिक उपांत्य सामना खेळणारा लक्ष्य हा पहिला भारतीय पुरुष एकेरी खेळाडू आहे. हा सामना जिंकून भारतासाठी पदक निश्चित करण्याची त्याच्याकडे संधी होती. मात्र त्याला यश आले नाही. लक्ष्यचा कांस्यपदकासाठी सातव्या मानांकित मलेशियाच्या जिया जी लीशी सामना होईल. सोमवारी हा सामना होणार आहे. ◀(वृत्तसंस्था)

# ऑल्ड्रिन, पारुल पॅरिस ऑलिम्पिकमधून बाहेर

◆ **पॅरिस, ४ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेतील ॲथ्लेटिक्स स्पर्धेत भारताची निराशाजनक कामगिरी रविवारीही कायम राहिली. राष्ट्रीय विक्रमवीर पारुल चौधरी आणि जेसविन ऑल्ड्रिन अनुक्रमे महिलांच्या ३००० मीटर स्टीपलचेस आणि पुरुषांच्या लांब उडीमध्ये अंतिम फेरीसाठी पात्र ठरू शकले नाहीत.



जेसविन ऑल्ड्रिन, पारुल चौधरी

पारुलने पॅरिस ऑलिम्पिकमधील तिच्या हीट रेसमध्ये आठव्या स्थानावर आणि एकूण २१व्या स्थानावर राहून तिची मोहीम संपवली.

ऑलिम्पिकपूर्वी अमेरिकेतील पॅरिसच्या अनुकूल परिस्थितीत सराव करणाऱ्या २९ वर्षीय पारुलने नऊ मिनिटे २३.३९ सेकंदात हे अंतर पार केले, ही तिची या मोसमातील सर्वोत्तम कामगिरी आहे. तथापि, २०२३ च्या जागतिक स्पर्धेत तिने नऊ मिनिटे १५.३१ सेकंदांच्या राष्ट्रीय विक्रमापासून ती खूप मागे होती. तीन हीट शर्यतींपैकी प्रत्येकी पहिल्या पाचमध्ये स्थान मिळवणारे खेळाडू अंतिम फेरीत पोहोचतात.

पारुलच्या हीट रेसमध्ये युगांडाची सध्याची ऑलिम्पिक चॅम्पियन पेरुथ चेमुताई ९:१०.५१ च्या वेळेसह प्रथम राहिली. केनियाचा फेथ चेरोटिच (९:१०.५७) आणि जर्मनीचा गेसा फेलिसिटास क्रुसे (९:१०.६८) अनुक्रमे दुसरा आणि तिसरा राहिला.

यासह पारुलची पॅरिस ऑलिम्पिकमधील मोहीमही संपुष्टात आली. ती आणि अंकिता ध्यानी महिलांच्या ५००० मीटर शर्यतीत पात्र ठरू शकल्या नाहीत.

पुरुषांच्या लांब उडीच्या पात्रता फेरीत, आल्ड्रिनने पहिल्या दोन प्रयत्नात फाऊल केले आणि तिसऱ्या प्रयत्नात तो केवळ ७.६१ मीटरपर्यंत पोहोचू शकला. तो गट ब पात्रतेमध्ये १६ खेळाडूंपैकी १३ व्या आणि एकूण २६ व्या स्थानावर आहे. पहिल्या १२ मानांकित खेळाडूंनी पुढील फेरीत प्रवेश केला.

ऑल्ड्रिनची हंगामातील सर्वोत्तम ७.९९ मीटर आणि वैयक्तिक सर्वोत्तम ८.४२ मीटर आहे. ◀(वृत्तसंस्था)

# श्रीलंकेचा वानिंदू हसरंगा एकदिवसीय सामन्यातून बाहेर

◆ **कोलंबो, ४ ऑगस्ट**

अष्टपैलू खेळाडू वानिंदू हसरंगा हा दुखापतीमुळे भारत आणि श्रीलंका यांच्यात सुरू असलेल्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतून बाहेर पडला आहे.

पहिला एकदिवसीय सामना रोमहर्षक बरोबरीत सुटल्याने, रविवारी येथील आर. प्रेमदासा स्टेडियमवर भारत आणि श्रीलंका यांच्यात दुसरा वनडे सामना झाला. वानिंदू हसरंगा उर्वरित एकदिवसीय मालिकेला मुकणार आहे. त्याच्या डाव्या हाताला दुखापत झाली आहे, असे श्रीलंका क्रिकेटच्या एका निवेदनात सांगितले आहे.

पहिल्या एकदिवसीय सामन्यात त्याच्या १०व्या षटकातील शेवटचा चेंडू टाकताना त्याच्या डाव्या हाताला दुखापत झाली. यानंतर त्याचा एमआरआय करण्यात आल्याने दुखापतीची पुष्टी झाली.

हसरंगाच्या जागी जेफ्री वेंडरसेला संघात स्थान देण्यात आले आहे. ३४ वर्षीय वेंडरसेने श्रीलंकेसाठी २२ एकदिवसीय सामन्यांपैकी शेवटचा सामना या वर्षी जानेवारीमध्ये झिम्बाब्वेविरुद्ध खेळला होता. तिसरा आणि शेवटचा वनडे ७ ऑगस्ट रोजी त्याच मैदानावर खेळवला जाईल. ◀(वृत्तसंस्था)

# मोहम्मद सिराजने घेतला पहिल्याच चेंडूवर बळी

**जहीर खानच्या पराक्रमाशी बरोबरी**

◆ **कोलंबो, ४ ऑगस्ट**

भारत आणि श्रीलंका यांच्यात ३ सामन्यांची वनडे मालिका सुरू आहे. त्यातील पहिला सामना बरोबरीत राहिला. त्यानंतर रविवारी दुसऱ्या सामन्यात श्रीलंकेचा कर्णधार चरिथ असलंकाने नाणेफेक जिंकून पुन्हा एकदा प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. श्रीलंकेविरुद्ध गेल्या काही वनडे सामन्यात विक्रमी कामगिरी करणाऱ्या मोहम्मद सिराजने आज पुन्हा एकदा मोठा पराक्रम केला आणि दिग्गज गोलंदाज जहीर खान याच्या कामगिरीशी बरोबरी केली.



सामना सुरू झाला तेव्हा सिराज पहिले षटक टाकण्यासाठी धावला. सामन्याचा पहिलाच चेंडू टप्पा पडून थोडासा स्विंग झाला आणि फलंदाजाच्या बॅटचे टोक लागून यष्टिरक्षकाकडे गेला. हा फलंदाज होता सलामीवीर पाथुम निसंका. निसंकाच्या बॅटला लागून गेलेला चेंडू यष्टिरक्षक राहुलने झेलला आणि त्यामुळे सामन्याच्या पहिल्याच चेंडूवर पाथुम निसंका झेलबाद झाला.

मोहम्मद सिराजने पहिल्याच चेंडूवर गडी बाद केला. त्यामुळे जहीर खान आणि प्रवीण कुमार या दोघांच्या पराक्रमाशी बरोबरी साधली. श्रीलंकेच्या सलामीवीराला वनडे क्रिकेटमध्ये भारतीय गोलंदाजाने पहिल्या चेंडूवर बाद करण्याची ही चौथी वेळी ठरली. याआधी भारतीय गोलंदाज जहीर खानने श्रीलंकेविरुद्ध २००२ आणि २००९ असा दोन वेळा हा पराक्रम केला होता. त्यानंतर २०१० मध्ये स्विंग गोलंदाजीत निष्णात असलेल्या प्रवीण कुमारने ही कामगिरी केली होती. त्यानंतर आज पुन्हा सिराजने ही कामगिरी केली. ◀(वृत्तसंस्था)

# लवलिना बोर्गोहेनचा उपांत्यपूर्व फेरीत पराभव

**मुष्टियुद्धातील भारताचे आव्हान संपुष्टात**



महिलांच्या मुष्टियुद्ध सामन्यात चीनची ली कियान भारताच्या लवलिना बोर्गोहेनला ठोसा मारताना

◆ **पॅरिस, ४ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या ७५ किलो वजनी मुष्टियुद्ध प्रकारात उपांत्यपूर्व सामना भारताच्या लवलिना बोर्गोहेनचा सामना जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या चीनच्या ली कियानशी झाला. लवलिना हरल्यानंतर पुरुष आणि महिला मुष्टियुद्धातील भारताचे आव्हान संपुष्टात आले.

टोकियो ऑलिम्पिक २०२० मध्ये कांस्यपदक विजेती लवलिना बोर्गोहेन पॅरिस ऑलिम्पिकमध्ये उपांत्यपूर्व फेरीच्या पुढे जाऊ शकली नाही. महिलांच्या ७५ किलो गटात चीनच्या अव्वल ली कियानने तीनही फेऱ्यांमध्ये तिचा पराभव केला. कियानने लवलिनाचा ४-१ असा पराभव केला. लवलिनाला उपांत्यपूर्व फेरीत पहिल्याच फेरीत पराभव पत्करावा लागला होता. त्याचवेळी लवलिनालाही दुसऱ्या फेरीत पराभव पत्करावा लागला होता. शनिवारी निशांत देवलाही उपांत्यपूर्व फेरीत पराभव पत्करावा लागला आणि भारताचे मुष्टियुद्धातील आव्हान संपुष्टात आले. ◀(वृत्तसंस्था)

### निशांत देवसोबत झाली फसवणूक

पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये भारतीय मुष्टियोद्धा निशांत देवचे पदक जिंकण्याचे स्वप्न भंगले. पुरुष बॉक्सिंगच्या ७१ किलो वजनी गटात निशांत देवचा सामना मेक्सिकोच्या मार्को वेर्देशी झाला. निशांत देवला १-४ ने पराभव स्वीकारावा लागला. निशांतने उपांत्यपूर्व फेरीत विजय मिळवला असता, तर किमान कांस्यपदक जिंकणे निश्चित झाले असते. निशांतने सुरुवातीची फेरी सहज जिंकली. पहिल्या फेरीत, पाच पैकी चार न्यायाधीशांनी निशांतला १०-१० गुण दिले. त्यानंतर दुसऱ्या फेरीत निशांत पूर्ण नियंत्रणात दिसला, जिथे त्याने मेक्सिकनवर अनेक मोठे ठोसे लावले. तरीही त्या फेरीत रेफ्रींनी आश्चर्यकारकपणे वेर्देची बाजू घेतली. दुसऱ्या फेरीत फक्त दोन रेफ्रींनी निशांतच्या बाजूने १०-१० गुण दिले. तर तीन रेफ्रींनी वेर्देच्या बाजूने निकाल दिला. मात्र, निशांत देवला तिसऱ्या फेरीत गती राखता आली नाही. तिसऱ्या फेरीत पाचही रेफ्रींनी वेर्देच्या बाजूने निकाल दिला. तिसरी फेरी संपली तेव्हा निशांत देव खूपच आत्मविश्वासाने दिसला. तो सामना जिंकल्याची त्याला पूर्ण खात्री होती, पण जो निर्णय आला तो आश्चर्यचकित करणारा होता. निशांत उपांत्यपूर्व फेरीत १-४ असा पराभूत झाला होता. समालोचकांनाही या निर्णयाचे आश्चर्य वाटले.



भारताचा मुष्टियोद्धा निशांत देव मेक्सिकोच्या मार्को वेर्देशी झुंज देताना

# कुस्तीमध्ये पदकांची घोडदौड कायम ठेवणार भारत

**आजपासून कुस्ती स्पर्धा ● विनेश फोगाट प्रबळ दावेदार**

◆ **पॅरिस, ४ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिकच्या १० व्या दिवशी सोमवारपासून कुस्ती स्पर्धा सुरू होत आहेत. गेल्या काही ऑलिम्पिकमध्ये भारताला कुस्तीमध्ये सातत्याने पदके मिळत आहेत आणि कुस्तीपटूंना ही परंपरा कायम ठेवायची असेल तर विनेश फोगटसह सहाही कुस्तीपटूंना आपली सर्वोत्तम कामगिरी करावी लागेल.

२००८ च्या बीजिंग ऑलिम्पिकपासून भारताने प्रत्येक ऑलिम्पिक खेळांमध्ये कुस्तीमध्ये पदके जिंकली आहेत. अशा परिस्थितीत सर्वांच्या नजरा अनुभवी कुस्तीपटू विनेशवर असतील. विनेशने जागतिक अजिंक्यपदमध्ये दोन, राष्ट्रकुल स्पर्धेत तीन आणि आशियाई अजिंक्यपदमध्ये आठ पदके जिंकली आहेत पण तिला अद्याप ऑलिम्पिक पदक जिंकता आलेले नाही.



महिला कुस्तीपटू विनेश पदक मिळवून देण्याची प्रबळ दावेदार आहे. मात्र तिला ऑलिम्पिकपूर्वी सरावाची पुरेशी संधी मिळाली नाही. लैंगिक छळाच्या आरोपांवरून भारतीय कुस्ती महासंघाच्या माजी अध्यक्षांविरोधात आंदोलन करणाऱ्या प्रमुख खेळाडूंपैकी ती होती. विनेशच्या वजन वर्गात अनेक दिग्गज कुस्तीपटूंचा समावेश आहे. ज्यात चार वेळा विश्वविजेती युई सुसाकी, चार वेळा ऑलिम्पिक पदक विजेती मारिया स्टॅडनिक, टोकियो गेम्सची कांस्य विजेती सारा हिल्डेब्रांड आणि दोन वेळा जागतिक पदक विजेती डॉल्गोर्झाविन ओटगोंजार्गल यांचा समावेश आहे. अंशू मलिक (महिला ५७ किलो) आणि अमन सेहरावत (पुरुष ५७ किलो) हेही पदकाच्या दावेदारांमध्ये आहेत. ◀(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





# पूर परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी यंत्रणा सज्ज

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ ऑगस्ट-**

उजनी व वीर धरण पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पर्जन्यवृष्टी झाल्याने भीमा नदीमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात आलेले आहे वाढणारा पाण्याचा विसर्ग लक्षात घेता नदीकडच्या लोकांनी सतर्क राहावे म्हणून वारंवार सूचना देण्यात येत आहेत. या बरोबरच नदी काठावरील नागरिकांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर देखील करण्यात आल्याची माहिती पालिकेचे उपमुख्यमुख्याधिकारी सुनील वाळुजकर यांनी दिली.

या संदर्भात माहिती देताना वाळुजकर यांनी सांगितले की, उजनी व वीर धरण पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पर्जन्यवृष्टी झाल्याने भीमा नदीमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात आलेले आहे. वाढणारा पाण्याचा विसर्ग लक्षात घेता रविवारी दुपारी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व प्रांत अधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार सचिन लंगुटे, उपमुख्याधिकारी अँड.सुनिल वाळूजकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी व्यास नारायण झोपडपट्टी व अंबाबाई पटांगण झोपडपट्टी येथे समक्ष पाहणी करून पूर परिस्थिती पाहता नागरिकांनी त्वरित आपले कुटुंब सुरक्षित राहण्याच्या दृष्टीने त्वरित स्थलांतरित करावे अशी सूचना देण्यात आल्या. नदीपात्रा लगतच्या व्यास नारायण झोपडपट्टी व अंबाबाई पटांगण झोपडपट्टी येथील ३५ झोपडपट्टी धारक यांना स्थलांतर करण्यासंबंधी नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

अंदाजे ७५ कुटुंब राहू शकतील अशा रायगड दिंडी समाज मठ उपजिल्हा रुग्णालयाच्या समोर येथे त्यांची राहण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे तसेच लोकमान्य विद्यालय जुन्या कोर्टासमोर येथेही व्यवस्था करण्यात आलेली आहे स्पीकर द्वारे सर्वांना पुराची वाढती पातळी लक्षात घेता नागरिकांनी स्थलांतरित व्हावे म्हणून ही सूचना देण्यात आलेले आहेत.

या ठिकाणी आपत्कालीन परिस्थिती उद्धभवू नये म्हणून अग्निशमन वाहन,एक बोट ठेवण्यात आली आहे तसेच दोन ट्रॅक्टर एक ट्रक यांचे द्वारे नागरिकांचे सामान नेण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत तसेच नगर परिषदेची अधिकारी व कर्मचाऱ्यांची सर्व टीम त्या ठिकाणी कार्यरत आहे प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार सचिन लंगुटे साहेब, उपमुख्याधिकारी अँड. सुनील वाळूजकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, माजी नगराध्यक्ष लक्ष्मणराव शिरसट, माजी नगरसेवक विक्रम शिरसाट, आरोग्य अधिकारी शरद वाघमारे, नागनाथ तोडकर, विद्युत अभियंता राजकुमार सपाटे, प्रितम येळे या ठिकाणी परिस्थितीचा अंदाज घेऊन काम पाहत आहेत.

# मार्ग फाऊंडेशन जवानांसाठी पाठवणार १० हजार राख्या

### ऋणानुबंध सैनिकांसाठी उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ४ ऑगस्ट-**

रक्षाबंधन हा सण भाऊ बहिण यांच्या नात्याम धील ऋणानुबंध आणि रक्षणाचे प्रतिक म्हणून ओळखला जातो. त्याचप्रमाणे आपल्या देशाचे सैनिक सीमेवरती उभे राहून देश संरक्षणाचे काम करत आहेत. त्यांच्या या कर्तव्याची जाण राखत सोलापुरातील मार्ग फाउंडेशन या रक्षाबंधनाला सीमेवरील जवानांना तब्बल दहा हजार राख्या पाठवून एक ऋणानुबंध जपणार आहे. रविवारी विविध मान्यवरांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

आपले सैनिक देश रक्षणासाठी कशाचीही तमा न बाळगता अहोरात्र आपलं कर्तव्य निभावत असतात. देश संरक्षणाच्या कर्तव्यामुळे त्यांना रक्षाबंधनासारखा पवित्र सण आपल्या कुटुंबीयांसोबत



साजरा करता येत नाही. मातृभूमीचे रक्षण हाच सण, आणि कर्तव्य मानून आपले सैनिक जीवाची बाजी लावून देशाचं संरक्षण करत असतात. त्यांच्या या समर्पित भावनेचा सन्मान करण्यासाठी मार्ग फाउंडेशनच्या संस्थापक संतोष पवार यांच्या संकल्पनेतून 'एक राखी सिमेवरील जवानांसाठी ऋणानुबंध जपण्यासाठी' हा उपक्रम राबवला जाणार आहे. या माध्यमातूम बहीण भावाचे अतूट नात्याची माया आणि देशभक्तीचा बंध अधिक घट्ट करण्याचा एक छोटासा प्रयत्न केला जाणार आहे.

या शुभारंभ कार्यक्रमप्रसंगी निसार पाटील, सिद्धार्थ खुजुरकर, निवृत्ती बहिरवाळ, संजय भोकरे, मार्ग फाऊंडेशन जिल्हा समन्वयक संतोष राठोड, आसिफ यत्नाळ, अजय चव्हाण, अनिल पवार, संतोष गायकवाड, सागर चव्हाण, नागनाथ जाधव, पिंटू राठोड, संतोष बिराजदार, कबीर तांडूरे, मेघराज राठोड, अविनाश इंगळे, अहमद कोतवाल, सोनिया दुबे, तानिया दुबे, सोनिया हिंगणे यांचा सत्कार करून चेक देण्यात आला होता. माता-भगिनी व मार्ग फाऊंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आसिफ यत्नाळ यांनी केले व आभार श्रद्धाताई गायकवाड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उषा कसबे, रूपा जवळे, रोशनी राठोड,अश्विनी भोसले, वैशाली देशपांडे, तबस्सुम शेख आदींनी परिश्रम घेतले.

### सोलापूरच्या भगिनी बनवणार राख्या

मार्ग फाउंडेशनच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या या उपक्रमांमध्ये सोलापुरातील सर्व जाती धर्मातील माता-भगिनी आणि कॉलेजच्या युवती सहभागी होणार आहेत. तसेच त्या स्वतः हाताने तयार केलेली राखी सीमेवरील रक्षणकर्त्या जवानांना पाठवणार आहेत. एक राखी सेमीवरील जवानांसाठी ऋणानुबंध जवान बांधवांसाठी या स्तुत्य उपक्रमात जास्तीत जास्त महिला भगिनींचा सहभाग वाढावा म्हणून मार्ग फाऊंडेशनचे सर्व पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

# सदाशिवनगर येथे सावता माळी महाराजांचा समाधी सोहळा भक्तिभावात

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. ४ ऑगस्ट-**

संत शिरोमणी सावता माळी महाराज यांची ७२९ वा संजीवन समाधी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला...या वेळी सदाशिवनगर पंचक्रोशीतील सर्व समाजातील भाविक भक्त उपस्थित होते. गेली १९ वर्ष ही परंपरा चालू आहे.

अरण येथून ज्योत सदाशिवनगरला आल्यानंतर पूजन करण्यात आले. संध्याकाळी जागर भजनाचा कार्यक्रम झाला. सकाळी ह.भ.प.संगीतताई काटोळे महाराज (पनवेल) यांचे किर्तन झाले. त्यांनी आपल्या जिवनात भक्तीचा मळा कसा फुलवावा हे सांगितले. महाराष्ट्रातून सर्व पालख्या विठ्ठलाला भेटण्यासाठी पंढरपूर या ठिकाणी येतात. परंतु संत शिरोमणी सावता महाराज हे विठ्ठलाचे असे एकमेव भक्त आहेत की स्वतः विठ्ठल त्यांना भेटण्यासाठी त्यांच्या मळ्यात जात होते व आजही विठ्ठलाची पालखी दरवर्षी सावता महाराजांना भेटण्यासाठी अरणला जाते. सावता



महाराज हे कधीही पंढरपूरला न जाता त्यांनी आपल्या आई-वडिलात प्राणी, पक्षात, झाडात व शेतातील मळ्यात देव पाहिला. ते आपल्या शेतातील कामात रमून जात व आपल्या मुखात कायम विठ्ठलाचे नामस्मरण भजन करत असत. आपण आपल्या आई-वडिलात मुक्या प्राणी पक्षात व वृक्षात देव पाहिला पाहिजे तो तिथंच सापडल्याशिवाय राहणार नाही. अशाप्रकारे सावता महाराजांच्या चरित्रावर प्रकाश टाकत संगीताताई महाराजांनी कीर्तन करून भक्तगणांना मंत्रमुग्ध केलं. दुपारी १२:०० वाजता फुलांचा कार्यक्रम पार पडला व त्यानंतर आलेल्या सर्व भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी सरपंच विरकुमार दोशी, प्रतिष्ठानचे अध्यक्ष ज्ञानेश राऊत, उपाध्यक्ष दीपक राऊत व कार्याध्यक्ष महेश नाळे उपस्थित होते.

# कामती, कुरुल येथे अपर तहसील कार्यालय करा

**मोहोळ भाजपाचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र; फेर सर्व्हेक्षण करण्याची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ४ ऑगस्ट-**

तालुक्यातील अनगर येथे मंजूर झालेले अप्पर तहसील कार्यालय रद्द होऊन फेरसर्व्हेक्षण करावे या मागणीचे पत्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना रविवारी मोहोळ येथे देण्यात आले.

यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष सुनील चव्हाण यांनी अनगर येथे मंजूर करण्यात आलेले अप्पर तहसील कार्यालय चुकीचे असून गैरसोयीची आहे. अनगर मध्यवर्ती ठिकाण असल्याचा चुकीचा अहवाल तयार करून शासनाची दिशाभूल केलेली आहे. तरी सदर कार्यालय त्वरित रद्द करावे तसेच फेर सर्व्हेक्षण करून सदर कार्यालय कामती किंवा कुरूल या ठिकाणी सुरू करावे, अशी जोरदार मागणी उपमुख्यमंत्री



देवेंद्र फडवणीस यांना केली. यावेळी त्यांनी या प्रश्नाबाबत मी लक्ष घालून कार्यालय रद्द करण्याबाबत कार्यवाही करतो, असे आश्वासन मोहोळ तालुका भाजपा अध्यक्ष सुनील चव्हाण यांना दिले. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष सुशील क्षीरसागर, सतीश काळे, विधानसभा निवडणूक प्रमुख रमेश माने, जिल्हा सरचिटणीस विकास वाघमारे, महेश सोवनी, अविनाश पांढरे, पिंटू राऊत, नागनाथ क्षीरसागर, माऊली भगरे, विशाल पवार, अजय कुर्डे, द्रोणाचार्य लेंगरे, विशाल डोंगरे, दीपक पुजारी, महावीर पुजारी, प्रकाश काळे, गणेश झाडे, मुजीब मुजावर, गुरुराज तागडे, औदुंबर वाघमोडे, पै. भारत आवारे, शशिकांत गावडे, संजय वाघमोडे, छोटू जाधव, बापू वाघमोडे, ब्रह्मदेव गोफणे, अॅड. चौधरी, अॅड. हेमंत शिंदे, अॅड. हिंदुराव देशमुख आदी उपस्थित होते.




# शालेय जीवनात शिस्त महत्त्वाची : कमांडंट अक्षय पाटील

**सांगोला, दि. ४ ऑगस्ट-**

शालेय जीवनात शिस्त महत्वाची असून विद्यार्थ्यांनी करिअरचे ध्येय,उद्दिष्ट ठरवून त्यासाठी कष्ट घेतले पाहिजे.स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होण्यासाठी जिद्द, चिकाटी व कठोर परिश्रम आवश्यक असल्याचे प्रतिपादन सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यू.कॉलेजचा माजी विद्यार्थी तथा असिस्टंट कमांडंट अक्षय पाटील यांनी केले. ते प्रशालेत करिअर गाईडन्स विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेची तयारी या विषयावर व्याख्यान कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य अमोल गायकवाड, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक सुरेश मस्तुद, तलाठी स्नेहल पाटील उपस्थित होते. माजी विद्यार्थीनी स्नेहल पाटील म्हणाले,विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेसाठी सुरुवातीपासूनच प्रयत्न व नियोजन करावे. आई,वडील व शिक्षकांचे मार्गदर्शन घ्यावे,मात्र निर्णय स्वतः घ्यावा.अध्यक्षीय म नोगतात प्राचार्य अमोल गायकवाड यांनी विद्यार्थ्यांनी आवडीच्या क्षेत्रात प्रयत्न केल्यास निश्चित यश मिळेल.

सोशल मीडिआचा वापर कमी करावा.संघर्षातून प्रेरणा,वरिष्ठांकडून मार्गदर्शन घेत विद्यार्थ्यांनी प्रयत्न करणे गरजेचे असे सांगत विविध प्रेरणादायी प्रसंग, उदाहरणे सांगता मौलिक प्रबोधन केले. यावेळी अक्षय पाटील यांनी आठवी स्कॉलरशिप व एनएमएमएस वर्गांना भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. प्रास्ताविक प्रा. गणेश घेरडीकर, पाहुण्यांचा परिचय प्रा. सचिन चव्हाण, सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र कुंभार यांनी केले तर प्रा. नवनाथ बंडगर यांनी आभार मानले.

# बार्शीतील शंभर उपासकांचा गडदेवदरी वर्षावास महोत्सवात सहभाग



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ४ ऑगस्ट-**

धाराशिव तालुक्यातील गडदेवदरी येथे होणाऱ्या वर्षावास महोत्सवासाठी बार्शीतून श्रावस्ती बुद्ध विहाराचे अध्यक्ष विष्णू कांबळे आणि नालंदा बुद्ध विहाराचे रमेश गवळी यांच्या नेतृत्वाखाली ८० म हिला आणि २० पुरुष अशा शंभर उपासकांचे मंडळ रवाना झाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला बार्शीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास शशिकांत गायकवाड आणि वाघमारे यांनी हार अर्पण करुन आदरांजली वाहिली. त्यानंतर बुद्ध वंदना घेण्यात आली. माजी शिक्षणाधिकारी विष्णू कांबळे यांनी पंचशील ध्वज दाखवून गाड्यांना कार्यक्रमासाठी रवाना केले.

यावेळी प्रमुख मान्यवर आणि रमेश गवळी उपस्थित होते. रविवारी, ४ ऑगस्ट रोजी सकाळी ९-३० वाजता गडदेवदरी येथे नव्याने निर्मित तगर भूमी बुद्ध विहाराच्या तीन एकर जागेत वर्षावास म होत्सवाची सुरुवात झाली. या महोत्सवात धाराशिव जिल्ह्यातील बौद्ध उपासक आणि उपासिकांनी सहभाग नोंदवला आहे.

# सोलापूर-कोल्हापूर-सोलापूर रेल्वे सुरू करा

### शहीद अशोक कामटे संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ४ ऑगस्ट-**

सोलापूर-कोल्हापूर-सोलापूर सुपरफास्ट रेल्वे सेवासह इतर म हत्वाच्या रेल्वे सुरू कराव्यात या मागणीचे निवेदन मध्य रेल्वेचे म हाव्यवस्थापक, मुंबई यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे,अशी माहिती शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेने दिली.



सोलापूर-कोल्हापूर रेल्वे सोलापूर येथून रात्री १०:४५ च्या सुमारास दररोज सुरू करावी,त्याचप्रमाणे कोल्हापूर येथून रात्री याच वेळी नियमित रेल्वे सेवा सुरू करावी,कोल्हापूर -तिरुपती रेल्वे सेवा पंढरपूर,कुर्डूवाडी मार्गे सुरु करावी, मिरज-कुर्डूवाडी पॅसेंजर रेल्वेचा विस्तार कोल्हापूर पर्यंत करावा,कुर्डूवाडी-मिरज लोहमार्गाचे दुहेरीकरण करावे, प्रलंबित कोल्हापूर-वैभववाडी या प्रलंबित लोहमार्गाचे काम सुरू करावे,देशातील रेल्वे प्रवासात ज्येष्ठ नागरिकांना भाडेदारात पूर्वीप्रमाणे सवलत मिळावी,दादर-सातारा एक्सप्रेस दररोज सोडावी त्यामुळे पुणे,मुंबई या ठिकाणी जाणाऱ्या नागरिकांची मोठी सोय होणार आहे,असे निवेदनाच्या प्रति रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव,खा.प्रणिती शिंदे,खा.धैर्यशील मोहिते-पाटील,आ.शहाजीबापू पाटील, खा.शाहू महाराज,खा.विशाल पाटील,खा.धैर्यशील माने,खा. नारायण राणे,विभागीय रेल्वे व्यवस्थापक,सोलापूर,पुणे यांनाही देण्यात आले असल्याची माहिती संघटनेने दिली.

दादर-सातारा-रेल्वे दररोज सुरू होण्याकरता सांगोल्याचे आ.शहाजीबापू पाटील यांनी रेल्वेमंत्री व मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक यांच्याकडे पत्राद्वारे पाठपुरावा करून सुरू होण्याकरता प्रयत्नशील असल्याचे सांगितले.कामटे संघटना देखील गेल्या सहा महिन्यापासून सतत पाठपुरावा व पत्रव्यवहार सुरू आहे,लवकरच सकारात्मक निर्णय होईल.

**-नीलकंठ शिंदे, संस्थापक, शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटना, सांगोला**



# प्रा. प्रविणकुमार नागोरे यांना पीएच.डी पदवी प्रदान

**मैंदर्गी, दि. ४ ऑगस्ट-**

अक्कलकोट तालुक्यातील नागोरे येथील रहिवासी सध्या रायगड येथील दोशी वकिल महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले प्रवीणकुमार नागोरे यांना पीएच. डी पदवी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे रायगड यांनी प्रदान केली. त्यांनी फायटोकेमिकल इन्वेस्टिगेशन अँड एंटिमायक्रोबियल स्टडी ऑफ इसेंशियल ऑइल ऑफ झिंजीबरेसी स्पेसिज अव्हेलेबल इन द कोंकन रिजनया विषयावर शोधप्रबंध सादर केला होता. त्यांनी त्यांच्या संशोधन कालावधीत पाच आंतरराष्ट्रीय शोधनिबंध प्रकाशित केले असून सहापेक्षा जास्त राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय परिषद आणि कार्यशाळेत सहभाग नोंदवला. त्यांनी एका आंतरराष्ट्रीय परिषदेत बेस्ट पेपर प्रेझेंटेशन अवॉर्ड पण मिळवला आहे. त्यांना प्रा. पी. बी. लोखंडे यांचे मार्गदर्शन मिळाले.

# लोकमंगल पतसंस्थेच्या माध्यमातून महिला सबलीकरणावर भर : सरव्यवस्थापिका अलका देवडकर

महिला जितक्या ताकदीने संसार सक्षमपणे उभी करू शकते, तितक्याच ताकदीने ती काटकसर आणि स्वयंशिस्तीच्या आधारे प्रामुख्याने अर्थव्यवस्थाही मजबूत करू शकते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून अर्थक्षेत्राबरोबरच आपला वेगळा ठसा उमटवत महिलांना सबल करणाऱ्या सक्षमा म्हणजे सरव्यवस्थापिका सौ. अलका नितीन देवडकर,

त्या मूळच्या माढा तालुक्यातील उपळवटे गावच्या, अर्थशास्त्रात त्यांनी आपले पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आहे. कामानिमित्त त्या सोलापुरात आल्या आणि २००४ साली त्या लोकमंगल पतसंस्थेत लिपीक या पदावर काम काजास सुरुवात केली. माजी मंत्री आ. सुभाष (बापू) देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कुटुंबीयांच्या पाठबळावर त्यांनी आपले कर्तृत्व सिद्ध करीत शाखाधिकारी, मुख्य लेखापाल आणि सरव्यवस्थापक या पदापर्यंत मजल म ारली. त्यांनी लोकमंगल च्या माध्यमातून लोकांना उभे करण्यासह पतसंस्थेचा नावलौकिक वाढता ठेवला. त्याआधारे सन २०१५ पासून पतसंस्थेच्या सरव्यावस्थापिका म्हणून सौ. अलका देवडकर काम पाहात आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना सन्मान स्त्रीशक्तीचा २०१८ चा पुरस्कार, स्मार्ट वुमनिया अवार्ड २०२१, सोलापूर इन न्यूज चॅनेल तर्फे आदर्श महिला पुरस्कार आदी



पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. आजही त्या आपला प्रपंच सांभाळून आपल्या सर्व सहकाऱ्यांना सोबत घेऊन संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षाला म्हणजे सन २०२८ पर्यंत ५००० कोटी व्यवसाय पूर्ती करण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे. सहकार क्षेत्रात आणि विशेषतः पतसंस्थेच्या चळवळीत एवढ्या उच्चपदस्थ आणि तितक्याच सक्षम महिला म्हणून त्यांचे नाव आग्रहाने घेतले जाते. यासंदर्भात त्या म्हणाल्या, महिलांच्या अंगी जिद्द असतेच. तिला चालना देत महिलांनी बचतीची सवय लाऊन घ्यावी. म हिलांनी ठरविले तर त्या कोणतेही काम पूर्णत्वास नेऊ शकतात. लोकमंगल माझा परिवारच आहे. माझा पूर्ण परिवार लोकमंगल समूहातच कार्यरत आहे. संस्थापक मा. सुभाष (बापू) देशमुख, मा. मनीष (भैय्या) देशमुख व चेअरमण मा. गुरण्णा (काका) तेली यांनी माझ्यासारख्या साम ान्य कुटुंबातील महिलेला एवढ्या मोठ्या पदावर बसविले. वरिष्ठांचा विश्वास आणि घरच्यांची साथ यामुळेच मी इथवर पोहोचू शकले, यापुढे बोलताना सौ. अलका देवडकर म्हणाल्या की, महिला सक्षमीकरण हे लोकमंगल पतसंस्थेचे उद्दिष्ट असून, त्यासाठी मा. सुभाष (बापू) देशमुख हे नेहमी मार्गदर्शन करतात. राज्यातील महिला स्वतःच्या पायावर उभे राहून स्वावलंबी व्हाव्यात याच ध्येयाने आम्ही लोकमंगल पतसंस्थेमधून महिला सक्षमीकरणासाठी सदैव प्रयत्नशील आहोत. महिलांना बचतीची सवय कशी लागेल, याकडे विशेष लक्ष दिले जाते. आजअखेर लघुउद्योग करणाऱ्या १० हजारहून अधिक महिलांना कर्जाचा लाभ देऊन स्वावलंबी केले आहे.फक्त मुली असलेल्या पालकांना एक वर्षापुढील ठेवींवर एक टक्का जादा व्याज दिले जाते. कोरोना काळात ३००० महिलांना कर्ज वाटप करून स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न केला आहे. पतसंस्थेच्या एकूण खातेदारांपैकी ५० हजाराहून अधिक महिला खातेधारक आहेत याबरोबरच आज अखेर पतसंस्थेमध्ये १६१ म हिला कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत, पुरुषांच्या तुलनेत महिलांकडून काम करून घेणे सोपे असते. एकदा सांगितले की त्या पटकन काम पूर्ण करून लगेच सादर करतात.

# सेवानिवृत्त उपअभियंत्या विरोधात अॅट्रॉसिटी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ४ ऑगस्ट-**

नगरपरिषदेच्या सेवानिवृत्त उपअभियंत्याने घरकुल या योजनेच्या लाभाची चौकशी करण्यासाठी कॅन्टिनमध्ये गेलेल्या महिलेस तुला पैसे देतो, तुझ्या मुलांचा शिक्षणाचा खर्च करतो, छोटी कामे करु नकोस, असे सांगत लज्जास्पद वर्तन केल्याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात उपअभियंत्याविरोधात ट्रासिटीचा गुन्हा दाखल झाला आहे.

दिलीप खोडके (रा. सुभाषनगर, बार्शी) असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे. ही घटना आझाद चौक येथील कॅन्टीनमध्ये शनिवारी (ता. ३) दुपारी एक वाजता घडली. पीडितेने दाखल केलेल्या फिर्यादीमध्ये असे म्हटले आहे की, गाडेगाव रोड, समर्थ कॉलनीमध्ये प्लॉट आहे. तो पतीच्या नावे करुन घरकुल योजनेचा लाभ घ्यायचा होता. यासाठी नगरपरिषदेत पिडीता एक महिन्यापूर्वी गेली होती. त्यावेळी खोडकेची ओळख झाली होती. तुमचे काम करुन देतो, असे त्यांनी सांगितले होते. माझा मोबाईल क्रमांक दिला व त्यांचाही घेतला होता. त्यानंतर आठ ते दहा वेळा फोन झाला आहे. कामाबाबत शनिवारी (ता. ३) सकाळी साडेदहाला फोन केला असता, त्यांनी घरी असल्याचे सांगून साडेअकरा वाजता आझाद चौकात बोलावले. खासगी कंपनीचे काम करीत असल्याने उशीर झाला.दुपारी एक वाजता गेले तेव्हा खोडकेला फोन करताच तेथे आला, त्यावेळी कॅन्टीनमध्ये गप्पा मारताना खोडकेने तू मला आवडतेस, अशी छोटी कामे करु नकोस, आठवड्यातून एकदा भेटत जा, मी पैसे देतो, तुझ्या मुलांचा शिक्षणाचा खर्च करतो, असे म्हणत गैरवर्तन केले. पोलीस उपअधीक्षक जालिंदर नालकूल तपास करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे जयंती मिरवणुकीत देखाव्यातून प्रबोधन

## अभिवादनासाठी लोटला जनसागर; तरुणांसह नागरिकांचा मोठा सहभाग

## सुमारे 35 मंडळांचा सहभाग; डॉल्बीच्या तालावर थिरकली तरुणाई



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

उत्साहपूर्ण वातावरणात जयघोष करत साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंती महोत्सवाची दिमाखदार मिरवणुकीने सांगता करण्यात आली. आकर्षक अशा प्रबोधनात्मक देखाव्याच्या माध्यमातून सामाजिक संदेश देण्यात आला. डॉल्बीच्या तालावर तरुणाई थिरकली. उत्साहाला उधाण आल्याचे दिसून आले.

साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंती महोत्सवास १ ऑगस्ट रोजी सार्वजनिक मंडळांच्या वतीने प्रतिमेची मनोभावे प्रतिष्ठापना करून प्रारंभ करण्यात आला. त्यानंतर आज रविवारी (दि. ४) उत्साहपूर्ण वातावरणात मिरवणुकीने या महोत्सवाची सांगता करण्यात आली. मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीच्या मार्गदर्शनाखाली ही भव्य मिरवणूक पार पडली. येथील साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करून या मिरवणुकीची सुरुवात रविवारी दुपारी करण्यात आली. या मिरवणुकीत विविध सामाजिक संदेश देणारे देखावे सादर करण्यात आले होते. याप्रसंगी अभिवादन करण्यासाठी समाज बांधव, विविध सामाजिक संस्था, संघटना व पक्ष पदाधिकाऱ्यांची मोठी गर्दी झाली होती. विविध मंडळाच्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, वस्ताद लहुजी साळवे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार कार्याचे प्रबोधनात्मक देखावे साकारण्यात आले होते.

ही मिरवणूक साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे चौकमार्गे, रामलाल चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, चार हुतात्मा पुतळा, मेकॅनिकी चौकमार्गे छत्रपती शिवाजी चौक येथे या मिरवणुकीची सांगता झाली. या मिरवणुकीत समितीचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री उत्तमप्रकाश खंदारे, महोत्सव समितीचे अध्यक्ष खंडू बनसोडे, माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, लहुजी शक्ती सेनेचे विष्णू कसबे, गट नेते नगरसेवक आनंद चंदनशिवे, अॅड. कोमल साळुंखे, सुरेश पाटोळे, सुहास शिंदे आदी सहभागी झाले होते.

### या मंडळांचा मिरवणुकीत सहभाग

एस. एस. ग्रुप, एम. जे. युवा प्रतिष्ठान, एम. एल. प्रतिष्ठान, डी. मित्रपरिवार, एन. पी. ग्रुप, लहुजी शक्तीसेना, ए.एस. ग्रुप, यु. के. ग्रुप, साकेत युवा प्रतिष्ठान, बिल्डर युवा प्रतिष्ठान, लहुजी ब्रिगेड, आर. सी. ग्रुप, आर.के. ग्रुप, एस. आर. ग्रुप, सी. एस. ग्रुप, एसडी ग्रुप, आर. एस. ग्रुप घोंगडे वस्ती मित्रपरिवार, ऐक्य वर्धनी ग्रुपसह ३५ मंडळ सहभागी झाले होते.

### सहभागी मंडळांचा सत्कार

या मिरवणुकीत सहभागी झालेल्या मंडळाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांचा विशाल खंदारे मित्रपरिवार, लहुजी शक्ती सेना, दलित पँथर या संघटनेच्या वतीने विविध चौकात सत्कार केला. शहरातील जवळपास ३५पेक्षा अधिक मंडळांनी या मिरवणुकीत अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन, कार्यावर आधारित भव्य दिव्य विविध देखावे, सादर करून उपस्थितांची मने जिंकली. डॉल्बीच्या चित्त थरारक व कलरफुल विद्युत रोषणाईत तरुणाईने विविध गीतावर ठेका धरला. बुधवार पेठ, मातंग वस्ती, वीर फकीरा चौक, जुना बोरामणी नाका, लष्कर, विजापूर नाका, देगाव, पांढरी वस्ती, अशोक चौक, फॉरेस्ट या परिसरातील मंडळांनी सहभाग नोंदविला.

# राज ठाकरेंचे सोलापुरात स्वागत



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

ढोल, ताशा फटाक्याच्या आतषबाजीत फुलांची मुक्त उधळण करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांचे सोलापुरात रविवारी सायंकाळी स्वागत करण्यात आले.

पुण्याहून कारने सोलापूरला ते आले. पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर मोडनिंब, मोहोळ येथे म नसे कार्यकर्त्यांनी त्यांचे स्वागत केले. जुना पुणे नाका, सोलापूर येथे राज ठाकरे यांचा ताफा येताच सोलापूर शहर-जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी मोठ्या जल्लोषात आणि घोषणाबाजी करत स्वागत केले. त्यानंतर सात रस्ता येथील शासकीय विश्रामगृह येथेही त्यांचे स्वागत झाले. यावेळी मनसेचे नेते दिलीप धोत्रे, जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, लोकसभा अध्यक्ष प्रशांत इंगळे, शहराध्यक्ष जैनुद्दीन शेख यांच्यासह सोलापूरसह धाराशिव, लातूर, पुणे येथील पदाधिकारी उपस्थित होते.

Precision PRINTS
सोलापूर तरुण भारत
वृत्तवेध CHANNEL
वर्धापन दिन सोहळा ४० वा
सस्नेह निमंत्रण...
सन्माननीय अतिथी,
सप्रेम नमस्कार,
गेली ४० वर्षे 'सोलापूर तरुण भारतने' सोलापूर जिल्ह्यासह मराठवाडा,
प.महाराष्ट्र तसेच कर्नाटकात आपल्या राष्ट्रीय विचारांचा ठसा उमटविला आहे.
वाचक, हितचिंतक व जाहिरातदार यांच्यामुळेच हे साध्य झाले आहे.
'वृत्तवेध चॅनल' मराठवाडा, सोलापूर जिल्ह्यात अग्रेसर आहे.
तसेच नागपूर, मुंबई, पुणे, जळगाव येथे ही तरुण भारतच्या
माध्यमातून राष्ट्रीय विचार पोहचवित आहोत.
अत्याधुनिक तंत्रज्ञानासह 'प्रिसिजन प्रिंटस्ने' कमर्शिअल
प्रिंटींग क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे.
दै. सोलापूर तरुण भारत, वृत्तवेध चॅनल, प्रिसिजन प्रिंटस् आदिंचा
॥ वर्धापन दिन ॥
कार्यक्रम आयोजित केला आहे.
आपण उपस्थित राहून ऋणानुबंध दृढ करावेत.
※ आपले स्नेहांकित ※
सोलापूर तरुण भारत मिडिया लिमिटेड
श्री. दिलीप यशवंत पेठे (मुख्य समूह संपादक) श्री. विवेक घळसासी (अध्यक्ष) श्री. प्रशांत वसंतराव माने (निवासी संपादक)
संचालक मंडळ व तरुण भारत, वृत्तवेध चॅनल व प्रिसिजन प्रिंटस् परिवार
※ स्थळ ※
दि. ८ ऑगस्ट २०२४, सायं. ६ ते ९ पर्यंत
दि सोलापूर इंडस्ट्रियल को-ऑप. इस्टेट सोसायटी फंक्शन हॉल,
तरुण भारत प्रेसच्या मागे, होटगी रोड, सोलापूर.

# अक्कलकोटचे किंगमेकर : रमेश पाटील

**विरोधकांच्या गोटात जाऊन दरारा निर्माण करणाऱ्या रमेश पाटील यांच्या धाडसी भूमिकेमुळे अक्कलकोट भाजपामध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. अक्कलकोटच्या राजकारणातील 'किंगमेकर' रमेश पाटील यांनी भाजपाकडून उमेदवारी मिळविण्यासाठी जोरदार फिल्डिंग लावली आहे.**

ग्रामीण भागातील भाजपाच्या सर्व जुने आणि नवे कार्यकर्ते धाडसी आणि वादळी व्यक्तिमत्त्व रमेश पाटलांच्या नेतृत्वासाठी आशादायी आहेत. केवळ भाजपाच नव्हे तर राष्ट्रवादी, काँग्रेस, शिवसेना, आरपीआय सर्वच पक्षांतर्गत त्यांचे मैत्रीपूर्ण आणि सलोख्याचे संबंध आहेत. युवा नेते रमेश पाटील यांच्याभोवती आता कार्यकर्त्यांचा गराडा पडत आहे. वडील माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांच्या राजकीय वाटचालीत पडद्यामागे राहून त्यांनी कायम एका 'किंगमेकर'ची भूमिका पार पाडली आहे. रस्त्याची विविध विधायक कामे स्वखर्चातून करून देण्याचा सपाटा रमेश पाटील यांनी लावला आहे. यामुळे त्यांच्या भोवती युवकांचा फौजफाटा, ज्येष्ठांचे पाठबळ आणि हितचिंतकांच्या सदिच्छा-शुभेच्छा निर्माण झाल्या आहेत.

हन्नूर ते डोंबरजवळगे रस्त्याच्या दुरुस्तीसाठी गेल्या दोन-तीन वर्षांपासून शासनाकडे शेतकरी मागणी करत होते. दोन-तीन वर्षांपासून हा रस्ता खराब झाला असल्याने रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले होते. या खड्ड्यांमुळे अनेकवेळा लहान-मोठे अपघात झाले होते. हन्नूर भागातील शेतकरी हन्नूर ते डोंबरजवळगे हा खराब रस्ता दुरुस्त करून देण्याची मागणी वारंवार करत होते. कोणीही याची दखल घेतली नव्हती. या मागणीची तात्काळ दखल घेऊन युवा नेते रमेश पाटील यांनी स्वखर्चातून या खराब रस्त्याचे काम करून दिल्याने या भागातील नागरिक, वाहनधारक, शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे.



दुष्काळी भागातील शेतकऱ्यांसाठी कृष्णा-भीमा स्थिरीकरण ही योजना व्हावी म्हणून सन २०१२-१३ सालामध्ये कृष्णा-भीमा आणि भीमा-सीना स्थिरीकरण योजनेसाठी रमेश पाटील यांनी अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर तालुक्यातून १ लाख ३५ हजार शेतकऱ्यांच्या स्वाक्षरीचे निवेदन शासनाकडे सादर केले होते. ही योजना शासनाने आत्ता मंजूर केले आहे. यामुळे अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर तालुक्यातील लाखो शेतकऱ्यांची जमीन ओलतिखाली येणार असल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. यामुळे रमेश पाटील यांच्या उमेदवारीबाबत जनता सध्या आश्वासक भूमिकेत आहेत.

लोकसभा निवडणुकीत अनपेक्षितपणे काँग्रेस वरचढ ठरत असताना तडवळ भागात भाजपाला लीड मिळवून देऊन भाजपाचे वर्चस्व कायम राखले आहे. याचे श्रेय माजी आमदार सिद्रामप्पा पाटील आणि त्यांच्या परिवाराला जाते. माजी आमदार सिद्रामप्पा पाटील गट हा पूर्णतः आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडे होता.

सिद्रामप्पा पाटलांचा आ. सचिन कल्याणशेट्टी भाजपाचे तालुकाध्यक्ष आणि आमदार बनण्यात मोठा वाटा आहे. त्यानंतर साडेचार वर्षे आमदार कल्याणशेट्टी आणि पाटील यांच्यामध्ये समन्वय होऊन दोन्ही बाजार समितीच्या निवडणुका लढविल्या गेल्या. यात भाजपाला विजयही मिळाला. यानंतर पाटील गटावर अन्याय होत असल्याची चर्चा सुरू झाली. यामुळे रमेश पाटील यांनी आपली भूमिका स्पष्ट करून माजी आमदार पाटील गटाचे स्वतंत्रपणे अस्तित्व ठेवण्याच्या दृष्टीने त्यांनी तयारी सुरू केली आहे. यात अक्कलकोटचे माजी नगराध्यक्ष बसलिंगप्पा खेडगी, माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे, पंचायत समितीचे माजी विरोधी पक्ष नेते बाळासाहेब मोरे यांच्यासह इतर अनेक नेते मंडळींनी पाटील गटाला 'बळ' दिले आहे.

अक्कलकोट तालुक्यात त्यांनी दौरा करून जिवाभावाचे मित्र जोडले. तळागाळातल्या लोकांना मदतीचा हात दिला. अडीअडचणीत असणाऱ्यांना सहकार्य केले. परिणामी, रमेश पाटील नावाचं एक मोठं वर्तुळ तयार केले. तालुक्यात सर्वत्र त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे. पडद्यामागून राजकारणाची सूत्रे हलवली. सिद्रामप्पा पाटील हे प्रथम अक्कलकोट पंचायत समितीचे सभापती झाले. जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक, स्वामी समर्थ साखर कारखान्याचे चेअरमन, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आणि आमदार या सर्व निवडणुकीत रमेश पाटील यांनी फार मोठी भूमिका बजावली. पण, ते कधीही व्यासपीठावर आले नाहीत किंवा प्रसिद्धीच्या झोतात राहिले नाहीत. हाती घेतलेले काम पार पाडायचे हेच त्यांचे उद्दिष्ट असते. केवळ वडील सिद्रामप्पा पाटील यांच्यासाठीच नाही, तर त्यांचे बंधू जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शिवानंद पाटील, दुसरे बंधू अक्कलकोट पंचायत समितीचे आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजीव पाटील, तसेच भगिनी माजी महापौर शोभा बनशेट्टी यांना महापौर करतानादेखील रमेश पाटील यांनी कुशल संघटन कौशल्याच्या जोरावर मोठे यश मिळवले आहे. केवळ कुटुंबच नाही तर जिल्ह्यातील पक्ष हितासाठी काम करणारे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना पाठबळ देऊन त्यांना त्यांच्या पायावर उभे केले. नेहमीच कार्यकर्त्यांचे हित जोपासले. कोणालाही पारके समजले नाही.

विरोधकांनाही आपल्या हृदयाला कवटाळून त्यांची मने जिंकण्याची ताकद रमेश पाटलांमध्ये आहे. यामुळेच सध्या त्यांच्या नावाला संमती मिळत आहे. ही कामे करत असताना त्यांच्या वाटेवर काटे पडले. मात्र त्याची त्यांनी कधीच तमा बाळगली नाही. संकटांना आपल्या कौशल्याच्या जोरावर लिलया बाजूला सारुन पुन्हा महापुरातील लव्हाळे आणि फिनिक्स पक्षाप्रमाणे भरारी घेतली. दातृत्व, निर्णयक्षमता, संयम, चिकाटी, सचोटी, कार्यतप्तरता आणि प्रसंगी धाडसी धोरण अवलंबण्याची त्यांची खास खाशियत आहे.



**बसवराज बिराजदार**
**मो.नं. ७३८५३४६१८५**

### रमेश पाटील यांच्या कार्यावर एक नजर....

रमेश पाटील हे अभियांत्रिकीचे पदवीधर आहेत. ते लोकनेते सिद्रामप्पा मलकप्पा पाटील प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आहेत. या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविले आहेत. शेतकरी व आरोग्य, रक्तदान शिबीर, शिक्षणासाठी अनेक गावात शिबीर घेतले. सोलापुरातील श्री. ज्ञानसागर शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष, मलकप्पा पाटील प्रशाला कोर्सेगांवचे (ता. अक्कलकोट) संचालक आहेत.

### शेतकऱ्यांना वीज, पाणी मिळण्यासाठी आंदोलने

शेतकऱ्यांना पाणी आणि वीज मिळावी यासाठी त्यांनी आंदोलने केली. अनेक सामाजिक उपक्रम राबविले. यामध्ये रक्तदान शिबिरे, शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, शिक्षणासाठी गरीब विद्यार्थ्यांना दत्तक घेतले. आरोग्य शिबिरे भरविली, गर्भवती महिलांना पोषण आहार, त्यांच्या बाळांसाठी पाळणाघर, महिलांना साडी वाटप, वृक्षारोपण, बी-बियाणे वाटप याचबरोबर आषाढी वारीला पायी जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी पाण्याच्या टँकरची सोय केली.

### राजकीय, सामाजिक, कौटुंबिक पार्श्वभूमी

| | |
|---|---|
| **नाव** | - **रमेश सिद्रामप्पा पाटील** |
| **शिक्षण** | - **अभियांत्रिकी पदवीधर** |
| **व्यवसाय** | - **शेती** |
| **संपूर्ण पत्ता** | - ३९/७, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१ मु. कुमठे, पो. कोर्सेगांव, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर |
| **मोबाईल** | - ७२४९६१७५४३ |
| **कार्य** | - कृष्णा-भीमा स्थिरीकरण योजनेला मान्यता मिळण्यासाठी सतत प्रयत्न |

**वडील- श्री सिद्रामप्पा मलकप्पा पाटील (भारतीय जनता पार्टी) वडिलांचे समाजकार्य**

- माजी आमदार, अक्कलकोट,
- माजी चेअरमन, स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना, दहिटणे
- माजी संचालक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सोलापूर
- माजी सभापती, पंचायत समिती, अक्कलकोट (भाजपा)
- माजी उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, सोलापूर (भाजपा)
- सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, अक्कलकोट
- अध्यक्ष, श्री. मल्लिकार्जुन शिक्षण प्रसारक मंडळ, तडवळ

**आई - सौ. भागिरथी सिद्रामप्पा पाटील (भारतीय जनता पार्टी)**

कार्य - माजी सदस्य, जिल्हा परिषद, सोलापूर

**भाऊ - शिवानंद सिद्रामप्पा पाटील (भारतीय जनता पार्टी)**

- सरपंच, ग्रामपंचायत कुमठे, ता. अक्कलकोट
- माजी अध्यक्ष, जिल्हा परिषद, सोलापूर (भाजपा)
- माजी संचालक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सोलापूर
- माजी संचालक, सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना, सोलापूर
- माजी संचालक, स्वामी समर्थ सहकारी सूत गिरणी, वळसंग
- चेअरमन, तालुका खरेदी-विक्री संघ, अक्कलकोट
- माजी संचालक, सहकारी दूध संस्था, सोलापूर

**संजीव सिद्रामप्पा पाटील (भाजपा)**

- माजी सभापती, पंचायत समिती, अक्कलकोट
- माजी सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, अक्कलकोट
- चेअरमन, स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना, अक्कलकोट
- माजी संचालक, सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना, सोलापूर
- संचालक, बसवेश्वर एज्युकेशन सोसायटी करजगी, ता.

**दिलीप सिद्रामप्पा पाटील (भाजपा)**

- माजी संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती,अक्कलकोट
- माजी संचालक, स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना, दहिटणे

**बहिण**

- सौ. शोभा श्रीशैल बनशेट्टी (भाजपा)
- माजी महापौर, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

**!! जाहीर सूचना !!**

सोलापूर तरुण भारत जाहिराती तसेच सर्व विभागांसाठी ऑनलाईन रिसीट ॲप वापरण्यास सुरुवात केली आहे. ग्राहकांनी याचा लाभ घ्यावा, कोणतेही पैसे जमा करताना ऑनलाईन रिसीटची मागणी करावी. ऑनलाईन रिसीट शेअर करण्याची देखील सोय केली आहे. आमच्या प्रतिनिधीकडून याची माहिती घ्यावी. ऑनलाईन रिसीटची मागणी हक्काने करावी.

सहकार्याबद्दल धन्यवाद.



## क्राईम वृत्त...

### मार्केट यार्डातून दुचाकी पळवली

**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

मार्केट यार्ड येथे दुचाकी क्रमांक एमएच.१३. एआर.६२२७ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ६ मे २०२४ रोजी सकाळी ११ ते १२ वाजण्याच्या दरम्यान घडली.याप्रकरणी कृष्णा अंकुश भोसले (वय-३४,रा.सरवदे नगर,मुळेगाव रोड) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास सहाय्यक फौजदार किणीगिरी हे करीत आहेत.

### किरकोळ कारणावरून मारहाण; चौघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

किरकोळ कारणावरून शिवीगाळ करत मारहाण केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २ ऑगस्ट रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास जोशी गल्ली रविवार पेठ येथे घडली.याप्रकरणी पारूबाई न्यानेश्वर भोसले (वय-५५,रा.जोशी गल्ली) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पूजा भोसले,पृथ्वीराज सरवदे,रूपाली,वर्षाराणी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादी यांच्या घरासमोर वरील संशयित आरोपी यांनी शिवीगाळ करत नवऱ्याला कशाला बोलते.या कारणाने हाताने मारहाण केली.त्यानंतर पृथ्वीराज याने विटेने मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल साळुंखे हे करीत आहेत.

### बुलेटसाठी विवाहितेचा छळ

**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

विवाहिता ही सासरी नांदत असताना तुला घरातील कामे नीट येत नाही,लग्नात मानपान केला नाही,तू आम्हाला पसंत नाही.तसेच बुलेट गाडी घेण्यासाठी माहेरून दोन लाख रुपये घेऊन ये असे म्हणत गळ्यातील मंगळसूत्र काढून घेऊन मारहाण करत शारीरिक व मानसिक त्रास देऊन माहेरी हाकलून दिल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना फिर्यादी यांच्या लग्नानंतर पंधरा दिवस ते १५ फेब्रुवारी २०२४ दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी घडली.याप्रकरणी कविता दिनेश वाघमारे (वय-३२,रा.शास्त्रीनगर अलकुंटे चौक) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती दिनेश वाघमारे,सासू संगीता वाघमारे,सासरे विजय वाघमारे,नणंद गौरी वाघमारे (सर्व. रा.गांधी वसाहत,लमाण तांडा,पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल इनामदार हे करीत आहेत.

### मोटारसायकल पळवली

**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

मोटरसायकल क्रमांक एम एच.१३. सीएफ.०६९६ ही संजीवनी बियर बार मड्डी वस्ती येथे पार्किंगमध्ये पार्क केलेली असताना अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना १५ जुलै दरम्यान घडली.याप्रकरणी शुभम श्रीकांत लोहकरे (वय-२९,रा.पूर्व मंगळवार पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल पैकेकरी हे करीत आहेत.

# सोलापुरात आज 'राज' खेळी

## ११ विधानसभा मतदारसंघाचा मनसे प्रमुख राज ठाकरे घेणार आढावा

### रात्री अन्य पक्षांच्या इच्छुकांनी घेतल्या भेटी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

विधानसभा निवडणूक जाहीर व्हायला आणखी कालावधी असतानाच आतापासूनच इच्छुक तयारीला लागले आहेत. अशात मनसे प्रमुख राज ठाकरे सोलापूर दौऱ्यावर आले आहेत. या दौऱ्यात सोमवारी जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघाचा आढावा ते घेणार आहेत. यावेळी त्यांना अन्य पक्षातील नाराज, नव्याने इच्छुक आणि आमदार होण्याचे स्वप्न उराशी बाळगलेले नेते भेटून मनसेच्या रेल्वेमध्ये जागा फिक्त करतील. याचीच प्रचिती रविवारी रात्री आली आणि शासकीय विश्रामगृहात 'राज'कीय खेळ रंगला. सोमवारीही राज ठाकरेंची 'राज' खेळी रंगणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लटकलेल्याच. राज्यपाल नियुक्त १२ आमदारांचे भवितव्यही टांगलेलेच. यावर कोणीच बोलायला तयार नसताना लोकसभेची निवडणूक झाली आणि त्याचा निकालही लागला. त्यात काहींचा अपेक्षाभंग झाला तर काहींना दिलासा मिळाला. अशात विधानसभा चुरशीने लढवून मीच सिकंदर आहे, हे दाखवण्यासाठी राजकीय पक्ष व्यूहरचना आखत आहेत. लोकसभा निवडणुकीत झालेल्या अपेक्षाभंगाचा वचपा काढण्यासाठी भाजपा तयारी करत आहे. दुसरीकडे भाजपाच्या चुका जनतेसमोर मांडून पुन्हा सत्तेवर येण्यासाठी महाविकास आघाडीची धडपड सुरू आहे. अशात कधीकाळी तटस्थ राहून जनतेला विकासाभिमुख नेतृत्वाला मतदान करण्याचे आव्हान करणारे नेते यंदाच्या लोकसभा निवडणुकीत भाजपाच्या बाजूने राहिले. आता काही दिवसांपासून विधानसभेचे रणशिंग फुंकण्यासाठी तयारी दर्शवत आखाड्यात उतरत आहेत. याचीच सुरुवात सोलापुरातून होत आहे. हा खेळ कसा खेळला जाणार आणि कोणाची गेम होणार हे येणारा काळच ठरवणार आहे. मात्र या 'राज'कीय खेळीमुळे सगळ्यांच्या भुवया उंचावल्या आहेत.



तसा पाहिला तर सोलापूर जिल्हा दुष्काळग्रस्त. पण उजनीमुळे काही प्रमाणात सदन झालेला. सोलापुरातील राजकारणही फारच भुसभुशीत. 'पेरल ते उगवेल' याची खात्री असल्याने राज्याचे नव्हे तर देशाचे लक्ष सोलापूरकडे लागलेले. एकेकाळी गिरणगाव, टॉवेल, चादरीसाठी प्रसिद्ध असलेले सोलापूर आता साखर कारखान्यांच्या माध्यमातून देशाच्या नकाशावर आले आहे. राजकारणाच्या साखर पेरणीसाठी सोलापूरची जमीन अगदी सुपीक झालेली आहे. यामुळेच येथील राजकारण प्रत्येकाला खुणावत आहे. याचाच फायदा घेण्यासाठी माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार, तत्कालीन मुख्यमंत्री विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, बसापाच्या मायावती, तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यासह राष्ट्रीय पक्षांबरोबरच प्रादेशिक पक्षांचे लक्ष सोलापूर वेधून घेत आहे. त्यातल्या त्यात दक्षिण सोलापूर तालुक्यावर अनेकांचा डोळा. विधानसभा निवडणुकीसाठी कित्येक इच्छुक उमेदवार दक्षिणच्या स्वारीसाठी सिद्ध होत आहेत. आतापर्यंत काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना, प्रहार, बीएसआर या पक्षाने यापूर्वीच मशागत केली. आता मनसेही यामध्ये उडी घेत आहे. राजकीय अंदाज घेऊन आखाडे तयार करण्यासाठी मनसेचे प्रमुख राज ठाकरे सोलापूर दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या राजकीय खेळीकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.





### तर मनसेची रेल्वे धावणार

शिवसेना, राष्ट्रवादीची उडालेली शकले. त्यातून सुरु असलेली रस्सीखेच. भाजपामधील गटबाजी आणि इच्छुकांचे उदंड झालेले पीक. यातून तोडगा काढणे भाजपा, काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादीला जड जाणार आहे. उमेदवारी नाकारल्यास इच्छुक अपक्ष म्हणून विधानसभा निवडणूक लढण्यापेक्षा मनसेचा पर्याय शोधू शकतील. यातून त्यांना पोषक वातावरणही निर्माण होऊ शकते. याचे गणित जुळल्यास सोलापुरातील पंढरपूर, मोहोळ, दक्षिण सोलापूर, शहर मध्य, माढा, करमाळा या विधानसभा मतदारसंघातून मनसेचे रेल्वे इंजिन जलद गतीने धावू शकेल. यासाठी फक्त तुल्यबळ, ताकदवान उमेदवार गळाला लावणे महत्त्वाचे आहे. ही जबाबदारी मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्यावर ठाकरे यांनी सोपविली आहे.

### असा असणार दौरा

रविवारी रात्री राज ठाकरे यांचे सोलापुरात आगमन झाले. त्यांचे मोडनिंब, मोहोळ, पुणे नाका सोलापूर येथे स्वागत करण्यात आले. रात्री ते शासकीय विश्रामगृहात मुक्कामी राहिले. सोमवारी सकाळी मनसे पदाधिकाऱ्यांशी संवाध साधणार आहेत. त्यानंतर ११ विधानसभा मतदारसंघाचा आढावा घेऊन सायंकाळी तुळजापूरमार्गे धाराशिवला जाणार आहेत, असे मनसेचे नेते दिलीप धोत्रे यांनी सांगितले.

# प्रशासकीय राजवटीत महापालिकेच्या कामकाजात वाढला ढिसाळपणा!

### देवेंद्र कोठे यांची उपमुख्यमंत्र्यांकडे तक्रार

### तीन दिवसाआड पाणीपुरवठ्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

महापालिकेत प्रशासकीय राजवटीत कामकाजात ढिसाळपणा वाढला आहे अशी तक्रार करत प्रशासकीय कामकाजात सुधारणा करण्याचे आदेश द्यावेत.सोलापूर शहरात तीन दिवसाआड पाणीपुरवठा करावा, अशी मागणी माजी नगरसेवक देवेंद्र कोठे यांनी थेट उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सोलापुरात आले असताना माजी नगरसेवक देवेंद्र कोठे यांनी त्यांना विविध सहा मागण्यांचे निवेदन दिले. सोलापूर महानगरपालिकेत मागील अडीच वर्षापासून प्रशासकीय कारभार सुरू आहे. अलीकडच्या काळात काम काजातील ढिसाळपणा वाढत चालल्याने सर्वसामान्य नागरिकांच्या मनामध्ये आपल्या पक्षाविषयी देखील नाराजीचे सूर उमटत आहेत. महापालिकेचा कारभार सुधारण्यासाठी संबंधितांना उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी आदेश द्यावेत, असे निवेदनात म्हटले आहे. उजनी धरण देखील जवळपास ८० टक्के भरलेले आहे. अशा परिस्थितीत देखील शहरातील पाणीपुरवठा चार ते पाच दिवसाआड सुरू आहे. तरी दोन ते तीन दिवसाआड पाणीपुरवठा व्हावा. कचरा संकलन नियमितपणे होणे गरजेचे आहे. बंद पडलेल्या पथदिव्यांची दुरुस्ती लवकर केली जात नाही. संबंधित मक्तेदारांवर पालिकेच्या अधिकाऱ्यांचे नियंत्रण नसल्याचे वारंवार जाणवते. पावसाळ्याच्या दिवसात रस्त्यांवर पाणी साचते आणि अशावेळी दिवे बंद राहिल्यास अपघाताची शक्यता वाढते. पावसाळ्यात अनेक रस्त्यांची दुरावस्था झाल्याचे पाहायला मिळते. हद्दवाढ भागात तर सर्वत्र चिखलमय रस्ते पाहायला मिळतात. अशावेळी प्रीमिक्स आणि मुरूम गरजेनुसार त्वरित उपलब्ध करून दिला जावा. रस्ते स्वच्छ करण्याकरिता मोठ्या रकमेचा मक्ता मंजूर झालेला असून शहरातील धुळीचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने हे काम चोखपणे केले जाणे अपेक्षित आहे. पालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांचे यावर नियंत्रण अपेक्षित आहे, आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे.



### स्मार्ट सिटी कामांच्या दुरुस्तीचा प्रश्न गंभीर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या स्मार्ट सिटीतून पूर्ण झालेली कामे महापालिकेकडे वर्ग केल्यानंतर बंद अवस्थेत आहेत. त्यांच्या देखभाल दुरुस्तीचा विषय देखील गंभीर बनत चालला आहे. त्यादृष्टीने लक्ष देऊन तरतूद करणे आवश्यक आहे, असेही माजी नगरसेवक देवेंद्र कोठे यांनी म्हटले आहे.

# कृ. ब. निकुंब साहित्य पुरस्कार राजेंद्र शेंडगे यांना जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ ऑगस्ट-**

बेळगाव येथील वाड्मय चर्चा मंडळाचे साहित्य पुरस्कार नुकतेच जाहीर झाले आहेत. यामध्ये काव्यसंग्रहासाठी देण्यात येणारा कृ. ब. निकुंब साहित्य पुरस्कार सोलापूरचे साहित्यिक राजेंद्र शेंडगे यांना जाहीर झाला आहे.

वाड्मय चर्चा मंडळ हे सीमावर्ती भागातील साहित्यक्षेत्रातील प्रसिद्ध संस्था आहे. कवी राजेंद्र शेंडगे यांच्या 'वर्तुळाच्याआत बाहेर अस्वस्थ मी' या काव्यसंग्रहास प्रथम क्रमांकांचा पुरस्कार झाला आहे. रोख रक्कम, स्मृती चिन्ह व पुस्तके असे पुरस्काराचे स्वरूप आहे. लवकरच बेळगाव येथे पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे. राजेंद्र शेंडगे यांचा 'दुरावा' हा कथासंग्रह, 'दोष ना कुणाचा' ही लघू कादबंरी, नांदी, संदर्भ हे काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांना इचलकरंजी येथील इंदिरा संतकाव्य पुरस्कार, आपटे वाचन मंदिर, द. मा. साहित्य परिषद कोल्हापूरचा उत्कृष्ठ काव्य संग्रह पुरस्कार, निर्मला मठपती सर्वोत्कृष्ठ वाङ्मय पुरस्कार, मनोरमा साहित्य पुरस्कार, शब्द गंध, चंद्रपूर पुरस्कार, सारांश मासिक, मिरजखा सर्वोत्कृष्ठ साहित्य पुरस्कार, छत्रपती संभाजी नगरचा मुक्त सृजन साहित्य गौरव पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.



# शहरात फ्रेंडशिप डे चा उत्साह

### मैत्रिणीच्या मनगटावर बांधला मैत्रीचा धागा




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि ४ ऑगस्ट -**

ऑगस्ट महिन्यातील पहिल्या रविवारी फ्रेंडशिप डे मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. त्याच अनुषंगाने सोलापूर शहरात रविवारी फ्रेंडशिप डे चा उत्साह दिसून आला. मैत्रिणींनी एकमेकींच्या मनगटावर फ्रेंडशिप बँड बांधून फ्रेंडशिप डेच्या शुभेच्छा दिल्या.

सोलापूर शहरातील नवीपेठ या बाजारपेठेत फ्रेंडशिप डे निमित्त विविध प्रकारचे परीक्षे बँड विक्रीसाठी दाखल झाले होते. हे फ्रेंडशिप बँड खरेदी करण्यासाठी दुकानांमध्ये कॉलेज तरुणींनी एकच गर्दी केली होती. पंधरा रुपयापासून ते शंभर रुपयापर्यंतचे आकर्षक आणि वैविध्यपूर्ण असे फ्रेंडशिप बँड तरुणींना आकर्षित करत होते. यावेळी कॉलेजच्या युवतींनी फ्रेंडशिप बँडचे बंडल खरेदी करून एकमेकींच्या मनगटावर बांधून मैत्री दिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

प्रत्येकाच्या जीवनामध्ये मैत्रीचे अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. भगवान श्रीकृष्ण आणि सुदामा यांची मैत्री जगविख्यात आहे. याच मैत्रीचे उदाहरण सर्वत्र दिले जाते. अशी मैत्री प्रत्येकाची असावी अशी भावना प्रत्येकाच्या मनामध्ये व्यक्त होते. हीच भावना व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे फ्रेंडशिप डे होय. या दिवशी कॉलेजचे तरुण-तरुणी एकमेकांना फ्रेंडशिप डेचा बँड बांधून फ्रेंडशिप डे निमित्त शुभेच्छा देतात. तसेच हा दिवस साजरा करण्यासाठी विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करतात. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये देखील हा उत्सव मोठ्या स्वरूपात साजरा केला जातो. शहरातील विविध महाविद्यालय, शाळा तसेच बाजारपेठ या ठिकाणी फ्रेंडशिप डेचा उत्साह मोठ्या प्रमाणात दिसून आला.

### मोठ्या स्वरूपात फ्रेंडशिप डे साजरा करतो

फ्रेंडशिप डे अर्थात मैत्रीचा दिवस आम्ही मोठ्या स्वरूपात साजरा करतो. आम्ही सर्व मैत्रिणी एकमेकींच्या हातावर बँड बांधून फ्रेंडशिप डे निमित्त शुभेच्छा देऊन हा दिवस उत्साहात साजरा करतो. शहरातील विविध हॉटेलमध्ये फ्रेंडशिप डे निमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले जाते त्या ठिकाणी फ्रेंडशिप डे हा दिवस साजरा करतो.

**- कॉलेज युवती**

### बँड घेण्यासाठी तरुण-तरुणींची गर्दी

फ्रेंडशिप डे निमित्त दरवर्षी विविध प्रकारचे बँड बाजारपेठेमध्ये विक्रीसाठी दाखल होतात. साध्या ते चांगल्या दर्जाचे बँड यामध्ये असतात. साधारणपणे १५ ते ५० रुपये पर्यंत बँडचे दर आहेत. महाविद्यालयाचे तरुण-तरुणी मोठ्या प्रमाणात बँड खरेदी करतात आणि उत्सव साजरा करतात. यंदाच्या वर्षी देखील फ्रेंडशिप डे निमित्त बाजारपेठेत कॉलेजच्या मुलांची वर्दळ होती.

**- फ्रेंडशिप बँड विक्रेते, नवीपेठ.**

# रिक्षाचालकाचा मुलगा झाला पीएसआय

## अक्षय कंदी कुटुंबाचा आनंद गगनात मावेना, जंगी मिरवणुकीने स्वागत

**तभा वृतसेवा । राजाराम मस्के**
**सोलापूर, दि.५ ऑगस्ट.**

गिरणी कामगार, गवंडी कामगार, बांधकाम कामगार, मोलमजुरी व रिक्षा व्यवसाय करणाऱ्यांची सलगरवस्ती. आपल्या कुटुंबाची गुजराण करीत आपल्या मुलाने शिकावे, मोठे व्हावे ही प्रत्येक आई बाबा यांची इच्छा असते. शिवाजी कंदी नामक अशाच एका प्रामाणिक रिक्षाचालक यांनीही स्वप्न पाहिले आणि त्यांचा तृतीय मुलगा अक्षय हा नुकत्याच पार पडलेल्या एमपीएससी परीक्षेत एनटी-बी या प्रवर्गातून राज्यातून तिसरा क्रमांकसह उतीर्ण झाला. महाराष्ट्रातून ३६८वा आला. आईवडिलांचे स्वप्न पूर्ण करायचे ही जिद्द बांधून अथक परिश्रम करून आपली कुटुंबाचे भविष्य उज्वल केले. त्याचे नाव आहे अक्षय विजयालक्ष्मी शिवाजी कंदी.

अक्षयचे मेकॅनिकल इंजिनियर पर्यंतचे शिक्षण सोलापुरात झाले. त्यानतंर त्याने पुण्यात ४ वर्षे एम पीएससीची तयारी केली. दररोज किमान १२ तास मन लाऊन अभ्यास केला. अक्षय यांची पोलीस उपनिरीक्षकपदी निवड होताच सलगरवस्ती येथील सर्व नागरिक, मित्र परिवार, पाहुणे यांनी एकच जल्लोष केला. सर्वत्र आकाशच्या शुभेच्छा बॅनर लावले. पुण्याहून घरी येताच सलगरवस्ती येथे गुलाल उधळून जंगी मिरवणूक काढली. आपल्या मुलाचे होणारे स्वागत पाहून आई वडिलांच्या डोळ्यातून आनंदअश्रू वाहू लागले.



### माझ्या कष्टाचे मोल जाणले

मला तीन मुले. पहिला इंजिनिअर, दुसरा एनटीपीसीमध्ये कार्यरत आहे. पूर्वीपासूनच रिक्षा व्यवसाय करतो. शालेय विद्यार्थ्यांची ने-आन करून कुटुंबाला आदर्श जीवन जगण्याचे संस्कार केले. सर्व कुटुंब सद्गुरूंच्या बैठकीस जातात. या विचाराने लहानपणापासून मुलावर चांगले संस्कार झाले. आर्थिक परिस्थिती बेताची असतानाही अपार कष्ट व अभ्यास करून अक्षयने माझ्या कष्टाचे मोल जाणले. माझ्या मुलाबद्दल खूप कौतुक आहे. माझ्या परिसरातील सर्वांच्या मुलाकडून हीच अपेक्षा करतो. त्यांच्याही मुलांनीही खूप अभ्यास करून मोठे व्हावे.

**-शिवाजी कंदी, अक्षयचे वडील**

## ज्ञानामृत आनंदलहरी - ८५१

**तो पाषाणांमाजी परिसु । रसांमाजी सिध्दरसु ।**
**तैसा मनुष्याकृती अंशु । तो माझाचि जाण ।।**

आपण मार्गदर्शन करतो म्हणजे अर्जुनावर उपकार करतो असे नाही, तर स्वयंसंतोषासाठी अर्जुनाला मार्गदर्शन करीत असल्याचे भगवंतांनी स्पष्ट केले. मी रात्रं-दिन जरी तुझ्या सहवासात असलो तरीही तुला माझ्या स्वरुपाविषयी यथार्थज्ञान झालेले नाही. आईच्या उदरातील गर्भ जसा आईची तारुण्यावस्था पाहू शकत नाही, त्याप्रमाणे कोणालाही माझ्या स्वरुपाविषयी यथार्थ ज्ञान होऊ शकत नाही. सागराच्या पाण्यात संचार करणा-या जलचरांना अफाट सागराची मोजणी करता येत नाही, किंवा चिलटाला आकाशाचा विस्तार माहिती होत नाही. त्याप्रमाणे महर्षीनाही माझे स्वरुप समजत नाही. हे सर्व सत्य असले तरी, जो कोणी बाहयवृत्ती टाकून आपल्या इंद्रियांना पाठमोरा होतो, आणि ठामवृत्तीने स्थिर राहून आपल्या शुध्द व आत्मप्रकाश ज्ञानदृष्टीने माझे जन्ममरणहीत स्वरुप पाहतो. मला रंग, रुप, आकार नाही, मी चराचरात भरुन उरलो आहे, प्रत्येक जीव मात्रात माझाच अंश आहे. असे जो पाहतो तो ज्ञानी होय. अशा ज्ञानीबद्दल बोलतांना भगवंत म्हणाले,



**तो पाषाणांमाजी परिसु । रसांमाजी सिध्दरसु ।**
**तैसा मनुष्याकृति अंशु । तो माझाचि जाण ।।.**

अर्थात, माझे स्वरुप जाणणारा ज्ञानी, या जीवरुपी पाषाणात जसा परीस किंवा रसांमध्ये जसे अमृत, तसे अशा मनुष्यामध्ये माझा श्रेष्ठ अंश असतो. माझे स्वरुप जाणणारा ज्ञानी म्हणजे चालते-बोलते सुर्यबिंबच होय. अचानकपणे कापुरामध्ये हिरा पडला तरी तो त्यावर सांडलेल्या पाण्यात विरघळत नाही. त्याप्रमाणे असा ज्ञानी मनुष्य मृत्यू लोकात, संसार सागरात अडकलेला दिसत असला तरी तो यातून मुक्त असतो. त्याच्यामध्ये बुध्दी हा पहिला भाव असतो. त्यानंतर अगाध ज्ञान, सहनशिलता, मोहाचा अभाव, सत्य, मनोनिग्रह, इंद्रियनिग्रह असे भाव असतात. भय, निर्भयता अहिंसा, समता, दान, यश, किर्ती, अपकीर्ती असे जे विविध भाव भूतमात्राच्या ठायी आढळतात. ते सर्व माझ्यापासून निर्माण झाल्याचे ज्ञानी मानतो. जशी भूते भिन्नभिन्न आहेत, तसेच माझे भावही भिन्न भिन्न आहेत. सुर्य उगवल्याबरोबर प्रकाश व मावळल्याबरोबर अंधार भासतो हे परस्पर विरोधी असणारे प्रकाश व अंधार हे एका सुर्यामुळेच होत असतात. तसे भुतमात्राच्या ठिकाणी घडणा-या दोन परस्पर विरोधी बाबी माझ्यापासूनच घडतात, असे ज्ञानी जाणतो. ही सर्व जीव सृष्टी माझ्या भावात गुंतल्याचे ज्ञानी मानतो, म्हणून तो जगात कोठेच भिन्नता पाहात नाही. या विश्वाची निर्मिती, वाढ आणि लय हे माझ्यापासूनच घडतात. राजा, प्रजा हा माझाच विस्तार आहे. एका बिजापासून वृक्ष तयार होतो. त्या वृक्षाच्या मुळावर अनेक कोंभ फुटतात, त्यातून अनेकवृक्ष निर्माण होतात व वृक्षाच्या बीजातून अनेक बीज निर्माण होतात, अनेक बीजातून अनेक वृक्षनिर्माण होतात. मुळात त्या वृक्षाचे एकच बीज होते, हे मान्यच करावे लागेल. तसे ज्ञानी भक्त, असे जाणतो की वेगवेगळी भूतमात्र वेगवेगळया रंगरुपानी, आकारांनी या सृष्टीवर नटली असली तरीही मुळात ती सर्व माझीच रुपे आहेत. या सर्वाच्या निर्मितीस मीच कारणीभुत आहे, असे ज्ञानी जाणतो. ज्ञानी भक्ताप्रमाणे आपणालाही सर्वप्राणीमात्रांत एकच ईश्वर पाहण्याची दृष्टी प्राप्त झाली, तर सुखाचा एक वेगळा अनुभव येईल.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : सोमवार**
**दि. ५ ऑगस्ट २०२४**
**विक्रम संवत् २०८०,**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - श्रावण**
**शु. प्रतिपदा (१८.०२)**
**ऋतु - वसंत**
**नक्षत्र- आश्लेषा (१५.२०)**
**योग - व्यतिपात (१०.३७)**
**करण - बालव (अहोरात्र)**

**दिनविशेष - श्रावण मासारंभ, शिवपूजन, शिवामूठ तांदूळ**
**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३ ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष** : शुभकामाची रूपरेषा आखाल. राजकीय कामात यश मिळण्याचे योग आहेत. जास्त फायदा मिळण्याच्या दृष्टीने केलेले प्रयत्न फायदेशीर राहतील.
**वृषभ** : मागील स्मृती उजाळल्यामुळे दुःख होईळ. धार्मिक प्रवृत्तीत वाढ होईल. उच्च अधिकाऱ्यांच्या भेटी होती. काम चुकारपणा करू नका.
**मिथुन** : सामाजिक कामात यश व सन्मान मिळण्याचे योग आहे. परिश्रमाचा पूर्ण मोबदला मिळेल. उत्पन्नात वाढ होईल. खाण्या:पिण्यावर लक्ष असू द्या. रोजगारात प्रगती राहील.
**कर्क** : मित्रांचे सहकार्य लाभेल. विचारपूर्वक काम केल्याने कामात यश मिळणार आहे. साथीदारांच्या कामावर लक्ष असू द्या.
**सिंह** : मनमानीने काम करण्याची प्रवृत्तीमुळे नुकसान होण्याची शक्यता आहे. आर्थिक स्थिती खराब राहील.
**कन्या** : कामकाजात आलेली समस्या आपल्या प्रयत्नामुळे दूर होईल. बाहेरील व्यत्तिंफ्च्या काम काजावर विशेष लक्ष द्या. यश मिळाल्याने उत्साह वाढेल. व्यापार व्यवसाय फायदेशीर राहील.
**तुळ** : जुन्या परिचित व्यक्तिची अचानक भेट होईल. मनोबलात वाढ होईल. आर्थिक स्थिती चांगली राहील.
**वृश्चिक** : कामात यश मिळाल्याने आनंदी रहाल. नातेवाईकांशी असलेल्या संबंधावर मर्यादा राखा.
**धनु** : विशेष काम होण्याचे योग आहेत. साथीदाराचे सहकार्यामुळे मन प्रसन्न राहील.
**मकर** : पूर्वी केलेल्या कामाचा चांगला परिणाम दिसेल. मुलांच्या बाबतीत भावनीक समस्या निर्माण होतील.
**कुंभ** : कौटुंबिक सदस्याचे आपल्या विषयी मत चांगले राहील. काम करतांना वेळेचे बंधन राखा.
**मीन** : जोशपूर्वक कामात रस घ्याल. हुशार व्यक्तिची भेट होईल त्यामुळे फायदा होईल. कौटुंबिक समाधान लाभल्यामुळे मन प्रसन्न राहील.

# जरांगे-पाटलांची शांतता रॅली ७ ऑगस्टला सोलापुरात

## छत्रपती शिवाजी महाराज चौकात जाहीर सभा; मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थ लाखो मराठा बांधव येणार

### दुसऱ्या टप्प्याची तयारी पूर्ण; २ हजार स्वयंसेवकाची व्यवस्था

### पाच ठिकाणी मेडिकल केंद्र; चारी दिशांना असणार ॲम्ब्युलन्स

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

गेल्या पाच वर्षापासून मराठा आरक्षणासाठी वेगवेगळ्या प्रकारचे मोर्चे, आंदोलने करण्यात आली मात्र आरक्षणाचा प्रश्न निकाली निघाला नव्हता. गतवर्षापासून मनोज जरांगे पाटील यांनी आरक्षणाचा विषय हाती घेतल्यामुळे या आरक्षणावरती ठोस निर्णय होण्यास सुरुवात झाली आहे. मराठा आरक्षणाच्या दुसऱ्या टप्प्यातील सुरुवात सोलापूरच्या हुतात्म्याच्या नगरीतून केली जाणार असल्याने या आरक्षणाला यश नक्कीच मिळेल असा विश्वास सोलापूरकरांमधून व्यक्त केला जात आहे.

बुधवार, दि. ७ ऑगस्ट रोजी दुपारी बारा वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली असल्याची माहिती मराठा क्रांती मोर्चा व छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीच्या वतीने देण्यात आली. यावेळी अमोल शिंदे, रवी मोहिते, दास शेळके, प्रताप चव्हाण, श्रीकांत घाडगे, बाळासाहेब गायकवाड, दिलीप कोल्हे, अनंत जाधव, हेमंत चौधरी, शेखर फंड आदींसह मराठा क्रांती मोर्चाचे अनेक सदस्य उपस्थित होते.

आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या शांतता रॅलीला मराठवाड्याच्या प्रत्येक जिल्ह्यामधून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला होता. या शांतता रॅलीची दुसऱ्या टप्प्यातील सुरुवात सोलापूर जिल्ह्यामधून केली जात आहे. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गामधूनच आरक्षण मिळायला हवे आणि सग्या सोयऱ्यांचा प्रश्नही निकाली काढण्यात यावा या मागण्यासाठी दुसऱ्या टप्प्यातील मराठा आरक्षणाच्या आंदोलनाची सुरुवात पश्चिम महाराष्ट्रामधील सोलापूर जिल्ह्यातून सात ऑगस्ट रोजी करण्यात येत आहे.



सोलापूर शहराचे मुख्य प्रवेशद्वार असलेल्या पुणे नाका येथून येणारी वाहने अवंतीनगर रस्त्यावरती दुतर्फा व बसवंती पार्किंग, रूपा भवानी रोड, महामार्गाचा सर्विस रोड येथे पार्क करण्यात येणार आहेत. बार्शी, मोहोळ, उत्तर सोलापूर या तालुक्यामधून येणाऱ्या वाहनांना वरील पार्किंगची व्यवस्था देण्यात आली आहे. तुळजापूर रोड वरून येणारी वाहने जव्हार मळा येथील पार्किंग मध्ये ठेवण्यात येणार आहेत. तर मंगळवेढा रोड वरून येणारी वाहने जुनी मिल कंपाऊंड, एक्जीबिशन सेंटर (एकूण आठ एकर क्षेत्र) सीएनएस हॉस्पिटल समोरील बंद रस्ता येथे पार्क करण्यात येतील. अक्कलकोट विजयपूर रोड वरून येणारी वाहने होम मैदानावर, सात रस्ता परिसर येथे पार्क करण्यात येतील.

जरांगे पाटील यांच्या सभेसाठी येणाऱ्या नागरिकांसाठी आपत्कालीन दोन रुग्णालय उभारण्यात आली आहेत. सभेच्या चारी बाजूला ॲम्बुलन्स ठेवण्यात येणार आहेत. पार्किंगच्या ठिकाणी मार्गदर्शनासाठी २००० स्वयंसेवकाची व्यवस्था करण्यात आली आहे. ठिकठिकाणी मोबाईल टॉयलेटची सुविधा देण्यात आली आहे. २०१६ च्या मोर्चापेक्षा मोठ्या रॅलीचे नियोजन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे. शिवाजी चौकामधील जेवढे लॉजेस, हॉटेल्स आहेत तिथे महिलांसाठी टॉयलेटची व्यवस्था करण्यात आली आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या सभेला येणाऱ्या नागरिकांना अन्नाचे पाकीट व पाण्याच्या बॉटल मोफत वाटप करण्यात येणार आहेत. मराठा समाजाच्या ५८ शांतता मोर्चाची निवेदने ज्याप्रमाणे केवळ लहान मुलींच्या हस्ते देण्यात आले होते; त्याचप्रमाणे बुधवारच्या शांतता रॅलीत ही कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेत्याऐवजी शेतकऱ्यांच्या मुलीच्या हस्ते मनोज जरांगे पाटील यांचे स्वागत करण्यात येणार आहे. सभेच्या वेळी विचारपीठावरही फक्त मनोज जरांगे पाटील हे एकटेच असणार आहेत.

पोलीस प्रशासनाकडूनही जरांगे पाटील यांच्या बंदोबस्तासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. सकाळच्या सत्रामध्ये जरांगे पाटील यांचे धाराशिव जिल्ह्यांमधील तुळजापूर येथून आगमन होणार असून, सोलापूर ग्रामीण हद्दीत प्रवेश केल्यानंतर सोलापूर तालुका पोलीस ठाण्याकडून रस्त्यावर पोलीस बंदोबस्त नेमला जाणार आहे. त्यानंतर शहरातील रॅली आटोपून ते कामती मार्गे मंगळवेढ्याला जाणार आहेत. त्यावेळी ग्रामीण पोलिसांचा रोड बंदोबस्त नेमलेला असणार आहे. तुळजापूर वरून जरांगे पाटील यांचे धर्मवीर संभाजी राजे चौकामध्ये आगमन होणार असून, तेथून ते छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये सभास्थळी दाखल होणार आहेत.

### अकरा तालुक्यांतील मराठा बांधव येणार

मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या दुसऱ्या टप्प्यातील शांतता रॅलीसाठी सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ, माढा, करमाळा, माळशिरस, मंगळवेढा, पंढरपूर, सांगोला, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर या अकरा तालुक्यामधून किमान दहा ते अकरा लाख मराठा बांधव या सभेसाठी उपस्थित राहतील असा अंदाज आहे.

### २०० स्पीकरची व्यवस्था

छत्रपती शिवाजी महाराज चौकात मनोज जरांगे पाटील यांची सभा आयोजित करण्यात आली आहे. त्यांचा आवाज छत्रपती संभाजी महाराज चौकापासून ते नवी वेस पोलीस चौकीपर्यंत, बाळीवेस रस्ता, बुधवार पेठ रस्ता अशा मार्गावरती २०० स्पीकर कर्णे लावण्यात येणार आहेत.जेणेकरून सर्वांना मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांचा आवाज ऐकता येईल, अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

# तब्बल पाच पिढ्यांचा साक्षीदार असलेल्या झाडावर कुऱ्हाड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील उळेगांव-कासेगांव रस्त्यावरील महावितरण नवीन तारा ओढण्याच्या कामात कासेगांव रस्त्यावरील लिंबाच्या २०-२५ झाडांवर कुऱ्हाड चालवलीय. त्यातच गुरवांचं लवण अशी ख्याती असलेल्या रस्त्याच्याकडेला नाल्याजवळील ५ पिढ्यांचा साक्षीदार असलेल्या वडाच्या झाडावर कटर चालवून त्यास बोडकं करण्यात आले आहे.



दरम्यान पर्यावरण संतुलनासाठी झाडं लावा, झाडं जगवा हा संदेश जनमाणसांना देण्यासाठी शासन लाखो रुपयांचा चुराडा करते. त्यानंतर अशी सर्रासपणे वृक्षांची कत्तल चालवली जात आहे. गेल्या पाच पिढ्यांचा साक्षीदार असणारे हे भलमोठे वटवृक्ष आज जमीनदोस्त केले जात असल्याने स्थानिक ग्राम स्थांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे. कालपर्यंत हिरव्या गर्द पानांनी बहारलेल्या झाडाची तीचं पानं उद्या पाचोळ्यात पडलेली दिसणार आहेत. तब्बल ५ पिढ्याचा मूक साक्षीदार असलेलं वडाचं झाडं विनापरवाना कापलं गेलं असल्यास जिल्हा प्रशासनानं स्वतः तक्रारदार होऊन मनमानी कारभार केलेल्या संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी अता जोर धरू लागली आहे.

# पुस्तके आयुष्याच्या कोणत्याही वळणावर चंद्रासारखी सोबत : डॉ. ढेरे

### प्रिसीजन वाचन अभियानाचे दुसरे पुष्प

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

भाषेचे स्वर्गसुख घ्यायचे असेल तर वाचनाचे कर्म केले पाहिजे. वाचनाने माणसाचे आयुष्य समृद्ध होते. काही पुस्तके कोणत्याही वळणावर चंद्रासारखी सोबत करतात. वाचनाने जीवन दृष्टी मिळते मग ते सरधोपट राहत नाही. उत्तम लेखक हा उत्तम माणूस असलाच पाहिजे. वाचता वाचता माणूस यांत्रिक होउ शकतो, अशा भावना डॉ. अरुणा ढेरे यांनी प्रिसिजन फाउंडेशन व इंडियन मेडिकल असोसिएशन आयोजित वाचन अभियानात व्यक्त केल्या. प्रिसिजन वाचन अभियानाचे आज दुसरे पान उघडले आणि शब्दांच्या श्रवनांनी रसिक सोलापूरकर तृप्त झाले.

डॉ. अरुणा ढेरे यांचे 'प्रेमाकडून प्रेमाकडे' या पुस्तकाचे अभिवाचन ममता बोल्ली आणि हसन जैद यांनी केले. अभिवाचना नंतर ममता बोल्ली व जैद शेख यांना शिरीष घाटे लिखित पुस्तक भेट देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर डॉ सुहासिनी शहा यांनी या कार्यक्रमाच्या मुख्य अतिथी डॉ. अरुणा ढेरे व हेमकिरण पत्की यांचे ही स्वागत केले. डॉ. अरुण ढेरे यांची प्रकट मुलाखत जेष्ठ लेखक हेमकिरण पत्की यांनी घेतली. या मुलाखती दरम्यान डॉ अरुणा ढेरे यांनी त्यांचा साहित्यिक जीवनपट उलघडला. त्या बोलताना म्हणाल्या, सगळे काही गुण सुत्रातून येत नाही, पुस्तकांनी श्रीमंत असलेले घर मला लाभले भिंत ते छत ईतके पुस्तके होती कि भिंतींचा रंग माहीत नव्हता. पुस्तकांबद्दल चित्रमय आणि नादमय पद्धतीने पुस्तकांचे संस्कार माझ्या बाबांनी माझ्यावर केले. पुस्तकं आणि द्यान यज्ञ संस्कार अखंड माझ्यावर सुरू होता.



### संस्कृतीच्या मातीशी नाते

पुण्यामध्ये आयटी कंपन्याचे जाळे असून पण एकही कंपनी सांस्कृतिक कार्यक्रमासाठी पुढाकार घेत नाही पण प्रिसीजनने संस्कृतीच्या मातीशी नाते जपले आहे. वाचन अभियानातून सोलापूरमध्ये समृद्ध वाचक नक्की तयार होतील. त्यामुळे प्रिसिजन आणि सोलापूरकर रसिकांचे मनापासून आभार.

# लाड समितीअंतर्गत कर्मचारी, पात्र वारसदारांनी अर्ज सादर करावेत

## महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ ऑगस्ट-**

नगर विकास खात्याच्या पत्रानुसार लाड समितीच्या शिफारशीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार सोलापूर महानगरपालिकेतील सफाई कामगार, सेवानिवृत्त, स्वेच्छानिवृत्त, वैद्यकियदृष्ट्या अपात्र ठरलेल्या अथवा मयत झालेल्या तथापी वाल्मिकी, मेहतर, भंगी, अनुसूचित जाती व नवबौध्द या जात प्रवर्गातील कर्मचारी/पात्र वारसदांरानी महापालिका सामान्य प्रशासन विभागाकडे नमूद कागदपत्रे सादर करावीत, असे आवाहन उपायुक्त आशिष लोकरे यांनी केले आहे. महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभागाकडून क्र. न्यायाप्र-२०२३/प्र.क्र.४८/ सआक, दि.१२ जुलैच्या पत्रान्वये लाड समितीच्या शिफारशीनुसार निर्गमित झालेल्या दि. २४ फेब्रुवारी २०२४ च्या सुधारित शासन निर्णयातील मुद्याबाबत मे, उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने वाल्मिकी, मेहतर, व भंगी या जात प्रवर्गातील सफाई कामगारासोबत अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील सफाई कामगारांचा समावेश करण्याबाबत निर्देश प्राप्त आहेत.

### कोणत्याही अमिषास बळी पडू नये : उपायुक्त लोकरे

या प्रक्रीयेच्या अनुषंगाने सर्व पात्र वारसदार/लाभार्थ्यांनी कुठल्याही कर्मचारी/ खाजगी व्यक्ती यांच्या कडून मिळणाऱ्या कसल्याही स्वरुपाच्या अमिषास बळी पडू नये. आपली कुठल्याही प्रकारची फसवणूक झाल्यास यासाठी सोलापूर महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. याची नोंद घ्यावी, असे आवाहन उपायुक्त आशिष लोकरे यांनी केले आहे.

# राज्य वेतन त्रुटी सुधारणा समितीकडे जि.प. युनियनचे प्रस्ताव सादर

**तभा वृत्तसेव,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

राज्याचे अध्यक्ष बलराज मगर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्याचे कार्याध्यक्ष बाबुराव पूजरवाड ,राज्य सरचिटणीस विवेक लिंगराज, कोषाध्यक्ष विजयकुमार हळदे, संपर्क सचिव रामचंद्र मडके यांच्या नेतृत्वाखालील वेतन त्रुटी समितीने मंत्रालयात १०९ कागदपत्रांसह वेतन त्रुटी समितीसमोर एक तास आपली साक्ष नोंदवून प्रस्ताव सादर केला.

सुनावणी प्रसंगी विभागीय संघटक डॉ एस. पी.माने, नाशिकचे अजय कस्तुरे, रविंद्र गायकवाड, प्रशांत कवडे, पवन तलवारे, ऋषिकेश शिंदे गजानन विषे आदी राज्याचे पदाधिकारी उपस्थित होते. वेतन त्रुटी समितीकडे सादर केलेल्या या प्रस्तावामुळे राज्यातील वरील संवर्गातील कर्मचाऱ्यांमध्ये वेतन त्रुटी दूर होण्याच्या अशा उंचावले आहेत.



महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियनच्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून कनिष्ठ सहायक, वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ प्रशासनाधिकारी, सहाय्यक प्रशासनाधिकारी, कनिष्ठ सहाय्यक लेखा, वरिष्ठ सहाय्यक लेखा, कनिष्ठ लेखाधिकारी, सहाय्यक लेखाधिकारी, परिचर, वाहन चालक, अंगणवाडी पर्यवेक्षिका, आरोग्य कर्मचारी, पशुचिकित्सा कर्मचारी, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य अभियात्रिकी सहाय्यक अशा १९ संवर्गावर सातव्या वेतन आयोगात व त्याचप्रमाणे सहाव्या वेतन आयोगापासून या संवर्गावर जो वेतन आयोगात झालेल्या अन्याय दूर करण्यासाठी सातत्याने अनेक वर्षापासून पत्र व्यवहार केले होते. मागील संपामध्ये वेतन त्रुटी दूर करावी ही एक प्रमुख मागणी घेऊन आंदोलन करण्यात आले होते. या बेमुदत संपामध्ये सहभाग घेतल्याने राज्याचे माजी अप्पर मुख्य सचिव मुकेश खुलर यांच्या अध्यक्षतेखाली वेतन त्रुटी समिती स्थापन करण्यात आली होती.




# विमान उड्डाणाची चाचणी यशस्वी

**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

गेल्या अनेक वर्षांपासून सोलापुरात विमान सेवा सुरु व्हावी अशी अनेक उद्योजक, राजकारणी लोकांची मागणी होती. हे त्यांचे स्वप्न आता लवकरच पूर्ण होत असून, शनिवार, दि. ३ ऑगस्ट रोजी सोलापुरातील होटगी रोडवरील विमानतळावर विमानसेवा प्राधिकरणाने व्हिटी-सिएनएस या तांत्रिक विमानाद्वारे चाचणी घेतली.

धावपट्टीचे काम योग्य पध्दतीने झाल्याचा निर्वाळा त्यांनी दिला. ही चाचणी यशस्वी झाली असल्याने पुढच्या महिन्यात सोलापुरातुन ७० आसनी विमानसेवा सुरू होईल आणि सोलापूरकरांची प्रतीक्षा संपणार आहे. भारतीय विमानसेवा प्राधिकरणाने विमानसेवेसाठी धावपट्टी मजबुतीकरण तसेच आवश्यक विकास कामांसाठी ४९ कोटी रुपये दिले होते,या कामांची पाहणी आणि चाचणीसाठी व्हिटी-सिएनएस हे तांत्रिक विमान धावपट्टी क्रमांक १५ आणि ३३ या दोन्ही ठिकाणी झेपावले.त्यानंतर तांत्रिक बाबी पाहणाऱ्या अधिकाऱ्यांनी विमानतळ व्यवस्थापकांना कामे योग्य पध्दतीने झाल्याचे सांगितले. नागरी विमान सेवेसाठी धावपट्टीचे काम प्राधान्याने पूर्ण करणे अत्यंत गरजेचे होते. धावपट्टीच्या कामानंतरच जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी भारतीय विमानसेवेकडे प्रस्ताव देणार असल्याचे सांगितले होते, आता लवकरच त्यांचा प्रस्ताव जावून लवकरच सोलापुरात विमानसेवा सुरू होणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# मुस्लिम महिला चेहऱ्याला प्रथमच मिळणार संधी?

## सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघ; प्रा. शिवाजी सावंत, मुबिना मुलाणी यांच्या नावाची चर्चा

**तभा वृत्तसेवा । आरती कुसेकर**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

विधानसभेची नव्याने रचना झाल्यानंतर शहर मध्य मतदारसंघावर आतापर्यंत प्रणिती शिंदे यांच्या रुपाने काँग्रेचे वर्चस्व राहिले. पूर्वी हा मतदारसंघ शिवसेनेचा बालेकिल्ला होता. माजी आ. शिवशरण पाटील यांनी या मतदारसंघाचे नेतृत्व केले. आता पुन्हा या मतदारसंघावर महायुतीचा झेंडा फडकविण्यासाठी व्यूहरचना आखण्यात येत आहे. शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे जिल्हा संपर्क प्रमुख प्रा. शिवाजी सावंत यांच्याबरोबरच महिला आघाडीच्या प्रमुख पुळूज (ता. पंढरपूर) पंचायत समिती गणातील माजी पंचायत समिती सदस्या मुबिना मुलाणी यांच्या नावाची चर्चा जोरदार सुरु आहे. त्यांच्या रुपाने पहिल्यांदाच मुस्लिम चेहऱ्याला शहर मध्यमधून संधी मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.



आरोग्य मंत्री प्रा. तानाजी सावंत यांचे बंधू असलेले प्रा. शिवाजी सावंत यांनी यापूर्वी माढा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविली आहे. महायुतीत सध्या माढ्याची जागा राष्ट्रवादी अजित पवार गटाकडे आहे. यामुळे ते सोलापूर शहर मध्य मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची दाट शक्यता आहे. त्यांच्याबरोबरच मुस्लिम समाजातील एक आक्रमक, सुशिक्षित चेहरा म्हणून मुबिना मुलाणी यांचे नावही आघाडीवर आहे. पंचायत समिती सदस्या म्हणून त्यांनी अनेक विधायक उपक्रम राबविले असून, प्रशासनाला धारेवर धरुन विविध कामे मार्गी लावल्या आहेत. त्या पुळूज गणातून खा. धनंजय महाडिक यांच्या बालेकिल्ल्यातून निवडून आल्या आहेत. याशिवाय सोलापूर जिल्ह्याचे पाणी इंदापूर पळविण्याच्या आरोपानंतर आक्रमक होत बांगड्या पाठवून पाणी चोरीचा निषेध केला होता. त्यांची दखल राज्य शासनाबरोबरच प्रशासनाने घेऊन या पाण्यावर निर्बंध घालण्यात आले. अनगर येथील अपर तहसील कार्यालयाला विरोध करण्याच्या संघर्षातही त्यांनी उडी घेऊन चुकीच्या निर्णयाविरोधात आवाज उठविला. याची दखल दस्तुरखुद्द मुख्यमंत्र्यांनी घ्यावी लागली. त्यांनी हा निर्णय रद्द केला.



सोलापूर जिल्ह्यात मुस्लिम समाजाची मते निर्णायक असतानाही लोकसभा निवडणुकीत त्या समाजाचा विचार झाला नाही. आता राजकिय गणित जुळविण्याबरोबरच मतांचा गठ्ठा मिळविण्यासाठी सुशिक्षित, आक्रमक, अभ्यासू चेहरा म्हणून मुबिना मुलाणी यांच्या नावावर एकमत होण्याचा विश्वास राजकीय अभ्यासक व्यक्त करत आहेत. सांगोल्याचे आ. शहाजीबापू पाटील यांच्या त्या निकटवर्तीय असून, आतापर्यंत महिला काँग्रेस कमिटीच्या माध्यमातून राज्य पातळीवर त्यांनी काम केले आहे.

### तीर्थक्षेत्र विकासासाठीही आक्रमक

माजी पंचायत समिती सदस्या मुबिना मुलाणी यांनी पंढरपूर तीर्थक्षेत्र विकासाच्या मुद्यावर तत्कालीन सरकारला धारेवर धरुन यात्रा निधी मिळण्याबरोबरच दैनंदिन पाणीपुरवठा, स्वच्छता, यात्री निवास, चंद्रभागा वाळवंट सुशोभिकरण, सुलभ दर्शन यासाठी आवाज उठवला होता. उजनी धरणातील पाण्याचे नियोजन, महापूर, वीज समस्या, शेतकरी कर्जमाफी, महिला-तरुणांना रोजगार, पंढरपूर एमआयडीसी, थकित एफआरपीचे मुद्दे त्यांनी उपस्थित केले होते.

---

# जिल्हा नियोजन समिती बैठकीत घुमला करमाळ्याचा आवाज

### निवडीनंतरच्या पहिल्याच बैठकीत दिग्विजय बागल यांनी तालुक्यातील महत्त्वाच्या प्रश्नांवर उठवला आवाज



**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ४ ऑगस्ट-**

करमाळा तालुक्यातील विविध प्रश्नांवर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत नवनियुक्त सदस्य दिग्विजय बागल यांनी आवाज उठवला.

कुकडी प्रकल्पातील ओहरफ्लो पाणी, मांगी, रोसेवाडी, वीट, राजुरी, कुंभेज तलावात तसेच तालुक्यातील इतर सर्व तलाव भरून घ्यावेत असा प्रश्न उपस्थित केला. दिग्विजय बागल यांची नियोजन समितीवर निवड झाल्यावर ही पहीलीच बैठक होती. यामध्ये केळी उत्पादक शेतकऱ्यांचे वादळी वाऱ्यामुळे मे महिन्यात ४२२४ हेक्टरवरील केळी बागांचे नुकसान झाले असून त्याचे पंचनामेही करण्यात आले आहेत. परंतु नुकसानभरपाई मिळाली नाही. यासह विविध प्रश्नांवर त्यांनी आवाज उठविला.

### पालकमंत्र्यांकडून दखल

यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सकारात्मक दखल घेत संबधित विभागास माहिती घेऊन याबाबत कार्यवाही करण्याचे आदेश दिल्याचे बागल यांनी सांगितले.

---

# माजी विद्यार्थ्यांनी जपले सामाजिक, शैक्षणिक ऋण

## धर्मादाय उपायुक्त डॉ. राजेश परदेशी यांची पित्याच्या स्मृतीनिमित्त विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ४ ऑगस्ट-**

आपल्याला विद्यार्थी दशेमध्ये आपल्याला घडविलेल्या शिक्षण संस्थेबद्दल असलेले प्रेम व्यक्त करत पुणे विभागाचे धर्मदाय उपआयुक्त डॉ.राजेश मोहनलाल परदेशी यांनी आपले दिवंगत पिता अभियंता मोहनलाल परदेशी यांच्या स्मृती जपण्यासाठी राजर्षी शाहू विधी महाविद्यालयातील पदवी परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास देऊ केलेली शिष्यवृत्ती आज त्या विद्यार्थ्यास प्रदान करण्यात आली. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे खजिनदार जयकुमार शितोळे यांच्या हस्ते विधी महाविद्यालयातील पदवी परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या सौरभ बचुटे या विद्यार्थ्यास ही शिष्यवृत्तीची रक्कम प्रदान करण्यात आली. आपण ज्ञानदान घेतलेल्या भूमीत विद्यार्थी म्हणून उज्वल यश मिळवले. त्याचप्रमाणे गुणवत्ताधारक विद्यार्थ्यास प्रोत्साहन मिळावे या उदात्त उद्देशाने प्रेरित होऊन डॉ. परदेशी यांनी ही शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेतला असून संबंधित सर्वोच्च गुणवत्ताधारक विद्यार्थी कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जयंती सोहळ्यानिमित्त आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभास डॉ. परदेशी यांच्याकडून सुवर्णपदकही मान्यवरांच्या हस्ते प्रदान केले जाणार आहे. हा उपक्रम कौतुकास्पद असून माजी विद्यार्थ्यांसमोर आदर्श निर्माण करणारा आहे, असे गौरवोद्गार यावेळी प्रमुख पाहुणे जयकुमार शितोळे यांनी काढले.

यावेळी प्राचार्य डॉ रत्नदीप सोनकांबळे, प्रा. ए. बी. गवळी, प्रा. एम. पी. शिकारी, प्रा. एम. एस. भागवत चव्हाण व इतर मान्यवर उपस्थित होते. त्यानुसार सौरभ बचुटे या विद्यार्थ्यास ही शिष्यवृत्ती महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या दालनामध्ये मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

---

# मुलांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच बौद्धिक विकासही आवश्यक

### अवर सचिव गणेश कचरे यांचे प्रतिपादन



**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. ४ ऑगस्ट-**

मुलांच्या शैक्षणिक प्रगती बरोबरच बौद्धिक मानसिक प्रगती ही आवश्यक असल्याचे प्रतिपादन अवर सचिव गणेश कचरे यांनी माळशिरस येथील गोपाळराव देव प्रशाला व ज. चं. आगाशे कनिष्ठ महाविद्यालयातील पारितोषिक वितरण समारंभात बोलताना केले.

यावेळी आठवी ते १२ वी मधील गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक करण्यात आले.यावेळी हनुमान शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अड माधव मिरासदार,कार्याध्यक्ष ॲड. मिलिंद कुलकर्णी, सचिव रामचंद्र दोशी संचालक संतोष कुलकर्णी, धनंजय मस्के, राजाराम ढाले, रामचंद्र सिद, सुभाष शिंदे, मुख्याध्यापक धनंजय केसकर, उपमुख्याध्यापक सूर्यकांत जानकर, पर्यवेक्षक शारदा महामुनी यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते. मार्गदर्शन करताना कचरे म्हणाले मुलांच्या शैक्षणिक प्रगती बरोबरच बौद्धिक मानसिक प्रगती ही आवश्यक असून मुलांना स्पर्धा परीक्षांची लहानपणापासून आवड निर्माण होते.शहरी भागातील मुलांपेक्षा ग्रामीण भागातील मुले परिस्थितीशी संघर्ष करत यश संपादन करतात. कार्याध्यक्ष मिलिंद कुलकर्णी यांनी आपल्या मनोगतात संस्थेच्या स्थापनेपासूनचा आढावा घेतला. मुख्याध्यापक केसकर यांनी मनोगतात शाळेच्या उज्वल निकालाची परंपरा आजही टिकून असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंदनशिवे यांनी केले.पारितोषिकांचे वाचन राजमाने सर यांनी केले तर उपस्थित सर्वांचे आभार काटकर सर यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमासाठी गावातील नागरिक व मान्यवर उपस्थित होते.

---

# जिल्हा नियोजन समितीवर शिवसेना तालुकाप्रमुख शिवाजी बाबर

### नियोजन समितीवर मुख्यमंत्र्यांचे विश्वासू जिल्ह्यातील पाच शिलेदार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ ऑगस्ट-**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना पंढरपूर तालुकाप्रमुख शिवाजी बाबर यांची सोलापूर जिल्हा नियोजन समितीच्या निमंत्रित सदस्यपदी निवड केली आहे. सोलापूर व पुणे जिल्ह्याचे संपर्क नेते संजय मशीलकर यांच्या प्रयत्नातून ही निवड करण्यात आली आहे.



शिवाजी बाबर हे भाळवणी येथील रहिवासी आहेत. १९९३ पासून शिवसेनेच्या कार्यकर्ता आणि शाखाप्रमुख पदापासून पक्षात काम केले आहे. सध्या तालुका प्रमुख पदावर आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेतली गेली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आशीर्वादाने ही निवड होताच, शनिवारी झालेल्या बैठकीला उपस्थित राहून प्रश्न मांडण्यासाठी संधी मिळाली आहे. जिल्हा नियोजन समितीवर शिवसेना पंढरपूर तालुका प्रमुख शिवाजी बाबर, यांच्यासह जिल्ह्यातील पाच शिलेदाराची नियुक्ती करण्यात आली आहे. नव्या सदस्यांच्या नियुक्ती ही शिवसेना सचिव संजय मशीलकर यांच्या प्रयत्नातून झाली आहे.

### यांचा घुमणार आवाज

मुख्यमंत्री नियुक्त विशेष निमंत्रित सदस्यपदावर पाच जणांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये शिवसेना पंढरपूर तालुका प्रमुख शिवाजी बाबर, कुर्डुवाडी शिवसेना शहर प्रमुख समाधान दास, अक्कलकोट तालुका प्रमुख संजय देशमुख, माळशिरस तालुका प्रमुख सतीश सप्ताळ, समाजसेवक सामी अहमद सकील अहमद मौलवी यांची नव्याने विशेष निमंत्रित सदस्यपदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

---

# पंढरपुरातील तीन शाळा ॲनिमियामुक्त; भारत विकास परिषदेचा उपक्रम

### सर्व विद्यार्थिनींचा हिमोग्लोबिन रिपोर्ट उत्तम



**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, दि. ४ ऑगस्ट-**

देशात ॲनिमीया मुक्त अभियान राबविले जात आहे. या अंतर्गत तालुक्यातील सिद्धनाथ विद्यामंदिर सातवा मैल, श्री गोपालकृष्ण विद्यामंदिर गोपाळपूर आणि महिला मंडळ प्राथमिक शाळा पंढरपूर या शाळेतील मुलींच्या शरीरातील रक्तामधील लोहाचे (हिमोग्लोबिन) तपासणी केली. या तिन्ही शाळेतील मुलींची तीनवेळा तपासणी केली. तिसऱ्या तपासणीच्या वेळेस तिन्ही शाळेतील सर्व मुलींचे हिमोग्लोबिन चांगले दिसल्याचा रिपोर्ट आला. आता या पुढे अजून शाळेत हा उपक्रम राबविणार असल्याची माहिती भार विकास परिषदेचे सचिव डॉ. अनिल पवार यांनी दिली.

भारत विकास परिषदेच्या वतीने सेवा अंतर्गत विविध शिबीर, माहिती आदी कामे केली जातात. दोन वर्षा पूर्वी देशाच्या आरोग्य विश्यिक माहिती समोर आली. यात सर्व वयोगटातील स्त्रियांना ॲनिमीयाने ग्रस्त असल्याचे जाहीर केल. यासाठी ॲनिमीया मुक्त अभियान राबविण्याचे काम सुरु झाले. त्या अनुषंगाने भारत विकास परिषद पंढरपूर शाखेने तालुक्यातील तीन शाळा निवडल्या. यामधील सर्व मुलींचे रक्त तपासणी, औषधोपचार मोफत केला. सुरुवातीला या शाळांमध्ये आम्ही मुलींच्या हिमोग्लोबिनची तपासणी केली. त्यावेळेस ४० ते ४५ टक्के मुली या ॲनिमीया असलेल्या आढळून आल्या. की ज्यांचं हिमोग्लोबिन हे सामन्य पेक्षा खूप कमी होतं. अशा सर्व मुलींना आम्ही तीन महिन्याची मोफत औषध उपचार केला. त्यांचे समुपदेशन केल. सहा महिन्यानंतर परत याच तीन शाळेमध्ये आम्ही पुन्हा तपासणी शिबीर घेतले. त्यावेळेस असे आढळून आले की ॲनिमीयाचे प्रमाण हे कमी झालं असून ते दहा ते पंधरा टक्के वर आलं. त्यावेळेस परत आम्ही त्या मुलींना औषधे व समुपदेशन केले. व त्यांना तीन महिन्यासाठी मोफत औषध उपचार केला. त्या नंतर बरोबर सहा महिन्यांनी म्हणजे ३१ जुलै २४ ला आम्ही या तीनही शाळेमध्ये परत हिमोग्लोबिन तपासणी शिबीर घेतले. यावेळेस आश्चर्यजनक असे चित्र दिसून आले. या तीनही शाळेमध्ये एकही मुलगी ॲनिमीया ग्रस्त असलेली दिसून आली नाही.सिद्धनाथ विद्यामंदिर सातवा मैल कासेगाव येथे मुलींची संख्या २२० दुसरी शाळा श्री गोपाळकृष्ण विद्यामंदिर गोपाळपूर येथे मुलींची संख्या १६० व तिसरी शाळा महिला मंडळ प्राथमिक शाळा पंढरपूर यामध्ये मुलींची संख्या आहे १०० आहे. आज या तीनही शाळेचे हिमग्लोबिन तपासणीनंतर या सर्व शाळेतील मुली ॲनिमीया मुक्त झाल्याचे जाहीर केले. लोहाची कमतरता, जीवनसत्वाची कमतरता, रक्तस्त्राव या कारणामुळे ॲनिमीया होतो.

### ही घ्यावी काळजी

काही खाण्यापूर्वी हात धुणे, सकस आहार, वैद्यकीय तपासणी वेळोवेळी करावी. हिरव्या पालेभाजी, आदलीन्ब, सफरचंद, कडधान्य, मांसाहार करावा. विशेषत: मुलींनी आहाराबरोबर व्यायाम करावा आणि काळजी घ्यावी, असे आवाहन डॉ. वर्षा काणे यांनी केले. भाविपचे अध्यक्ष मंदार लोहोकरे यांच्यासह सदस्यांनी सहकार्य केल्याचे खजिनदार अजित कुलकर्णी यांनी सांगितले.

---

## संक्षिप्त वृत्त



### सह्याद्री फार्मसीमध्ये मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना शिबीर उत्साहात

**सांगोला, दि. ४ ऑगस्ट-**

महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू केली आहे. या योजनेची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी म्हणून सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे यांनी एक दिवसीय शिबिराचे आयोजन केले होते. शिबिराचे उद्घाटन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. दिलीपकुमार इंगवले, संगेवाडी मंडल अधिकारी विजया नाईक, तलाठी धायटीचे दीपक शिंदे, संगेवाडीचे अनिल चव्हाण, हलदहीवडीचे यशोदा पंगुडवाले, मेथवडेचे प्रथमेश बाबर, कोतवाल दिलावर वाघमारे, विपुल वाघमारे, प्राचार्य डॉ. मनोजकुमार पाटील यांच्या हस्ते झाले. विजया नाईक व दीपक शिंदे यांनी मनोगतात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेची संपूर्ण माहिती दिली. या योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ६ हजार, पदविकाधारक विद्यार्थ्यांना ८ हजार तर पदवीधर, पदव्युत्तर विद्यार्थ्यांना १० हजार रुपये विद्यावेतन दरमहा डीबीटी पद्धतीने येणार आहे. महाराष्ट्र रहिवासी असणारे व शैक्षणिक पात्रता धारण केलेले रोजगार इच्छुक उमेदवारांनी ज्यांचे किमान वय १८ व कमाल ३५ वर्ष आहे व रोजगार देणाऱ्या विविध आस्थापनांनी, उद्योजकांनीही कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे, असे मत व्यक्त केले. सूत्रसंचलन प्रा. एस. पी. जोकार यांनी केले.



### माढ्यात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी

**माढा, दि. ४ ऑगस्ट-**

मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळा व वादळ ग्रुप यांच्या वतीने साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी नगराध्यक्षा ॲड. मीनल साठे, उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, संत कुर्मदास सहकारी साखर कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे, माजी जि. प. सदस्य झुंजार भांगे, माजी ग्रामपंचायत सदस्य गुरुराज कानडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर, नगरसेवक आजिनाथ माळी, सभापती अरुण कदम, नाना साठे, माजी नगराध्यक्ष गंगाराम पवार, किरण पवार, कुंदन पवार, गणेश पवार, दत्ता पवार, दिनेश गाडेकर, विकास साठे, डॉ. विकास मस्के, शिवाजी जगदाळे, सुधीर लंकेश्वर, दौलत साठे, रामेश्वर पवार, निखिल पवार, सचिन साबळे, बापू साबळे, सचिन बगाडे, समर्थ लोखंडे, रणजित देवकुळे, अरविंद कदम, प्रविण पवार, आण्णा पवार उपस्थित होते.



### आ. रणजितसिंह मोहिते-पाटील 'जनवात्सल्य'वर; विधानसभेबाबत माजी केंद्रीय मंत्री शिंदेंशी चर्चा

**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

भारतीय जनता पार्टीचे विधान परिषदेचे आमदार रणजितसिंह मोहिते पाटील हे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीसाठी आले असता त्यापूर्वी ते सात रस्ता परिसरातील माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या जन वात्सल्य या निवासस्थानी भेटीला गेले. दरम्यान, आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही त्यांची भेट महत्त्वाची मानली जात आहे. चहापानानंतर बराच वेळ नूतन खासदार प्रणिती शिंदे आणि सुशीलकुमार शिंदे यांच्यासह रणजीतसिंह मोहिते पाटील आणि शिवतेजसिंह मोहिते पाटील यांची बंद दाराआड चर्चा झाली. काही वेळाने प्रणिती शिंदे या बाहेर आल्या. त्यानंतर सुशीलकुमार शिंदे यांनी माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, माजी महापौर महेश कोठे, दूध संघाचे संचालक सुरेश हसापुरे, काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे यांना आत मध्ये बोलावून चर्चा केली. थोड्या वेळाने खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांचेही आगमन झाले. सोलापूर जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदारसंघात कुणाला कुठे उमेदवारी द्यायची? कोणता मतदारसंघ कोणाला घ्यायचा याबाबतही या सर्व नेत्यांमध्ये चर्चा झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत धैर्यशिल मोहिते पाटील यांनी बंडखोरी करत शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश करत निवडणूक लढवली त्यात ते विजयी झाले. आजच्या जनवात्सल्यवरील सर्वांच्या भेटीत आगामी विधासभेच्या दृष्टीने चर्चा झाल्याचे सांगण्यात येते.

### स्वामी समर्थ महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल व्यवस्थापन संस्थेत प्रवेश प्रक्रिया सुरू

**सोलापूर दि. २ ऑगस्ट-**

येथील स्वामी समर्थ महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरींग टेक्नॉलॉजी या संस्थेत ३ वर्षाच्या बी.एस.सी.(एचएचए) पदवी तसेच पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षामध्ये प्रवेशासाठी पात्र उमेदवारांकडून ५ ऑगस्ट पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत, अशी माहिती संस्थेच्या प्राचार्यांनी कळविली आहे. पदवी अभ्यासक्रमासाठी उमेदवारांनी मान्यताप्राप्त १०+२ प्रणालीमध्ये कोणत्याही विद्याशाखेमध्ये ४० टक्के गुण मिळवून १२ वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. १२ वीच्या अभ्यासक्रमामध्ये इंग्रजी हा विषय अनिवार्य असून त्यात उत्तीर्ण असावे. अंतिम पदवी प्रदान करण्याकरिता अभ्यासक्रमाला जवाहरलाल नेहरू विद्यापीठाची मान्यता राहील. अधिक माहितीसाठी ए-१६०, कंबर तलाव जवळ, धर्मवीर संभाजी महाराज उद्यान, विजापूर रोड, सोलापूर येथे संपर्क साधावा, असे आवाहनही प्राचार्यांनी केले आहे.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## सर्वाधिक निधी शैक्षणिक सुविधासाठी द्यावा : वैशाली साठे

**तभा वृत्तसेवा,**
सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-

शैक्षणिक सुविधांसाठी जास्त निधी तरतूद करुन विद्यार्थ्यांच्या करिअरला प्रोत्साहन द्यावे असे अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठचे सदस्या वैशाली साठे यांनी सांगितले.

माजी आ. दिलीप माने यांच्या वाढदिवसानिमित्त साखरेवाडी ग्रामपंचायतीतर्फे विद्यार्थ्यांना सायकल, शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी सरपंच परिषदेच्या जिल्हा महिलाध्यक्षा कविता घोडके-पाटील होत्या. यावेळी उपसरपंच पप्पू साखरे, सीमा कांबळे, हरी क्षीरसागर, दादा माने, जनार्धन पवार, ग्रामसेवक बापू हाके, प्र. ग्रामसेवक सुदीप क्षीरसागर, गणेश पावले, पोलीस पाटील गणेश साखरे आदी उपस्थित होते.



प्रास्ताविक मुख्याध्यापक राजकुमार कांबळे यांनी केले तर आभार आप्पासाहेब जाधव यांनी मानले. भगवान क्षिरसागर, सिराज शेख, चंद्रकांत क्षीरसागर, आण्णासाहेब पावले उपस्थित होते.

### संक्षिप्त वृत्त...



## पिलीव येथे खंडोबाच्या २१ विरांसह गझी ढोलचा कार्यक्रम उत्साहात

**पिलीव, दि. ४ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव व आसपासच्या गावातील नाईक समाजाच्यावतीने वतीने खंडोबा देवाच्या २१ विरांचा व गझी ढोलाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या वीरांच्या कार्यक्रमाला एक ऐतीहासीक अशी परंपरा आहे. दर तिन वर्षांनी हा कार्यक्रम मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात येतो मात्र कोरोना काळामुळे हा कार्यक्रम बरेच दिवस रखडला होता. तब्बल १४ वर्षानंतर हा कार्यक्रम समाजाच्यावतीने वतीने करणयात आला. शुक्रवारी झिंजेवस्ती, पिलीव, लेंगरेवस्ती, मदनेवस्ती, काळामळा व इतर ठिकाणच्या गझी ढोलाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. शनिवारी विरांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यामध्ये सर्व विरांना खंडोबाच्या मंदीरात कोंडले जाते याठिकाणी या मंदीराली असणारी कडी ही आपोआप उघडली जाते व तेथुनच विरांचा कार्यक्रम सुरू होऊन तो मुख्य पेठेतून, बसस्थानकावरुन पाण्याच्या टाकीजवळ असणाऱ्या मंदीराजवळ हा कार्यक्रम समाप्त होतो.यावेळी कलश घेऊन महीलाही यामध्ये सहभागी होतात. हा कार्यक्रम पार पाडणयासाठी नरवीर उमाजी नाईक मंडळ तसेच समाजबांधवांनी विशेष परीश्रम घेतले. हा कार्यक्रम पाहण्यासाठी पिलीव व आसपासच्या परीसरातील नागरीकांनी प्रचंड मोठी गर्दी केली होती. या कार्यक्रमाप्रसंगी पिलीव पोलीस स्टेशनच्या वतीने हवालदार धनाजी झगडे, सतीश धुमाळ, अमीत जाधव यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता. सर्व कार्यक्रम अतिशय शांततेत पार पडला. या कार्यक्रमामुळे पिलीव गावात संपूर्ण वातावरण भक्ती मय झाले होते. पिलीव परिसरातील नाईक समाजाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या हा ऐतिहासिक सोहळा पाहण्यासाठी तालुक्यासह जिल्ह्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लक्ष वेधून घेणाऱ्या गझीढोलच्या आवाजाने परिसर दणाणून गेला होता. सहभागी प्रत्येकजण हा सोहळा कौतुकाने पाहत वाहवा करत होते. प्रत्येक वर्षी हा सोहळा घेतला जातो.



## शरद बँकेच्या पोटनिवडणुकीत घाडगे, निर्मल, साळुंके, शहांची निवड

**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

येथील शरद नागरी सहकारी बँकेच्या पोटनिवडणुकीत नूतन संचालक म्हणून एकनाथ घाडगे, प्रदीप निर्मल, सुनीता साळुंके व श्रेणिक शहा यांची बिनविरोध निवड करण्यात आली. शरद बँकेचे विद्यमान संचालक मुकुंद जाधव, सागर सपाटे, प्रभावती जाधव यांनी राजीनामा दिल्याने त्यांच्या रिक्त पदावर अनुक्रमे घाडगे, निर्मल व साळुंके यांची संचालक म्हणून तर शहा यांची तज्ञ संचालक म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उमेश पवार यांनी काम पाहिले. या नूतन संचालकांचा बँकेचे संस्थापक तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी बँकेचे अध्यक्ष प्रा. महेश माने, उपाध्यक्षा महानंदा सोलापुरे, संचालक सुरेश पवार, ज्ञानेश्वर सपाटे, नीलेश उंब्रजकर, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र आवताडे. तसेच दत्ता भोसले, केशव क्षीरसागर, स्वाती सपाटे यांच्यासह बँकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान, आगामी विधानसभा निवडणुका लक्षात घेता सपाटे बँकेचे नूतन अध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणून कोणाची निवड करणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.



## व्हॅलेंटाईन स्कूलमध्ये स्पोर्टस् नर्सरी नवीन उपक्रमाची सुरुवात

**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी स्पोर्टस नर्सरी या नवीन उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. याच्या उद्‌घाटनाप्रसंगी मुख्याध्यापिका जी.एच. कल्याणी, उपमुख्याध्यापिका मीना दुधनिकर, पर्यवेक्षिका सुनीता मंद्रूपकर व नागमणी पेगडा शिक्षक वर्ग विद्यार्थी वर्ग पालक वर्गाची उपस्थिती होती. मुख्याध्यापिका कल्याणी यांच्या हस्ते व पालक प्रतिनिधींच्या हस्ते क्रीडांगणाची व क्रीडा साहित्याची पूजा करण्यात आली. याप्रसंगी प्रशालेच्या क्रिडा शिक्षक लावण्या दुस्सा, संतोष पाटील व शिवाजी आवताडे यांचे मार्गदर्शन लाभले. या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापुरे, उपाध्यक्षा यमुना दिड्डी, सचिव संतोष गड्डम, सहसचिव नागेश शेंडगे यांनी कौतुक केले.

# सुखद वार्ता : उजनी ओव्हरफ्लो

### उजनी धरणाचे १६ दरवाजे उघडले

### भीमा नदीत २० हजार क्युसेक्सचा विसर्ग

### पंढरपूरसह नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ ऑगस्ट-**

उजनी धरणात वरून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरु धरणाची वाटचाल शंभरीकडे सुरु आहे. ८० हजार क्युसेक्सने धरणात पाण्याचा विसर्ग येत असल्याने रविवारी रात्रीच धरण १०० टक्के भरणार आहे. उजनीत येणारा विसर्ग १ लाखापर्यंत वाढत असल्याने रविवारी सायंकाळी पाच वाजता उजनीतून २० हजार क्युसेक्सने पाणी सोडण्यात आल्याने पंढरपूरसह नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. या भागात पुराचा धोका असल्याचे सांगण्यात सूचित करण्यात आले आहे.

गेल्या वर्षीच्या तीव्र दुष्काळानंतर यंदा उजनी धरण भरणार का? याची शेतकऱ्यांना काळजी लागली होती. आता उजनी तुडुंब भरु लागले असून, येणाऱ्या पाण्याची अवाक १ लाख क्युसेक्सपर्यंत जाऊ लागल्याने धरणातून २० हजार क्युसेक्स विसर्गाने भीमा नदीत पाणी सोडण्यास सुरुवात केली आहे. धरणाने ९० टक्क्यांची पातळी गाठली असताना वरुन धरणाकडे येणाऱ्या पाण्याची अवाक १ लाख क्युसेक्सपर्यंत पोहोचू लागल्याने धरण प्रशासनाने धरणातून सुरुवातीला २० हजार क्युसेक विसर्गाने पाणी सोडण्याचा निर्णय घेतला आहे. धरणाकडे येणाऱ्या पाण्याचा विसर्ग वाढत राहिल्यास धरणातून सोडावा लागणार विसर्गही मोठ्या प्रमाणात वाढवावा लागणार आहे.



### सावधानतेचा इशारा

भीमा नदी काठच्या सर्व नागरीकांना याद्वारे सुचित करण्यात येते की कृपया नदीपात्रात कोणीही उतरू नये आणि नदी मधील शेती पंप, नदी काठचे शेती अवजारे व तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास तात्काळ हलविण्यात यावेत. कृपया सखल भागातील संबंधित नागरिकांना सूचना देण्यात याव्यात व सर्वांनी योग्य ती दक्षता घ्यावी व पाटबंधारे विभागास सहकार्य करावे, असे आवाहन उजनी धरण पूरनियंत्रण कक्षाकडून करण्यात आले आहे.

### वीर धरणातूनही नीरा नदीत ४२ हजार क्युसेक्स विसर्ग

एका बाजूला उजनी धारण ओव्हरफ्लो होत असताना सातारा जिल्ह्यातील वीर धरणातूनही नीरा नदीत ४२ हजार क्युसेक्स विसर्गाने पाणी सोडण्यास सुरुवात झाली आहे. सोलापूर जिल्ह्याच्या सीमेवर असणाऱ्या नीरा नरसिंहपूर येथे भीमा आणि नीरा नदीचा संगम होऊन हे सर्व पाणी पंढरपूरकडे येत असते. सध्या याच वीर धरणातून सोडलेल्या पाण्याने भीमा नदी दुथडी भरुन वाहत असताना आता यात उजनी धरणाचे पाणी येण्यास सुरुवात झाली आहे. पंढरपूरचा पुराचा धोका वाढणार आहे. पुणे आणि सातारा जिल्ह्यात असाच पाऊस सुरु राहिल्यास पुढच्या दोन दिवसात पंढरपूर शहर व नदीकाठच्या गावांना पुराचा तडाखा बसणार आहे.

### सोलापूरसह अनेक भागांचा पाणीप्रश्न सुटणार

सोलापूर जिल्ह्यासाठी वरदायिनी ठरलेले उजनी धरण लवकरच १०० टक्के होणार असल्यानं आता सोलापूर जिल्ह्यासह, अहमदनगर, उस्मानाबाद आणि पुणे जिल्ह्यातील अनेक भागाचा पिण्याच्या व शेतीच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. उजनी धरणाची एकूण क्षमता ११७.२३ टीएमसी असून यात जिवंत साठ्यात ५३.५७ ढचउ तर मृत साठ्यात ६३.६६ टीएमसी पाणी साठवता येते. यावर्षी धरणाने नीचांकी पातळी गटात वजा ६० टक्के एवढी पातळी गाठली होती. मात्र, जुनपासूनच पुणे जिल्ह्यात सुरु झालेल्या पावसाने धरणातून पाणी सोडण्याची वेळ आली आहे. अजूनही उजनी पाणलोट क्षेत्रात २ महिने पावसाचा कालावधी असताना ऑगस्ट मध्येच पुरस्थितीला सामोरे जाण्याची वेळ येणार आहे. उजनी धरणात पूर नियंत्रणासाठी ११० टक्के पाणी साठवण्याची व्यवस्था करण्यात आली असल्याने १२३ ढचउ पर्यंत पाणी धरणात साठवता येवू शकते. मात्र, सध्या ज्या प्रमाणात उजनी धरणात पाणी येऊ लागले आहे, हे पाहता प्रशासनाने आजपासून पाणी सोडण्याचा निर्णय घेतला आहे.

### विसर्गामध्ये वाढ होण्याची शक्यता

भीमा नदी काठच्या सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, उजनी धरणाच्या वरील बाजूस असणाऱ्या धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पर्जन्यवृष्टी होत असून उजनी धरण जलाशय दिनांक ४ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १० वाजता ९० टक्के टक्के क्षमतेने भरले आहे. त्यामुळे पुरनियंत्रणासाठी उजनी धरणाच्या सांडव्यावरून भीमा नदीपात्रामध्ये सायंकाळी ५ वाजता २०००० क्यूसेक्सने सुरुवातीला पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात येणार आहे. विसर्गामध्ये आवश्यकतेनुसार वाढ होण्याची शक्यता आहे.

## दहिगाव उपसा सिंचन योजनेचे खरीप आवर्तन सुरू होणार

### आ. संजयमामा शिंदे यांची माहिती; बोगदा, सीना-माढा उपसा सिंचनलाही पाणी सुटणार

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ४ ऑगस्ट-**

दहिगाव उपसा सिंचन योजनेचे आवर्तन सुरू करावे अशी मागणी आपण यापूर्वीच कार्यकारी संचालक कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्याकडे केली होती. काल जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीमध्ये पालकमंत्री ना.चंद्रकांतदादा पाटील यांनी सदर पाणी सोडण्यास मान्यता दिली असून ५ ऑगस्टपासून दहिगाव उपसा सिंचन योजनेचे आवर्तन सुरू होईल अशी माहिती आमदार संजयमामा शिंदे यांनी दिली.

गेल्या वर्षी करमाळा तालुक्यासह संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे उजनी धरणात अवघा ६० टक्के पाणीसाठा झाला होता. याच पाणी साठ्यावरती गेल्या वर्षी पाणीपुरवठा झाल्यामुळे धरण -६० टक्केपर्यंत गेलेले होते. यावर्षीही करमाळा तालुक्यात अद्यापही सर्वसमान पाऊस झालेला नाही. विशेषतः दहिगाव उपसा सिंचन योजनेच्या टेल भागात अजूनही पावसाची प्रतीक्षा आहे. याविषयी अधिक माहिती देताना ते म्हणाले की, उजनी धरण पाणलोट क्षेत्रांमध्ये सातत्याने संततधार पाऊस सुरू असून उजनी धरणाच्या पाणी पातळीत झपाट्याने वाढ होत आह.त्यामुळे दहिगाव उपसा सिंचन योजना तसेच बोगदा यांनाही पाण्याचे आवर्तन उद्यापासून सुरू होणार असून त्याचा फायदा खरीप हंगामातील पिकांसाठी तसेच बारमाही पिकांसाठी शेतकऱ्यांना होणार आहे.



### केळी लागवड वाढणार

नव्यानेच करमाळा तालुक्याच्या दहिगाव उपसा सिंचन योजनेच्या कॅनॉल पट्ट्यात केळीची लागवड मोठ्या प्रमाणावर होत होती ,परंतु गेल्या वर्षी दुष्काळाचा फटका या भागांनाही बसला त्यामुळे केळी बागांची लागवड होऊ शकली नव्हती. यावर्षी मात्र ऑगस्टमध्येच उजनी धरण १०० टक्के कडे वाटचाल करत असल्यामुळे पाण्याची चिंता मिटलेली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा या पट्ट्यामध्ये केळी लागवड मोठ्या प्रमाणावर होणार आहे.

## नीरा नदीला पूर; सतर्कतेचा इशारा

### वीर, भाटघर धरणातून सोडले पाणी; नदीकाठावर बघ्यांची गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ४ ऑगस्ट-**

वीर, भाडगर धरणातून नीरा नदीत सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे नदीला पूर आला असून नीरा नदी दुथडी भरून वाहत आहे. पुराचे पाणी पाहण्यासाठी गावातील नागरिकांनी अकलाई घाट, महादेव घाट व किल्ला परिसरात गर्दी केली असून प्रशासनाकडून सतर्कतेचे सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र माळशिरस तालुक्यात अद्यापही मोठा पाऊस झाला नसल्याने तालुक्यातील ओढे, नाले, वगळी अध्यापही कोरड्याच आहेत.

माळशिरस तालुका व परिसरात जूनच्या सुरुवातीस पाऊस झाला. या पावसावर शेतकऱ्यांनी धाडस करून मका, सोयाबीन, तूर, उडीद, मुगाची पेरणी केली आहे. या पिकांना अधूनमधून येणाऱ्या हलक्या पावसाच्या सरीने जीवदान मिळाले आहे. पिके जोमात आहेत. थोड्याबहुत प्रमाणात अडसाली उसाच्या लागवडीही सुरू आहेत. परंतु विहिरींना, बोरवेलला अद्यापही पाणी वाढलेले नाही. अद्यापही काही ठिकाणी टँकरने पाणी घ्यावे लागत आहे. कालव्यातून पाणी सोडण्यात आले आहे. तसेच काही पाझर तलावातही पाणी सोडण्यात आल्याचे समजत. सध्या माळशिरस तालुक्याची स्थिती अशी आहे सकाळी गच्च आभाळ येते, आता थोड्या वेळात पाऊस येईल असे वाटते. परंतु दुपारी वारा सुटतो आणि आभाळ निघून जाते. रात्री चक्क चांदणे पडतात. त्यामुळे पावसाची कोणतीही आशा राहत नाही.



### शेतकऱ्यांना दमदार पावसाची प्रतिक्षा

मधूनअधून येणाऱ्या हलक्या सरीवर शेतामध्ये व बांधावर गवताची मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. त्यामुळे जनावरांच्या चाऱ्याचा थोडाबहुत प्रश्न मिटलेला दिसत आहे. मात्र कोणत्याही परिस्थितीत मोठ्या जोरदार पावसाची प्रतीक्षा माळशिरस तालुक्यातील शेतकऱ्यांना लागून राहिली आहे.

## सासुरेच्या म्हाकांळेश्वर मंदिरात उज्जैनचा अधिवास

### श्रावण महिन्यात दर्शनासाठी भाविकांची गर्दी; नागझरी नदीच्या तिरावर वसलेले स्थान

**तभा वृत्तसेवा । रामदास पवार**
**वैराग, दि. ४ ऑगस्ट-**

ऐतिहासिक आणि पौराणिक महत्त्व लाभलेल्या सासुरे येथील श्री म्हाकांळेश्वराचे श्रावण महिन्यात दर्शन घेणे पुण्यकर्म समजले जाते. त्यामुळे संपूर्ण श्रावण महिना भाविकांची मांदियाळी या मंदिरात असते. श्री क्षेत्र उज्जैनचा अधिवास लाभल्याने श्रावणी सोमवारचे औचित्य साधून अनेक भाविक विशेषतः दर्शनासाठी सासुरे (ता. बार्शी) गावी जमतात.

दक्षिण काशी म्हणून ओळखले जाणारे सासुरे गाव नागझरी नदीच्या तिरावर वसले आहे. श्री म्हाकांळेश्वराचे जागृत देवस्थान असलेले सासुरे हे शिवभक्तांचे श्रद्धास्थान बनले आहे. श्रावण महिन्यात श्री म्हाकांळेश्वराचे दर्शन घेणे पुण्यवत असल्याने भाविक गर्दी करतात. मध्यप्रदेशातील उज्जैन हे श्री म्हाकांळेश्वराचे मूळ स्थान आहे. मात्र सासुरेच्या दयाळराजे आवारे या अवतारी पुरूषामुळे उज्जैनच्या दैवत्वाला सासुरेला यावे लागले. दयाळराजेंच्या सात पिढ्यांनी पायी चालत जावून उज्जैनच्या वाऱ्या केल्या. या भक्तीमागे कोणताही स्वार्थ दडला नसल्याने स्वतः श्री म्हाकांळेश्वर सासुरे गावामध्ये प्रकटले. तेव्हापासून आजतागायत अविरहित श्री म्हाकांळेश्वराची सेवा चालू आहे. संपूर्ण मंदिर हेमाडपंथी असून ५६ फूट उंच शिखर आहे. या शिखरावर विविध शिल्पकला कोरण्यात आल्या आहेत. शिवलिंग स्वयंभू असून शेषशाही नागनाथ पाच फूट उंचीचे असून फणा काढलेला आहे. मंदिरात १२ जोतिर्लिंग असून २९ शिवलिंगही आहेत. इथेच श्री म्हाकांळेश्वराचे परमभक्त दयाळराजे यांची संजीवन समाधी आहे. कार्तिक पौर्णिमेला पाच दिवस मोठी यात्रा भरते. मात्र श्रावणात महिनाभर भाविक मोठी गर्दी करतात व श्री म्हाकांळेश्वरास जलाभिषेक, रुद्राभिषेक, दुग्धाभिषेक आदी अभिषेक घालतात. सास ऋषींनी वसवलेल्या या नगरीत पांडव अज्ञातवासात असताना वास्तव्य करून पुढील प्रवासास निघून गेले.

### सहा ओढे, नद्याचा संगम

नागझरी नदीला सासुरे येथे सहा ओढे, नद्या रूपाने मिळतात. त्यामुळे विविध ठिकाणी निर्माण झालेल्या संगमांना भाविक भेटी देतात. अशा तीर्थक्षेत्राच्या दर्शनाने मनोरथ पूर्ण होते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. त्यामुळे श्रावण महिन्यात भाविक आवर्जून सासुरे गावी श्री म्हाकांळेश्वराच्या दर्शनासाठी जातात.



CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ग्रीन क्लब, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने औषधी वनस्पतीचे वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ ऑगस्ट -**

येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त महाविद्यालयातील ग्रीन क्लब आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने औषधी वनस्पतीचे वृक्षारोपण करण्यात आले.




या प्रसंगी प्राचार्य प्रा.डॉ.प्रशांत चौधरी, महाविद्यालयातील माजी कर्मचारी रवींद्र सरवदे, ग्रीन क्लब मास्टर ट्रेनर, ग्रीन क्लब धाराशिव जिल्हा नोडल अधिकारी व ग्रीन क्लब फॅकल्टी कोऑर्डिनेटर प्रा.डॉ.विनोदकुमार वायचळ, ग्रीन क्लब शिक्षक प्रतिनिधी प्रा.अभय शिंदे, प्रा. अमोल हिंगमिरे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रशांत गुरव, ग्रंथपाल सचिन महाजन, ग्रीन क्लब यूथ व्हाईस प्रेसिडेंट प्रगती माळी, ग्रीन क्लब कॅम्पेन कोऑर्डिनेटर आरती इंगळे, ग्रीन क्लब डॉक्युमेंटेशन कोऑर्डिनेटर बीबी हाजरा पटेल, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...




### अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांचे कार्य प्रेरणादायी: प्रा.डॉ.रसाळ

**धाराशिव, दि.४ ऑगस्ट -**

अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांचे कार्य हे आजच्या तरुणांसाठी प्रेरणादायी असून विद्यार्थ्यांनी यांच्या कार्याची प्रेरणा घेतली पाहिजे, असे मत प्रा. डॉ. सहदेव रसाळ यांनी व्यक्त केले. व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी यानिमित्त घेण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. प्रशांत चौधरी, समर्थ आश्रमशाळा येवतीचे संदीप पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना प्रा.रसाळ यांनी अण्णाभाऊ साठे यांची साहित्यकृती व लोकमान्य टिळक यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. या कार्यक्रमात बोलताना प्राचार्य प्रा.डॉ.प्रशांत चौधरी यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक कार्याविषयी माहिती दिली तसेच आजच्या काळामध्ये यांच्या विचारांची गरज असल्याचे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.संजय जोशी यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रा.बाबासाहेब इंगळे यांना पीएचडी पदवी

**धाराशिव, दि.४ ऑगस्ट -**



धाराशिव तालुक्यातील आंबेवाडी येथील प्रा.बाबासाहेब इंगळे यांनी भौतिकशास्त्र विषयात एचडी पदवी प्राप्त केले आहे प्राध्यापक इंगळे यांनी सिंथेसिस अॅण्ड इन्वेस्टीगेशन ऑफ एनआयसीयुझेड हायइनिशियल परमियाबिलिटी या विषयावर प्रबंध सादर केला होता. प्रा.इंगळे यांनी सोलापूर विद्यापीठातील प्रा. डॉ.एस.एस. सुरवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली ही पूर्ण केली. त्यांना सहाय्यक मार्गदर्शक प्रा.डॉ.आर.बी.सुरवंशी यांनी मार्गदर्शन केले. उस्मानिया विद्यापीठ हैदराबाद येथील प्रा.डॉ.केमधुकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. त्यांच्या या यशाबद्दलसंस्थेचे सचिव डॉ.अफसर शेख, संस्थाध्यक्ष संजय कुलकर्णी, प्राचार्य डॉ.एस.यू.मासुमदार यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारीवृंद, आंबेवाडी ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.



### पोदार जम्बो किड्सची पहिली पोर्टफोलिओ बैठक

**उमरगा, दि.४ ऑगस्ट -**

लोटस पोदार लर्न स्कूल मध्ये पोदार जम्बो किड्स येथे पहिली पोर्टफोलिओ बैठक दि.३ ऑगस्ट रोजी संपन्न झाली. या बैठकीमध्ये पोर्टफोलिओ म्हणजे पालक, पाल्य आणि शिक्षक यांचात मुलांची प्रगती आणि ध्येय यावर चर्चा करण्यात आली. तसेच प्रत्येक मुलांची EYFS पोर्टफोलिओ फाईल पालकांना दाखविण्यात आली. या पोर्टफोलिओ बैठकीमध्ये पालकांनी सक्रियपणे सहभाग घेऊन मौल्यवान अभिप्राय प्रदान केला आणि त्यांच्या मुलांच्या विकासामध्ये खूप रस दाखवला. त्यांच्या पाठिंब्याबद्दल आणि सहकार्या बद्दल शाळेने कृतज्ञ व्यक्त केली. या बैठकीसाठी प्राचार्य श्रीकांत वारुडे, उपप्राचार्य अतुल फावडे व पोदार जम्बो किड्सच्या प्रमुख मंजिरी सूर्यवंशी तसेच त्यांच्या सहशिक्षिका रागिणी जावळे, आश्विनी पाटील, ज्योती काळे, अश्विनी दुधभाते, नीतीप्रिया पांचाळ, रेणुका हिरमुखे, विजया अंबुसे, अनुसया शिंदे, अंजली क्षीरसागर, सरस्वती भालके यांनी पालकांना मार्गदर्शन केले.

### राज ठाकरे आज जिल्हा दौऱ्यावर

**धाराशिव/जळकोट, दि.४ ऑगस्ट -**



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे विधानसभा निवडणुकीच्या संदर्भात धाराशिव जिल्ह्यात निरीक्षकांची टीम पाठवून आढावा घेतला होता. निरीक्षक व स्थानिक पदाधिका-यांसोबत चर्चा, आढावा व मार्गदर्शक करणार आहेत.
दि.५ ऑगस्ट (सोमवार) रोजी ते दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास श्रीक्षेत्र तुळजापूर येथे दर्शन घेण्यासाठी येणार आहेत. त्यानंतर पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन धाराशिवकडे मुक्कामी निघणार आहेत. जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदार संघातील पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन व चर्चा हे ६ ऑगस्ट (मंगळवार) रोजी धाराशिव येथे आयोजित केलेल्या बैठकीत करणार आहेत. पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा उपाध्यक्ष महेश जाधव, जिल्हा सचिव ज्योतिबा येडगे, तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन कुंभार, विधानसभा अध्यक्ष मयूर गाढवे, तालुका सरचिटणीस गणेश पाटील, नळदुर्ग शहराध्यक्ष अलिम शेख, शहर सरचिटणीस प्रमोद कुलकर्णी मनविसे तालुकाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी केले आहे.

# तुळजापूर विधानसभेत महायुतीविरुध्द महाविकासआघाडी?

## आ.राणाजगजितसिंह पाटील यांची मतदारसंघावर पकड घट्ट... इच्छूकांची संख्याही वाढली...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.४ ऑगस्ट -**

महाराष्ट्रात लवकरच विधानसभेची निवडणुक होणार आहे. त्यामुळे सध्या सर्वच राजकीय पक्षांकडुन विधानसभा निवडणुकीची जोरदार तयारी करण्यात येत आहे. तुळजापुर विधानसभा मतदार संघातही विधानसभा निवडणुकीची आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्याकडुन जोरदार तयारी सुरु आहे. यावेळी या मतदार संघात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी लढत होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर ओबीसी नेत्या डॉ. स्नेहा सोनकाटे याही या मतदार संघातुन निवडणुक लढविणार आहे.

लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या मोठ्या यशामुळे आज विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीकडे उमेदवारी मागणाऱ्यांची आज रांग लागली आहे. तुळजापुर विधानसभा मतदार संघातही महाविकास आघाडीकडुन निवडणुक लढविण्यासाठी अनेकजण इच्छुक आहेत. मात्र या मतदार संघात भाजपचे विद्यमान आमदार हेच पुन्हा एकदा महायुतीचे उमेदवार राहणार आहेत त्यामुळे महायुतीचे राणा जगजितसिंह पाटील यांच्या विरोधात महाविकास आघाडीचा उमेदवार कोण राहणार याची उत्सुकता सर्वांनाच लागली आहे. या मतदार संघात यावेळी दुरंगी नाही तर तिरंगी, चौरंगी निवडणुक होण्याची शक्यता आहे. तुळजापुर विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडीकडुन राज्याचे माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अॅड. धीरज पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) अशोक जगदाळे, माजी जि.प.सदस्या सक्षणा सलगर, शिवसेना (ठाकरे गट) मकरंदराजे निंबाळकर यांच्यासह अनेकजण निवडणुक लढविण्यासाठी इच्छुक आहेत. या मतदार संघात भाजकडुन रोहन देशमुख, अॅड.गुंड यांच्यासह कांहीजण इच्छुक असले तरी या मतदार संघात भाजपची उमेदवारी राणा जगजितसिंह पाटील यांनाच मिळणार यात शंका नाही. त्यामुळे महायुतीचे राणा जगजितसिंह पाटील यांच्या विरोधात महाविकास आघाडीचा उमेदवार कोण राहणार? हे पाहणे गरजेचे आहे.

त्याचबरोबर या मतदार संघातुन निवडणुक लढविण्यासाठी ओबीसी नेत्या डॉ.स्नेहा सोनकाटे यांनी सध्या जोरदार तयारी सुरु केली आहे. डॉ.स्नेहा सोनकाटे यांनी संपुर्ण राज्यात ओबीसी समाजाची मोट बांधण्याचा प्रयत्न केला आहे. त्या तुळजापुर विधानसभा मतदार संघातीलच रहिवासी असुन त्यांना ओबीसी समजामध्ये आज मानाचे स्थान आहे. ओबीसी आरक्षण टिकविण्यासाठी त्या अहोरात्र झटत आहेत. तुळजापुर विधानसभा मतदार संघात ओबीसीचे मतदान जवळपास दोन लाखाच्या आसपास आहे त्यामुळे डॉ.स्नेहा सोनकाटे यांची उमेदवारी भल्याभल्याना घाम फोडणारी ठरू शकते. डॉ.स्नेहा सोनकाटे यांनी तुळजापुर विधानसभा मतदार संघात आपला दौरा सुरु केला आहे.

त्याचबरोबर देवराज मित्र मंडळाचे सर्वेसर्वा देवानंद रोचकरी हेही यावेळी विधानसभा निवडणुक पुर्ण ताकदिनीशी लढविणार असल्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे या मतदार संघात यावेळी बहुरंगी लढत होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

येणाऱ्या कांही दिवसात या मतदार संघात मोठया राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीचे तिकीट मिळविण्यासाठी कांहीजण या पक्षातुन त्या पक्षात जाण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर मराठा समाजाला ओबीसीतुन आरक्षण मिळावे यासाठी लढा देणारे मराठा योद्धा म्हणुन पुढे आलेले मनोज जरांगे पाटील यांनीही विधानसभेच्या सर्व जागा लढविण्याचा निर्णय घेतला असल्याने त्यांचा उमेदवार या मतदार संघात कोण असणार हेही पाहणे गरजेचे आहे.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा बालेकिल्ला असणाऱ्या तुळजापुर विधानसभा मतदार संघात राणा जगजितसिंह पाटील यांनी दणदणीत विजय मिळवुन काँग्रेसचा हा बालेकिल्ला उद्ध्वस्त करून टाकला. आणि या मतदार संघावर भाजपचा झेंडा फडकविला. सलग चार टर्म या मतदार संघातुन निवडुन आलेले राज्याचे माजी मंत्री व काँग्रेसचे जेष्ठ नेते मधुकरराव चव्हाण यांचा पराभव करीत राणा जगजितसिंह पाटील यांनी या मतदार संघात इतिहास घडविला. आजही या मतदार संघावर आमदार राणा जगजितसिंह पाटील यांची मोठी पकड आहे. कारण गेल्या पाच वर्षात त्यांनी या मतदार संघात विकासाची कामे केली आहेत.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत तुळजापुर विधानसभा मतदार संघात भाजपचे राणा जगजितसिंह पाटील यांना ९९ हजार ३४,काँग्रेसचे मधुकरराव चव्हाण यांना ७५ हजार ८६५ तर वंचित बहुजन आघाडीचे अशोक जगदाळे यांना ३५ हजार ३८३ इतके मतदान मिळाले होते.वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक जगदाळे यांनी घेतलेल्या मतदानामुळे काँग्रेसचे मधुकरराव चव्हाण यांचा पराभव झाल्याचे दिसुन येत आहे.

## कडुसं मधून समाजातील दांभिकतेवर लिखानाद्वारे आसुड : प्रा.ए.डी.जाधव



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ ऑगस्ट -**

शाहू पाटोळे यांनी लिहिलेल्या कडुसं पुस्तकात भुतकाळातील ज्ञान व वर्तमान काळातील भान या पुस्तकात आहे. जे भोगलय व जे पचवलयं ते या पुस्तकात आहे. त्यामुळेच पाटोळे यांनी समाजातील दांभिकता मोडून काढण्यासाठी लिखाणाद्वारे आसुड ओडले आहेत, असे प्रतिपादन इतिहास तज्ञ प्रा.ए.डी.जाधव यांनी केले आहे.

रविवार दि. ४ ऑगस्ट रोजी घेण्यात आलेल्या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील, अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर येथील प्राचिन भारतीय इतिहास संस्कृती आणि पुरातनशास्त्रचे माजी विभागप्रमुख प्रा.डॉ.माया पाटील, जनसंज्ञापन विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा.डॉ.रविंद्र चिंचोलकर उपस्थित होते. मसप व मिरा प्रकाशन छत्रपती संभाजीनगर यांच्यावतीने घेण्यात आलेल्या कार्यक्रमात पुढे बोलताना पाटोळे यांनी या पुस्तकात समाजातील मुळ गाभा दाखविण्याचा प्रयत्न केला आहे, असे प्रा.जाधव यांनी सांगितले. तर माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील यांनी कडुसं हे पुस्तक बोली भाषेत असून, जगण्यासाठी जो संघर्ष करतो त्या स्वभाव व गुणधर्मातून पुस्तकातील भाषा आहे. आण्णाभाऊ साठे यांची भाषा व शाहू पाटोळे यांची पुस्तकातील भाषा सारखीच आहे. तर प्रा.डॉ.माया पाटील यांनी लेखक शाहू पाटोळे यांनी मनन, चिंतन करत आत्मभान राखत स्पष्टवक्ते पणे लिखान केले आहे. तर प्रा.डॉ.रविंद्र चिंचोलकर यांनी जिथे आम्ही लिहिण्याचे थांबतो, तेथून शाहू पाटोळे यांचे लिखान चालू होते. समाजातील व्यंग शाहू यांनी आपल्या पुस्तकात दाखवून दिले आहे. बाबा आमटे यांची भारत जोडो यात्रा असो किंवा समाजातील दांभिकता असो हे सर्व कडुसंमध्ये पाटोळे यांनी मोठ्या धाडसाने मांडले आहे. त्यामुळेच कडुसं मधून विसंगतीवर बोट ठेवणारे लिखान झाले आहे, असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.अरविंद हंगरगेकर यांनी केले. तर सुत्रसंचालन व आभार दौलत निपाणीकर यांनी मानले. या कार्यक्रमास संरक्षण मंत्रालयाचे जनसंपर्क अधिकारी महेश अय्यगर, मिरा प्रकाशनचे जीवन कुलकर्णी, डॉ.पंकज गांधी, ठाकूर आदीसह पाटोळे यांचा मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होतो.

## उमरगा जिल्हा परिषद हायस्कूल येथे गुणवंतांचा कौतुक सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.४ ऑगस्ट -**

उमरगा येथील जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये दहावीच्या परीक्षेत यशस्वी झालेल्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उमरगा शहरातील अनेक दानशूर व्यक्तीने विद्यार्थ्यांना एकवीस हजार रुपयाची रोख बक्षीसे दिली.

या कार्यक्रमासाठी अध्यक्षा म्हणून शकुंतला मोरे तर प्रमुख पाहुणे शाळेचे माजी विद्यार्थी मंगेश देशमुख, अविनाश काळे, अंबादास जाधव, समिर सुतके, शंकर बिराजदार, प्रदिप भोसले, मुख्याध्यापक पद्माकर मोरे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रशालेतील इयत्ता आठवी वर्गातील पृथ्वीराज वरवटे या विद्यार्थ्यांचे मेंदू मृत झाल्याने निधन झाले. पृथ्वीराजला श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. शाळेतून प्रथम आलेल्या आल्फिया आलुरे या विद्यार्थिनीला ११००० रुपयाचे पारितोषिक देऊन तिचा गौरव करण्यात आला. द्वितीय आलेल्या प्रतिक्षा मोरे ला १००१ रुपये तृतीय आलेल्या नादीया शानेदिवान १५५१ रुपयाचे पारितोषिक देऊन गौरवण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक मुख्याध्यापक पद्माकर मोरे सूत्रसंचालन सरिता उपासे तर आभार शिल्पा चंदनशिवे यांनी मांडले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बाबासाहेब जाधव, धनराज तेलंग, बलभीम चव्हाण, चंद्रशेखर पाटील, सदानंद कुंभार, ममता गायकवाड, सोनाली मुसळे, यांनी परिश्रम घेतले.

### परमेश्वर जाधव यांना पीएचडी प्रदान

**धाराशिव, दि.४ ऑगस्ट -**

पर्यावरण शास्त्र विषयात परमेश्वर अरुण जाधव यांना डेव्हलपमेंट ऑफ इंटिग्रेटेड अँड इको-फ्रेंडली सिस्टिम फॉर रिडक्शन ऑफ पॉप्युलेशन लोड फ्रॉम सीवर सिस्टीम या विषयात डॉ.एम.बी.मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडी प्रदान करण्यात आली. पर्यावरण शास्त्राचे विभाग प्रमुख प्रा.डॉ.एन.एन.बंदेला, तसेच प्रा.डॉ.सतीश पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयात एक हजार झाडांचे वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा**
**नळदूर्ग, दि.४ ऑगस्ट -**

मागील पिढीचा इतिहास नजरेसमोर राहिला तरच भविष्यातील पिढी ही संस्कारक्षम बनेल व देशाच्या जडणघडणीत त्यांचा हातभार लागेल असे मत महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्री तथा बालाघाट शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव चव्हाण यांनी व्यक्त केले. नळदुर्ग येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने महाराष्ट्राचे माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांच्या ९० व्या वाढदिवसाचे औचित्य साधुन एक हजार झाडांचे वृक्षारोपण व अभिष्टचिंतन सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष राम आलुरे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. अभय शहापुरकर, सहसचिव प्रकाशराव चौगुले, सहसचिव शहबाज काजी, सहसचिव लिंबराज कोरेकर, सहसचिव अॅड. प्रदीपराव मंटगे हे उपस्थित होते. या कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांचा सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष राठोड यांनी केला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.सुभाष राठोड यांनी केले. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.अभय शाहपुरकर, संस्थेचे कार्याध्यक्ष राम आलुरे, संस्थेचे सहसचिव तथा माजी नगराध्यक्ष शहबाज काजी, माजी नगरसेवक विनायक अहंकारी, सुभद्राताई मुळे, कल्पना गायकवाड पोलीस उपनिरीक्षक ईश्वर नांगरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमास यशवंतराव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुकुंद गायकवाड, माजी उपप्राचार्य डॉ. रामदास ढोकळे, माजी नगरसेवक बसवराज धरणे, सुधीर हजारे, माजी नगराध्यक्ष दत्तात्रय दासकर, उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.संतोष पवार यांनी केले तर उपस्थितांचे आभार कार्यालयीन अधिक्षक धनंजय पाटील यांनी मानले.

## डॉ.प्रतापसिंह पाटील यांच्या भूम-परंडा-वाशी विधानसभा मतदारसंघाच्या जंबो दौऱ्याला सुरुवात

### भूम-परंडा-वाशीच बोला एकत्रच चला या टॅग लाईन खाली २४८ गावांना देणार भेटी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ ऑगस्ट -**



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे महाराष्ट्र राज्याचे सरचिटणीस डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी विधानसभेचे रणसिंग फुंकले असून भूम परंडा वाशी विधानसभा मतदारसंघातून ते चाचपणी करण्यासाठी 'भूम परंडा वाशीच बोला एकत्र चला' या टॅगलाईन खाली दौऱ्याला सुरुवात केली आहे.

या दौऱ्याची सुरुवात ईट येथून सुरू केली असून निपाणी, लांजेश्वर, आंद्रुड, माळेवाडी, पखरूड, ज्योतिबाचीवाडी, ईराचीवाडी, उमाचीवाडी, मात्रेवाडी, नागेवाडी, वडाचीवाडी पांढरेवाडी, झेंडेवाडी, डोकेवाडी, गिरवली, सोन्नेवाडी,चांदवड, घाटनांदूर, गिरलगाव या गावातील ज्येष्ठ नागरिकांसाठी फिजिओथेरपीचे तपासणी शिबिर घेऊन नागरिकांच्या समस्या देखील त्यांनी जाणून घेतल्या. या तपासणी शिबिरास जवळपास २५०० पेक्षा जास्त लोकांनी लाभ घेतला. या तपासणी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी माजी उपसभापती काकासाहेब चव्हाण, डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा.डॉ.आप्पासाहेब हुंबे, उपसरपंच प्रमोद देशपांडे, मा.सरपंच पती दत्ता अहिरे, गटनेते सयाजीराजे हुंबे, महेश चव्हाण, विनोद वाडकर, ग्रामपंचायत सदस्य गणेश चव्हाण, अण्णासाहेब चव्हाण, अण्णासाहेब चोरमले, श्रीमंत डोके, दत्ता आसलकर, हायेत भाई पठाण, विकास चव्हाण, सोनू चव्हाण, शामराव देशमुख, जयराम डोके, सुनील देवकते, गवळी, धनंजय चव्हाण यांची यावेळी उपस्थिती होती.

राष्ट्रवादीचे डॉ.प्रतापसिंह पाटील हे ४१ दिवस भूम-परंडा-वाशी विधानसभा मतदारसंघाचा दौरा करणार असून २४८ गावांमध्ये ते भेटी देणार आहेत. यामध्ये नागरिकांच्या वेगवेगळ्या समस्या समजावून घेऊन त्या निवारण करण्यासाठी काय करता येईल यासाठी देखील एक सोबत तज्ज्ञ टीम त्यांनी ठेवली आहे. 'मी येतोय आपल्या समस्या ऐकायला आणि त्याचे निवारण करायला' यासारख्या अनेक टॅगलाईन त्यांनी या दौऱ्यात केल्या असून 'जनसमस्या संवाद भेट' असे या दौऱ्याचे नामकरण केले आहे.

## पारडी शाळेत आपत्ती व्यवस्थापनाचे धडे




**वाशी, दि.४ ऑगस्ट -**

वाशी तालुक्यातील जि.प.प्रा. शाळा पारडी येथे शनिवार (दि.३) रोजी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाअंतर्गत विद्यार्थ्यांना एखादी आपत्ती आल्यानंतर घाबरून न जाता आलेल्या आपत्तीचे दुष्परीणाम कमी व्हावेत अगर होऊच नयेत म्हणून आलेली परिस्थिती कशी हातळावी, अचानक आलेल्या आपत्तीचे व्यवस्थापन कसे करावे, याचे पोष्टर्सच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले.

आज विद्यार्थ्यांनी दप्तराविना शाळा या अंर्गत योगायोगाने मिळालेला मजकूर वाचन व लेखन केला. मुलांनी सर्प दंश, वीज पडून होणारी दुर्घटना हे टाळण्यासाठी कोणते उपाय सांगितले आहेत. याचा प्रामुख्याने खूप संवेदनशिलतेने, भावनिक होऊन विचार करून त्याचे समजपूर्वक वाचन व लेखनही केले. त्याचवेळी आपण आपल्या आई बाबांना सांगू मग त्यांना समजेल, अशीही काळजीपोटी चर्चा केलेलीही ऐकण्यास मिळाली. आज मुलांनी खूप जाणीवपूर्वक, काळजीपूर्वक, हळव्या मनाने आपत्तीव्यवस्थापन स्वत: समजून घेतलेले दिसून आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक आत्माराम नागटिळक यांच्यासह उषा डिसले, उर्मिला भोसले-कावळे, बाबुराव माने, बापुराव कात्रे, ज्ञानराज घुले, वैभव सोणवणे यांच्यासह सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# जनतेत संभ्रम निर्माण करण्याचा मविआ खासदार, आमदारांचा राजकीय डाव

## ✻ भूमिगत गटारीचे रखडलेले काम हे त्यांचेच पाप... ✻ शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळूंके यांचा मविआ नेत्यांना प्रतिटोला...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ ऑगस्ट-**

शहरातील भूमिगत गटारीचे काम हे नागरिकांना चिखलातून वाट काढावी लागते, भूमिगत गटारीचे रखडलेले कामम हाविकास आघाडीचे खासदार, आमदार व माजी नगराध्यक्षांचेच पाप आहे. या कामासाठी १५० कोटी रुपयांचा निधी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी तात्काळ मंजूर केला. महिनाभरात या कामाला सुरुवात होईल, हे माहीत असताना काल महाविकास आघाडीचे खासदार, आमदार व माजी नगराध्यक्षांनी पत्रकार परिषद घेऊन जे आरोप केले. दुसरा कुठलाही मुद्दा नसल्यामुळे सातत्याने त्याच त्याच विषयाचे भांडवल करुन जनतेत संभ्रम निर्माण करण्याचा त्यांचा राजकीय डाव असल्याचा प्रतिटोला शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांनी पत्रकार परिषदेत लगावला.



शासकीय विश्रामगृहात रविवारी (दि.४) झालेल्या पत्रकार परिषदेत खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार कैलास पाटील आणि माजी नगराध्यक्ष मकरंद राजेनिंबाळकर यांनी केलेल्या आरोपांचा समाचार घेतला. ते म्हणाले, तुम्ही खासदार म्हणून मतदारसंघातील माता, भगिनींसाठी, बेरोजगारांसाठी काय करणार आहात? हे त्यांनी स्पष्ट करणे अपेक्षित होते. परंतु या विषयावर न बोलताना मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या सरकारवर आरोप करणे, मंत्री, आमदारावर आरोप करत सुटले आहेत. निवडणूकीत पैशांचे वाटप केले असा ते करतात,

भुयारी गटार योजना जेव्हा त्यांनी आणली त्यांनीच योजनेचा सत्यानाश केला. आज सगळीकडे रस्त्यांवर चिखल आहे. तरीही आम्ही योजनेसाठी निधी आणला आणि त्याला पालकमंत्री महोदय आणि आमदार राणाजगजितसिंह पाटील स्थगिती आणली म्हणून ते सांगतात. परंतु त्यांनी नेमका कोणता निधी आणला, हेही सांगावे असे आव्हान जिल्हाप्रमुख साळुंके यांनी आ.कैलास पाटील व माजी नगराध्यक्ष मकरंद राजेनिंबाळकर यांना दिले.

खरेतर या योजनेची शहराला गरज होती काय? असा सवालही त्यांनी केला. पाणी पुरवठ्याच्या प्रश्नावरही ते बोलले, मात्र भुयारी गटार योजनेवर झालेला खर्च पाणीपुरवठ्यासाठी केला असता तर पाण्याचा प्रश्न सुटला नसता काय? योजना कुणी आणली आणि त्या योजनेचे लाभार्थी कोण आहेत?

स्वतःच्या घराजवळ आमदार, माजी नगराध्यक्षांनी मोठ्या पाईपलाईन गटारीसाठी टाकल्या, परंतु इतर ठिकाणी किती साईजच्या पाईपलाईन टाकल्या, हेही पत्रकार परिषदेत सांगितले असते तर बरे झाले असते. या योजनेमुळे जनतेचा नाही तर त्यांचाच विकास झालेला असल्याचे श्री.साळुंके म्हणाले.

रस्त्यावरील चिखलामुळे जनतेला होणारा त्रास कमी होण्यासाठी पालकमंत्री महोदयांनी निधी उपलब्ध करुन दिला, परंतु रस्त्याच्या कामाला पण भुयारी गटार योजनेची अडचण येत आहे. विशेष म्हणजे भुयारी गटार योजनेच्या २५ टक्के निधीचा भार नगर परिषदेवर पडत आहे, हा निधी विशेष वैशिष्ट्य पूर्ण योजना मधून का आणला नाही? असा सवालही त्यांनी केला.

आमदार कैलास पाटलांनी १०८ कामांना स्थगिती दिल्याचा आरोप केला आहे. परंतु या कामांच्या निविदा प्रक्रियेवर आक्षेप नोंदवल्यामुळे जिल्हाधिकार्यांनी ही कामे नगर परिषदेला समांतर सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग केली. या १०८ कामांपैकी ८८ कामे प्रगती पथावर आहेत १० कामे हॉटमिक्स असल्यामुळे पावसाळ्यात करता येत नाहीत म्हणून थांबलेली असून उर्वरित कामे प्रगतिपथावर आहेत.

धाराशिव जिल्ह्यातील वर्ग १ च्या जमिनी वर्ग २ मध्ये घेतल्यानंतर अन्यायग्रस्त शेतकरी व प्लॉटधारकांनी धनंजय शिंगाडे यांच्या नेतृत्त्वात शेतकरी बचाव कृती समिती स्थापन केली. परंतु महाविकास आघाडीच्या खासदार, आमदारांनी यासाठी पाठपुरावा का केला नाही? उलट पालकमंत्री महोदय आणि आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी सकारात्मक भूमिका घेऊन महसूल मंत्री विखे पाटील यांच्याकडे बैठक लावून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठक अभ्यास समिती स्थापन करण्यासाठी पाठपुरावा केला.

फक्त महायुती सरकारवर आरोप करण्याचा उद्योग ही मंडळी करत आहेत. महाविकास आघाडी सरकारने उद्यानासाठी दिलेला निधी सध्या अस्तित्वात असलेल्या ठिकाणीच खर्च करण्याचा घाट नगराध्यक्षांनी घातला. त्यामुळे आम्ही हा निधी इतरत्र उद्यान निर्मितीसाठी वापरण्याकरिता पाठपुरावा केला.

परवाच पालकमंत्री, आ.राणाजगजितसिंह यांनी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासाठी शासकीय दुध डेअरीची १ एकर जागा उपलब्ध करुन १ कोटीचा निधी उपलब्ध करुन देण्याचा शासननिर्णय जारी केला.

मातंग समाजाने या निर्णयाचे स्वागत करुन महायुतीच्या पदाधिकार्यांचा सत्कार केला. महाविकास आघाडीच्या खासदार, आमदारांना ही बाब सलत असल्यामुळे याचेही राजकारण करण्याचा प्रयत्न ते करत आहेत. त्यामुळे यापुढे तरी त्याच त्याच विषयावर पुन्हा पुन्हा बोलून जनतेची दिशाभूल करण्याचे काम महाविकास आघाडीच्या पदाधिकार्यांनी थांबवावे असा सल्लाही जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांनी दिला.

पत्रकार परिषदेस शिवउद्योग सहकारचे जिल्हाध्यक्ष सुनील शेरखाने, मागासवर्गीय सेलचे जिल्हाध्यक्ष अमित बनसोडे, शिवसेना शहर संघटक रणजीत चौधरी, उपशहर प्रमुख रजनीकांत माळाळे, युवासेना शहरप्रमुख सागर कदम, अमर माळी, सौरभ निंबाळकर, सिद्धू सावंत उपस्थित होते.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...




### डॉ.घुले यांचा मतदारसंघात ग्रामदैवत दर्शन दौरा

**भूम/परंडा, दि.४ ऑगस्ट -**

भूम-परंडा-वाशी तालुक्यात आरोग्य दूत अशी आपली ओळख निर्माण करणारे डॉ.राहुल घुले यांनी तिन्ही तालुक्यात ग्राम दैवत दर्शन दौरा आयोजित केला आहे. तशी माहिती त्यांनी रविवार दि.४ रोजी शासकीय विश्राम गृहात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. डॉ राहुल घुले यांनी कमल भिमराव घुले सामाजिक संस्थेच्या माध्यमातून भूम, परंडा, वाशी तालुक्यातील शेकडो गरजू रुग्णांना मदतीचा हात दिला आहे. शेकडो रुग्णांच्या शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन डी.पी.दुरुस्तीची मोफत वाहतूक तसेच काठी वाटपाच्या माध्यमातून ते तिन्ही तालुक्यातील जेष्ठ नागरिकांपर्यंत पोहचले आहेत. तालुक्यातील अनेक गावांत आरोग्य शिबीर, परंडा तालुक्यात महाराष्ट्रातील पहिले खतना शिबीर यामुळे ते तळागाळापर्यंत पोहचले आहेत. प्रत्यक्ष प्रत्येक गावात जाऊन लोकांमध्ये मिसळण्याच्या उद्देशाने या ग्राम दैवत दर्शन दौऱ्याचे आयोजन केले असल्याचे डॉ घुले यांनी सांगितले. या दौऱ्यात ते तिन्ही तालुक्यातील प्रत्येक गावातील ग्रामदैवताचे दर्शन घेणार आहेत. त्यांच्या या दौऱ्यात ते गरजू रुग्णांना तसेच शेतकऱ्यांना भेटणार असल्याचे त्यांनी बोलताना सांगितले. यावेळी आरोग्यदूत डॉ.राहुल घुले मित्रपरिवाराचे सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते.

### विक्रांत देटे-पाटील उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला रवाना होणार

**धाराशिव, दि.४ ऑगस्ट -**



धाराशिव तालुक्यातील रुई ढोकी येथील विक्रांत रवींद्र देटे पाटील हा विद्यार्थी दि.७ ऑगस्ट रोजी पुढील शिक्षणासाठी अमेरिकेला रवाना होणार आहे. विक्रांत देठे पाटील यांचे प्राथमिक शिक्षण धाराशिव येथील तेरणा पब्लिक स्कूल येथे तर शालेय शिक्षण पुणे येथील के लाईन मेमोरियल स्कूल ऑफ पुणे येथे झाले. पुढे पुणे येथील जेएसपीएम विद्यापीठातून आयटी इंजिनिअरिंग झाल्यानंतर त्यापुढील शिक्षण अमेरिकेतील नामांकित नॉर्थ कॅरोलीना स्टेट युनिव्हर्सिटीतुन तो एमएसचे शिक्षण पूर्ण करणार आहे. तसेच शिक्षण पूर्ण करत असतानाच अमेरिकेतील आयटी क्षेत्रातील एका नामांकित कंपनीत तो आयटी इंजिनियर म्हणून कार्यरत राहणार आहे. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन तो पुढील शिक्षणासाठी अमेरिकेत जाणार असल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. या भरघोस यशाचे श्रेय आई ॲड.उल्का देटे-पाटील हिला जाते असे विक्रांत याने सांगितले.



### माजी मंत्री आ.मधुकरराव चव्हाण यांचा भव्य सत्कार

**तुळजापूर, दि.४ ऑगस्ट -**

माजीमंत्री माजी आमदार मधुकर चव्हाण यांच्या ९० व्या वाढदिवसा निमित्ताने श्रीनाथ मंगल कार्यालयात भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर काँग्रेस नेत्या डॉ.स्मिता शहापुरकर, अशोक मगर, माधवराव कुतवळ, भागवत धस, मुकुंद डोंगरे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सत्कारास उत्तर देताना मधुकरराव चव्हाण पुढे म्हणाले की, आजपर्यत जन्मदिन साजरा केला नाही या दिवशी मी देवधर्म देवदर्शनाथ तिर्थक्षेत्री जातो. पण यंदा कार्यकत्यांचा आग्रह नाकारु शकलो नाही म्हणून प्रथमच वाढदिवस प्रमाणात साजरा करतोय, असेच तुमचे प्रेम माझ्यावर राहु द्या, माझे कायम तुमचावर राहिल. तुमच्या शुभेछेने मला काम करण्याची उर्जा ताकद मिळाली आहे. जिल्ह्यात काँग्रेस पक्ष वाढवण्याचे काम इमान इतबारे केले तसेच शहरवासियांचे कामे करताना आधी तुळजापूर करांना विचारायाचे मगच मगच विकास काम करायाचे अनेक कार्यकते निर्माण केले. मी तालुक्यातील जनतेच्या मुलभुत समस्या सोडविण्यासाठी प्रथम प्राधान्य दिले. सर्वजातीधर्माला मी आपला वाटतो कारण जात न बघता मानवता बघुन काम केले. मला मोठे करण्यात सर्वांचा सहभाग आहे.

### लाडकी बहीण योजना समिती सदस्यपदी सुरेश कवडे यांची निवड

**वाशी, दि.४ ऑगस्ट -**



लाडकी बहीण योजना परंडा विधानसभा समिती सदस्य भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष तथा वाशी येथील उपनगराध्यक्ष सुरेश बप्पा कवडे यांची निवड झाली. त्याबद्दल वाशी तालुक्यातून त्यांचे अभिनंदन होत आहे. त्यांच्या निवडणुकीमुळे परंडा-भूम-वाशी मतदार संघातील लाडक्या बहिणीचे शंभर टक्के काम होणार असल्याने नागरिकांमधून आनंद व्यक्त केला जात आहे. कवडे यांची निवड झाल्याबद्दल वाशी तालुका भाजपा अध्यक्ष राजगुरू कुकडे महाराज, धनंजय कुलकर्णी, महादेव आप्पा आखाडे, कुलकर्णी प्रशांत, तात्या लोकरे, महिला आघाडी अध्यक्ष त्रिशाला देशमुख तसेच मित्र मंडळ पत्रकार बांधव यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

### अध्यक्षपदी मुगळे तर उपाध्यक्ष गंगथडे

**उमरगा, दि.४ ऑगस्ट -**



तालुक्यातील मुळज येथील जिल्हा परिषद प्राशाळेत शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी संजय मुगळे तर उपाध्यक्षपदी अमोल गंगथडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली शालेय व्यवस्थापन समिती निवडीसाठी सरपंच शिवकन्या महेश शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. संजय मुगळे यांचे अध्यक्ष तर अमोल गंगथडे यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. तर विश्वास बिराजदार, किरण कांबळे, अरुण चव्हाण, श्रीकांत माळी, गणेश कुलकर्णी, दत्ता राजपूत, अंजली शिंदे, उषा गोसावी, वेंकट दंड, घुले राजपूत, मिनाक्षी पांचाळ यांची ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवड करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक जाधवसर, गोपाळ शिंदे, पप्पु दुधभाते, मनोज यादव यांच्या सह पालक, शिक्षक गावातील मान्यवर उपस्थित होते. या निवडीनंतर बाबा पाटील यांनी अध्यक्ष उपाध्यक्ष यांचा सत्कार केला.

# नागरिकांना मूलभूत सोयी-सुविधा पुरविणे लोकप्रतिनिधींचे कर्तव्य : आ.चौगुले

## दाळिंब ग्रामस्थांच्या वतीने आ.ज्ञानराज चौगुले यांचा भव्य सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.४ ऑगस्ट-**



दाळींब ता.उमरगा येथे विशेषतः मागील ०२ वर्षाच्या कार्यकाळात विविध मूलभूत सोयीसुविधा पुरविण्याच्या अनुषंगाने आमदार ज्ञानराज चौगुले यांनी भरघोस असा निधी मंजूर केला आहे. त्याबद्दल ग्रामपंचायत दाळिंब व बाबा जाफरी फाउंडेशन च्या वतीने आमदार ज्ञानराज चौगुले यांच्या भव्य अशा सत्काराचे समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

या सत्कारास उत्तर देताना आमदार चौगुले यांनी नागरिकांना मूलभूत सोयीसुविधा पुरविणे हे लोकप्रतिनिधीचे आद्यकर्तव्य असून यासाठी निधी उपलब्ध करून देणे व त्याच्या माध्यमातून विविध विकास कामे करणे ही अविरत चालणारी गोष्ट आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील नागरिकांच्या मूलभूत समस्या जाणणारा मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्याला मिळाल्याने मला प्रत्येक गावातील वेगवेगळ्या जाती धर्मांच्या उद्धारासाठी व मूलभूत सुविधा सोडविण्यासाठी भरघोस असा निधी मंजूर करून घेता आला असे यावेळी व्यक्त केले. त्यानंतर गावातील अनेक नागरिकांनी केलेल्या विकास कामांबद्दल आमदार ज्ञानराज चौगुले यांचा सत्कार केला व आभार व्यक्त करत पुढील काळात आमदार चौगुले यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असल्याचे सांगितले. तसेच शाळेची इमारत बांधणे, कब्रस्थान सरंक्षक भिंतच्या उर्वरीत कामांसाठी निधी मिळणे, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर समाज मंदिर बांधणे, बौद्ध विहार बांधणे, शेतरस्ते करणे, नविन व अतिरीक्त रोहित्र बसविणे, मातंग समाज स्मशानभूमी करणे, धनगर समाज मंदिर बांधणे, दिव्यांग बांधवांना घरकुलाचा लाभ मिळवुन देणे अशा अनेक मागण्यांचे निवेदन दिले. यावेळी समाजसेवक बाबा जाफरी, तालुकाप्रमुख बळीराम सुरवसे, शेतकरी सेना तालुकाप्रमुख शाहूराज सावंत, सरपंच रंजनाताई सातपुते, पोलीस पाटील अश्विनीताई वाले, साहेबलाल (चाचा) कमाल, बाबुराव टिकंबरे, एकबाल पटेल, खय्युम चाकुरे, नदीम मुगळे, हनुमंत शिंदे, धीरज इंगळे, राजू कारभारी, प्रदीप मदने, अमर देशटवार, लक्ष्मीकांत कुलकर्णी, सर्व ग्रामपंचायत सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तिर्थक्षेत्र तुळजापूरातील कुठल्याही घटकावर अन्याय होणार नाही : जिल्हाधिकारी डॉ.ओम्बासे

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ ऑगस्ट-**



तिर्थक्षेत्र तुळजापूरात विकास कामे करताना विस्थापीतांचे प्रमाण कमी असेल आपण केलेल्या सुचना सल्लागार यांना पाठवल्या असुन या बाबतीत लवकरच अहवाल येईल, असे मत श्रीतुळजाभवानी मंदीरसंस्थान अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंम्बासे यांनी व्यक्त केले.

तुळजापूर विकास आराखडय़ाबाबत तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष जिल्हाधिकारी सचिन ओंम्बासे यांच्याशी चर्चा करण्यासाठी खा.ओमराजे निंबाळकर यांनी जिल्हाधिकारी निवास येथे बैठक नियोजित केले होती. या बैठकीत तिन्ही पुजारी मंडळाच्या अध्यक्षांनी मते मांडले.

खा.ओमराजे निंबाळकर यांनी यावेळी तुळजापूर शहराचा विकास करताना शहर वासियांचे मत विचारत घ्यावा विस्थापीत करुन शहरवासीयांचे नुकसान करु नका कारण मंदीरावर शसरवासायीयांचि उपजिविका अवलंबून आहे, यांचा विकास आराखड्यात गांभीर्य पुर्वक विचार करा, तिर्थक्षेत्र तुळजापूरचा विकास करताना सर्व भागात विकास करा विकास करताना कुण्याही भागावर अन्याय होवू देवु नका, तुळजापूर शहरामध्ये प्रत्येक भागामध्ये समान विकास होणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले शेवटी जिल्हाधिकारी यांनी तिर्थक्षेत्र तुळजापूर शहरातील कुठल्याही घटकावर अन्याय होणार नाही, याची ग्वाही दिली.

या बैठकीला धिरज पाटील, विपीन शिंदे, अनंत कोंडो, रूशीकेश मगर, अमोल कुतवळ, अमर परमेश्वर, श्याम पवार, सुधीर परमेश्वर, प्रविण कदम, राहुल खपले, भाऊ भांजी, सचिन अमृतराव, लालासाहेब मगर, राजाभाऊ चोपदार, आण्णासाहेब क्षीरसागर, नवनाथ जगताप, बल्लू कदम, अमोल जाधव, मुन्ना धुमाळ, श्रीराम अपसिंगेकर व इतर उपस्थित होते.



# कोळेवाडीचा शेतकरी पुत्र बनला पीएसआय

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.४ ऑगस्ट-**

तालुक्यातील कोळेवाडी गावचे अल्पभूधारक शेतकरी मच्छिंद्र पालमपल्ले यांचा मुलगा मोहन पालमपल्ले पोलीस उपनिरीक्षक पीएसआय बनला आहे.या यशाबद्दल त्यांचा सत्कार प्राचार्य डॉ.श्रीकांत गायकवाड, विठ्ठल चिकुंद्रे, सिद्धेश्वर माने, मच्छिंद्र पालमपल्ले, जीवन पालमपल्ले यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये करण्यात आला.

त्यांचे प्राथमिक शिक्षण कोळेवाडी येथील छोट्याशा गावात झाले.त्यानंतर माध्यमिक शिक्षण रामलिंग मुदगड येथे तर महाविद्यालयीन शिक्षण लातूर येथे झाले.

त्यांचा हा यशाचा प्रवास दीपस्तंभासारखा दिशा देणारा ठरतो. अद्यावत शैक्षणिक सुविधा, साधने नाहीत, योग्य मार्गदर्शनाचा अभाव आहे. आर्थिक संपन्नता नाही म्हणून हतबल न होता प्रतिकूल परिस्थितीवर जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर मात करता येऊ शकते हे त्यांनी आपल्या यशाद्वारे सिद्ध करून दाखवले आहे.

### राष्ट्रवादीकडून विधानसभेची तयारी

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.४ ऑगस्ट-**

तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे जीवनराव गोरे इच्छुक आहेत. त्यांनी ग्रामीण भागाचा दौरा सुरू केला असून, या दौऱ्याच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हा युवकाध्यक्ष आदित्य गोरे यांनी सिंदगाव येथे भेट देऊन विधानसभेची जोरदार तयारी करण्याच्या सूचना दिल्या.

याप्रसंगी ग्रा.पं.सदस्य गंगाधर पेठसांगवे, माजी ग्रा.पं.सदस्य प्रताप पाटील, दानाप्पा बणजगोळे, मल्लिनाथ कुलकर्णी, विजय भोसले, विजय पेठसांगवे, रवी शिंदे, संतोष चव्हाण, अशोक कुलकर्णी, प्रेमनाथ सोनकाटे, लक्ष्मण इंगोले, नागेश सुरवसे, अशोक बणजगोळे, सिद्धांना करंडे, साधू इंगळे, सोमनाथ रेड्डी, रवी रेड्डी, सिद्धू कुलकर्णी, परू पेठसांगवे, खंडू चव्हाण, शरणू कामगुंडे, मल्लू स्वामी, लाडूशा शिंदे, बाळू स्वामी आदि कार्यकर्ते उपस्थित होते.

# ड्रग्ज सप्लायरला सहज सोडणार नाही : उपविभागीय अधिकारी डॉ.निलेश देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ ऑगस्ट-**



तिर्थक्षेत्र तुळजापूर शहरात ड्रग्ज येत असेल तर घेणाऱ्या ऐवजी सप्लायर पकडुन त्याचावर कारवाई करणारसप्लायरला सोडणार नाही असे प्रतिपादन उपविभीगीय अधिकारी डॉ.निलेश देशमुख यांनी पत्रकारांशी संवाद साधताना दिली.

येथील पोलिस ठाण्यात पत्रकारांशी संवाद साधताना देशमुख म्हणाले की , ड्रग्ज प्राशन करणाऱ्या वर कारवाई करण्यासाठी मर्यादा आहे ऐक तर त्याच्या कडे कमी प्रमाणात असते पण ड्रग्ज प्राशन करणाऱ्या पेक्षा सप्लाय करणाऱ्यावर कारवाई होणे गरजे आहे ते आम्ही निश्चित करणार आहे.

तिर्थक्षेत्र तुळजापूर शहरात वाढत्या चोऱ्यांच्या घटने बाबतीत बोलताना म्हणाले कि पोलिस रात्री पेट्रोलिंग करीत असुन सायरन सिस्टीम सुरु केली आहे.

शहरात सध्या सर्वत्र ५७ सीसीटीव्ही कार्यरत असुन उर्वरीत सीसीटीव्ही दुरुस्ती पत्र नगर परिषदेला दिले आहे. तिर्थक्षत्री वेश्याव्यवसाय बाबतीत कारवाई करण्याचे आश्वासन दिले. तसेच शहरात बेभाव पैसे रिक्षावाले घेतात. अनाधिकृत रिक्षा बाबतीत बोलतान म्हणाले की, शहरातील सर्व रिक्षांची तपासणी करावी लागेल, या बाबतीत आरटीओला कळवु असे यावेळी म्हणाले. जेष्ठ नागरिकांचा मोबाईल चोरी पार्श्वभूमिवर बोलताना म्हणाले की, बंदोबस्त वाढवावा लागेल व तक्रार आली तर निश्चित कारवाई केली जाईल, अशी ग्वाही यावेळी दिली.

# अवयवदान जनजागृती कार्यक्रम उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ ऑगस्ट-**




येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,रोटरी क्लब उस्मानाबाद तसेच इंडियन मेडिकल असोसिएशन धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे राष्ट्रीय अवयवदान दिनाचे औचित्य साधुन अवयवदानाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

सदरील कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबसे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. शिल्पा दोमकुंडवर, रोटरी क्लब उस्मानाबादचे अध्यक्ष डॉ.श्रीराम जिंतुरकर व सचिव आनंद कुलकर्णी, डॉ. सचिन देशमुख, डॉ.तानाजी लाकाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

सदरील कार्यक्रमामध्ये पथनाट्याद्वारे अवयवदानाची जनजागृतीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला अवयवदाना निमित्त सर्वांनी शपथ घेऊन अवयवदानाचा संकल्प केला. तसेच वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी यांनी काव्यवाचन /स्लोगन/वक्तृत्व / रांगोळी इत्यादी स्वरुपाच्या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्याचे प्रशिस्तिपत्राचे वाटप जिल्हाधिकारी सचिन ओंबसे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच कोळी यांच्या मुलाचे अवयवदान केल्याबद्दल त्यांचा सत्कार जिल्हाधिकारी धाराशिव यांच्या हस्ते करण्यात आला. सदरील कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ.शिल्पा दोमकुंडवार यांनी केले. त्यानंतर अवयवदान जनजागृती रॅलीला जिल्हाधिकारी धाराशिव यांनी हिरवा झेंडा दाखवून शहरातून रॅलीचे आयोजन करण्यात आले.

# नवोदय विद्यालयात त्वचारोग तपासणी शिबीर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ ऑगस्ट-**



पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयात रविवार दि.४ ऑगस्ट रोजी त्वचारोग तपासणी शिबिर संपन्न झाले. या शिबिराचे उद्घाटन विद्यालयाचे प्राचार्य के.वाय.इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी विद्यालयातील वरिष्ठ अध्यापक एस.डी.खोब्रागडे, एस.एस.माने, हरी जाधव, आरोग्य परिचारिका सुषमा येलकर यांची उपस्थिती होती. या शिबिरामध्ये जवळपास ५५ विद्यार्थ्यांची त्वचेची तपासणी करण्यात आली. ही तपासणी तुळजापूर सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल, तुळजापूर येथील नामवंत त्वचारोग तज्ञ डॉ.मीनल सुजितकुमार मगर यांनी केली.

या त्वचेच्या रोगासंबंधी मार्गदर्शन करताना म्हणाल्या की, सर्वांनी सकस आहार, जेवणामध्ये हिरव्या पालेभाज्या, फळे, भरपूर व्यायाम, स्वच्छ कपडे, विश्रांती, भरपूर झोप, अंग ओले न ठेवणे, भरपूर पाणी पिण्यासाठी सांगून आंघोळ करताना केमिकल युक्त शाम्पू व साबण न वापरण्याचे सांगितले. या आरोग्य तपासणीसाठी विद्यालयातील आरोग्य परिचारिका सुषमा येलकर यांनी विशेष पुढाकार घेतला होता.

# अक्षरओळख नसलेल्या पालकांचा मुलगा झाला पीएसआय

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, ४ ऑगस्ट -**

आई-वडील दोघेही निरक्षर, कोरडवाहू दोन एकर शेती त्यामुळे मजुरी हाच मुख्य व्यवसाय; पण मुले शिकली पाहिजेत, अशी पालकांची जिद्द, आश्रम शाळेमध्ये शालेय शिक्षण पुर्ण करुन , डी. एड. चे शिक्षण पूर्ण झाल्यावर 'टीईटी'च्या तयारीसाठी लातूरला आलेल्या विठ्ठल राठोड यांना इथे स्पर्धा परीक्षेची गोडी निर्माण झाली. त्यात चारवेळा अपयश आल्यावरही जिद्द सोडली नाही. संयम ठेवून अभ्यासात सातत्य ठेवल्याने पाचव्या प्रयत्नात तांड्यावरचा हा मुलगा 'पीएसआय' झाला.

सावळी तांडा येथील रहिवासी असलेले विठ्ठल वसंतराव राठोड. आई-वडील मजुरी, शेळ्या सांभाळून घरगाडा चालवितात. दोन मुले, एक मुलगी असे छोटंसं कुटंब, मोठा मुलगा विठ्ठल याचे पूर्ण शिक्षण आश्रमशाळेत झाले. उदगीरच्या आश्रमशाळेत अकरावी, बारावी झाल्यावर डी.एड. केले. शिक्षक व्हायचे म्हणून 'टीईटी'ची तयारी करण्यासाठी ८ वर्षांपूर्वी गावातून लातूरला आलेल्या विठ्ठल राठोड यांना स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण झाली. मग काय 'टीईटी'चा नाद सोडला अन् स्पर्धा

**योग्य मार्गदर्शक, जिद्द, संयम, अभ्यासात सातत्य महत्त्वाचे**

स्पर्धा परीक्षेची तयारी करीत असताना संयम महत्त्वाचा आहे. अपयश आले म्हणून खचून न जाता अभ्यासात सातत्य ठेवले पाहिजे. योग्य मार्गदर्शन मिळाले की मन एकाग्र राहते. सतत प्रयत्न करीत राहावेत. मला चारवेळा अपयश आले. वर्ष २०१८ मध्ये गुप्त वार्ता अधिकारी म्हणून निवड झाली; पण उंची मायक्रो २ मध्ये कमी पडल्याने अपयश आले. तरीही खचून न जाता मार्गदर्शक प्रा. सुधीर पोतदार यांच्या मार्गदर्शनात अभ्यासात सातत्य ठेवले.



डी.एड. असतानाही शिक्षक पदासाठी कुठलीच परीक्षा दिली नाही. जे लक्ष्य ठेवले त्यात यश मिळाले. त्यामुळे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी संयम, अभ्यासात सातत्य ठेवावे, असा सल्ला पीएसआय विठ्ठल राठोड यांनी दिला आहे.परीक्षेच्या अभ्यासात मन रमले. तब्बल तीन वेळा पूर्व परीक्षेत अपयश आले. चौथ्यावेळी मुख्य परीक्षा पास झाल्यावर मुलाखतीत अनुत्तीर्ण झाले. तरीही संयम ठेवला. पाचव्यांदा यश आले, निकाल जाहीर होताच मित्रपरिवार अन् ग्रामस्थांनी कौतुकाचा वर्षाव सुरू केला. अक्षर ओळख नसलेल्या पालकांच्या कौतुकासाठी ग्रामस्थांची रीघ लागली. मार्गदर्शक प्रा. सुधीर पोतदार यांच्या हस्ते लातूरमध्ये भव्य सत्कार करण्यात आला. मित्रांनीही पेढे भरवून कौतुकाचा वर्षाव केला.

**दोन्ही भावंडे झाले अधिकारी**

अक्षर ओळख नसलेल्या आई-वडिलांनी दोन्ही मुलांना जिद्दीने शिक्षण दिले. मुलांनीही पालकांच्या कष्टाचे चीज केले. लहान मुलगा भरत राठोड हा दहा महिन्यांपूर्वीच कर सहायक झाला.

आता मोठा मुलगा विठ्ठलही पीएसआय झाला, दोघांच्या यशाने कुटुंब आनंदी झाल्याचे वडील वसंतराव राठोड यांनी सांगितले.

**योग्य मार्गदर्शक, जिद्द, संयम, अभ्यासात सातत्य महत्त्वाचे**

स्पर्धा परीक्षेची तयारी करीत असताना संयम महत्त्वाचा आहे. अपयश आले म्हणून खचून न जाता अभ्यासात सातत्य ठेवले पाहिजे. योग्य मार्गदर्शन मिळाले की मन एकाग्र राहते. सतत प्रयत्न करीत राहावेत. मला चारवेळा अपयश आले. वर्ष २०१८ मध्ये गुप्त वार्ता अधिकारी म्हणून निवड झाली; पण उंची मायक्रो २ मध्ये कमी पडल्याने अपयश आले. तरीही खचून न जाता मार्गदर्शक प्रा. सुधीर पोतदार यांच्या मार्गदर्शनात अभ्यासात सातत्य ठेवले.

डी.एड. असतानाही शिक्षक पदासाठी कुठलीच परीक्षा दिली नाही. जे लक्ष्य ठेवले त्यात यश मिळाले. त्यामुळे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी संयम, अभ्यासात सातत्य ठेवावे, असा सल्ला पीएसआय विठ्ठल राठोड यांनी दिला आहे. परीक्षेच्या अभ्यासात मन रमले. तब्बल तीन वेळा पूर्व परीक्षेत अपयश आले. चौथ्यावेळी मुख्य परीक्षा पास झाल्यावर मुलाखतीत अनुत्तीर्ण झाले. तरीही संयम ठेवला. पाचव्यांदा यश आले, निकाल जाहीर होताच मित्रपरिवार अन् ग्रामस्थांनी कौतुकाचा वर्षाव सुरू केला. अक्षर ओळख नसलेल्या पालकांच्या कौतुकासाठी ग्रामस्थांची रीघ लागली. मार्गदर्शक प्रा. सुधीर पोतदार यांच्या हस्ते लातूरमध्ये भव्य सत्कार करण्यात आला. मित्रांनीही पेढे भरवून कौतुकाचा वर्षाव केला.

# चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त आज माळाकोळी येथे रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांचा कीर्तन सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ४ ऑगस्ट -**

लिंबोटी धरणाचे प्रणेते ,माजी खासदार, लोकनेते प्रतापराव पाटील चिखलीकर आणि भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त आज दि. ५ ऑगस्ट रोजी लोहा तालुक्यातील माळाकोळी येथे रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांच्या कीर्तनाचा सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

संतोष नाना तिडके यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला हा भव्य कीर्तन सोहळा माळाकोळी येथील श्री बाराज्योतिर्लिंग सभा मंडपात दुपारी बारा वाजता सुरू होणार आहे. आयोजित करण्यात आलेल्या भव्य कीर्तन सोहळ्यास माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर , भाजपा महिला आघाडीच्या उपाध्यक्षा सौ. प्रनिताताई देवरे - चिखलीकर यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. आयोजित ढोक महाराजांच्या कीर्तनाचा लाभ घेण्यासाठी भाविक भक्तांनी आणि चिखलीकर यांच्यावर जीव लावणाऱ्या तमाम चाहत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजक संतोष नाना तिडके यांनी केले आहे.



# डाक विभागातील विविध कल्याणकारी योजना लाभार्थ्यांना नवसंजीवनी देणाऱ्या आहेत : डॉ. एस.बी.अडकिणे

**तभा वृत्तसेवा**
**मुखेड, ४ ऑगस्ट -**

शहरातील महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व भारतीय डाक नांदेड विभाग यांच्या वतीने आधार नोंदणी , दुरुस्ती व इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक खाते शिबीर आयोजित करण्यात आला होता . यावेळी भारतातील अनेक मौल्यवान घटकांपैकी एक म्हणजे भारतीय डाक विभाग आहे . या विभागाच्या वतीने जनतेसाठी विविध लाभकारी योजना उपलब्ध करून दिले आहेत . या योजना लाभार्थ्यांना नवसंजीवनी ठरणाऱ्या आहेत असे प्राचार्य डॉ. एस.बी.अडकिणे यांनी प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.बी.अडकिणे , प्रमुख उपस्थिती मुखेडचे सब पोस्ट मास्टर संजय भिसे , मंडळ अधिकारी सुरेश कपाटे , प्रमुख मार्गदर्शक नांदेडचे डाक पर्यवेक्षक उमेश पाटील , कुंद्राळाचे पोस्ट मास्टर सुधाकर हिवराळे , तलाठी जी.डी.कल्याणकर तर प्रमुख पाहुणे म्हणून डाक पर्यवेक्षक उन्केश्वर कानगुले , उमरदरी पोस्टमन केशव काळे , बहोद्दीन शेख , सुर्यवंशी , बोंडले , आटोळकर हे उपस्थित होते . कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. चंद्रकांत एकलारे , सूत्रसंचालन स्वयंसेविका कु.ऋतुजा डाकळे तर आभार प्रदर्शन स्वयंसेविका कु. कोमल टोकलवाड यांनी केले .

## संक्षिप्त वृत्त

### नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांच्या वतीने बाळासाहेब आंबेडकर यांचे जंगी स्वागत

**लोहा-**वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा ओबीसी आरक्षण बचाव यात्रेचे बाळासाहेब आंबेडकर लोहा शहरातील सुर्यवंशी कॉम्पलेक्स येथे नगरीचे लोकनियुक्त नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांच्या वतीने शहरांच्या परंपरेनुसार खारिक खोबऱ्याचा हार घालून फटाक्यांची आतिषबाजी करून ढोल ताशांच्या गजरात जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी चंद्रसेन पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते गंगाधरराव महाबळे, माजी नगरसेवक युवराज वाघमारे, , नगरसेवक संदीप दमकोडावार वैभव हाके ,ज्ञानेश्वर भीसे ,लकी फुलवरे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

### महाडीबीटी पोर्टलवर ६ ऑगस्ट पर्यत अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड, -** सोयाबीन व इतर तेलबिया आधारित पीक पद्धतीस चालना देऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी सोयाबीन व इतर तेलबिया पिकातील मूल्य साखळीस चालना देण्यासाठी राज्य पुरस्कृत एकात्मिक सोयाबीन आणि इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मुल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजना सन २०२२-२३ ते २०२४-२५ या तीन वर्षात राबविण्यात येत आहे. योजनेंतर्गत सन २०२४-२५ मध्ये चालू खरीप हंगामामध्ये निविष्ठा १०० टक्के अनुदानावर पुरविण्यात येणार आहेत. मागील १० दिवसापासुन अर्ज करण्याची प्रक्रिया पोर्टलवर सुरू असुन सद्यस्थितीत जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या अर्जाची संख्या कमी प्रमाणात असल्याने ६ ऑगस्ट २०२४ पर्यंत अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. बॅटरी ऑपरेटेड फवारणी पंप शंभर टक्के अनुदानावर लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांची निवड महाडीबीटी पोर्टलवर केलेल्या अर्जातून ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी करावेत व या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी भाऊसाहेब बऱ्हाटे यांनी केले आहे.

# लोहा नगरपरिषदेने नागरिकांच्या मुलभूत सुविधेची हालगर्जी करु नये : भास्कर पवार

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, ४ ऑगस्ट -**

शहरात गल्ली बोळातील नाल्या तुंबुन सर्वसमान्याच्या घरात पाणी जात आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस आल्याने रस्त्याच्या बाजूने काटेरी झुडपे,गवत ,कचऱ्याचे ढिगारे साचला आहेत.प्रतेक वार्डातील रस्त्यावरील दोन महिने झाले दिवा बत्ती बंद आहे.रस्त्यामध्ये मोठमोठे खड्डे पडले आहेत त्या ठिकाणी मुरूम टाकून खड्डे भरून घ्यावेत या मुलभुत सुविधेची अधिकाऱ्याने हालगर्जी केली तर तहसील कार्यालय समोर जन आंदोलन करण्यात येईल असा इशारा भाजपचे माजी नगरसेवक भास्कर पाटील पवार यांनी उपविभागीय अधिकारी कंधार व तहसीलदार लोहा यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

लोहा नगरपरिषदेवर प्रशासकीय मंडळ आसल्यामुळे स्थानीक स्वराज्य संस्थेकडे दुर्लक्ष केले जात आहे. या हालगर्जीपणाचा नागरिकांना अनेक आडणीचा सामना करावा लागत आहे.नागरिकांच्या मुलभूत सुविधेकडे दुर्लक्ष केले जात आहे. शहरात रस्त्यावर कचऱ्याचे ढिगारे पडुन आसल्याने दुर्गंधी पसरत आहे यामुळे शहरात रोगराई पसरण्याची दाट शक्यता आहे.गल्ली बोळातील रस्त्यावर गवत, काटेरी झुडपे वाढल्यामुळे रात्रीला पायी चालणे जिकिरीचे वाटत आहे.पावसाळ्याचे दिवश आसल्याने प्रत्येक वार्डातील नाल्या तुडुंब भरून सर्वसामान्याच्या घरात पाणी जाऊन घरात राहाणे मुश्कील होतं आहे. नगर परिषदेचे प्रशासकिय अधिकारी आसल्याने उपविभागीय अधिकारी कंधार व तहसीलदार लोहा यांनी तात्काळ लक्ष देऊन अंमलबजावणी करावी अन्यथा आपल्या कार्यालयासमोर जन आंदोलन करण्यात येईल अशी नोंद घेऊन नागरिकांच्या मुलभूत सुविधेची हालगर्जी करु नये असे माजी नगरसेवक भास्कर पाटील पवार यांनी उपविभागीय अधिकारी कंधार यांना दिलेल्या निवेदनात नमुद करुन तहसीलदार विठ्ठल परळीकर यांना निवेदनाची प्रत देऊन इशारा दिला आहे.

# आ. केराम यांनी केले मयत किशन मुंडे यांच्या कुटूंबियांचे सांत्वन

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, ४ ऑगस्ट -**

किनवट तालुक्यातील बोधडी खुर्द येथील शेतकरी, प्रतिष्ठित दुकानदार व युवकाच्या निधनाप्रती संवेदना व्यक्त करत आ. भीमराव केराम यांनी दि ३ ऑगष्ट रोजी बोधडी येथे जाऊन मयतांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले व त्यांना धीर दिला आहे.

किनवट तालुक्यातील मौजे बोधडी खु येथील किशन मुंडे या शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केली.त्यानंतर शेतकरी रामेश्वर गणपत मुंडे यांचा मुलगा पवन मुंडे याचे विजेच्या धक्क्याने दुर्दैवी निधन झाले. दि २२ जुलै रोजी रोजी प्रसिद्ध किराणा दुकानदार निवृत्ती गोविंद दराडे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले तर प्रतिष्ठित नागरिक दिगंबर गादेकर हे दीर्घ आजाराने मृत्यु पावले. बोधडी खु येथे लागोपाठ झालेल्या शेतकरी, युवक, प्रसिद्ध दुकानदार तसेच प्रतिष्ठित नागरिकाच्या



निधनाप्रती आ. भीमराव केराम यांनी संवेदना व्यक्त केली असून दि ३ ऑगस्ट रोजी त्यांनी भाजपाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह बोधडी खु येथे मुंडे, दराडे व गादेकर कुटुंबियांच्या घरी जाऊन सांत्वन केले व त्यांना धीर दिला आहे.यावेळी भाजपा ओबीसी आघाडीचे जिल्हाध्यक्ष बाबुराव केंद्रे,किनवट नगर परिषदचे माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार करपुडे पाटील, दत्ता आडे, संतोष मरस्कोल्हे बोधडी खु चे उपसरपंच डॉ नामदेव कराड, विवेक केंद्रे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# तालुका गुरू गौरव पुरस्कार वितरित करा; राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, ४ ऑगस्ट -**

मुदखेड तालुक्यातील पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या वतीने देण्यात येणारा गुरू गौरव पुरस्कार गेल्या चार वर्षांपासून देण्यात आला नसून तो लवकर वितरीत करण्यात यावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित दादा गटाचे) शहराध्यक्ष मोहम्मद बुराण यांनी निवेदनाद्वारे गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे यांच्या कडे केली आहे .

दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून गुरू गौरव पुरस्कार तालुकास्तरावर वितरीत केला जातो. आपले अध्यापन कार्य उत्तमरीत्या पार पाडणारे शिक्षक यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. परंतु २०२० पासून गेली चार वर्षे ह्या पुरस्काराचे वितरण करण्यात आले नाही.त्यामुळे तालुका गुरू गौरव पुरस्काराचे वितरण करण्यात यावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा गटाच्या वतीने करण्यात आली.

यावेळी शहराध्यक्ष मोहम्मद बुराण, गजानन बोडखे,दिलीप सरोदे, शेख मुखीद जानेमिया ,हनुमंत नटुरे , गजानन बोडके ,शेख इरफान, म.साजिद,म. खाजा शेख हकिम,संतोष दर्शनवाड,ज्ञानेश्वर गायकवाड आदी उपस्थित होते.

# पत्रकारासाठी पंचसूत्री कार्यक्रम घेऊन व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेची वाटचाल : विजय चोरडिया




**तभा वृत्तसेवा**
**कंधार, ४ ऑगस्ट -**

ग्रामीण भागातील पत्रकार सक्षम झाला पाहिजे पत्रकार हे आपल्या हक्कापासून वंचित राहू नये यासाठी पंचसूत्री घटकाचा कार्यक्रम घेऊन पत्रकारांना न्याय देण्यासाठी व्हॉईस ऑफ मिडिया ही संघटना तत्पर असल्याचे प्रतिपादन संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष विजय चोरडिया यांनी कंधार येथील पत्रकार संघाच्या बैठकीत केले.

शिर्डी येथे होणाऱ्या अधिवेशनासंबधी व्हाईस ऑफ मिडिया या संघटनेची बैठक कंधार येथील शासकीय विश्रामगृहावर दिनांक ४ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आली होती. सदरील बैठकीस व्हाईस ऑफ मिडियाचे मराठवाडा अध्यक्ष विजय चोरडिया, नांदेड महानगर अध्यक्ष गणेश जोशी जिंतूर चे तालुकाध्यक्ष चव्हाण हे उपस्थित होते. यावेळी चोरडिया व जोशी यांचा कंधार तालुका संघटनेच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी पत्रकारांना मार्गदर्शन करताना मराठवाडा अध्यक्ष विजय चोरडिया म्हणाले की, जागतिक पातळीवर पत्रकारासाठी न्याय हक्कासाठी काम करणारी एकमेव संघटना म्हणून व्हाईस ऑफ मीडिया काम करते. पत्रकारासाठी कौशल्य शिक्षण, घरकुल, आरोग्य, निवृत्तीनंतर पेन्शन योजना आदी पत्रकाराच्या प्रश्नासाठी संघटना काम करत आहे.ग्रामीण भागातील पत्रकार सक्षम झाला पाहिजे,छोटे-मोठे उद्योग आदी पंचसूत्री कार्यक्रम घेऊन संघटनेची वाटचाल सुरू आहे. याच व्हाईस ऑफ मीडिया संघटनेच अधिवेशन ३१ ऑगस्ट ल शिर्डी येथे होणार असून या अधिवेशनास कंधार तालुक्यातील संघटनेचे अधिका अधिक पदाधिकारी उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.यावेळी गणेश जोशी यांनी ही पत्रकाराना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन संतोष कांबळे यांनी केले तर आभार विनोद तोरणे यांनी मानले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दयानंद कदम, संभाजी कांबळे उपस्थित होते तर व्हॉईस ऑफ मीडियाचे कंधार तालुका अध्यक्ष सय्यद हबीब, सचिव विनोद तोरणे ,सहसचिव संतोष कांबळे ,कार्याध्यक्ष माधव गोटमवाड, सदस्य मगदुम परदेसी, ॲड. उमर शेख, प्रा जमील बेग, ॲड. सिद्धार्थ वाघमारे, माधव जाधव आदींची उपस्थिती होती.



**नांदेड- साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त अण्णाभाऊ साठे क्रांती सेनाच्यावतीने आयोजित निर्धार मेळावा अनंता लॉन्स येथे पार पडला. यावेळी उद्घाटन प्रसंगी संस्थापक अध्यक्ष तथा अण्णाभाऊ साठे यांच्या सुनबाई सावित्रीबाई साठे, खा. वसंतराव पा. चव्हाण, डॉ. अण्णाभाऊ साठे क्रांतीसेनाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा नातू सचिन साठे, आ. माधवराव पा. जवळगावकर, आ. मोहन हंबर्डे, माजी जि.प. अध्यक्ष आनंद गुंडले, राष्ट्रीय सचिव गणेश भगत, रा.काँ. चे जिल्हा उपाध्यक्ष भास्कर भिलवंडे, आयोजक जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष विठ्ठल पावडे, आयोजक अण्णाभाउ साठे क्रांती सेनेचे जिल्हाध्यक्ष पंडित वाघमारे, सतीश कावडे, माधव डोम्पले, उत्तम भाबळे, किशोर कवडीकर, संजय वाघमारे, अविनाश आंबटवाड आदीसह अण्णाभाऊ साठे क्रांती सेना पदाधिकारी व समाज बांधव**

# अचानक कामावरुन कमी करण्यात आल्याने नगर परिषदेविरोधात महिलेचे अमरण उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**भोकर, ४ ऑगस्ट -**

गेली दहा वर्षापासून भोकर नगरपरिषदेची सेवा करुनही कोणतेही कारण नसताना पूर्व कल्पना न देता अचानक नगरपरिषदेकडून कंत्राटी महिला कर्मचारी महानंदा मोटेकर यांना कामावरुन कमी करण्यात आले असून पालीकेकडे सदर महिला कर्मचार्यांचे चार महिन्याचे मानधन थकित आहे परिणामी सदरील महिलेवर उपासमारीची वेळ आली राहिलेले थकित मानधन देवून पूर्ववत कामावर रूजू करुन घेण्यात यावे याकरिता दि.५ ऑगष्ट पासून महानंदा नागोराव मोटेकर या कंत्राटी महिला कर्मचारी नगरपरिषदेसमोर अमरण उपोषण करणार असल्याचे निवेदन उपविभागीय अधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

महानंदा मोटेकर मागील दहा वर्षापासून भोकर नगरपालीकेत कंत्राटी कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत त्यांना कोणतीही पूर्व सूचना न देता कामावरुन कमी करण्यात आले त्यांचेवर उपासमारीची वेळ आली भोकर नगरपालीकेने महात्मा फूले सेवा भावी संस्था आष्टी ता.हदगाव या संस्थेला स्वच्छतेचे कंत्राट दिले सदरील कंत्राटदाराकडे सदर कंत्राटी महिला कर्मचारी महानंदा मोटेकर यांचे चार महिन्याचे मानधन थकित असताना सदरील कंत्राटदाराने या महिलेला कामावरुन कमी करण्यात आल्याचे सांगून कामावर येवू नकोस असे म्हणत अरेरावीची भाषा सदर कंत्राटदार वापरत असल्याचे निवेदनात नमूद असून भोकर नगरपरिषद प्रशासनाने सदरील महिलेला पूर्ववत कामावर रुजू करुन घेवून न्याय मिळवून द्यावा अन्यथा कामावर जो पर्यंत घेणार नाही तो पर्यंत नगरपरिषद कार्यालयासमोर अमरण उपोषण सूरुच ठेवणार असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

# नायगाव मतदार संघात आमदार राजेश पवारांसारख्या विकास पुरुषांना गमवू नका : सांवत

**तभा वृत्तसेवा**
**उमरी, ४ ऑगस्ट -**

नायगाव मतदार संघातील आमदार राजेश पवार यांनी जिल्हात इतर आमदारा पेक्षा निधी आणून मतदार संघाचा कायापालट केला असून अशा विकास करणाऱ्या आमदार यांना गमवानुका पुन्हा एकदा येणाऱ्या निवडणुकीत मध्ये निवडणू द्यावे असे आव्हान भाजपा तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील सांवत यांनी केली आहे .

महाराष्ट्रात व केंद्रात महाविकास आघाडीचे सरकार असल्याने शासकीय योजना जनकल्यासाठी करीत आहे पण नायगाव मतदार संघाचे विकास पुरुष आमदार राजेश पवार यांनी शेतकरी पिकाचा उत्पनाचा भाव जास्तीचा मिळावा , विमा ही शेतकरी यांना वेळेत मिळावा , अवैध वाळू माफियावर कार्यवाचा करावी , गोर गरीब घरकुल यांना वाळू मोफत पाच ब्रास मिळावी , मराठा आरक्षण , एसी समाजातील अ ब क ड वर्गीकरण असे मतदार संघातील रस्ते , विज , पाणीपुरवठा , निराधार आधार असे प्रश्न विद्यानसभेत तारांकीत करून न्याय दिला आहे . जिल्हात जेवढा आमदार यांना विकास भेटला नाही तेवढा विकास निधी खेचून आनला आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण यासाठी मतदार संघात मोफत फॉर्म भरित आहे हा सामाजिक सर्व योजना असल्या तरी , जि प सदस्या त्यांच्या धर्म पत्नी पुनमताई पवार यांनी ही वंदेमातरम् प्रतिष्ठाषण कडून मतदार संघात मोफत चष्मे वाटप तपासनी शिबीर प्रत्येक गावा गावात घेतले आहे त्यामुळे मतदार संघात पन्नास हजारा च्या वर लोकांना सेवा मिळाली आहे . यापुढे ही ज्ञानेश्वर पाटील सावंत म्हणले की आमदार राजेश पवार हे सामाजीक क्षेत्र विकासा प्रमाणे धार्मिक क्षेत्रात भक्ताचे निपुन आहेत नव्हे तर धार्मिक भाविकाचे आमदार वेडे आहेत. म्हणून तर पाच वर्ष गणपती निधी, देवदर्शन, भंडारे ही करून भक्तात विलीन होतात. त्यांच्या धर्म पत्नी पुनमताई पवार यांचा ही सिहांचा वाटा असून त्यांनी बचतगट महिलाना ही मोफत देवदर्शन दिले तर मातृत्व योजना राबवून प्रस्तुती मध्ये बाळाना व मातृवाना किट देवून मदत दिली आहे.

परवा मुदखेड येथेतून दोनहजार दोनशे लोकांना काशी तिथे तिर्थयात्रा जाणाऱ्या भक्ताची मोफत रित्या एकस्ट्रा रेल्वेची मागणी करून तिर्थयात्रेस रवानगी केली आहे यावेळी राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा विद्येमान भाजप खासदार या सह अनेक माजी आमदार, पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थितीथ होते.

यावेळी अशोकराव चव्हाण म्हणाले की आमदार राजेश पवार सारख्या आमदाराची गरज आहे त्यांनी शासनाच्या अगोदर त्या योजना राबवता त्या बदल मला आनंद होत आहे त्यांच्यामुळे दोन हजार च्या वर लोक तिर्थक्षेत्राला जात आहे निश्चितच त्यांचे राजकीय भविषय सुखकर असणार आहे अशी प्रतिक्रिया अशोकराव चव्हाण यांनी उपस्थित पत्रकार यांना प्रतिक्रीया दिली आहे.

असे कार्य करणाऱ्या विकास पुरुष आमदार राजेश पवार यांना येणाऱ्या निवडणूक काळात गमवूनका पुन्हा आमदार म्हणून संधी द्यावी कारण केंद्रात सरकार आहे राज्यात येणार आहे जे कॉग्रेस सरकार ७० वर्षात केले नाही ते मोदी सरकार केले तर नायगाव मतदार संघात ही ५० वर्ष पुल, रस्ते, गाव अतर्गत रस्ते , असे अनेक मुलभूत विकास आमदार राजेश पवार यांनी केले आहे अशी प्रतिक्रीया उमरी भाजप तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील शिंदे यांनी दै तरून भारत प्रतिनिधीशी दिली आहे.

लातूर
दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले

# विवेकानंद रुग्णालयात पीसीआर मोलेक्युलर लॅबची सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.४ ऑगस्ट-**

येथील विवेकानंद रुग्णालयात दिनानाथ मंगेशकर रुग्णालय, पुणे यांच्या माध्यमातून डायरेक्ट रिलीफ अमेरिका या सेवाभावी संस्थेच्या सहाय्याने अद्यावत यंत्रांनी सुसज्ज पीसीआर मोलेक्युलर लॅब कार्यरत झाली आहे.

लातूर व परिसरातिलो रुग्णांसाठी या लॅबोरेटरीचा विशेष फायदा म्हणजे या अंतर्गत होणाऱ्या तपासण्यांचे रिपोर्टस २४ तासांच्या आत उपलब्ध होत आहेत. यामध्ये सीएमव्ही , स्त्रियांमध्ये होणाऱ्या गर्भाशय कर्करोगाचा कारणीभूत विषाणू एचपीव्ही - डीएनए, , एचएलए बी २७, एचसीव्ही - आरएनए, एचआयव्ही, टीबी, पीसीआर, एचबीव्ही, डीएनए , गंभीर आजारी असणाऱ्या रुग्णांमध्ये होणाऱ्या संसर्गजन्य रोगांसाठी रक्त तपासणी, पावसाळ्यात पसरणाऱ्या निरनिराळ्या विषमज्वरांसाठी फिव्हर पॅनेलची रुग्णालयाने सुरुवात केली आहे. या अंतर्गत डेंग्यू, चिकन गुनिया,, मलेरिया, आदी व्याधींसाठीची रक्त तपासणी करण्यात येत आहे/. रक्त तपासणीमुळे आजाराला नेमका कोणता जीवाणू कारणीभूत आहे हे कळण्यास मदत होते. त्यावरून योग्य उपचार केले जाऊ शकतात. एखाद्या संसर्गाचा उपद्रव होऊन निर्माण होणाऱ्या गंभीर अवस्थेसाठी सेप्सीस पॅनेलची सुरुवात करण्यात आली आहे. पासावळ्यातील विषमज्वराचा वाढत प्रादुर्भाव बघता रुग्णालयाने डेंग्यू, चिकन गुनियासाठीच्या तपासण्या माफक दरात उपलब्ध केल्या आहेत. लातूर शहर व परिसरातील रुग्णांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहनज डॉ. अरुणा देवधर, डॉ. प्रशांत मुळे तसेच विवेकानंद रुग्णालयाच्या सर्व तज्ज्ञ डॉक्टरांनी केले आहे.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त



### नवनाथ राऊत यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**उदगीर, दि. ४ ऑगस्ट-**

नवनाथ राऊत यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात सेवा गौरव समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार उपस्थित होते तसेच केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह शंकरराव लासुने, विद्यालयाचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले, उपमुख्याध्यापक अरुण पत्की, सत्कारमूर्ती नवनाथ राऊत व त्यांच्या पत्नी गौरी राऊत यांची उपस्थिती होती. सत्कारमूर्ती नवनाथ राऊत यांनी आपल्या दीर्घ सेवेतील जुन्या आठवणींना उजाळा दिला. सेवा करत असताना चांगले पदाधिकारी, सहकारी मिळाल्याचे समाधान व्यक्त केले. तसेच नवनाथ राऊत यांनी विद्यालयाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची प्रतिमा भेट दिली. तसेच विद्यालयातील होतकरू विद्यार्थ्यांना इंग्रजी डिक्शनरी तसेच पुस्तकांचे वाटप केले. यावेळी त्यांचा मुलगा प्रथमेश व मुलगी प्रेरणा हे देखील उपस्थित होते. सत्कारमूर्ती नवनाथ राऊत यांच्या पत्नी गौरी राऊत यांनी याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात मधुकरराव वट्टमवार यांनी नवनाथ राऊत यांना शुभेच्छा देऊन त्यांनी केलेल्या सेवेबद्दल समाधान व्यक्त केले. सूत्रसंचालन आशा मोरे, प्रास्ताविक मीनाक्षी कस्तुरे, स्वागत व परिचय निलेश मांडवकर तर बालाजी जाधव व प्रमोदिनी रेड्डी यांनी मनोगत व्यक्त केले. आभार नीता मोरे यांनी मानले.संदीप जाधव यांनी कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व पर्यवेक्षक, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



### उदयगिरी महाविद्यालयात क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती साजरी

**उदगीर, दि. ४ ऑगस्ट-**


येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य आर.के.मस्के, प्रा.डॉ.एस.आर. नागोरी, स्टाफ सेक्रेटरी तथा ग्रंथपाल डॉ.एल.बी.पेन्सलवार, प्रा.डॉ. एस.आर.सोमवंशी, आयक्युएससीचे समन्वयक प्रा.डॉ.के.आर.गव्हाणे, प्रा.डॉ.जी.जी.जेवळीकर, प्रा.प्रवीण जाहुरे यांच्यासह प्राध्यापक तथा शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.



### गौरव काथवटे यांना डॉक्टरेट

**लातूर, दि. ४ ऑगस्ट-**

माजी नगरसेवक गौरव काथवटे यांना इंटरनॅशनल इंटर्नशिप युनिव्हर्सिटीच्या वतीने मानद डॉक्टरेट प्रदान करण्यात आली. गौरव काथवटे यांनी नगरसेवक म्हणून तसेच सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्याबद्दल ही डॉक्टरेट त्यांना देण्यात आली आहे. युनिव्हर्सिटीचे व्हाइस चान्सलर प्रो.डॉ. चॅप व रजिस्ट्रार माहा षादेह यांच्या हस्ते त्यांना डॉक्टरेट प्रदान करण्यात आली. या यशाबद्दल पक्षाचे पदाधिकारी आणि मित्रमंडळीं मधून गौरव काथवटे यांचे अभिनंदन केले जात आहे.



### लालबहादूर शास्त्री शाळेत क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती साजरी

**उदगीर, दि. ४ ऑगस्ट-**

लालबहादूर शास्त्री प्राथमिक विद्यालयात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून संस्कार केंद्रप्रमुख अंकुश मिरगुडे, प्रमुख वक्ते म्हणून अभ्यासपूरक मंडळ प्रमुख माधव केंद्रे तर,प्रमुख पाहुणे म्हणून विभाग प्रमुख सुधाकर पोलावर उपस्थित होते.मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करून क्रांतिसिंह नाना पाटील व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन करण्यात आले. शाळेच्या वतीने पुष्प देऊन मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. सूत्रसंचलन देवक काळे यांनी केले.

# मंदिरातील रक्कम, दागिने चोरणारे अटकेत; २ लाख १८ हजारांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि.४ ऑगस्ट-**

अहमदपूर व जळकोट परिसरात एकाच रात्रीत पाच वेगवेगळ्या गावच्या मंदिरात दान पेट्या फोडून रक्कम व देवीच्या अंगावरील दागिने चोरणाऱ्या आरोपींना अहमदपूर पोलिसांनी चौकशीअंती गुन्हा कबूल केलेल्या आरोपींच्या मुस्क्या आवरून त्यांच्याकडून २ लाख १८ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करून त्यांना अटक केली.

१७ जुलैच्या मध्यरात्री चोरट्याने अहमदपूर व जळकोट परिसरात वेगवेगळ्या पाच गावच्या मंदिरातील दान पेट्या फोडून रक्कम व देवीच्या अंगावरील दागिने चोरून पळ काढल्याची घटना घडली होती. यासंदर्भात अहमदपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. सदर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी निर्देशित केल्याप्रमाणे अप्पर पोलीस अधीक्षक अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक बि.डी. भुसनूर यांच्या नेतृत्वात अहमदपूरच्या पोलीसानी वरील गुन्ह्याचा सखोल तपास चालू केला. यातच नेमलेल्या बातमीदाराकडून मंदिराची दानपेटी व देवीचे दागिने चोरणाऱ्या आरोपींची माहिती मिळाली.

वरील माहितीचा बारकाईने अभ्यास करून, दानपेटीतील रक्कम व देवीच्या अंगावरील दागिने चोरणारे आरोपी १)महबूब आजमुद्दीन शेख वय ३६ रा. बनशेळकी रोड उदगीर, २) अजहर हुसेन भांडे वय २४ रा. मरसांगवी ता. जळकोट, ३) शिवराज रतनसाब तांबोळी वय २० रा. समता नगर उदगीर यांना आरोपी निष्पन्न करून त्यांच्या राहत्या ठिकाणावरून ताब्यात घेतले व त्यांची कसून चौकशी केली असता त्यांनी सदर गुन्हा कबूल केला, व मंदिरातील देवाच्या मूर्तीवरील दागिने, दानपेटीतील रोख रक्कम असा एकत्रित २ लाख १८ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेऊन वरील आरोपींना नमूद गुन्ह्यात अटक केली आहे.

सदरच्या कारवाईत, पोलीस निरीक्षक बी.डी.भुसनूर यांच्या नेतृत्वाखालील पथकामध्ये पोलिस अमलदार तानाजी आरदवाड, बापूराव धुळगुंडे, राजकुमार उबेटवार, पिराजी पुठेवाड, चिमनदरे, बाळू आरदवाड, साळवे, केशव जायभाये यांचा सहभाग होता. पुढील तपास अहमदपूर पोलीस करत आहेत.

# ब्रह्मवाडी शिवारात आढळली महाकाय मगर

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि. ४ ऑगस्ट-**



तालुक्यातील ब्रह्मवाडी गावाच्या शिवारात कोणतीही मोठी नदी अथवा तलाव जवळपास नसताना एका शेतकऱ्याच्या शेतात कालव्यात जवळपास दीडशे किलो वजनाची महाकाय मगर सोयाबीनच्या रानात आढळून आली. हा प्रकार शेतकऱ्याच्या लक्षात येताच वन विभागाशी संपर्क साधुन परिसरातील शेतकरी व सर्प मित्रांच्या मदतीने ही मगर पकडून अहमदपूर वन विभागाच्या ताब्यात देण्यात आली. मगरीला पुणे वन विभागाकडे पाठवण्यात आले.

अहमदपूर तालुक्यातील ब्रम्हवाडी परिसरात शिवदास घुगे या शेतकऱ्याच्या शेताजवळ दोन दिवसा पूर्वी मध्यरात्री १ वाजेच्या सुमारास कुत्री का भुंकताहेत हे पाहण्यासाठी शेतकरी या परिसरात गेले असता सोयाबीनच्या शेतात कालव्यात महाकाय मगर असल्याचे लक्षात आले. त्यांनी या संदर्भाची माहिती त्यांनी तातडीने अहमदपूर वन विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली. वनपरिक्षेत्र अधिकारी आश्विनी आपेट यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिमंडळ अधिकारी गोविंद माळी, रामभाऊ केसाळे उदगीर जि.बि काळे जळकोट, वनरक्षक गडकर, होनराव, राठोड , अंबुलगेकर, बोंबले, सर्पमित्र सिध्दार्थ काळे , आशिष कलुरे,उद्धव देगलुरे, योगेश तेलंगे , कान्हा पांचाळ, भानुदास ससाने , गजानन कांबळे आदींच्या पथकाने आणि शेतकऱ्यांच्या मदतीने दोन तास अथक प्रयत्न करून ही मगर पकडण्यात यश आले. तिला वन विभागाच्या जीपमध्ये टाकून अहमदपूर येथे आणुन वैद्यकीय पशुधन विकास अधिकारी डॉ.सुयोग येरोळे यांनी मगरीची वैद्यकीय तपासणी केली असता सदरील मगर नर जातीची असल्याचे निष्पन्न झाले तसेच त्यामगरीचे वय १० ते ११ वर्ष वजन १५० किलो व लांबी ९ फुट असल्याचे वैद्यकीय पशुधन विकास अधिकारी यांनी सांगीतले. मन्याड नदी पात्रात मगर नेहमी येत असतात बहुदा ही मगर सुध्दा मन्याड नदी पात्रातून आली असावी. साधारण दीड क्विंटल वजन असलेली ही मगर नऊ फुट लांब आहे. तिची वैद्यकीय तपासणी केली असती ती फिट असल्याचा अहवाल अहमदपूर येथील पशुवैद्यकीय अधिकारी यांनी दिला तिला नंतर पुणे वन विभागा कडे पाठवण्यात आले.

# पानगावात अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त गुणवंतांचा सन्मान

**रेणापूर, दि. ४ ऑगस्ट-**

साहीत्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती नुकतीच पानगाव येथे विविध उपक्रम राबवून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

रेणापूर तालूक्यातील पानगाव येथे जयंती निमित्त साहीत्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकातील ध्वजारोहण क्रषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती चंद्रचूड चव्हाण, कलवले गल्लीत ध्वजारोहण सरपंच मिनाताई मोटाडे, जूनी ग्रामपंचायत डॉ सुनिल नागरगोजे, उल्हास नगर येथील ग्रा पं. सदस्य गोविंद नरारे, रेल्वे स्टेशन रोड येथील उपसरपंच प्रमिला वाघमारे, तर डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकातील ध्वजारोहण सेवा निवृत्त पोलीस उपनिरीक्षक सुभाष हणवते आदींच्या हस्ते वरील ठिकाणचे ध्वजारोहण करण्यात आले. या नंतर गुरुवारी सायंकाळी ७ वाजता ईयत्ता १० वी आणि १२ वी परीक्षेमध्ये यंदा २०२४ मध्ये प्रथम, द्वितीय, आणि त्रतिय आलेल्या गुणवंत विद्यार्थांचा शाल श्रीफळ आणि सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला तसेच या वर्षी शासकीय सेवेत व निमशासकीय सेवेत रुजू झालेल्या कर्मचारी यांचाही सत्कार जयंती उत्सव समितीच्या वतीने शाल श्रीफळ व स्मतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच यावेळी सामाजीक क्षेत्रात योगदान देणाऱ्यांना समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या नंतर रात्री ९ वाजता साहीत्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन कार्यावर जंगी आसा गित गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या नंतर दुसऱ्या दिवशी संपूर्ण गावातून वाजत गाजत साहीत्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेची भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी रेणापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रदीप काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

### २६ ते ३१ ऑगस्टदरम्यान

# कान्हा कला प्रदर्शनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. ४ ऑगस्ट-**

शैक्षणिक क्षेत्रात आपला आगळा वेगळा ठसा उमटविणाऱ्या लातूरने आता कला क्षेत्रातही नवी भरारी घेण्याच्या दृष्टीने तयारी सुरु केली असून येथील चवंडा आर्ट गॅलरीच्या वतीने येत्या दि. २६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२४ या कालावधीत कान्हा कला प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संयोजिका श्रीमती गीता रविशंकर चवंडा यांनी दिली.

या अभिनव उपक्रमाचे उदघाटन दि. २६ ऑगस्ट २०२४ रोजी कृष्णाष्टमीच्या दिवशी मान्यवरांचे हस्ते होईल. चवंडा आर्ट गॅलरीच्या माध्यमातून लातूर जिल्ह्यातील तसेच परिसरातील कलाकारांच्या कलागुणांना वाव देण्याच्या उद्देशाने आपण हा उपक्रम हाती घेत असल्याचे गीता चवंडा यांनी सांगितले. आपल्याकडील अनेक होतकरू कलाकार केवळ त्यांच्या कलागुणांना योग्य न्याय, संधी न मिळाल्यामुळे जगासमोर येऊ शकत नाहीत. अशा कलाकारांच्या कलाविष्कारांना खऱ्या अर्थाने न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार आहे. जन्माष्टमीचे औचित्य साधून होणाऱ्या या कान्हा कला प्रदर्शनात स्थानिकच्या होतकरू कलाकारांनी सादर केलेल्या चित्रकला, शिल्पकला, रांगोळी चित्रे आणि इतर विविध कलाकृती पाहण्यास मिळणार आहेत. दि. २६ ते ३१ ऑगस्ट २०२४ या कालावधीत सकाळी १० ते रात्री ८ पर्यंत हे प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य खुले असणार आहे. या कला प्रदर्शनाच्या आयोजनासोबतच 'चवंडा आर्ट गॅलरी' कला क्षेत्रात एक नवे पर्व साकारत आहे, समर्पण आणि उत्कटतेचा एक अनोखा संगम आणत आहे. आपण सर्वांनी या अप्रतिम कला उत्सवात सहभागी होऊन लातूरच्या कलेचा गौरव वाढवण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहनही संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. या कान्हा कला प्रदर्शनात आपल्या कलाकृतींचे सादरीकरण करण्यासाठी कलाकारांनी डॉ. रवी चवंडा मेमोरियल चवंडा हॉस्पिटल याठिकाणी संपर्क साधावा असे आवाहन आयोजक गीता चवंडा, डॉ. संगमेश चवंडा, डॉ. केतकी चवंडा, डॉ. स्नेहा गाढवे, डॉ. शर्विल गाढवे, नागेश स्वामी यांनी केले आहे.

# ऑगस्ट महिन्यासाठी मालमत्ता करात ५ टक्के सूट

### सूट, सवलतीकरीता ३१ ऑगस्ट अंतिम तारीख

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. ४ ऑगस्ट-**

कर संकलन व कर आकारणी विभाग, लातूर शहर महानगरपालिका मार्फत वर्षाच्या सुरुवाती पासूनच १००% कर वसुलीचे उद्दिष्ट ठेवून कर संकलन केले जात आहे. त्यादृष्टीने नियमितपणे कर भरणारे मालमत्ता धारकासाठी वर्षाच्या सुरुवातीस विविध सुट/सवलती देण्यात आले आहेत. त्यानुसार ३१ जुलै पर्यंत मालमत्ता कर online भरणा-यास १० टक्के व ऑफलाइन भरणाऱ्यास ७ टक्के सवलत देण्यात आली होती. सदरील योजनेस मालमत्ताधारकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला असून तब्बल १५००० हून अधिक मालमत्ता धारकानी १८ कोटी येवढा टॅक्स भरणा केला आहे. सदरील योजनेला मिळणारा प्रतिसाद पाहता २ वेळा मुदतवाढ सुद्धा देण्यात आली होती.

आता ऑगस्ट महिन्या साठी सूटमध्ये कपात होऊन सामान्य करात ५ टक्के सूट योजना लागू करण्यात आली आहे. टॅक्स ऑनलाइन पधतीने भरणा केल्यास अतिरिक्त ३ टक्के सूट लागू राहणार आहे. तसेच महिला, दिव्यांग, स्वातंत्रसैनिक, रेन वॉटर हार्वेस्टिंग व सोलर सिस्टम बसविणे, चार्जिंग स्टेशन उभारन्यास नियमांनुसार सुट लागू राहिल. तसेच ऑगस्ट महिना सुट/सवलतीचा शेवटचा महिना असल्याने उर्वरित मालमत्ता धारकणी सुट चा लाभ घेऊन टॅक्स भरणा करावा व शहर विकासात हातभार लावावा असे आव्हान मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे. कर भरणा करण्यासाठी mclatur.org, LaturProperty Tax सिटीझन ॲप किंवा propertytax. mclatur.in या वेबसाईटचा वापर करावा . किंवा आपल्या वसुली लिपिक, क्षेत्रीय कार्यालय, व मनपा मुख्यालय येथे आपल्याकडील देय कराचा भरणा करून वरील देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ घेण्यात यावा.

# शिवलिंगेश्वर फार्मसीच्या जीपॅट परीक्षेतील पात्र विद्यार्थ्यांचा सत्कार




**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. ४ ऑगस्ट-**

भारत सरकार यांच्या वतीने संपुर्ण भारतात नॅशनल टेस्टींग एजन्सी एनटीएद्वारे एम.फार्मसी पदव्युत्तर राष्ट्रीय पातळीवर प्रवेशासाठी एकाच वेळी घेण्यात आलेल्या चाचणी परीक्षेत आलमला येथील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयातील ५ विद्यार्थ्यांनी जीपॅट-२०२४ नेत्रदिपक यश संपादन करुन महाविद्यालयाच्या उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.

यामध्ये रमेश कोळी रँक २८३, सुबोध कांबळे रँक ९१५ , सचिन शेवाळकर रँक ९५८, विनोद अनेराये रँक ९६२, वैभव गव्हाणे रँक २९००. या परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय पातळीवर पदवीधर एम. फार्मसी प्रवेशास प्राधान्य दिले जाते. तसेच शिष्यवृत्ती आणि इतर आर्थिक मदत देखील जीपॅट स्कोअर आधारावर दिली जाते.

या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या वतीने औसा तालुक्याचे गट विकास अधिकारी युवराज म्हेत्रे, संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे यांच्या हस्ते रोख पाच हजार रुपयांचे पारितोषिक, प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करुन गौरविण्यात आले. यावेळी प्राचार्य विश्वेश्वर धाराशिवे, डॉ. समीर शफी, डॉ. अजय फुगटे इत्यादी उपस्थित होते. या विद्यार्थ्यांना कविता सिरगिरे, विकास मुगळे, अस्मिता झोडगे, प्रियंका बंडगर, ऋतुजा भिसे, निलेश शेळके व मनिषा बेलुरे यांनी जी-पॅट परीक्षेकरीता मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, योगेश धाराशिवे, सर्व शिक्षक व शिक्षेत्तर कर्मचारी यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. सूत्रसंचालन अश्विनी कवाले, प्रांजली सुर्यवंशी, आर्यन कुमार, मंजुषा कदम व आभार प्रदर्शन संस्थेचे सहसचिव महादेव खिचडे यांनी केले.

# १,२०० शेतकऱ्यांना फवारणीच्या साहित्यांचे वाटप

### उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त संतोष सोमवंशी यांचा उपक्रम



**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. ४ ऑगस्ट-**

शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त गोंद्री मोड औसा येथे महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती तथा सहसंपर्कप्रमुख संतोष सोमवंशी यांच्या वतीने १२०० शेतकऱ्यांना पीक फवारणी औषधाचे वाटप केले.

उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त गेली दहा वर्षे संतोष सोमवंशी यांच्यावतीने नेत्र तपासणी, शस्त्रक्रिया शिबिरे, दिव्यांगांना साहित्य वाटप, शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात फवारे वाटप, औसा किल्ला येथे शस्त्र प्रदर्शन, शालेय साहित्य वाटप, छत्री वाटप, असे विविध समाज उपयोगी उपक्रम राबविले गेले. यावर्षी अडचणीत असलेल्या गोरगरीब शेतकऱ्यांना खरीप पिकांवर फवारणीसाठी औषधांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास युवा सेना जिल्हाप्रमुख दिनेश जावळे, खरेदी विक्री संघाचे उपसभापती शेखर चव्हाण, बाजार समिती माजी उपसभापती किशोर जाधव, उपतालुकाप्रमुख नारायण भोसले, शाहूराज जाधव, श्रीहरी काळे, होळी चेअरमन, नंदकुमार पाटील, हासेगाव व्हाईस चेअरमन संगमेश्वर बावगे, धानोरा चेअरमन विक्रम पाटील, लोदगा चेअरमन शरद भाईबार, हिप्परसोगा सरपंच मनोज सोमवंशी, धानोरा सरपंच सुरेश मुसळे, शरद गरड, लोदगा व्हाईस चेअरमन चंद्रकांत तळेगावे, इंद्रजीत शेंडगे, आप्पासाहेब सरवदे, मारुती मगर, इनुस बोपले, संजीव सोमवंशी, सुनील खंडागळे उपस्थित होते.

Chate
The Symbol of Merit
सोलापूर तरुण भारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !
'चाटे पॅटर्न' राज्यात सर्वोत्तम
* आमची वैशिष्ट्ये *
* सर्व विषय एकाच ठिकाणी
* चाटे परिपुर्ण नोटस्
* दर रविवारी ऑनलाईन/ऑफलाईन युनिट टेस्ट
* मिळालेल्या मार्कांचा पालकांना SMS
* प्रत्येक महिन्याला पालक मिटिंग
* प्रत्येक महिन्याचे स्वतंत्र मार्कलिस्ट
* विद्यार्थ्यांच्या गैरहजेरीचा पालकांना SMS
* मुला - मुलींसाठी स्वतंत्र अभ्यासिकेची सोय
* प्रत्येक विषयाला स्वतंत्र शिक्षक
* विविध स्पर्धापरीक्षांचे आयोजन व मार्गदर्शन
* तज्ञ व अनुभवी शिक्षकवृंद
* पार्किंगची स्वतंत्र व्यवस्था
* मर्यादित विद्यार्थी संख्या
* फक्त ४० विद्यार्थ्यांचीच एक बॅच
* विद्यार्थ्यांच्या शाळेनुसार बॅचेस
* प्रत्येक विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष
* पालकांशी नियमित संपर्क व समन्वय
* शिस्तबध्द व सुसंस्कारीत वातावरण
* इ. ५ वी व इ. ८ वी स्कॉलरशिपची स्वतंत्र बॅच
श्री भास्कराचार्य प्रतिष्ठान, कोल्हापूर विभाग
TRUSTED EXAM... ...TRUSTED SUCCESS
इयत्ता चौथी ते बारावीमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी
BHASKARACHARYA TALENT SEARCH EXAM.-2024
जिंका 1 कोटी ची बक्षिसे
BTS EXAM. 2024
प्रत्येक वर्गासाठी जिल्हानिहाय बक्षिसे
प्रवेश फी 100 ₹
* स्पर्धेचा दिनांक व वेळ *
Sunday
1st September 2024
At 11:00 am
* नियम व अटी लागू
* अधिक माहिती व नांव नोंदणीसाठी संपर्क *
7020060802
विद्यार्थ्यांची परिपुर्ण तयारी करुन प्रगतीची हमी देणारा एकमेव क्लास
प्रोजेक्टरव्दारे अध्यापनाची सोय
इ. ५ वी पासूनच CET/NEET/JEE सह Foundation ची तयारी
डिजीटल क्लासरुम
क्लासेसचा संपुर्ण परिसर CCTV च्या नियंत्रणाखाली
चाटे क्लास... यश हमखास !
चाटे क्लासेस म.गांधी शॉपिंग सेंटर, महाव्दार चौक, बार्शी.
8421455800
इ. ५ वी ते १० वी प्रवेश सुरु...

# बार्शीचा भगवंत देशात एकच



बार्शी ही भगवंताची नगरी! या शहराला बार्शी हे नाव कसे पडले? याचा धार्मिक, पौराणिक इतिहास पाहता बार्शी शहराचे पुरातन नाव 'द्वादशी क्षेत्र' असे आहे. 'द्वादशी' हा संस्कृत शब्द आहे. त्यास प्राकृत भाषेत 'बारस' हा शब्द आहे. यामुळे 'द्वादशी क्षेत्र' या मूळ नावापासून 'बारस-बारसपूर-बारसी-शेवटी बार्शी असे नाव प्रचलित झाले. याशिवाय बार्शी या नावाची उत्पत्ती आणखी दुसऱ्या प्रकारे झाली असावी असे सांगितले जाते. 'अंबरिष विजय' या ग्रंथात या नगरातील (१) भगवंत तीर्थ (२) लक्ष्मी तीर्थ (३) मल्लिकार्जून तीर्थ (४) उत्रेश्वर तीर्थ (५) संकेश्वर तीर्थ (६) भोगेश्वरी तीर्थ (७) बाळेश्वर तीर्थ (८) गणेश तीर्थ (९) नरसिंह तीर्थ (१०) एकविराई तीर्थ (११) काळभैरव तीर्थ आणि (१२) पंक तीर्थ या बारा पवित्र तीर्थांच्या अस्तित्वावरून 'बाराशिव' बारा पवित्र तीर्थे असलेले नगर! यावरुन रूपांतरीत 'बारसी-बार्शी' हे नाव पडले असावे. जसे बार्शीच्या शेजारचे 'धाराशिव' (उस्मानाबाद) तसेच 'बाराशिव' (बार्शी) असाही बार्शी नावाचा इतिहास असू शकतो.

बार्शी ही भगवंत भक्त राजा अंबरिषाची नगरी! ती आज भगवंताची बार्शी म्हणून सर्वत्र ओळखली जाते. पंढरपूरात जशी विठ्ठलाची आळवणी करताना ' पुंडलिक वरद-हरि विठ्ठल !' अशी भक्ती गर्जना केली जाते तशी बार्शीच्या भगवंताची 'अंबरिष वरद - श्री भगवंत !' अशी आळवणी केली जाते. बार्शीचे भगवंत मंदिर हे पुरातन मंदिर असून ते हेमाडपंथी सुबक बांधणीचे आहे. काही अभ्यासकांच्या मते भगवंत मंदिर इ.स. १३ व्या शतकापूर्वीचे असावे. कारण इ.स. १२४५ च्या दरम्यान या मंदिराची मूळ स्वरूपात रचना झाली आहे. तर मंदिरा समोरील लाकडी सभामंडप सुमारे दोनशे वर्षापूर्वी बांधला गेला असावा. या मंडपात गरूडाची सुबक अशी संगमरवरी मूर्ती शिल्पकलेचा एक उत्कृष्ट नमुना वाटावा अशी आहे. मंदिराच्या मुख्य मंडपात 'गरूडखांब' असून भक्तजन त्याला प्रेमाने अलिंगन देतात.

भगवंताचे मंदिर पुरातन असून श्री विष्णू भगवंत या नावाने ते सर्व भारतभर प्रसिध्द आहे. हे मंदिर देशात फक्त बार्शीतच आहे. येथील श्री भगवंताची चतुर्भुज मूर्ती शाळीग्राम पाषाणाची असून ती अत्यंत सुबक व आकर्षक अशी आहे. शंख, चक्र, गदा व पद्मधारी अशा मूर्तीच्या उजव्या हाताखालीच अंबरिष राजाची प्रतिमा (मूर्ती) कोरलेली असून भगवंताच्या पाठीशी श्रीलक्ष्मीची मूर्ती (मुखवटा) कोरलेली आहे.

याशिवाय मंदिराच्या दक्षिणे कडील ओवरीत अन्नपूर्णा देवी, श्री ज्ञानेश्वर महाराज, तुकाराम महाराज यांच्या मूर्ती असून मुख्य मंदिराच्या उत्तर दिशेस श्री दत्त मंदिर बांधण्यात आले आहे. तर उत्तरेकडील ओवरीत भक्तराज श्री जोगा परमानंदाची समाधी आहे. या जोगापरमानंदाचा तेराव्या शतकातील संतांच्या मालिकेत अंतर्भाव केल्याचे आढळून येते. महिपती बुवांनी त्यांचा उल्लेख आपल्या 'भक्ती विजय' ग्रंथात केला आहे. तेच संत विसोबा खेचरानी रचलेले अभंग लिहून काढण्याचे कार्य करत असत.

एकादशीला पंढरपूरात जाऊन चंद्रभागेत स्नान करणे, विठ्ठलाचे दर्शन घेणे, उपवास करणे आणि द्वादशीला बार्शीत येऊन 'अंबरिष वरद श्री भगवंताचे' दर्शन घेऊन द्वादशीचा उपवास सोडणे ही परंपरा गेली शेकडो वर्षे येथे चालत आहे. याशिवाय येथे प्रतिवर्षी वैशाख महिन्यात शुद्ध दशमी ते शुद्ध द्वादशी असा तीन दिवस भगवंत जयंतीचा सोहळा मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. याशिवाय पंढरपूर प्रमाणेच बार्शीतही चैत्र-आषाढ-कार्तिक आणि माघ महिन्याच्या एकादशीला भक्तमंडळी मोठ्या प्रमाणात येतात. भगवंताचे दर्शन घेतात.

भगवंत देवस्थानास श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनी सन १७६० मध्ये मंदिराच्या खर्चासाठी एक सनद दिली. तर सन १८२३ मध्ये ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीने आणि सन १८७४ मध्ये इंग्रज सरकारने भगवंत देवस्थानला सनद दिली आहे. याशिवाय पुण्यश्लोक साध्वी अहिल्यादेवी होळकरांनी सुध्दा मंदिरासाठी अर्थसहाय्य केल्याचे आढळून येते. येथील मंदिराची दैनंदिन व्यवस्था सुरुवातीपासून स्थानिक भगवंत देवस्थान कमिटी मार्फत केली जाते, तर सेवाधारी बडवे मंडळी वंशपरंपरेने भगवंताची नित्यनियमाने पूजाअर्चा करत आहेत.

येथे वर्षभर विविध उत्सव मोठ्या भक्तीभावाने साजरे होतात. शेगावच्या गजानन महाराजांच्या दिंडीप्रमाणे अनेक दिंड्या पंढरपूरला जाण्यासाठी बार्शीला येतात-जातात, मुक्काम करतात यामुळे बार्शी शहरात वारकऱ्यांचा मेळा भरल्यासारखे वाटते. ह.भ.प. बोधले महाराज गेली वीस वर्षे श्रावण महिन्यात महिनाभर प्रवचनाचे कार्य करत आहेत. येथे नियमितपणे अन्नदानाचा कार्यक्रम केला जातो. सर्व बार्शीकर जनता श्री भगवंत बार्शीकरांचे ग्रामदैवत म्हणून मोठ्या यात्रेप्रमाणे भगवंत जन्मोत्सव साजरा करतात. यामुळे भगवंत मंदिर आणि परिसर कायम भक्तीमय गर्दीने फुललेला असतो. बार्शीतील व्यापारी, उद्योजक, दानशूर यांच्या वतीने गेल्या कांही वर्षांपासून भगवंत महोत्सवाचे आयोजन केले जात आहे. यामुळे बार्शी हे धर्मपरायण शहर बनत आहे. या महोत्सवात विविध सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक विषयांवरील नाट्य कलाकृती सादर केली जात आहेत. यास समाजातून चांगला प्रतिसाद मिळत आहे.



-हरीभाऊ कोळेकर
दलितमित्र, बार्शी

सोलापूर तरुण भारतच्या वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा '
* शुभेच्छुक *
श्री. शिवाजी दगडू गलांडे,
श्री. तानाजी शिवाजी गलांडे,
ॲड. संभाजी शिवाजी गलांडे
३८४७, भवानी पेठ, बार्शी, जि. सोलापूर

दै. सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!
NOTARY Gov. of India
ॲड. प्रविण प. करंजकर
नोटरी (भारत सरकार)
मो. ९८२२०६५६६१
रघुकुल, पाटील प्लॉट, बार्शी जि. सोलापूर ४१३४०१

सोलापूर तरुण भारतच्या वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा !
Mob. : 9767833939
9673753939
* शुभेच्छुक *
ॲड. अमोल एन. अलाट
M.A.,LL.B.
अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी.
ऑफिस : शिवतेज, शिवाजी नगर, माऊली चौक, देशमुख प्लॉट, अलिपूर रोड बार्शी - ४१३४११, जि. सोलापूर.

सोलापूर तरुण भारतच्या वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा !
शशांक गुगळे मो.९८५०५५४१५४
दर्शन गुगळे मो.७३५००३३२९४
चांदमल ज्वेलर्स
सोने चांदीचे दागिन्याचे निर्माते व विक्रेते.
महावीर मार्ग, बार्शी, जि. सोलापूर
फोन : (०२१८४) २२३७८८ निवास : २२८०७२
चांदमल ट्रेडर्स, चांदमल फायनान्स, चांदमल चॅरिटेबल ट्रस्ट

दै. सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा
सुवर्ण महोत्सवी वर्षाकडे वाटचाल
सहकार महर्षी
कै.तात्यासाहेब देशमुख
।। विना सहकार नाही उद्धार ।।
सहकार क्षेत्रातील ७४ वर्षातील विश्वसनीय वाटचाल
नोंदणी क्र. व स्थापना - सी ११६९ दि. ८/३/१९४९
श्री भगवंत सहकारी पुरवठा मंडळी लि. बार्शी
२६३५, रुई ओळ, बार्शी जि. सोलापूर फोन : ०२१८४-२२२३१४
ठळक वैशिष्ट्ये :
१. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. डिलरशीप १९६५ पासून
२. बार्शी पेट्रोल पंप स्थापना सन १९६७ (५५ वर्षाची विश्वसनीय परंपरा)
३. रास्तभाव धान्य दुकान स्थापना १९७० पासून
४. जामगांव पेट्रोल पंप स्थापना २००७ (१५ वर्षाची विश्वसनीय परंपरा)
५. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. (वाहतुक कॉन्ट्रॅक्टर सन २००७ पासून)
६. शासकीय व निमशासकीय योजना तालुक्यात विश्वासाने राबविणारी संस्था
७. कमर्शियल इंडेन गॅस विक्री केंद्र २०१८ पासून
श्री. आनंद मो. कुलकर्णी - चेअरमन
श्री. उमेश शि. ठोंबरे- व्हा.चेअरमन
श्री. डॉ. बी. वाय. यादव - संचालक
श्री. नंदकिशोर ना. देशमुख- संचालक
श्री. रामचंद्र भ. गौरकर - संचालक
श्री . शब्बीर अ. तांबोळी - संचालक
श्री. अरुण त्र्यं. देशमुख - संचालक
श्री. चंद्रकांत ज. खाडे - संचालक
सौ. माधुरी सु. गोलकोंडा - संचालक
सौ. भावना भा. नाईकवाडी - संचालक
ॲड. राहुल अरुण देशमुख - संचालक
श्री. दिपक दत्तात्रय धेंडुळे - संचालक
श्री. रविंद्र मा. माचवे - व्यवस्थापक
सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वृंद

यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
सोजर कॉलेज ऑफ फार्मसी, खांडवी
Choice Code : 650482310/650482311T
पी.सी.आय.न्यु दिल्ली, महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त, एम.एस.बी.टी.ई. मुंबई व DBATU विद्यापीठ लोणेरे, रायगड संलग्नित
SOJAR COLLEGE OF PHARMACY
B. PHARMACY
शैक्षणिक पात्रता :
• १२ वी सायन्स उत्तीर्ण
• MHT CET आवश्यक
• PCB/PCM खुला गट ४५% व मागासवर्गीय ४०% गुण आवश्यक
कालावधी ४ वर्ष
D. PHARMACY
शैक्षणिक पात्रता :
• १२ वी सायन्स उत्तीर्ण
• PCB/PCM
कालावधी २ वर्ष
बार्शी तालुक्यातील सर्वात पहिले औषधनिर्माणशास्त्र व्यावसायिक महाविद्यालय प्रवेश देणे चालु आहे.
मागील शैक्षणिक वर्ष ५१ विद्यार्थ्यांचे यशस्वी प्लेसमेंट
कॉलेजची वैशिष्ट्ये :
• सुसज्ज इमारत • सुसज्ज ग्रंथालय
• अत्याधुनिक लॅबोरेटरी व कॉम्प्युटर लॅब • वैयक्तिक लक्ष
• कॉलेज बस ची सुविधा • शासनाच्या ई.बी.सी./स्कॉलरशिपची सुविधा उपलब्ध
• स्पर्धा परीक्षा व उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन (M.Pharm DPEE) Workshop Seminar चे आयोजन
• खाजगी व्यावसायिक कंपन्यांकडून (CSR Fund) शिष्यवृत्तीची सोय.
व्यावसायिक संधी
▪ स्वत:चे मेडिकल शॉप
▪ मेडिकल रिप्रेसेंटेटीव्ह
▪ हॉस्पिटल फार्मासिस्ट
▪ क्लिनिकल फार्मासिस्ट
▪ औषध कंपन्यामध्ये जॉब
▪ पुढील शिक्षण थेट द्वितीय वर्ष बी फार्मसी/एम. फार्मसी
अधिक माहितीसाठी खालील QR Code Scan करुन ग्रुप जॉईन करा.
For more details, please visit : www.sojarcop.edu.in
E-mail ID : soajrcop@gmail.com
Admissions Helpline No.
02184-297000, 9923332316, 8888178918, 9579868028
@SOJARPHARMACY
Sojar College of Pharmacy, Khandvi

# श्री भगवंत सहकारी पुरवठा मंडळी लि.,बार्शीची अमृत महोत्सवी वाटचाल

श्री भगवंत सहकारी पुरवठा मंडळी लि., बार्शी या संस्थेची स्थापना बार्शीतील नामवंत वकील व उद्योगपती कै. भगवंत उर्फ काकासाहेब सुलाखे यांनी ८ मार्च १९४९ रोजी केली. आजपावेतो संस्था ७५ व्या वर्षात दमदार पावलाने वाटचाल करीत आहे. याच संस्थेचे आधारस्तंभ म्हणून ज्यांचे नाव आजही आदराने घेतले जाते असे आपल्या सर्वांचे पितृतुल्य नेतृत्व म्हणजे सहकार तपस्वी कै. ल.ग. तथा तात्यासाहेब देशमुख. यांचा जन्म बार्शीतील सराफी व्यावसायिक देशमुख घराण्यात दि. १४ सप्टेंबर १९२९ रोजी झाला व त्यांनी बार्शी शहरात जुन्या मॅट्रीक हे शिक्षण पूर्ण करुन वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी त्यांनी श्री भगवंत सहकारी या संस्थेत कै. काकासाहेब सुलाखे व कै. नानीवडेकर यांचे मार्गदर्शनाखाली कामास सुरुवात केली. लहान वयातच प.पू. गोळवलकर गुरुजी, स्वामी विवेकानंद, रमण महर्षी इ. सत्पुरुषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा एक साधा लहान स्वयंसेवक म्हणून व भगवंत सहकारीची नोकरी सांभाळून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम सतत चालू ठेवले. भगवंत सहकारी संस्था ही आपले कुटुंबच आहे असे समजून संघाची अंगात असलेली शिस्त व कै. काकासाहेब सुलाखे व कै. नानी वडेकर यांचे व्यवसाय चातुर्याच्या मार्गदर्शनाच्या जोरावर त्यांनी या संस्थेचे सर्व सूत्रे सन १९६० साली एकहाती घेवून संस्थेचा कारभार यशस्वीपणे सुरु केला.

संस्थेच्या माध्यमातून विविध उद्योग व्यवसाय व प्रयोगशील उपक्रम राबवून संस्था हाच माझा प्रपंच अंगीकारुन ब्रह्मचर्य व्रत स्वीकारले. त्यांचे बोलण्यातील स्पष्टपणा व व्यवसाय चातुर्य या बळावर त्यांनी संस्थेचे नांव सहकार क्षेत्रात पूर्ण महाराष्ट्र राज्यात परिचित करुन दिले. श्री भगवंत सहकारी या संस्थेचे सन १९६७ साली ग्राहक सहकारी संस्थेत रुपांतर करुन इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. यांची डिझेल, पेट्रोल व केरोसीनची डिलरशीप मिळवून सोलापूर, उस्मानाबाद व लातूर या जिल्ह्यात व्यवसाय सुरु केला. तसेच किराणा भुसार, वह्या वितरण, सिमेंट, रासायनिक खते, प्रिटींग प्रेस, आईल मिल, दाळ कारखाना, यंत्रमाग व्यवसाय, दूध डेअरी, पतसंस्था, भगवंत बझार, शासनामार्फत बार्शी तालुक्यात कडबा तगाई, मोफत गहू वाटप केंद्र, प्रौढ शिक्षण केंद्र इत्यादी अनेक व्यवसाय ना नफा ना तोटा या भावनेतून सामाजिक बांधिलकी म्हणून चालू ठेवले होते.

सहकाराच्या माध्यमातून सामाजिक ऋण फेडता येत नाही म्हणून भारतीय संस्कार केंद्र या न्यासाची १९७४ साली स्थापना करुन अनेक सामाजिक शैक्षणिक व धार्मिक कार्यक्रम त्यांनी यशस्वीपणे राबविले व जनसामान्यपर्यंत संस्थेची ओळख निर्माण करुन दिली. संस्थेची वार्षिक उलाढाल २५ ते ३० कोटीपर्यंत नेवून संस्था कायम नफ्यात ठेवून व ऑडीट वर्ग 'अ' ठेवून संस्थेच्या सभासद व ग्राहक व हितचिंतकांसाठी अनेक उपक्रम राबवून त्यांचा फायदाच करुन दिलेला आहे. त्यामुळे आजही महाराष्ट्रात सहकार क्षेत्र किंवा धार्मिक क्षेत्र असो त्यामध्ये आजही कै. तात्यासाहेबांचे नावाचा उल्लेख आदराने केला जातो.

कै. तात्यासाहेब यांचे निधन २२ जून २०११ रोजी वयाच्या ८२ व्या वर्षी वार्धक्यामुळे झाले व संस्था आधारहीन झाली. कै. तात्यासाहेब यांचे अंगी असलेल्या नेतृत्व गुणामुळे आज भगवंत सहकारी संस्थेची ७५ व्या वर्षाकडे वाटचाल सुरु आहे. कै. तात्यासाहेब यांचे नेतृत्वाखाली झालेली संस्थेची ६२ वर्षांच्या कामाची दखल घेवून महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याने २०१२ साली संस्थेस 'आदर्श संस्था' हा पुरस्कार प्रदान केलेला आहे.

कै. तात्यासाहेब यांचे निधनानंतर संस्थेवर सन २०१३ साली आलेल्या आपत्कालीन परिस्थितीमुळे संस्थेच्या बाबतीत राज्यभर अफवा, गैरसमज व संस्थेच्या कामकाजात अनेक हितचिंतकांनी निर्माण केलेले अडथळे यावर संस्थेच्या आजी, माजी संचालकांनी व सेवक वर्गाने एकत्रित बसून कै. तात्यासाहेब यांनी एवढ्या कष्टाने उभारलेली संस्था बंद पडू नये म्हणून प्रयत्न करुन एकविचाराने सन २०१४-१५ मध्ये संस्थेचे सर्व व्यवहार सुरळीत चालू केले असून संस्थेची सन २०२१ अखेर उलाढाल १२ ते १३ कोटींची असून संस्था सध्या 'अ' वर्गात आहे. तसेच सभासदांसाठी अनेक उपक्रम राबवून दरवर्षी सभासदांना लाभांश वाटप करीत आहे. महाराष्ट्रामध्ये सहकाराची चळवळ सर्व सामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम करणाारी सहकार भारती या संस्थेने महाराष्ट्र राज्यभर सहकार चळवळीत निस्वार्थ बुद्धिने केलेल्या कामाची पावती म्हणून सहकार महर्षी या पुरस्काराची सहकार तपस्वी कै. तात्यासाहेब देशमुख यांच्या कार्याची दखल घेऊन सहकारमहर्षी या ग्रंथात स्थान दिल्यामुळे पुढील पिढीस संस्थेस निस्वार्थ बुद्धिने काम केलेची आठवण कायम राहील.




तरुण भारत
वर्धापन दिनास
मन:पूर्वक शुभेच्छा !
कर्मवीर लोहोकरे गुरुजी
द्रष्टे समाज सुधारक
छत्रपती शिवाजी महाराज
जाणता राजा

✻ कार्यकारी विश्वस्त मंडळ ✻

| | | |
|---|---|---|
| श्री. विनायकराव गणपतराव गरड | -- | अध्यक्ष |
| श्री. बळवंतराव केशव पाटील | -- | उपाध्यक्ष |
| श्री. मदनलाल गुलाबचंद खटोड | -- | खजिनदार |
| श्री. पंडितराव जनार्धन लोहोकरे | -- | सचिव |
| श्री. अरुण रामराव भड | -- | सह सचिव |
| श्री. अनिल माणिकराव गरड | -- | संचालक |
| श्री. जीवन रामदास लोहोकरे | -- | संचालक |
| श्री. वसंत त्रिंबकर काकडे | -- | संचालक |
| श्री. डॉ. संतोष इंद्रसेन भड | -- | संचालक |
| श्री. अक्षय अशोक भड | -- | संचालक |
| श्री. महेश दत्तात्रय पाटील | -- | संचालक |
| श्री. मधुकांत विनायकराव गरड | -- | संचालक |
| श्री. विलास गजेंद्र लोहोकरे | -- | संचालक |
| श्री. चव्हाण अरविंद तुकाराम | -- | संचालक |
| श्री. अनिल धनाजी पाटील | -- | संचालक |
| श्री. डॉ. विवेकानंद पोपट पाटील | -- | संचालक |

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ
सर्व संचालक, सर्व शाखाप्रमुख व कर्मचारी वृंद
गौडगांव, ता. बार्शी



दैं. तरुण भारत वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !!


ॲड. राहुल अरुण देशमुख
बी.ए. (ऑ.) एल.एल.बी.
सल्लागार, स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा-बार्शी
सल्लागार, सोलापूर जनता सहकारी बँक लि., शाखा-बार्शी
संचालक, श्री भगवंत सह. पुरवठा मंडळी लि., बार्शी
फर्म :
श्री रेणुका उद्योग, बार्शी.
श्री रेणुका कॉम्प्लेक्स
श्री रेणुका ॲग्री फर्म
मो. ९४२२३९६१११,८८३०५९९८३१
अलिपूर रोड, बार्शी, जि. सोलापूर



श्री अंजना नर्सरी
आमच्याकडे उत्तम दर्जाचे खजुर व ड्रॅगन फ्रूट चे रोपे मिळतील

रेग्युलर रेड ड्रॅगन फ्रूट
C-रेड ड्रॅगन फ्रूट
येलो ड्रॅगन फ्रूट
व्हियेतनाम रेड/व्हाइट
बेसिक खजुर
आजच संपर्क करा...
राजेंद्र देशमुख:- 9422042400 / 7020205028
पत्ता:-अजंना बाग नर्सरी, घोरओढा, उड्डाण पुलाच्या पुढे, सोलापुर रोड,बार्शी



मा. सभापती शिक्षण मंडळ, बार्शी.
दै. तरुण भारत
वर्धापनदिना निमित्त
हार्दिक शुभेच्छा!

रजि. नं. MAH/4402/2007
ॲड. महेश अशोक जगताप
B.Sc., LL.B.
मा. नगरसेवक, बार्शी नगरपालिका
मा. ॲड. महेश जगताप मित्रमंडळ, बार्शी.



दैंनिक तरुण भारत सोलापूर
हार्दिक शुभेच्छा
वर्धापन दिनास
शुभेच्छुक
श्री. दिनेशसिंह परदेशी
सरपंच, उत्रेश्वर देवस्थान, बार्शी
JDP Krushi Urja
Manufacturer of white Coal
ऑफिस - जावळी प्लॉट, सुभाषनगर, आगळगाव रोड, बार्शी - ४१३४०१, जि. सोलापूर
फॅक्टरी - मु.पो.ताडसौंदणे, ता. बार्शी, जि. सोलापूर.
फोन - (०२१८४) : २२३०८८, मो.९४२२४५८७३४.


## आपले दैंनिक...!

संस्कारांचा, संस्कृतीचा, जागर म्हणजे आपले दैनिक!
सद्विचार अन् नैतिकतेचा, सागर म्हणजे आपले दैनिक!

देशावरती, धर्मावरती,निस्सीम श्रद्धा, आपले दैनिक!
आदर्श आणिक व्यवहाराचा, संगम सुध्दा आपले दैनिक!

सवंगतेला, प्रलोभनांना, बळी न पडते आपले दैनिक!
सत्यासाठी निर्भयतेने, अविरत लढते आपले दैनिक!

राष्ट्रघातकी अविचाराला, निष्प्रभ करिते आपले दैनिक!
घनांधकारी दिवा लावते,दिशा दाविते, आपले दैनिक!

देशरक्षणा समरभूमीवर, जसा झुंजतो आपला सैनिक!
वैचारिक रणभूमीवरती, तसेच ठाके आपले दैनिक!


समाजातल्या सज्जनतेला, देत दिलासा आपले दैनिक!
सुजाण ऐशा प्रत्येकाला,खरेच वाटे ' आपले ' दैनिक!

देवभक्तीचे देशभक्तीचे, तुम्ही घेतले असिधारा व्रत!
वाढदिनाच्या ह्याच शुभेच्छा, वर्धिष्णू हो तरुण भारत!

\- मुकुंदराज पं. कुलकर्णी




माधवबाग™ बार्शी । धाराशिव
३० च्या पुढे वय, चालताना दम/धाप, मधुमेह (शुगर), उच्च रक्तदाब (बी.पी.), वाढलेले वजन किंवा कोलेस्टेरोल, पायांवर सूज, अशी लक्षणे असतील किंवा यापूर्वी हार्ट अटॅक येऊन गेला असेल, अँजिओग्राफी-अँजिओप्लास्टी-बायपास झाली असेल अथवा करुन घेण्याचा सल्ला मिळाला असेल, स्ट्रेस टेस्ट (TMT) पॉझिटिव्ह आली असेल तर आजच बार्शी किंवा धाराशिव क्लिनिकला तपासणी करुन घ्या व योग्य मार्गदर्शनानंतर तणावमुक्त आयुष्य जगा.
व्याधीनुसार आहाराचे डायट बॉक्सेस

Swasthyam
Prameha
GOBIPI
REVERSE
माधवबाग च्या संपूर्ण हृदय शुद्धीकरण थेरपीज©
SHS
आम्ही फक्त हृदयविकाराचा उपचार करत नाही, तर त्याला परतवून लावतो.

डॉ. क्रांती कोळी
डॉ. पवन कोळी
बार्शी व धाराशिव शाखेची ठळक वैशिष्ट्ये
- २०१४ पासून बार्शी व २०१८ पासून धाराशिव येथे अखंड सेवा.
- पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र पंचकर्म विभाग आणि प्रशिक्षित थेरपीस्ट.
- आजारानुसार रिसर्च व इविडन्स बेस्ड डायट बॉक्सेस व पंचकर्म थेरपीज.
- हृदयाचा रक्तपुरवठा व $VO_2Max$ दर्शवणारी कम्प्युटराईज्ड स्ट्रेस टेस्ट.
- डॉ. क्रांती व डॉ. पवन कोळी यांचे रिसर्च पेपर्स देश विदेशातील नामांकित हेल्थ जर्नल्स मध्ये प्रकाशित.
- पेशंट इम्प्रुव्हमेंटसाठी विविध पुरस्कारांनी सन्मानित क्लिनिक्स.

सुसज्ज पंचकर्म विभाग

डॉ. रोहित साने यांच्याहस्ते पुरस्कार स्वीकारताना
FOLLOW US :
नुतन हॉस्पीटलची नियोजित खवास्तू

छत्रपती कॉलनी, बाळेश्वर नाका, कुर्डूवाडी रोड, बार्शी
7276519111 / 8605191110
प्रसाद कॉलनी, माणिक चौक, DIC रोड, धाराशिव
7796519111 / 8975191110



दै. तरुण भारत
वर्धापनदिना निमित्त
हार्दिक शुभेच्छा!

मा. श्री. विजय (नानासाहेब) राऊत
अध्यक्ष, मॉर्निंग सोशल फाऊंडेशन
३८०९, राऊत चाळ, बार्शी.
शुभेच्छुक : मॉर्निंग सोशल फाऊंडेशन सर्व सदस्य, बार्शी.



दै. तरुण भारत
वर्धापनदिना निमित्त
हार्दिक शुभेच्छा!

करण बारंगुळे
Mo.9623200525
7068651212
फॅमिलीसाठी स्वतंत्र व्यवस्था
अदयावत आरामदायी व प्रशस्त बैठक व्यवस्था
अदयावत झोपडी (हट) प्रशस्त बैठक व्यवस्था
स्वतंत्र ए.सी. हॉल. प्रशस्त बैठक व्यवस्था
हॉटेल वैशाली
- नविन मॅनेजमेंट व्यवस्थेसह
- परमीट रुम,बिअर बार,
- व्हेज नॉनव्हेज जेवण,
- अद्ययावत साऊंड सिस्टीमसह प्रोजेक्टर,
- फॅमिलीसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था
बार्शी शहरापासून जवळच....
परमीट रुम & बिअर बार
बार्शी-कुर्डूवाडी रोडवर
(बार्शी पासून ३ कि.मी.अंतरावर)



दै. तरुण भारत
वर्धापनदिना निमित्त
हार्दिक शुभेच्छा!

डॉ. सागर राजाराम कांबळे
आखिल भारतीय विद्यार्थी परिषद

श्री. आकाश राजाराम कांबळे
जिल्हा उपाध्यक्ष भाजपा - प्रज्ञा सेल

# गिरणगाव ते स्मार्ट सिटी प्रवासातील सोलापूर महापालिकेचा इतिहास

**स्वातंत्र्यपूर्व काळापासून गिरणगाव अर्थात सोलापूरचे महत्त्व भारताच्या इतिहासात अद्वितीय आहे. स्वातंत्र्यलढ्यात सोलापूरचे योगदान महत्त्वपूर्ण असे आहे. सोलापूर पालिकेला स्वातंत्र्य लढ्याचा जाज्वल्य व क्रांतिकारी असा इतिहास आहे. सोलापूर शहरालाही स्वातंत्र्य लढ्याचा क्रांतिकारी जाज्वल्य इतिहास आहे. महापालिकेच्या स्थापनेपासून एकूण ६० वर्षाच्या कार्यकाळात सोलापूर शहराचा चेहरा मोहरा बदलला आहे. पर्यावरणपूर्वक सुशोभीकरणातून नवा लूक दिला जातोय. १८५२ ते १९६४ पर्यंत नगरपालिका आणि त्यानंतर आजतागायत महानगरपालिका नगर विकासात अखंडपणे कार्यरत आहे. या कार्यकाळात गिरणगाव ते स्मार्ट सिटी अशा प्रवासात सोलापूर शहरात अमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येते. स्मार्ट सिटी म्हणून ओळख होत असली तरीही संपूर्णपणे मूलभूत समस्या सुटली नसल्याचे चित्र आहे.**





किरण बनसोडे

मो. ९८२२६१६१४१

सोलापूर ही पूर्वी १८७४ पर्यंत उतार पेठ म्हणून ओळखली जायची. त्यानंतरच्या काळात सोलापूर स्पिनिंग अँड विविंग मिलसह (जुनी मिल) अनेक गिरण्या स्थापन झाल्या. हजारो गिरणी कामगार कार्यरत होते, तेव्हापासून सोलापूरला गिरणगाव अशी ओळख निर्माण झाली आणि आता स्मार्ट सिटी म्हणून ओळख होऊ पाहत आहे. सोलापूर महापालिकेचा इतिहास महत्त्वपूर्ण असा आहे.

सन १८५१च्या दरम्यान सोलापुरात विविध नागरी समस्यांनी आणि मूलभूत सोयी सुविधा अभावी सोलापूरकर त्रस्त झाले होते. या सोयी सुविधा मिळाव्यात. सुधारणा व्हाव्यात अशी सोलापूरकरांची भावना होती. मि. एन्व्हारारिटी व मि. लॉफनन या तत्कालीन दोन कलेक्टरांच्या प्रोस्ताहनातून सन १८५०च्या अॅक्ट २६ नुसार स्थानिक गैरसोयी दूर करण्यासाठी सरकारकडे सोलापूर शहरातील १७२ नागरिकांनी नगरपालिका स्थापनेची अर्जाद्वारे मागणी केली. शहरातील रहिवाशांना पाण्यासाठी केवळ तलावावर अवलंबून राहावे लागते ज्या खोडवीने तलावास पाणी येते. त्याचे बांध फुटले आहेत. त्यामुळे तलावास पुरेसे पाणी येत नाही. तलाव गाळाने भरला आहे. हे जर थांबवले नाही तर नागरिकास व जनावरास बहुत दुःख होईल. रस्ते, बोळ गल्ली यांची दुरुस्ती नसल्यामुळे आणि पावसाळ्यात गलिच्छ स्थितीत असल्यामुळे रस्त्याने जाणे मुश्किल होते. त्याची दुरुस्ती होणे जरुरीचे आहे. दुसरी महत्त्वाची अडचण म्हणजे एकाच तलावातून पाणी न्यावे लागते. नळाने पाणी आणून शहरात ठीक ठिकाणी हौद बांधल्यास जनतेस बहुत सुख लाभेल. त्यामुळे अशा प्रकारच्या सुधारणा करण्याची आमची इच्छा आहे, असा आशय असलेला अर्ज दि. २८ ऑगस्ट १८५१ रोजी बापूजी कृष्ण व इतर १७२ सोलापूर करांच्या स्वाक्षरीने सरकारला देण्यात आला होता. रस्ते पाणीपुरवठा आणि आरोग्य याबाबत अशी सोय करावा की जनतेस बहुत सुख लाभेल, अशी महत्त्वाची मागणी तत्कालीन नागरिकांनी केली होती.

दरम्यान, दि. १ ऑगस्ट १८५२ रजी सोलापूर नगरपालिकेची स्थापना करण्यात आली. सोलापूर नगरपालिकेची पहिली सभा ३ ऑगस्ट १८५२ रोजी कलेक्टर कचेरीतील एका हॉलमध्ये भरवण्यात आली होती. नगरपालिकेचे कार्यालय मंगळवार पेठ येथे होते मात्र नगरपालिकेची सभा कलेक्टर कचेरीतच होत होती.



### मंगळवार पेठेतील काशीबाई शेटे यांचा वाडा ते कौन्सिल हॉल

नगरपालिकेची स्वतःची मालकीची इमारत नसल्याने सुरुवातीला मंगळवार पेठेत काशीबाई शेटे यांच्या वाड्यात सहा खण सोपा व सहा खण माडी अशी बारा खण जागा दरमहा रुपये पाच रुपये भाड्याने घेण्यात आली होती. तत्कालीन कचेरीची वेळ सकाळी १० ते सायंकाळी ५ अशी ठरवण्यात आली होती. वेळ समजण्यासाठी व वालुका यंत्र ठेवण्यात आले होते. त्यानंतर पुढे नवी पेठ येथील दगडी इमारतीमध्ये नगरपालिकेचे कामकाज सुरू झाले. तिथून इंद्रभुवन इमारत आणि पुढे कै. यशवंतराव चव्हाण सभागृह (कौन्सिल हॉल) असा महापालिका कामकाजाचा प्रवास झाला आहे.

### चंदनी अत्तर लावून सभासदांना दोन पानाचे विडे दिले जात

नगरपालिकेच्या सभेवेळी प्रत्येक सभासदास दोन पानाचे विडे दिले जात होते आणि सभेच्या शेवटी चंदनी अत्तर लावून गुलाब पाणी शिंपडण्यात येत असे. प्रत्येक सभेस विड्यांची सहाशे पाने व इतर सामान अंदाजे लागत होते. पान सुपारीचा खर्च नगरपालिकेमार्फत केला जात होता. कलेक्टर कचेरीतील इतर अधिकारी, कारकून, पट्टेवाले त्याचबरोबर उपस्थित लोकांनाही पान सुपारी दिली जात असे.

१८५२साली सभासद संख्या १३ होती. १८५२ ते १८८३ या काळात शासन नियुक्त सभासद होते. त्यात अधिकारी व प्रतिष्ठित नागरिकांचा समावेश होता. १८८३मध्ये नगरपालिकेची प्रथमच निवडणूक झाली. नागरिकांनी मतदानाद्वारे निवडलेले १२ तर शासनाने नेमलेले १४ असे २६ सभासद या नव्या नगरपालिका मंडळात होते. ऑगस्ट १८८५ रोजी पहिल्या लोकनियुक्त नगराध्यक्षांची निवड झाली. राव बहादूर आप्पाजी देगावकर हे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष ठरले. सन १९४७ मध्ये ''नगरसेवा हीच ईश सेवा'' हे नगरपालिकेचे ब्रीदवाक्य सर्वांमध्ये संमत करण्यात आले.

दरम्यानच्या काळात सोलापूर नगरपालिकेचा कारभार (सध्याच्या नवी पेठ येथील प्राथमिक शिक्षण मंडळ) स्वतःच्या दगडी बिल्डिंगमध्ये सुरू झाला. त्यानंतर एक मे १९६४ रोजी नगरपालिकेचे महानगरपालिकेमध्ये रूपांतर झाले. महानगरपालिकेचा कारभार इंद्रभुवन इमारतीतून सुरू झाला. सन १९९८ पासून महापालिका आवारातील कै. यशवंतराव चव्हाण कौन्सिल हॉल या वास्तूत सभेचे काम सुरू झाले. सध्या कौन्सिल हॉल, इंद्रभुवन आणि प्रशासकीय इमारत अशा तीन वास्तूंमधून महापालिकेच्या कारभाराचा गाडा चालवला जातो.

### पारतंत्र्यात नगरपालिकेवर फडकविले राष्ट्रीय निशाण

दि. ६ एप्रिल १९३० रोजी सोलापूर नगरपालिकेवर राष्ट्रीय झेंडा फडकवण्यात यावा असा ठराव करण्यात आला. त्यानुसार देशभक्त अण्णासाहेब भोपटकर यांच्या हस्ते सध्याच्या नवी पेठ येथील नगरपालिकेच्या इमारतीवर राष्ट्रीय निशाण फडकवण्यात आले. पारतंत्र्यातही दि. ९ ते १२ मे १९३० दरम्यान सोलापूरकरांनी स्वातंत्र्य उपभोगले. आक्रमक क्रांतिकारी लढा उभारल्याने ब्रिटिशांनी सोलापुरात मार्शलला पुकारला. मार्शल लॉच्या काळात नगरपालिकेवर उभारण्यात आलेले राष्ट्रीय निशाण उतरावे असे फर्मान ब्रिटिश अधिकाऱ्यांनी सोडले मात्र त्याला न जुमानता सभासदांनी सर्वानुमते केलेली कृती त्यांच्या संमतीशिवाय मी मागे घेऊ शकत नाही असे बाणेदार उत्तर देऊन निशाण उतरवण्यास तत्कालीन नगराध्यक्ष माणिकचंद शहा यांनी स्पष्ट नकार दिला. असा हा क्रांतिकारी इतिहास आहे. आजही ही वास्तू सर्वांना प्रेरणा देत आहे.

सन १९६४ पासून सोलापूर महानगरपालिकेच्या साठ वर्षाच्या या कालखंडात आतापर्यंत ३७ महापौर व ३६ उपमहापौर झाले. महापौरपदावर तीन जणांची बिनविरोध निवड झाली. महापालिकेत महापौरपदी एकूण ७ महिला विराजमान झाल्या आहेत तर ६ महिलांना उपमहापौर पदाचा मान मिळाला आहे.महापालिकेचे एकूण ३.५ हजार कर्मचारी व अधिकारी मिळून महापालिकेच्या कारभाराचा गाडा ओढत आहेत.

दि. १ ऑगस्ट १८५२ रोजी स्थापन झालेल्या सोलापूर नगरपालिकेचे १ मे १९६४ मध्ये महापालिकेत रूपांतर झाले. महापालिका स्थापनेला साठ वर्षे पूर्ण होत आहेत. या साठ वर्षाच्या कार्यकाळात महापालिका प्रशासन सोलापूर शहर आणि एकूणच कार्यपद्धतीमध्ये फार मोठा बदल झाला असल्याचे दिसून येते.

### अद्याप न सुटलेला पाणी प्रश्न

भौतिक सुधारणा प्रकर्षाने झाल्या आहेत मात्र गेल्या वीस वर्षात दररोज पाणी पुरवठ्याची अपेक्षापूर्ती झाली नाही. निवडणुकीचा मौसम आला की नेहमीच आणि दररोज पाणीपुरवठ्याचं गाजर राजकीय धोरणी आणि लोकप्रतिनिधींकडून दाखवले जाते. आतापर्यंत अनेक पाणीपुरवठा योजना राबवल्या मात्र अद्यापही न सुटलेला प्रश्न म्हणजे पाणीपुरवठा हा होय. आजही हा पाण्याचा प्रश्न संपूर्णपणे सुटला नाही.

सोलापूर पालिकेला स्वातंत्र्य लढ्याचा जाज्वल्य व क्रांतिकारी असा इतिहास आहे. दरम्यान, सोलापूर महानगरपालिकेच्या स्थापनेपासून ते आतापर्यंत साठ वर्षाच्या कार्यकाळात महिला महापौर, उपमहापौर यांचे योगदान महत्त्वपूर्ण असेच ठरले आहे. शेवटचे नगराध्यक्ष पारसमल जोशी हेच पहिले महापौर झाले. त्या -त्या कार्यकाळात महिला महापौर व उपमहापौरांनी आपापल्या कामाचा वेगळा ठसा उमटविला आहे. सन१९६४ ते २०२२ पर्यंत एकूण ३७ महापौर झाले. त्यामध्ये सात महिला महापौर यांना संधी मिळाली. याच कार्यकाळात एकूण ३६ उपमहापौर झाले. त्यापैकी सहा महिला उपमहापौर झाल्या आहेत. पहिले उपमहापौर एन. एम. वडवान हे सर्वाधिक कालावधीसाठी (१९६४-७०) पदावर होते. सोलापूर महापालिकेत महिला पदाधिकारी व अधिकाऱ्यांचे योगदान मोलाचे ठरले आहे.

महाराष्ट्र शासनाने सोलापूर महापालिकेसाठी दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी आकृतीबंध मंजूर केला. या आकृती बंधानुसार महापालिकेत ४ हजार ६१२ पदे मंजूर करण्यात आली. मंजूर आकृतीबंधानुसार आवश्यक ती पदे सोलापूर महापालिका प्रशासनात उपलब्ध नाहीत. मंजूर पदांपैकी ३ हजार ३९० कर्मचारी व अधिकारी कार्यरत आहेत उर्वरित १ हजार १२५ म्हणजेच सुमारे २५ टक्के कर्मचारी व अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. अपुऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांवर सोलापूर शहराचा कारभार चालला आहे. सहाय्यक आयुक्तांची १२ तर रिक्त आहेत. एकूण अ, ब, क, ड या चारही वर्गातील सुमारे १ हजार १२५ पदे रिक्त आहेत.

दरम्यान, सोलापूर शहरात स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत सुमारे ६०० कोटींची कामे झाले. मात्र, यातील अनेक प्रकल्प देखभाल दुरुस्ती अभावी बंद असल्याचेच दिसून येते. तर उजनी सोलापूर दुहेरी जलवाहिनी हा महत्त्वपूर्ण प्रकल्प सध्या मार्गी लागत आहे. साधारणता: ७०० कोटी रुपयांचा हा प्रकल्प आहे. अमृत २ योजनेअंतर्गत ड्रेनेज आणि जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी निधी मंजूर आहे. निविदा प्रक्रिया सुरू आहे. उड्डाण पुलाचे काम हे रखडले आहे.

सध्या शहराला चार ते पाच दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. विमान सेवा सुरू करण्यासाठी शर्तीचे प्रयत्न असून विमानतळ येथील धावपट्टीचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. गिरणगाव म्हणून ओळख असलेल्या या शहराला मात्र औद्योगिक दृष्ट्या गती मिळू शकली नाही. यामुळे बेरोजगारीचे प्रमाण अधिक असून स्थलांतरही मोठ्या प्रमाणात आहे. रस्ते महामार्गाचे मोठे जाळे निर्माण झाले आहे.

### आजची आणि कालची परिवहन बस सेवा

सोलापूर शहरातील नागरिकांना बस सेवा सुरू करावी यासाठी शर्तीचे प्रयत्न झाले अखेर दि. १० जानेवारी १९४९ पासून म्युनिसिपालिटीच्या मालकीची बस सेवा सुरू करण्यात आली. त्यावेळी सुरुवातीला १५ बसेस उपलब्ध होत्या. आज ७५ वर्षानंतर महापालिका परिवहन सेवेचा आढावा घेतला असता मधल्या काळात दमदारपणे चालणारी परिवहन सेवा आज डबघाईला आली आहे. आमदनी अठन्नी आणि खर्चा रुपया अशी स्थिती या उपक्रमाची झाली आहे. सध्या सोलापूर शहरात १४ लाख लोकसंख्येसाठी केवळ २८ बसेस मार्गावर धावत असल्याचे दिसून येते. यापूर्वी केंद्र शासनाच्या जे एन एन यु आर एम योजनेअंतर्गत मिळालेल्या सुमारे २०० बसेस सदोष असल्याच्या कारणाने बंद अवस्थेत पडून आहेत. आता पुन्हा नव्याने केंद्र शासनाच्या योजनेतून १०० ई बसेस मंजूर झाले आहेत. महापालिका परिवहन उपक्रम या येणाऱ्या नव्या बसेस कशा पद्धतीने चालवतात, यावरच त्याचे भवितव्य अवलंबून आहे अन्यथा येरे माझ्या मागल्या हे ठरलेलेच!

### तीन महापौर झाले बिनविरोध

महापालिकेच्या इतिहासात फक्त तीन महापौर बिनविरोध निवडले गेले. मागासवर्गीय प्रवर्गातील पहिले महापौर होण्याचा मान दलितमित्र भीमराव जाधव गुरुजी (१९७४-७५) यांना मिळाला. मुस्लिम समाजाचा पहिला व्यक्ती महापौरपदासाठी उभा असल्याने विरोधकांनी उमेदवार उभा केला नाही. त्यामुळे युन्नूस शेख (१९७५-७६) यांचीही बिनविरोध निवड झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून अनुसूचित जाती प्रवर्गातील मुरलीधर पात्रे (१९९०-९१) यांची बिनविरोध निवड झाली होती.

### पहिल्या महिला महापौर म्हणून शेवंताबाई पवार यांना मान

सोलापूर शहराच्या पहिल्या महिला महापौर म्हणून शेवंताबाई पवार यांना मान मिळाला. दरम्यान, मार्च २०१२ ते मार्च २०२२ या दहा वर्षाच्या कार्यकाळात अलका राठोड, प्रा. सुशीला आबुटे , शोभा बनशेट्टी, श्रीकांचना यन्नम या चार महिला महापौरांनी सलग कारभार सांभाळला. सन २०१७ ते २०१९ या कालावधीत महापौर आणि उपमहापौर या दोन्हीही महिला होत्या. त्यावेळी शोभा बनशेट्टी या महापौर तर उपमहापौर शशिकला बत्तुल होत्या.

### महापौर व उपमहापौरपदी या मान्यवर महिलांना मिळाली संधी

सोलापूर महापालिकेत आतापर्यंत ७ महापौर व उपमहापौरपदी ६ मान्यवर महिलांना संधी मिळाली. महापौरपदी शेवंताबाई पवार (सन १९९७- ९८), नलिनी चंदेले (२००२- ०५), अरुणा वाकसे(२००७-०९), अलका राठोड(२०१२-१४), प्रा. सुशीला आबुटे(२०१४-१७), शोभा बनशेट्टी (२०१७-१९) व श्रीकांचना यन्नम (२०१९ -२२) या विराजमान झाल्या होत्या. तर उपमहापौर म्हणून प्रा. नसीमा पठाण(१९७६-७७), सुषमा घाडगे(१९९२-९३), फातिमा शेख(१९९४-९५), महानंदा भोसले(१९९८-९९), सुमन मुदलियार (मार्च १९९९- ऑगस्ट १९९९), शशिकला बत्तुल(२०१७-१९) यांनी कारभार पाहिला.

### पहिल्या महिला आयुक्त म्हणून शितल तेली - उगले ठरल्या मानकरी

सोलापूर महापालिकेत साठ वर्षाच्या कार्यकाळात आत्तापर्यंत एकूण तीन वेळा प्रशासकीय राजवट होती. या प्रशासकीय राजवटीत आतापर्यंत एकूण सात प्रशासक तथा आयुक्तांनी कारभार पाहिला आहे. आठवे प्रशासक म्हणून सध्या शितल तेली-उगले या कार्यरत आहेत. शितल तेली-उगले या सोलापूर महापालिकेच्या पहिल्या महिला आयुक्त तथा प्रशासक ठरल्या आहेत.

### आठव्या प्रशासक म्हणून शितल तेली-उगले यांच्याकडे कारभार !

सोलापूर महापालिकेवर विविध कारणास्तव तीन वेळा प्रशासकीय राजवट लागू करण्यात आली. यापूर्वीच्या दोन प्रशासकीय राजवटीत एकूण ६ प्रशासकांनी कार्यभार सांभाळला. लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ संपल्याने लागू केलेल्या सध्याच्या तिसऱ्या प्रशासकीय कारकीर्दीला २ वर्ष पूर्ण झाले आहे. आत्तापर्यंत आठव्या प्रशासक म्हणून शितल तेली - उगले या सध्या प्रशासकीय जबाबदारी सांभाळत आहेत.

दि. १ जून १९६७ ते २२ जून १९६९ दरम्यान सुमारे २ वर्ष २१ दिवस पहिल्यांदा प्रशासकीय कारकीर्द होती. आणि पुन्हा दि. ६ फेब्रुवारी १९८१ ते १२ मे १९८५ या कालावधीत साधारणता: ४ वर्षे ३ महिने प्रशासकीय कारकीर्द होती. असे यापूर्वी दोन वेळेला प्रशासकीय राजवट लागू करण्यात आली होती. १९६७ ते १९६९ आणि १९८१ ते १९८५ या सहा वर्षाच्या कालावधीत यापूर्वी ६ प्रशासकांनी कामकाज पाहिले. या कार्यकाळात एम. जी. सप्रे, डी. डी. रणदिवे, एस. के. जांबवडेकर, व्ही. के. कोल्हटकर, रमानाथ झा आणि ए. के. नंदकुमार या आयुक्तांनी प्रशासक म्हणून काम पाहिले. त्यांची कारकीर्द वैशिष्ट्यपूर्ण ठरली. रमानाथ झा यांच्या कार्यकाळातील अतिक्रमण विरोधात बेधडक कारवाईच्या आठवणी आजही सांगितल्या जातात. मार्च २०२२ पासून तिसऱ्यांदा प्रशासकीय राजवट लागू झाली. महापालिका लोकप्रतिनिधीची पाच वर्षाची मुदत संपल्याने राज्य शासनाकडून ८ मार्च २०२२ पासून प्रशासक म्हणून महापालिका आयुक्तांची नियुक्ती करण्यात आली. सुरुवातीच्या काळात आयुक्त पी. शिवशंकर यांनी प्रशासक म्हणून काम पाहिले. त्यांच्या बदलीनंतर दि. २१ नोव्हेंबर २०२२ पासून आजतागायत शितल तेली-उगले या प्रशासक तथा आयुक्तपदाची धुरा कार्यकुशलतेने सांभाळत आहेत.

विशेष म्हणजे मेडिकल हब म्हणूनही सोलापूर पुढे आले आहे. शहरात अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असलेली अनेक हॉस्पिटल निर्माण झाली आहेत. बायो वेस्ट वाहतुकीसाठी वाढवलेल्या दरावरून हॉस्पीटल असोसिएशनचे विरोध दर्शविला आहे.सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातही वेगळी ओळख जपली आहे. असे असले तरी नागरी मूलभूत प्रश्न पुर्णपणे सुटले नाहीत.

काळानुसार बदल होत आहेत. राजकीय इच्छाशक्ती अभावी नवे उद्योग आले नाहीत. सोलापूकरांनी रोजी - रोटीसाठी पडेल ते काम केले. आजही बहुतांश तशीच स्थिती आहे. स्मार्ट सोलापूर होत असताना खड्डेमय रस्ते धुळ यासह विविध समस्यांना तोंड द्यावे लागते आहे. राष्ट्रीय स्वच्छ वायु कार्यक्रमांतर्गत सुमारे २२ कोटी रुपयांच्या निधीतून विविध ठिकाणी कामे सुरू आहेत. धूळ मुक्त सोलापूर आणि पर्यावरण पूरक सोलापूर शहरासाठी ही योजना राबवली जात आहे. या योजनेअंतर्गत विविध ठिकाणी रस्ते आणि पर्यावरण पूरक सुशोभीकरण कामे प्रगतीपथावर आहेत.

### महापालिकेचा राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मान

सोलापूर स्मार्ट सिटीतील कामासाठी सोलापूरच्या सीईओ शितल तेली-उगले यांचा राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यामुळे सोलापूर महापालिकेच्या शिरपेचात हा मानाचा तुरा रोवला गेला. तसेच भारत सरकारच्या गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय अंतर्गत पंतप्रधान स्वनिधी व स्पार्क २०२३-२४ योजनेतील उत्कृष्ट कामकाजाबाबत सोलापूर महानगरपालिकेला देशात द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला. दिल्ली येथे महापालिका उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांनी हा पुरस्कार केंद्रीय मंत्री मनोहर लाल यांच्या हस्ते स्वीकारला.

### दृष्टिक्षेपात अशी आहे महापालिका

- महापालिकेचे एकूण क्षेत्रफळ - १७८ चौरस किलोमीटर
- एकूण वार्षिक अंदाजपत्रक - ११५७ कोटी रुपये
- एकूण कर्मचारी - सुमारे ३४००
- महापालिकेत ११२५ कर्मचारी - अधिकाऱ्यांची पदे रिक्त
- एकूण वेतनावरील खर्च- ४१ टक्के
- विविध ३१ संवर्गासाठी ३०२ पदाची भरती प्रक्रिया पूर्ण
- वेतन व भत्ते (पाणीपुरवठा व्यतिरिक्त) २२१ कोटी ८ लाख रुपये
- निवृत्तीवेतन, कुटुंबवेतन - ११७ कोटी ९३ लाख रुपये

सायबर क्राईममध्ये डिजीटल उपकरणे आणि नेटवर्क वापरून केलेल्या गुन्हेगारी क्रियाकलापांच्या विस्तृत श्रेणीचा समावेश होतो. या गुन्ह्यांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर करून फसवणुक, ओळख चोरी, डेटा भंग, संगणक व्हायरस, घोटाळे आणि इतर दुर्भावनापूर्ण कृत्यांमध्ये विस्तार करणे समाविष्ठ आहे. सायबर गुन्हेगार अनधिकृत प्रवेश मिळविण्यासाठी, संवेदनशील माहिती चोरण्यासाठी, सेवांमध्ये व्यत्यय आणण्यासाठी आणि व्यक्ती, संस्था आणि सरकार यांना आर्थिक किंवा प्रतिष्ठेची हानी करण्यासाठी संगणक प्रणाली आणि नेटवर्कमधील असुरक्षिततेचे शोषण करतात. सायबर गुन्ह्यांमध्ये संगणक फसवणुक, आर्थिक गुन्हे, घोटाळे, सायबरसेक्स तस्करी आणि जाहिरात फसवणुक यासह क्रियाकलापांच्या विस्तृत श्रेणीचा समावेश होतो.

# सायबर गुन्हेगार पासून सावधान...




श्रीशैल गजा
मो. ९०११५८०१००



## सायबर क्राइम म्हणजे काय ?...

सायबर क्राईम ही गुन्हेगारी कृती आहे जी एकतर संगणक, संगणक नेटवर्क किंवा नेटवर्क केलेले उपकरण लक्ष्य करते किंवा वापरते. बहुतेक सायबर गुन्हे हे सायबर गुन्हेगार किंवा पैसे कमवू इच्छिणारे हॅकर्स करतात. तथापि, अधूनमधून सायबर गुन्ह्यांमध्ये नफ्याव्यतिरिक्त इतर कारणांसाठी संगणक किंवा नेटवर्कचे नुकसान करण्याचा हेतू असतो. हे राजकीय किंवा वैयक्तिक असू शकतात. सायबर गुन्हे व्यक्ती किंवा संस्थांद्वारे केले जाऊ शकतात. काही सायबर गुन्हेगार संघटित आहेत, प्रगत तंत्र वापरतात आणि अत्यंत तांत्रिकदृष्ट्या कुशल असतात. इतर नवशिक्या हॅकर्स आहेत.

### सायबर क्राइमचे प्रकार कोणते आहेत?...

१. ईमेल आणि इंटरनेट फसवणूक.

२. ओळख फसवणूक (जेथे वैयक्तिक माहिती चोरली जाते आणि वापरली जाते).

३. आर्थिक किंवा कार्ड पेमेंट डेटाची चोरी.

४. कॉर्पोरेट डेटाची चोरी आणि विक्री.

५. सायबर लुटणे (धोकादायक हल्ला टाळण्यासाठी पैशांची मागणी करणे).

६. रॅन्समवेअर हल्ले (सायबर लुटण्याचा एक प्रकार).

७. क्रिप्टोजॅकिंग (जेथे हॅकर्स त्यांच्या मालकीच्या नसलेल्या संसाधनांचा वापर करून क्रिप्टोकरन्सीची खाण करतात).

८. सायबर हेरगिरी (जेथे हॅकर्स सरकारी किंवा कंपनीच्या डेटामध्ये प्रवेश करतात).

९. नेटवर्कशी तडजोड करणाऱ्या प्रणालींमध्ये हस्तक्षेप करणे.

१०. कॉपीराइटचे उल्लंघन.

११. बेकायदेशीर जुगार.

१२. अवैध वस्तूंची ऑनलाइन विक्री.

१३. बाल पोर्नोग्राफी मागणे, निर्माण करणे किंवा बाळगणे.

### सायबर गुन्ह्यात खालीलपैकी एक किंवा दोन्हीचा समावेश होतो...

व्हायरस आणि इतर प्रकारचे मालवेअर वापरून संगणकांना लक्ष्य करणारी गुन्हेगारी क्रिया आणि इतर गुन्हे करण्यासाठी संगणक वापरून गुन्हेगारी क्रियाकलाप.

सायबर गुन्हेगार जे संगणकांना लक्ष्य करतात ते त्यांना मालवेअरने संक्रमित करू शकतात. जेणेकरून ते



उपकरणांचे नुकसान करू शकतील किंवा त्यांचे कार्य थांबवू शकतील. ते डेटा हटवण्यासाठी किंवा चोरी करण्यासाठी मालवेअर देखील वापरू शकतात. किंवा सायबर गुन्हेगार वापरकर्त्यांना वेबसाइट किंवा नेटवर्क वापरण्यापासून रोखू शकतात किंवा एखाद्या व्यवसायाला त्यााच्या ग्राहकांना सॉफ्टवेअर सेवा प्रदान करण्यापासून रोखू शकतात, ज्याला इतर गुन्हे करण्यासाठी संगणकाचा वापर करणाऱ्या सायबर गुन्ह्यांमध्ये मालवेअर, बेकायदेशीर माहिती किंवा बेकायदेशीर प्रतिमा पसरवण्यासाठी संगणक किंवा नेटवर्क वापरणे समाविष्ट असू शकते. सायबर गुन्हेगार अनेकदा एकाच वेळी दोन्ही करत असतात. ते प्रथम व्हायरस असलेल्या संगणकांना लक्ष्य



करू शकतात आणि नंतर इतर मशीनवर किंवा संपूर्ण नेटवर्कमध्ये मालवेअर पसरवण्यासाठी त्यांचा वापर करू शकतात. काही अधिकार क्षेत्रे सायबर गुन्ह्यांची तिसरी श्रेणी ओळखतात. जिथे संगणकाचा वापर गुन्ह्यांसाठी सहायक म्हणून केला जातो. चोरीचा डेटा साठवण्यासाठी संगणक वापरणे हे याचे उदाहरण आहे.

### सायबर गुन्ह्यांची उदाहरणे...

सायबर गुन्हेगारांद्वारे वापरल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या सायबर क्राइम हल्ल्याची काही प्रसिद्ध उदाहरणे आहेत :

**१. मालवेअर हल्ला...**

मालवेअर हल्ला म्हणजे संगणक प्रणाली किंवा नेटवर्क संगणक व्हायरस किंवा इतर प्रकारच्या मालवेअरने संक्रमित होते. मालवेअरने तडजोड केलेला संगणक सायबर गुन्हेगारांद्वारे अनेक उद्देशांसाठी वापरला जाऊ शकतो. यामध्ये गोपनीय डेटा चोरणे, इतर गुन्हेगारी कृत्ये करण्यासाठी संगणक वापरणे किंवा डेटाचे नुकसान करणे यांचा समावेश आहे. मालवेअर हल्ल्याचे एक प्रसिद्ध उदाहरण म्हणजे रॅन्समवेअर हल्ला, मे २०१७ मध्ये केलेला जागतिक सायबर गुन्हा. हा रॅन्समवेअरचा एक प्रकार आहे, मालवेअर हा खंडणीसाठी पीडिताचा डेटा किंवा डिव्हाइस रोखून पैसे उकळण्यासाठी वापरला जातो. रॅन्समवेअरने मायक्रोसॉफ्ट विंडोज चालवणाऱ्या संगणकांमधील असुरक्षिततेला लक्ष्य केले. जेव्हा हल्ला झाला तेव्हा १५० देशांमध्ये २ लाख ३० हजार संगणक प्रभावित झाले. वापरकर्त्यांना त्यांच्या फायली लॉक केल्या गेल्या आणि त्यांना पुन्हा प्रवेश मिळवण्यासाठी बिट कॉइन खंडणी देण्याची मागणी करणारा संदेश पाठवला. जगभरात, सायबर क्राइममुळे ४ अब्ज आर्थिक नुकसान झाल्याचा अंदाज आहे. आजपर्यंत, हा हल्ला त्याच्या आकार आणि प्रभावासाठी वेगळा आहे.

**२. फिशिंग...**

फिशिंग मोहीम म्हणजे जेव्हा स्पॅम ईमेल किंवा इतर प्रकारचे संप्रेषण, प्राप्तकर्त्यांना फसवून त्यांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करण्याच्या उद्देशाने पाठवले जाते. फिशिंग मोहिमेच्या संदेशांमध्ये संक्रमित संलग्नक किंवा दुर्भावनापूर्ण साइटच्या लिंक असू शकतात किंवा ते प्राप्तकर्त्यास गोपनीय माहितीसह प्रतिसाद देण्यास सांगू शकतात. फिशिंग घोटाळ्याचे एक प्रसिद्ध उदाहरण २०१८च्या विश्वचषकादरम्यान घडले. आमच्या अहवालानुसार, २०१८ फ्रॉड वर्ल्ड कप, वर्ल्ड कप फिशिंग स्कॅममध्ये फुटबॉल चाहत्यांना पाठवलेल्या ईमेलचा समावेश होता. या स्पॅम ईमेलने चाहत्याांना मॉस्को येथे खोट्या मोफत सहलींद्वारे मोहित करण्याचा प्रयत्न केला, जिथे विश्वचषक आयोजित केला जात होता. ज्या लोकांनी या ईमेलमधील लिंक उघडल्या आणि त्याावर क्लिक केले त्याांचा वैयक्तिक डेटा चोरीला गेला. तुमचा आमच्या वेबसाइटचा अनुभव अधिक चांगला करण्यासाठी आम्ही कुकीज वापरतो. ही वेबसाइट वापरून आणि पुढे नेव्हिगेट करून तुम्ही हे स्वीकारता. या वेबसाइटवर कूकीजच्या वापराविषयी तपशीलवार माहिती अधिक माहितीवर करून उपलब्ध आहे ज्या फिशिंग मोहिमेचा आणखी एक प्रकार भाला-फिशिंग म्हणून ओळखला जातो. या लक्ष्यित फिशिंग मोहिमा आहेत. ज्या विशिष्ट व्यक्तींना ते काम करत असलेल्या संस्थेची सुरक्षा धोक्यात आणण्याचा प्रयत्न करतात. मास फिशिंग मोहिमांच्या विपरीत, जे शैलीत अगदी सामान्य आहेत, भाला-फिशिंग संदेश सामान्यतः विश्वसनीय स्त्रोताच्या संदेशांसारखे दिसण्यासाठी तयार केले जातात. उदाहरणार्थ, ते सीईओ किंवा आयटी व्यवस्थापकाकडून आलेले असल्यासारखे बनवले जातात. ते बनावट आहेत असे कोणतेही दृश्य संकेत असू शकत नाहीत.

**३. वितरित हल्ले...**

डिस्ट्रिब्युटेड हल्ला हा एक प्रकारचा सायबर क्राइम हल्ला आहे. ज्याचा वापर सायबर गुन्हेगार सिस्टम किंवा नेटवर्क खाली आणण्यासाठी करतात. काहीवेळा कनेक्ट केलेले (इंटरनेट ऑफ थिंग्ज) डिव्हाइसेसचा वापर वितरीत हल्ले सुरू करण्यासाठी केला जातो. कनेक्शन विनंत्यांसह सिस्टमला स्पॅम करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मानक संप्रेषण प्रोटोकॉलपैकी एक वापरून हल्ला सिस्टमला व्यापून टाकतो. सायबर क्रिमिनल जे सायबर लुटत आहेत ते पैशाची मागणी करण्यासाठी हल्ल्याची धमकी वापरू शकतात. वैकल्पिकरित्याा, सायबर गुन्ह्यांचा दुसरा प्रकार घडत असताना डीडीओएसचा उपयोग विचलित करण्याची युक्ती म्हणून केला जाऊ शकतो. या प्रकारच्या हल्ल्याचे एक प्रसिद्ध उदाहरण म्हणजे यूके नॅशनल लॉटरी वेबसाइटवरील २०१७ हल्ला. यामुळे लॉटरीची वेबसाइट आणि मोबाइल ॲप ऑफलाइन झाले. ज्यामुळे यूकेच्या नागरिकांना खेळण्यापासून रोखले गेले. हल्ल्यामागील कारण अद्याप अज्ञात आहे. तथापि, हा हल्ला राष्ट्रीय लॉटरीला ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न असल्याचा संशय आहे.

### सायबर गुन्ह्यांचा प्रभाव...

साधारणपणे सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ होत आहे. स्टेट ऑफ सायबर सिक्युरिटी रेझिलिन्स २०२१च्या




अहवालानुसार, २०२० ते २०२१ पर्यंत सुरक्षा हल्ल्यांमध्ये ३१% वाढ झाली आहे. प्रति कंपनी हल्ल्यांची संख्या दरवर्षी २०६ वरून २७० पर्यंत वाढली आहे. कंपन्यांवरील हल्ले व्यक्तींवरही परिणाम करतात. कारण त्यांच्यापैकी अनेक ग्राहकांकडून संवेदनशील डेटा आणि वैयक्तिक माहिती संग्रहित करतात. एकच हल्ला. मग तो डेटा भंग, मालवेअर, रॅन्समवेअर किंवा हल्ला असो. सर्व आकाराच्या कंपन्यांना सरासरी २ लाख खर्च करावा लागतो आणि अनेक प्रभावित कंपन्या हल्ल्याच्या सहा महिन्यांच्या आत व्यवसायातून बाहेर पडतात, असे विमा कंपनी नुसार. जेव्हलिन स्ट्रॅटेजी अँड रिसर्चने २०२१ मध्ये आयडेंटिटी फ्रॉड स्टडी प्रकाशित केला. ज्यामध्ये असे आढळून आले की वर्षभरातील ओळख फसवणुकीचे नुकसान एकूण ५६ अब्ज होते. व्यक्ती आणि कंपन्या दोघांसाठी, सायबर गुन्ह्यांचा प्रभाव खोलवर असू शकतो. प्रामुख्याने आर्थिक नुकसान, परंतु विश्वास आणि प्रतिष्ठेचे नुकसान देखील.

### सायबर गुन्ह्यांपासून स्वत:चे संरक्षण कसे करावे...


सायबर गुन्ह्यांची व्याप्ती पाहता सायबर गुन्हे कसे थांबवायचे असा प्रश्न तुम्हाला पडला असेल? सायबर गुन्ह्यांपासून तुमचा संगणक आणि तुमचा वैयक्तिक डेटा संरक्षित करण्यासाठी येथे काही समजूतदार टिपा आहेत-

१. सॉफ्टवेअर आणि ऑपरेटिंग सिस्टम अपडेट ठेवा.

तुमचे सॉफ्टवेअर आणि ऑपरेटिंग सिस्टीम अद्ययावत ठेवल्याने तुमच्या कॉम्प्युटरचे संरक्षण करण्यासाठी तुम्हाला नवीनतम सिक्युरिटी पॅचचा फायदा होईल याची खात्री होते.

२. अँटी-व्हायरस सॉफ्टवेअर वापरा आणि ते अपडेट ठेवा.

अँटी-व्हायरस वापरणे किंवा सर्वसमावेशक इंटरनेट सुरक्षा उपाय वापरणे हा तुमच्या सिस्टमला हल्ल्यांपासून वाचवण्याचा एक स्मार्ट मार्ग आहे. अँटी-व्हायरस सॉफ्टवेअर तुम्हाला धमक्या समस्या होण्यापूर्वी स्कॅन करू, शोधू आणि काढून टाकू शकतात. हे संरक्षण योग्य ठिकाणी असल्याने तुमच्या संगणकाचे आणि तुमच्या डेटाचे सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण करण्यास मदत होते, तुम्हाला मनाचा आनंद मिळतो. सर्वोत्तम स्तरावरील संरक्षण प्राप्त करण्यासाठी तुमचा अँटीव्हायरस अपडेट ठेवा.





३. मजबूत पासवर्ड वापरा.

मजबूत पासवर्ड वापरण्याची खात्री करा. ज्याचा लोकांना अंदाज येणार नाही आणि ते कुठेही रेकॉर्ड करू नका. किंवा हे सोपे करण्यासाठी यादृच्छिकपणे मजबूत पासवर्ड तयार करण्यासाठी प्रतिष्ठित पासवर्ड व्यवस्थापक वापरा.

४. स्पॅम ईमेलमध्ये संलग्नक कधीही उघडू नका...

मालवेअर अटॅक आणि इतर प्रकारच्या सायबर गुन्ह्यांमुळे संगणक संक्रमित होण्याचा एक उत्कृष्ट मार्ग म्हणजे स्पॅम ईमेलमधील ईमेल संलग्नकद्वारे. तुम्हाला माहीत नसलेल्या प्रेषकाकडून संलग्नक कधीही उघडू नका.

५. स्पॅम ईमेल किंवा अविश्वासू वेबसाइट्समधील लिंकवर क्लिक करू नका.

लोक सायबर गुन्ह्यांचे बळी बनण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे स्पॅम ईमेल किंवा इतर संदेश किंवा अपरिचित वेबसाइटवरील लिंकवर क्लिक करणे. ऑनलाइन सुरक्षित राहण्यासाठी असे करणे टाळा.

६. सुरक्षित असल्याशिवाय वैयक्तिक माहिती देऊ नका.

ओळ किंवा ईमेल सुरक्षित असल्याची तुम्हाला पूर्ण खात्री असल्याशिवाय फोनवर किंवा ईमेलद्वारे वैयक्तिक डेटा कधीही देऊ नका. तुम्ही ज्या व्यक्तीशी आहात त्या व्यक्तीशी तुम्ही बोलत आहात याची खात्री करा.

७. संशयास्पद विनंत्यांसाठी थेट कंपन्यांशी संपर्क साधा.

तुम्हाला कॉल केलेल्या कंपनीकडून वैयक्तिक माहिती किंवा डेटा विचारला गेल्यास, हँग अप करा. तुम्ही त्यांच्याशी बोलत आहात आणि सायबर गुन्हेगार नाही याची खात्री करण्यासाठी त्यांच्या अधिकृत वेबसाइटवरील नंबर वापरून त्यांना परत कॉल करा. आदर्शपणे, एक वेगळा फोन वापरा कारण सायबर क्रिमिनल लाइन उघडू शकतात. जेव्हा तुम्हाला वाटते की तुम्ही पुन्हा डायल केले आहे, तेव्हा ते तुम्ही बोलत आहात असे तुम्हाला वाटते त्या बँकेचे किंवा इतर संस्थेचे असल्याचे भासवू शकतात

८. तुम्ही कोणत्या वेबसाइट ला भेट देता ते लक्षात ठेवा...

तुम्ही क्लिक करत असलेल्या वर लक्ष ठेवा. ते कायदेशीर दिसतात का? अपरिचित किंवा स्पॅम सारख्या दिसणाऱ्या सह लिंकवर क्लिक करणे टाळा. तुमच्या इंटरनेट सुरक्षा उत्पादनामध्ये ऑनलाइन व्यवहार सुरक्षित करण्यासाठी कार्यक्षमता समाविष्ट असल्यास, ऑनलाइन आर्थिक व्यवहार करण्यापूर्वी ते सक्षम असल्याची खात्री करा.

९. तुमच्या बँक स्टेटमेंटवर लक्ष ठेवा...

तुम्ही सायबर गुन्ह्यांचा पटकन बळी झाला आहात हे लक्षात घेणे महत्वाचे आहे. तुमच्या बँक स्टेटमेंटवर लक्ष ठेवा आणि बँकेसोबतच्या कोणत्याही अपरिचित व्यवहारांची चौकशी करा. त्यांची फसवणूक झाली आहे का याचा तपास बँक करू शकते.

### सात महिन्यात ११५० तक्रारी दाखल...

या सात महिन्यात ११५० तक्रारीची सायबर पोलिस ठाण्याला नोंद झाली आहे. चार कोटींचा फसवणूक २८० प्रकरणांत १५ लाखांचा लागला शोध लागला. केले एक कोटी १० लाख रुपये होल्ड करण्यात आले. सायबर गुन्हेगार कधी जनतेला प्रलोभन देऊन, तर कधी जनतेचा सायबर, ऑनलाईन व्यवहार बाबतीत अज्ञानाचा फायदा घेऊन सायबर चोरट्यांनी लोकांची आर्थिक फसवणूक करत आहेत. आत्तापर्यंत ३५० प्रकरणे निकाली काढली आहेत. या प्रकरणांतील जवळपास १४ लाख ४७ हजार रुपयांचा शोध लागला असून एक कोटी रुपयांची रक्कम होल्ड आहे. ही रक्कम परत मिळविण्यासाठी न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. दिवसेंदिवस सायबर गुन्हे करणारे गुन्हेगार अपडेट होत आहेत. पण सर्वसामान्य नागरिकांनी कोणत्याही अमिषाला बळी पडू नये. कोणतेही ऑनलाईन व्यवहार करताना काळजी घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर अश्लील संकेतस्थळ, चॅटिंग ॲप आणी शॉर्ट टर्म लोनवरून फसवणूक होत आहेत. अधिकृत ॲपचाच वापर करावा सध्या शेअर मार्केट मधील बोगस ॲप वरून बरेच लोकांची फसवणूक होत आहे. शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवताना अधिकृत ब्रोकर किंवा अधिकृत ॲप आणि वेबसाईट वरूनच ऑनलाईन व्यवहार करावा.

### ही घ्यावी काळजी...

-ऑनलाइन आर्थिक व्यवहारातील ओटीपी कुणालाही सांगू नका, बँका किंवा इतर संस्था ओटीपी मागत नाहीत.

-कुठल्याही ॲपवरुन आलेल्या लिंक खात्री करून क्लिक करा.

- सोशल मीडियावर आपल्या वैयक्तिक आयुष्यातील पोस्ट टाकू नये.

-आर्थिक फसवणूक झाल्याचे कळताच बँक व १९३० ऑनलाईन तक्रार आणी सायबर पोलिसांशी तत्काळ संपर्क साधा.


-फसवणूक झाल्यानंतर लागलीच तक्रार- दिल्यास फसवणूकीचे रक्कम परत मिळण्याची शक्यता आहे.

### या प्रकारच्या येतात तक्रारी...

नोकरीचे आमिषातून लूट, क्रिप्टोकरन्सी, इन्स्टंट लोन, इन्शुरन्स, शेअर मार्केट गुंतवणुक जादा परतावा अशा प्रकारचे आमिषे दाखवतात. ऑनलाइन खरेदी, बनावट संकेतस्थळ खात्री करावी. सायबर गुन्हेगार ऑनलाइन फ्रॉड करण्यासाठी मजूर व गरजू लोकांकडून बँक खाते वापरण्यासाठी घेतात. त्यांना महिन्याकाठी दोन ते ५ हजार रुपये दिले जातात. त्यामुळे कोणीही आपली बँक खाते वापरण्यास किंवा भाड्याने देवु नये.

सोशल मीडिया वापरताना संदेशाची खात्री करूनच ईतर लोकांना किंवा ग्रुपवर शेअर करावा. सायबर पोलीस ठाणे सोलापूर शहर लक्ष ठेवून आहेत. काही आक्षेपार्ह पोस्ट पाठवले तर नक्कीच त्यांच्यावर कारवाई होईल.

तसेच तलवार, पिस्टल, बंदूक अशा प्रकारचे शस्त्र घेऊन असलेले फोटोचे डीपी ठेवणे, स्टेटस ठेवणे तलवारने केक कापणे असे आढळून आल्यास अशा व्यक्तीना नक्कीच कारवाईला सामोरे जावे लागणार आहे.



# कीणी पत्रिबन देवस्थान, टेन्शन मुक्तिंचा ठिकाण!


बसवराज बिराजदार
मो. ७३८५३४६१८५



पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या सरहद्दीवरील सर्व धर्मीय श्रद्धास्थान जागृत श्री क्षेत्र श्रीमंतलिंग मल्लीनाथ पत्रिबन देवस्थान किणी हे जगातील एकमेव स्वयं बेलाची पवित्र स्थान आहे. आजही या पवित्र स्थानी कोणही आल्यास तात्काळ टेन्शन मुक्त होतो. शिव पार्वती मातेचे वास्तव्य असल्याने श्रावण व महाशिवरात्रीला येथे मोठी गर्दी होत असते.घटस्थापना पासून विजयादशमीच्या कालावधीत येथे मोठ्या उत्साहात नवरात्र महोत्सव साजरी केला जातो.

अक्कलकोट तालुक्यातील किणी. सुलतानपूर, चुंगी आणि तुळजापूर तालुक्यातील गुळहळ्ळी, दहिटणे या सरहद्दीवर बसलेले जागृत श्री श्रीमंतलिंग मल्लिनाथ पत्रिबन देवस्थान हे अक्कलकोट पासून २१ कि.मी. आणि नळदुर्ग पासून फक्त १६ कि.मी. अंतरावर बोरी नदीच्या काठावर वसलेले एकमेव जागृत शिव पार्वती देवीची पत्रिबन देवस्थान आहे.

हजारो वर्षापूर्वी पासून येथे स्वयं बेलाची पानाची झाडे आहेत. येथे हजारो ऋषीमुनी तपश्चर्या केलेली आहेत. पूर्वी होटगी मठाचे शिवाचार्य महाराज या ठिकाणी तपश्चर्या केलेले आहेत. या शिवाय कर्नाटक व महाराष्ट्रातील अनेक साधु-संतांनी या ठिकाणी तपश्चर्या केलेले आहेत. अजूनही अनेक साधु-संत या ठिकाणी तपश्चर्यासाठी येतात. येथील बेलांची वृक्षाला कन्नड मध्ये पत्रिबन म्हणतात.येथील बेलाची पानाच्या झाडाप्रमाणे अख्या जगात कोठेही. बेलाची झाड नाहीत. एका बेलाच्या पानाला तीन तीन, पाच पाच सात सात पान आहेत. या बेलाची झाडाची लागवण इतरत्र केल्यास वापत नाहीत. या दीड दोन एकरमध्ये बेलाची मुळे तुटले की तिथे एक बेलाची झाड तयार होती.या बाबत अनेक कृषी तज्ञ, शास्त्रज्ञ आदी जण अन्य ठिकाणी या बेलाची झाड लावले परंतु वापले नाहीत.या झाडांची फळे आणि बियाणे अन्य ठिकाणी लावले परंतु वापली नाहीत. सदर बेलाची झाड नवीन तयार करण्यासाठी भरपूर प्रयत्न केले तरी वापले नाहीत. या ठिकाणी अर्धांगवायु झालेला रुग्णास येथे आणल्यास पूर्णपणे बरा होतो. म्हणून येथून वर्षांतून शे पाचशे रुग्ण बरे होऊन जात आहेत. आजही या पवित्र ठिकाणी कोणही आल्यास तात्काळ टेन्शन मुक्त होतो.

तीनशे वर्षांपूर्वी एका ऋषीमुनींनी या ठिकाणी जिवंत समाधी घेतली आहे. समाधी घेतलेल्या ठिकाणीच्या खाली सोन्याची राजवाडा असल्याची अख्यायिका आहे. या जिवंत समाधीवर एक हेमांडपती कोरीव दगड आहे. या हेमाडपंती दगडावर सूर्य, चंद्र, शिवलिंग आदी कोरलेले शिलालेख आहेत. येथे सात आठ फूट उंचीचे एक वारूळ होते. या वारुळ खाली सोन्याचा राजवाडा आहे. कीणी या गावास भंगार (सोनेचा) कीणी म्हणून ओळखले जात आहे. कन्नडमध्ये भंगार ला सोनं म्हणतात.या सोनियांच्या राजवाड्यांच्या संरक्षणासाठी एक भला मोठा नागराज वास्तव्यास होते. यामुळे या ठिकाणी रात्री तर सोडा दिवसाही कोणीही फिरकत नव्हते.सन १९९६ पूर्वी या भला मोठा नागराजच्या भीतीने सहसा या ठिकाणी कोणी फिरकत नव्हते. पण सण उत्सव दिवशी अनेकांनी भीत भीत या ठिकाणी लांबुनच नावैद्य दाखवून पळून जात होते.

सन १९९७ मध्ये श्रावण महिन्यात जय भारत माता सेवा समिती नवी दिल्लीचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष तथा सदगुरु श्री ओम हवा मल्लिनाथ महाराजांनी येथे अचानक रात्री १२ वाजता येवून या भल्या मोठे सात आठ फुटाचे वारुळ वर उभे राहिले आणि या वारुळ वर हात फिरविले. लगेच दुसऱ्या दिवसापासून हे वारुळ हळू हळू खाली उतरून जमीन लेवल झाले.तेव्हा पासून येथील भीती नाहीशी झाली. यानंतर शनिवार दि. ११ ऑक्टोबर १९९७ रोजी दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर सदगुरु श्री ओम हवा मल्लिनाथ महाराजानी या ठिकाणी शिवलिंगांची स्थापना केली. तेव्हा पासून दर वर्षी येथे श्रावण आणि महाशिवरात्रीला भाविक भक्तांची मोठी गर्दी होत असते. नवरात्र घटस्थापना पासून विजयादशमीच्या कालावधीत यात्रा महोत्सव मोठ्या उत्साहात भरले जाते.



















